नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

युगवाणी विशेषांक


ऑक्टो-६९ (म. गांधी जन्मशताब्दी)

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

म. गांधी जन्मशताब्दी विशेषांक



राष्ट्रपिता पू. महात्मा गांधी

वर्ष २४ अंक ६

ऑक्टोबर १९६९

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २४] ऑक्टोबर १९६९ [अंक ६

म. गांधीजन्मशताब्दि विशेषांक

अंतरंग

संपादक
शं. बा. शास्त्री

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर–१

या अंकाची किंमत : रुपये दोन

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

‘ दे–इझम् ’पासून मुक्त व्हा !

—विनोबा

[१० ऑगस्ट, १९६९ रोजी रांची येथे अखिल भारतीय झारखंड पार्टीच्या कार्यकारिणीपुढे विनोबांनी प्रचलित राजनीतीच्या व्यर्थतेबद्दल आणि खऱ्या लोकतंत्राच्या निर्मितीसाठी लोकनीतीची कशी आवश्यकता आहे ह्या संबंधी उद्बोधक आणि मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले. देशाच्या आजच्या चिंताजनक परिस्थितीत विनोबांचे हे विचार प्रत्येक विचारशील नागरिकाला मननीय असे वाटतील.

प्रारंभाला प्रथम [illegible] झारखंड पार्टीच्या अध्यक्षांनी आपल्या झारखंड आंदोलनाला विनोबांचा आशीर्वाद असावा अशी विनंती केली. “आजवर आमचे कोणीच भले केले नाही. आता झारखंडाचे निराळे राज्य उभे करून आम्ही आपल्या पायावर उभे राहण्याची इच्छा व्यक्त करीत आहोत. आपण आम्हाला शोषणापासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावा ” अशी विनंती त्यांनी केली. त्या अनुषंगाने विनोबाजी जे काही म्हणाले ते येथे मुद्दाम उद्धृत करीत आहोत. कारण हे विचार केवळ झारखंडाची मागणी करणाऱ्यांपुरतेच मर्यादित नसून संपूर्ण भारत–वासीयांनाच मार्गदर्शक ठरतील असे आम्हाला वाटते.

—संपादक]

आपण झारखंडासंबंधीचा प्रश्न पुढे ठेवला. जेथपर्यंत माझा स्वतःचा संबंध आहे तेथपर्यंत माझा ह्या असल्या ‘ खंडां ’वर विश्वास नाही हे मी सांगून टाकतो. हा ‘ पोलिटिकल ’ म्हणजे राजकीय विचार आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत भारतात अनेक प्रांत बनले आणि नष्ट झाले. मुख्य गोष्ट आहे ती प्रांत निर्माण होण्याची नाही, तर जन-शक्ती, लोक-शक्ती निर्माण झाली पाहिजे ही आहे. झारखंड निर्माण झाले तर काय होईल ? काही माणसांना गव्हर्नर वगैरे बनण्याचा अवसर मिळेल, पण जनता मात्र होती तिथेच राहील. इंग्लंडमधील एका मित्राने मला पत्र लिहिले आहे त्यावरून मला ह्या बाबतीत एक मोठाच पुरावा मिळाला. त्याने पत्रात लिहिले आहे,–“ तुमच्या ह्या आंदोलनाची आम्हाला इंग्लंडमधे गरज आहे, एवढेच नाही तर, साऱ्या जगाला आज त्याची गरज आहे, कारण तुम्ही लोक-शक्ती उभारण्याच्या कामी लागलेले आहात. आज जगात कुठे कम्युनिझम् आहे तर कुठे फॅसिझम्; कुठे सोशॅलिझम् आहे तर कोठे वेल्फेअरिझम्. अशा प्रकारचे तऱ्हेतऱ्हेचे ‘ इझम् ’ म्हणजे वाद आज सुरू आहेत. पण खरे पाहिले असता सर्वत्र चालू आहे तो एकच ‘ इझम् ’–एकच वाद आहे. तो आहे “ दे-इझम् ” (They-ism). दे विल डू फॉर अस्–म्हणजे आमच्यासाठी काही करायचे ते ‘ ते ’ (They) करतील. कारण आमचे काम चालविणे आमच्या स्वतःकडून होत नाही. स्वतःचे कल्याण आम्ही स्वतःच्या हातांनी साधू शकत नाही. ते आहे दुसऱ्या काही लोकांच्या हाती ! काम करायचे ते त्यांनी करावे. एक तर विलसन आमचे भले करील, नाही तर त्याचे कॅबिनेट; नाही तर माओ आमचे भले करील. वगैरे वगैरे. ह्याचा अर्थ एवढाच की आमचे भले करण्याची शक्ती आमच्या हातात नाही. आमचे बरे-वाईट करणारा कोणी तरी दुसराच आहे. ह्यालाच म्हणतात “ दे-इझम् ”. ह्या ‘ दे-इझम् ’ पासून तुम्ही लोकांना मुक्ती मिळावी अशी इच्छा करता, आणि खरी शक्ती आहे ती तुमच्याच हातात आहे ही गोष्ट तुम्ही लोकांना समजावून सांगत आहात. लोकांचे आपले स्वतःचे राज्य स्थापित झाले पाहिजे. ” ही गोष्ट माझ्या त्या इंग्रज मित्राने आपल्या पत्रात लिहीली आहे. गावा-गावात ग्रामसभा निर्माण व्हाव्या, सर्वांच्या इच्छानुकूलतेने गावाचा कारभार चालावा, सारी

जमीन संपूर्ण गावाची व्हावी, ग्रामसभेकडून मदत मिळो अथवा न मिळो पण गावचे उद्योग-धंदे गावातच चालावे, गावे आपल्या वळावरच सर्व कामे उरकीत असावी, अशी माझी इच्छा आहे. ह्यालाच लोकराज्य म्हणतात. अशा प्रकारचे लोकराज्य आज भारतातही नाही आणि इंग्लंडमधेही नाही, ते चीनमधेही नाही आणि रशियातही नाही.

समजा, तुमचे झारखंड निर्माण झाले, तर काय होईल ? काही काळापूर्वी महाराष्ट्र आणि गुजरात एकच होते. दोघे निरनिराळे व्हावे ह्यासाठी तेथे खूप मोठी चळवळ झाली. शेवटी त्यांच्या मागणीप्रमाणे दोघे वेगळे झाले. पण गावा-गावातून राहणाऱ्या गरीबांचे प्रश्न काही सुटले नाहीत. झाले ते एवढेच की, अमुक क्षेत्राच्या मर्यादा इकडे असाव्यात की तिकडे एवढे नकाशावर रेखाटून दाखविले गेले. पॉलिटीक्सवर-राजनीतीवर विश्वास ठेवणाऱ्यांना मी वीस वर्षांचा अवधी दिला होता. तुम्हाला काय करता येणे शक्य आहे ते वीस वर्षांच्या अवधीत करून दाखवा, असे मी म्हणालो होतो. पण या वीस वर्षांत कांग्रेसनेही काही करून दाखविले नाही, आणि विरोधी पक्षांनीही काही केले नाही. वीस वर्षांत काय झाले ? "पर कॅपिटा प्रॉडक्शन" म्हणजे व्यक्तीगणिक उत्पादन घटले. धान्य, फळे, भाज्या यांचे उत्पादन कमी झाले आहे आणि व्यक्तीगणिक दारू, सिगरेट, सिनेमा वगैरेंचा खर्च वाढला आहे. सारे काही ठरते ते तिथे, पाटण्यात. हे पाटण्यातले किंवा दिल्लीतले लोक आमचे काही भले करतील अशी वाट पाहता-पाहता सर्वसामान्य जनता आता थकली. बिहारमध्ये काय खेळ चालला आहे तो तुम्ही पाहताच आहात. येथे पाच वर्ष-पर्यंत कोणतेही मंत्रिमंडळ टिकतच नाही. पाच तर सोडाच पण दोन वर्षे, दोन महिने सुद्धा ते टिकत नाही–आणि आता तर दहा दिवससुद्धा ते टिकून राहू शकत नाही. अशा अवस्थेत झारखंड निराळे निर्माण झाले, तर काय होईल ? रांची म्हणा किंवा जमशेटपूर म्हणा अशा कुठल्या तरी एका ठिकाणी राजधानी उभारली जाईल, आणि मग लोक म्हणायला लागतील–"आमचे मुक्ती-दाता रांचीत बसले आहेत, ते आम्हाला मुक्ती देणार !" दुसरे काय ? अशा रीतीने इकडे हे गावचे लोक हताश होऊन स्वस्थ बसून राहणार. म्हणून माझे म्हणणे असे की, झारखंड निर्माण करायचे असेल, तसे करणे तुम्हाला बरे वाटत असेल, तर बनवा झारखंड. उर्दूमध्ये एक शेर आहे.—

> **अगर यूं हुआ तो क्या हुआ ।**
> **और अगर यूं हुआ तो क्या हुआ ? ॥**

—हे झाले काय आणि ते झाले काय, लोक म्हणणार एकच,–काहीही झाले नाही; कारण पहिल्याने आमचे नशीब अमक्याच्या हाती होते, आता ते अमक्याच्या हातात गेले एवढेच.

जर झारखंड बनले तर काय होईल ? आज झारखंड बनावे म्हणून सारे आदिवासी एक झाले आहेत; पण ते एकदा निर्माण झाले की त्यांचे पुन्हा तुकडे पडणार, दरोडा टाकीपर्यंत सारे दरोडेखोर एक असतात, आणि त्यानंतर मग त्यांच्यात होतो झगडा सुरू—मला इतका वाटा मिळाला पाहिजे, तुला इतका. भारताची अगदी अशीच गत झाली. स्वातंत्र्य मिळे-पर्यंत सारेजण एक होते. पण स्वातंत्र्य हाती पडले, आणि गांधी एकीकडे तर जिना दुसरीकडे, अय्यंगार वेगळे आणि अंबेडकर निराळे ! दरोडा घालताना सारे एक होतात, पण मग हाती आलेल्या मालाचे हिस्से–वाटे करताना भांडणे सुरू होतात. त्याच प्रमाणे झारखंड निर्माण झाल्यानंतर कोणी म्हणायला लागतील माझी जात मुंडा आहे, मुंडा जातीला अमुक मिळाले पाहिजे; दुसरे म्हणतील, उराव जातीला ते मिळाले पाहिजे. मग पक्षापक्षाची भांडणे सुरू होतील, ख्रिश्चन आणि नॉन–ख्रिश्चन यांच्यात भांडणे सुरू होतील. म्हणजे, पहिल्याने भांडणांचे क्षेत्र जे विशाल होते ते आता संकुचित बनेल, आणि म्हणून भांडणे अधिकच तीव्र स्वरूप धारण करतील.

पॉलिटिक्स म्हणजे राजनीतीवर माझा विश्वास नाही. ज्यांचा विश्वास असेल त्यांना माझे सांगणे एवढेच,–करून पहा. त्यामुळे जर हित होणार असेल, तर करून पाहा. रामकृष्ण परमहंसांनी एकदा म्हटले होते,–पंचांगात लिहिलेले असते यंदा अशी अशी, इतकी वृष्टी होणार; पण पंचांग पिळून काढा, त्यातून पाण्याचा एक थेंबही खाली गळणार नाही. त्याच प्रमाणे तुम्ही मोठी राज्ये बनविली काय आणि लहान राज्ये बन-विली काय, त्यापासून फायदा कोणताच नाही. हल्ली आंध्रवाले लहान राज्याची मागणी करण्यासाठी दंगे करीत आहेत. तुम्हीही दंगे सुरू कराल तर तुमचेही

निराळे राज्य बनू शकेल. पण, तुमच्या बाबतीत प्रश्न थोडा अधिक गुंतागुंतीचा आहे. तुमचे म्हणणे आहे की, बिहार, ओरिसा आणि मध्यप्रदेश ह्या तीन राज्यातील आदिवासी क्षेत्राचे मिळून झारखंड निर्माण झाले पाहीजे. म्हणजे ह्या तीन्ही राज्यात दंगली माजणार आणि मग, तिकडे विदर्भ आणि सौराष्ट्रही स्तब्ध बसणार नाहीत.

मित्रांनो, आपल्याला करायचे तेवढे तुकडे करा. जोडायचे तितके जोडा. पण तुकडे पाडूनही काही होणार नाही आणि जोडूनही काही होणार नाही. गावा–गावातली शक्ती उभी केल्यानेच काम साधणार आहे. हा बाबाचा विश्वास आहे. त्या बाबतीत बाबाचे मत इतर सर्व राजनीतिज्ञांच्या मतापासून वेगळे आहे. बाबाचा विश्वास आहे की भारतात राजनैतिक सत्तेपासून काहीही प्राप्त होणार नाही. गेल्या वीस–बावीस वर्षांत ही गोष्ट सिद्ध होऊन चुकली आहे. जनतेने पाहिले,—काँग्रेसकडून काही काम होत नाही तर मग चला "टाँग्रस"कडे; आणि तेथून काही फल हाती पडत नाही असे पाहिले तेव्हा लोकांना वाटायला लागले,–कदाचित् "फाँग्रेस" काही करील. अशा रीतीने काँग्रेस, टाँग्रेस, फाँग्रेस सर्वांचीच परीक्षा आम्ही पाहिली. दुसऱ्यांच्या हवाली आपले नशीब सोपवून आम्ही स्वतःला नुसते लोंबकळत ठेवले.

लोक म्हणतात,—आमचे प्रतिनिधी सारे काही करतील. शाळा ते काढून देतील, साहित्याला प्रोत्साहन ते देतील, मिलिटरी, पोलिस, फायनान्स, कॉमर्स, सारी कामे ते करतील. ते करतील आणि मग आम्ही काय करणार ? आम्ही प्रजोत्पादन करीत राहणार ! अशी आहे ही आमची लाचारी. मला तर वाटते की लोक असे देखील म्हणायला कमी करणार नाहीत की आमच्या प्रतिनिधींनी आमच्यासाठी प्रजोत्पत्ती करावी आणि आम्ही मजेत आरामखुर्चीत लोळत पडावे. म्हणावे, अमुक आमच्या प्रतिनिधीने दहा मुले उत्पन्न केली आणि आम्ही दहा मुलांचे बाप बनलो ! ह्यापेक्षा अधिक गुलामीची, पराधीनतेची, अमानुषतेची परिसीमा होऊच शकत नाही. आजची आमची अवस्था रानटी जनावरांच्या अवस्थेपेक्षाही अधिक वाईट आहे. ही तर झाली मेंढ्या–बकऱ्यांसारखी अवस्था !

एकदा पंडित नेहरूने मला विचारले की, तुम्ही नेहमी लोकात हिंडता-मिसळता, तर सांगा, आम्ही जे प्लॅनिंग करतो म्हणजे योजना तयार करतो त्यांच्याबद्दल लोकांना उत्साह का वाटत नाही ? याचे कारण काय ? मी म्हणालो,—याचे उत्तर असे की, लोक म्हणजे काही बैल नाहीत. शेतकरी कधी आपल्या बैलाला विचारतो का की, बाबा रे, शेतात काय पेरायचे ? शेतकरी स्वतःच ठरवतो, मला गहू पेरायचा आहे; आणि मग तो बैलाला म्हणतो, चल रे गड्या शेतात ! बैलही म्हणतो,– मला चांगले खायला–प्यायला द्या, झाले. मला तेवढेच पुरे. माझे मत तुम्ही विचारू नका. तुम्ही दिल्लीवाले समजता, तुम्ही शेतकरी आहात आणि गावखेड्यातले लोक बैल आहेत. शेतकऱ्याने योजना तयार करायची आणि बैलांना म्हणायचे, तुम्ही माझ्यापाशी सहकार्य करा, मी तुम्हाला चांगले खायला–प्यायला देईन, तुमची नीट निगा राखीन. पण परमेश्वराची कृपा म्हणायची की, भारतातले लोक थोड्या फार प्रमाणात असले तरी पूर्णपणे अजून बैल बनलेले नाहीत. म्हणून माझे म्हणणे असे की, तुम्ही त्यांना त्यांची योजना तयार करू द्या. योजना तुम्ही तयार करणार आणि लोकांना म्हणणार 'सहकार्य द्या,' तर ते होणार नाही आणि शिवाय, तुम्ही योजनासुद्धा ज्या तयार करता त्या जर्मनी, अमेरिका वगैरेंचे मोठमोठाले ग्रंथ वाचून. तेथे काय चालले आहे हे पाहून इथे योजना तयार होतात. म्हणून गावखेड्यात या विषयासंबंधी उत्साह आढळत नाही.

मित्रांनो, राजनीतीच्याद्वारा आपला कार्यभाग सिद्ध होत नाही हे आपण पाहिले. तर मग आता प्रश्न असा की, ही कामी पडू शकणारी शक्ती तरी कोणती ? याला उत्तर म्हणजे, कार्यभाग साधू शकेल तो क्रांतीच्या मार्गाने. ही क्रांती दोन प्रकारची असू शकते. एकतर रक्त–रंजित क्रांती आणि दुसरी अहिंसक क्रांती. भारतात जर रक्तरंजित क्रांती शक्य झाली असती तर बाबाने तिला आशीर्वाद दिला असता आणि आजच्या अवस्थेपेक्षा ती रक्ताळलेली क्रांती अधिक बरी असे म्हटले असते. पण रक्तरंजित क्रांतीच्या नावावर इथे-तिथे काही दंगेधिंगे करणे आणि बाहेरच्या शक्तींना येण्यासाठी आमंत्रण देणे म्हणजे शुद्ध मूर्खपणा व्यतिरिक्त दुसरे काहीही नाही. नक्सलवाडीला मी गेलो होतो. तिथल्या लोकांना मी सांगितले,–तुम्ही मूर्ख आहात. धनुष्य-बाण हातात घेऊन तुम्ही क्रांती

करणार ? तुम्ही आणि आम्ही मिळून ज्या मिलीटरीच्या हाती अधिकार देऊन ठेवले आहेत ती मिलिटरी तुमचा पाहता-पाहता फडशा उडवून टाकील. धनुष्य-बाणांची तुमची ही क्रांती त्रेतायुगात चालू शकली असती. त्या काळात रामचंद्राच्या हातात धनुष्य होते, आणि दुसऱ्यांच्या हातात ते नव्हते. पण आज त्रेता-युग नाही. आज कलियुग आहे आणि हे कळ-युगही आहे. कळ म्हणजे मशीनचे हे युग आहे. मिलिटरीचे हे युग आहे. आण्विक शास्त्रांचे हे युग आहे. अशा परिस्थतीत जर तुम्ही हिंसात्मक क्रांती करायला निघालात तर काही दंगे-धोपे तेवढे करू शकाल आणि मग तिकडून पाकिस्तानचे आणि इकडून चीनचे आक्रमण सुरू होईल. याशिवाय दुसरे काहीही साध्य होणार नाही.

हे लक्षात घ्यायला पाहिजे की जगात तीन जातीच्या शक्ती काम करीत आहेत. एक आहे पॉलिटिक्सची शक्ती, दुसरी हिंसेची शक्ती आणि तिसरी अहिंसेची शक्ती. पॉलिटिक्सने काहीच साध्य होऊ शकत नाही हे आपण पाहिलेच. आज हिंसात्मक क्रांतीही शक्य नाही. मग अहिंसक क्रांतीशिवाय दुसरा मार्गच कोणता उरला ?

तुमच्यापैकी बरेचसे लोक ख्रिस्ती आहेत. जीसस ख्राईस्टचे म्हणणे होते की आपण अहिंसेने कार्य केले पाहिजे. तेव्हा तुम्हाला अधिक काही सांगण्याची गरज नाही. तुम्ही गावा–गावांतून शक्ती संगठित केली पाहिजे. आज गावांचे तुकडे पडलेले आहेत. तुम्ही म्हणता, पूर्वी ज्या जमिनी आमच्या हातातून छिनावून घेतल्या गेल्या होत्या त्या आमच्या हाती परत येऊ द्या, मग आम्ही ग्रामदान करू. पण माझे म्हणणे असे की जमिनी छिनावून घेतल्या त्या गेल्या कुठे ? काय इथली जमीन उडून पाटण्यात जाऊन बसली ? जमिनी आहेत तशा आपल्या जागेवरच आहेत. त्यांचे मालक मात्र दुसरीकडे बसलेले आहेत. म्हणून, जेथे ग्रामदान होईल तेथे जमिनीची मालकीही सर्वांचीच होईल. यासाठी मालक–मंडळीलाही त्यात सामिल व्हावे लागेल, ते जर गावात येणार नसतील तर त्यांना बहिष्कृत व्हावे लागेल आणि मग त्यांच्या जमिनी नांगरणार कोण ? मजूर लावायचे तर ते म्हणतील, आम्ही तर ग्रामसभेच्या आदेशाबरहुकूमच काम करणार. कोणा एका व्यक्तीचे काम आम्ही करणार नाही. मग तशा परिस्थितीत मालकांना ग्रामदानाच्या पुढे येणे भागच पडणार. ग्रामसभा त्यांना म्हणेल,— आम्ही तुमच्या जमिनी वाहून देऊ, पण उत्पन्नातला थोडा भाग तुमच्याकडे राहील आणि बाकीचा सारा भाग जाईल गावाला. आज जसा संपूर्ण उत्पन्नावर तुम्ही आपला हक्क लागू करता तसे चालायचे नाही. अशा रीतीने गावात ग्रामदानाची हाक जोर धरू लागली की, त्या जमिनीतून उत्पन्न होणारा सारा माल गावात वाटला जाईल. ज्या जमिनी तुमच्या हातातून छिनावून घेतल्या गेल्या आहेत त्या साऱ्या पुन्हा परत मिळवायच्या असल्या तरी संपूर्ण गावाला एक व्हावेच लागेल. संपूर्ण गावाच्या शक्तीचे संगठण करावे लागेल.

ह्या कामाची मला घाई लागलेली आहे. मी अशी घाई करण्याचे कारण काय ? पहिले कारण हे की भारताचे स्वातंत्र्य आज धोक्यात आले आहे असे वाटते. आज देशात जिकडे पाहावे तिकडे भांडणे आणि वेगळेचार यांचे थैमान सुरू असलेले दिसते. प्रांत, जाती, भाषा, धर्म, पक्ष या सर्वांच्या नावावर भेद मोकाट सुटले आहेत. मालक आणि मजूर यांच्यातही भांडण आहे. लोक असंतुष्ट आहेत म्हणून नक्सलवादी लोकांचे प्रयोग चालू शकतात. घेराव, हरताळ वगैरे सुरूच असतात. अशा परिस्थितीतच बाहेरच्या आक्रमणाचा संभव असतो. म्हणून आमच्या देशाचे स्वातंत्र्य आज धोक्यात आले आहे. देशाचे स्वातंत्र्य जर नष्ट झाले तर मग झारखंडही गेले आणि भारतखंडही गेले ! लोक मला म्हणतात, — आम्ही दंगे माजवीत आहोत, त्यासाठी आम्हाला तुमचा आशीर्वाद हवा. थोडा विचार करा. अशा दंगली माजवून काय होणार ? फक्त आपापसात हाणामारी, धामधूम ह्याशिवाय दुसरे काय होईल ? लोक मूर्ख आहेत; त्यांना कळत नाही. त्या आशीर्वाद मागायला आलेल्या लोकांना मी सांगितले, – माझा आशीर्वाद तुम्हाला मिळेल, पण एका अटीवर, – तुम्ही तुमच्या कामात सफल व्हाल, तर. पण तुम्ही सफल होणार नाही. समजा, रांचीत दंगा झाला. चार लाख लोकवस्तीपैकी दोन लाख कापले गेले. तरी दोन लाख माणसे शिल्लक उरलीच ना ? घरेदारे आणि जमिनीचे वाटप दोन लाखांमध्ये झाले तर बरेच झाले. नुकताच लखनऊमध्ये शिया आणि सुन्नी ह्या दोन जमातीत दंगे झाले. त्यात दहा–बारा माणसे गारद झाली. अगदी ताजी खबर आहे, म्हणे की आयर्लंडमधे दंगे झाले.

निदान ख्रिस्ती लोकांनी तर एक होऊन रहायचे ? पण तिथे प्राटेस्टंट आणि कॅथॉलिक लोकांत हाणामारी झाली. कारण काय तर म्हणे एकाच रस्त्यावरून दोघांच्याही मिरवणुकी निघायच्या होत्या. लोकांनी एकमेकांवर दगडा धोंड्यांचा वर्षाव केला. दहा-पंधरा लोक मारले गेले. अशा प्रकारचे दंगे माजवून काहीही निष्पन्न होणे नाही. समजा, भारतात अगदी जोरदार अंतर्युद्ध सुरू झाले, लोक अगदी जमून आपापसात लठ्ठालठ्ठी करू लागले, बिहारमधल्या पाच कोटी लोकांपैकी अडीच कोटी मारले गेले, भारतातल्या पन्नास कोटीपैकी पंचवीस कोटी लोक गारद झाले. तर प्लॅनिंग कमिशन म्हणेल, झाले ते चांगलेच झाले. आता लोकांना दुप्पट घरे आणि दुप्पट जमिनी मिळाल्या. आता आम्हाला प्लॅनिंग करणे अधिक सोयीचे झाले. पण हे दंगे करणारे लोक काय करतात ? फार झाले तर चार-दोन माणसांचा जीव घेतात. ही काय क्रांती झाली ? हे दंगे करणारे लोक आणखी दुसरे काय करतात ? ते मोटार-बसेस, आगगाड्या वगैरेंना जाळतात, म्हणजे ते राष्ट्राची संपत्ती नष्ट करतात. संपत्ती तशीच कायम ठेवून त्यांनी माणसांना ठार मारलं असतं तर काही प्रमाणात तो प्रश्न सुटला असता. पण हे लोक माणसांना कायम राहू देतात आणि संपत्ती तेवढी नष्ट करून टाकतात. नुकताच आंध्रात दंगा झाला, त्यात शंभर कोटींचे नुकसान झाले. आता तुम्हीच सांगा, ह्या दरिद्री देशात असे शंभर कोटींच्या संपत्तीचा नायनाट होणे, ह्याला काय म्हणावे ?

मित्रांनो, भारताबाहेरून आक्रमण होणार अशी मला भीती वाटते. हे आक्रमण कुठून सुरू होणार ते ठिकाणही मी पाहून आलो आहे. ते ठिकाण हिंदुस्थानचे "बॉटल-नेक" आहे. इकडे पाकिस्तान आहे, तिकडे नेपाळ, चीन आणि एके बाजूला आसाम, या ठिकाणावरून चीन आणि खालून पाकिस्तान हल्ले चढवतील. मग, बंगालमध्ये आतून दंगली माजतील आणि आसाम वेगळा पडेल. अशी व्यवस्था झाली की मग ब्रम्हपुत्रेच्या उत्तरेकडचा भाग चीन वळकावील आणि दक्षिणेकडचा भाग पाकिस्तान घशात घालील. मित्रांनो, बाबाला या कामाची घाई का लागली आहे ते मी तुम्हाला समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. बाहेरून आक्रमण होण्याचा संभव फार मोठा आहे आणि ते आक्रमण भारताच्या स्वातंत्र्याला धोक्यात आणण्याची फार मोठी शक्यता आहे. तो अनर्थ टळावा यासाठी मी म्हणतो त्याप्रमाणे हे कार्य लवकर पार पडणे अत्यंत आवश्यक आहे.

दुसरेही एक कारण आहे. ते तसे लहान आहे पण व्यक्तिगत स्वरूपाचे असल्यामुळे ते मोठे वाटते. बाबाचे वय आज चौऱ्याहत्तर वर्षांचे आहे. समजा, आज रात्री बाबा मेला, तसा त्याला मरण्याचा हक्कच आहे, कारण तो आता म्हातारा झाला आहे. लोकांना या गोष्टीचे दुःख वाटेल, खरे आहे. वर्तमानपत्रांतही लेख छापले जातील, — बाबा मेला, वाईट झाले. पण अकाली, कमी वयाचा असताना मेला असे काही कोणी म्हणणार नाही. सत्तर वर्षांच्या वरच्या लोकांना भारतातील लोकांच्याकडून पासपोर्ट मिळून जातो. बाबाला फ्रांस, जर्मनी, अमेरिकेचा नाही, परलोकाचा पासपोर्ट मिळाला आहे. मग बाबा अजूनही इथेच का थांबलेला आहे ? तिकडचा व्हिसा अजून यायचा आहे, म्हणून. व्हिसा आणि पासपोर्टसाठी होणारा विलंब होईल तितका होईल. तुम्ही तरुण आहात म्हणून तुम्ही म्हणता,-दहा वर्षांत काम पुरे होईल. पण बाबाला थोडेच मिळणार आहेत दहा वर्षे ? म्हणून ही घाई.

गांधी आणि तरुणांची चळवळ

— दादा धर्माधिकारी

सुरवातीलाच मला एक गोष्ट सांगायची आहे, ती ही की, मी येथे जे काही सांगणार आहे ते गांधी-तत्त्वज्ञानाविषयी नसून गांधींविषयीच सांगणार आहे. याचं कारणही मी पुढे स्पष्ट करीन.

काही दिवसांपूर्वी पूर्ण तीन आठवडे मी महाराष्ट्रामध्ये तरुणांच्या दर्शनासाठी एक प्रकारची तीर्थयात्रा करीत हिंडत होतो. महाराष्ट्रातल्या तारुण्याचे दर्शन घ्यावे, त्यांच्या आकांक्षा जाणून घेता आल्यास जाणून घ्याव्या, निदान त्यांच्या समोर आजच्या परिस्थितीचे विश्लेषण करावं आणि मग निष्कर्ष काढण्याचं त्यांच्यावर सोपवावं असा क्रम जवळ जवळ तीन आठवडे चालला. तीस भाषणे मी केली; आजचे हे एकतीसावं शेवटचं भाषण.

गांधींच्या तत्त्वज्ञानाबद्दल मी बोलू शकत नाही, बोलू इच्छितही नाही. त्याचं कारण, गांधींसंबंधीचं माझं अध्ययन जसं जसं वाढत गेलं तशी तशी माझी अशी खात्री होत गेली की, गांधींचं निश्चित असं तत्त्वज्ञान काही नव्हतंच. त्यांची काही निश्चित अशी विचारसरणी नव्हती. गांधी हा तत्त्वज्ञही नव्हता, विचारकही नव्हता. तो सत्यनिष्ठ होता. आणि जो सत्यनिष्ठ असेल तो तत्त्वनिष्ठ असू शकत नाही, तो विचारनिष्ठ असू शकत नाही. सत्याचा शोध घ्यायचा असतो. सत्याचं आकलन, सत्याचं दर्शन, माणसाला त्याच्या संस्कृतीप्रमाणं, त्याच्या बुद्धीच्या शक्तीप्रमाणं होत असते. आणि तो काही निष्कर्ष काढतो. काही सिद्धांत बांधतो. त्याला आपण "तत्त्वज्ञान" असं म्हणतो. म्हणून तत्त्वज्ञान अनेक असू शकतात. पण सत्य अनेक असू शकत नाही. सत्य अनेक झाली की ती असत्य होतात. तत्त्वज्ञानाचा प्रचार होऊ शकतो एवढेच. कोणा एका तत्त्वज्ञानं म्हटले आहे–Philosophy is a route on many roads leading from nowhere to nothing. त्यामुळे एक तत्त्वज्ञान दुसऱ्या तत्त्वज्ञानाच्या विरुद्ध उभे राहाते आणि तत्त्वज्ञानामध्ये संघर्ष होतो. हा विचार किंवा तत्त्वज्ञान जेव्हा संघटित होते, तेव्हा त्याचं नाव "संप्रदाय" असं होतं. संघटित विचार, संघटित तत्त्वज्ञान म्हणजे संप्रदाय. हा संप्रदाय आक्रमणशील झाला म्हणजे त्याला "वाद" म्हणतात. आणि हाच विचार किंवा तत्त्वज्ञान संघटित होऊन जेव्हा सत्ताधीन होतो, तेव्हा त्याला पक्ष असं नाव देण्यात येते. संघटित विचार म्हणजे कुंठित विचार, गोठलेला विचार, ज्या प्रवाहातून जिवंतपणा नाहीसा झालेला आहे असा विचार. जो सत्यनिष्ठ असेल तो त्यामुळे तत्वनिष्ठ किंवा तत्त्वज्ञाननिष्ठ होऊ शकत नाही. आणि म्हणून गांधींचे मित्र पोलक यांनी त्यांच्या संबंधात असं म्हटलं आहे की–His is an illusive personality म्हणजे, या माणसातली विभूती चंचल आहे. आत्ता हा इथे आहे, म्हणून त्याला स्पर्श करायला जावं तो पर्यंत तो सत्याच्या शोधात कुठल्या-कुठे निघून गेलेला असतो. तो काही हाताला लागत नाही. स्पर्श करायला कठीण आहे. म्हणून सुरवातीला माझी अशी विनंती आहे की आपल्या मनावर गांधी, मार्क्स, बुद्ध, ख्रिस्त, महंमद, नानक यांच्या पैकी कुणाच्याही विचारांचे संस्कार जर असतील तर कृपा करून माझ्या बरोबर गांधींचं अध्ययन करीत असतांना काही वेळ आपण ते बाजूला काढून ठेवावे. ते सगळे चष्मे आहेत. चष्म्यांना नंबर असला म्हणजे तो वस्तूचे सत्य दर्शन होऊ देत नाही. चष्मा वस्तु-दर्शनाच्या आड येत असतो. संप्रदाय, पुढारी, संस्था, संघटना, देवळे, मंदिरे ही सगळी माणसाच्या सत्यदर्शनामध्ये अंतराय आहेत. त्यामुळे या सगळ्यांच्या वर उठून शुद्ध बुद्धीने आपण समस्यांचं थोडंसं अध्ययन करा.

अनुक्रमणिका

शुद्ध बुद्धी म्हणजे uncormemitted intellect कुठल्याही तत्वज्ञानाच्या किंवा विचाराच्या आहारी न गेलेली बुद्धी. तटस्थ बुद्धी. तटस्थ बुद्धी म्हणजे जड किंवा उदासीन बुद्धी नव्हे, Indifferent नव्हे. ही बुद्धी अनासक्त, म्हणून नम्र आहे. ती Detatched किंवा अनासक्त आहे. तटस्थता म्हणजे तिचा नम्रपणा आहे. विनय आहे. हा विनय बुद्धीत आल्यावाचून सत्याचं दर्शन होत नाही. मी आपल्यासमोर गांधींच्या विचारांचा प्रचार करायला आलो नाही. तो गांधीचा अपमान होईल. आणि मला असेही सांगायचं आहे की, एकाच्या विचारांचा प्रचार दुसऱ्याने करू नये. ती salesmanship आहे. विचार हा अपौरुषेय आहे. ज्याचा–त्याचा आहे. आणि ज्याचा–त्याचा म्हणणे कुणाचाच नव्हे. या दृष्टीने आपण आज आजच्या समस्येचा विचार करणार आहोत, आणि त्या समस्येच्या संदर्भात गांधींची उपयुक्तता वाटली तर आपण गांधींचे आभार मानू, कृतज्ञताबुद्धी प्रगट करू, त्यापासून काही प्रकाश घेता आला तर घेऊ. आजच्या संदर्भात गांधींची उपयुक्तता जर आपल्याला वाटली नाही तर आपण त्यांचं श्राद्ध करू, खीर खाऊन मोकळे होऊ. शताब्दी आहे तेव्हा शताब्दीचा उत्सव करायला हरकत नाही, खीर खायलाही हरकत नाही.

आज जी समस्या आहे ती जागतिक समस्या आहे. The crux of to-days problem is that it is global. आजचा प्रश्न हा विश्व–प्रश्न आहे. आता या प्रश्नाला राष्ट्रीय किंवा स्थानीय स्वरूप राहिलेले नाही. प्रश्न सगळे जागतिक झालेले आहेत. ते कसे झाले आहेत, त्याला काय प्रमाणं आहेत, इतिहासाची साक्ष काय आहे, हा सगळा एक निराळा विषय असल्यामुळे त्याचे विश्लेषण मी करणार नाही. एक मात्र खरं. आज सगळे प्रश्न विश्व–प्रश्न आहेत, म्हणून या प्रश्नांचं अध्ययन करण्याची बुद्धी, दृष्टी, ती सुद्धा विश्व–व्यापी पाहिजे. त्यांची भूमिका विश्वाची पाहिजे, मानव्याची पाहिजे.

दोन अघटित घटना, जगाच्या इतिहासातील अपूर्व घटना, आता नुकत्याच घडल्या. एक घटना, माणूस चंद्रावर गेला. ही इतिहासातली अपूर्व घटना आहे. आपल्याला आपल्या मानव्याचं भूषण वाटावं, मानव्याचा गौरव वाटावा, अशी ही घटना आहे. जमिन आणि आस्मान यांच्यातलं अंतर मानवानं तोडून टाकलं जणू. ही घटना म्हणजे मानवात्मा, विश्वात्मा हर्षनिर्भर व्हावा अशी घटना. परंतु मानवाचं मत आणि विज्ञान यांच्यातली तफावत अजून नाहीशी झालेली नाही. विज्ञानाचा जितका विकास झाला, तितकीच मानवी संस्कृतीची पिछेहाट होत आहे की काय, अशी शंका वाटू लागली आहे. माणूस चंद्रावर गेला. त्याचा अभिमान मानवाला वाटला. पण जो माणूस तिथं गेला, त्याने तिथे निशाण उभारलं ते अमेरिकेचं. अमेरिकेचं निशाण फडकवलं, माणसाचं नाही. तो आपलं label विसरू शकला नाही. मी अमेरिकन आहे, मी रशियन नाही किंवा चायनीज नाही, हे तो विसरू शकला नाही. आणि म्हणाला काय ? मी शांततेच्या शोधार्थ इथे आलो आहे. निक्सन आज आपल्या देशात आला आहे. तोही म्हणाला, मी शांततेच्या शोधात इथं आलो आहे. मोठी गंमत आहे. आमच्या विनोबांचे धाकटे भाऊ आहेत. बाळकोबा त्यांचं नाव. त्यांना झोपच येत नव्हती. विनोबांकडे ते तक्रार करायला गेले की, मी रात्रभर झोपण्याचा प्रयत्न करतो, पण झोप काही येत नाही. विनोबा यावर म्हणाले, 'अरे वेड्या, प्रयत्नातच सारी रात्र निघून जाते. झोपेला संधीच मिळत नाही. दोन शांतिसैनिक एकदा एका–मेकाशी बोलत होते. एकाने विचारलं, Is there going to be another war ? यावर दुसरा म्हणाला, 'नाही. युद्ध तर होणार नाही, But the fight for peace will be so intense that no stone will be left unturned शांतते करताच इतकं भांडण होणार आहे की, सगळे दगड रस्त्यावर आल्यावाचून राहणार नाहीत. आजच्या जागतिक समस्येचं स्वरूप, तिची एक बाजू, तिचा एक पैलू हा असा आहे.

दुसरा पैलू आहे. सबंध जगात तारुण्याचं बंड सुरू झालं आहे, युवकांचा विद्रोह ! मी युवकांना म्हणालो, त्यात मी युवतींना सामील करीत नाही. दुर्दैवानं आजपर्यंतच्या ज्या समस्या आहेत, त्या मुलांच्या आहेत, मुलींच्या नाहीत. मुलींची आज देखील एकच समस्या आहे, ती म्हणजे लग्न किंवा Sex. यौन संबंध किंवा लग्न या खेरीज मुलींची समस्या जगामध्ये आजही नाही, क्रांतिकारी देशातही नाही.

म्हणून मी ज्यावेळी तरुणांची, तारुण्याची समस्या म्हणतो, त्यावेळी ती मुलांची समस्या आहे असा अर्थ आपण घ्यावा.

मे, १९६८ साली फ्रांसमध्ये या वेडाचा उद्रेक झाला, ज्याला "फ्रेंच रिव्होल्यूशन १९६८" असं नाव देण्यात आलं आहे. या वंडाच्या प्रवर्तकांनी आणि नेत्यांनी आपल्या वेडाचं विवेचन केलेलं आहे. त्यांनी आपला Manifesto–जाहीरनामा काढलेला आहे. या अशांत, प्रक्षुब्ध, अस्वस्थ, उच्छृंखल तरुणांमध्ये तीन वर्ग आहेत. एक आहे corner–boy sub–culture म्हणजे हा रुसलेला तरुण, रागावलेला तरुण, कुढणारा तरुण एका कोपऱ्यात बसला आहे समाजाच्या. तो आपलं हितगुज कुणाजवळ बोलत नाही, दुसऱ्याचं हितगुज जाणून घेण्याची त्याला इच्छा नाही. त्याची एकच आकांक्षा,–आज जो समाज अस्तित्वात आहे, त्या समाजात आपल्याला प्रतिष्ठेचं, मानाचं, उपयुक्ततेचं स्थान मिळालं पाहिजे. या समाजात प्रतिष्ठा आहे, या समाजात उपयुक्त स्थान मिळावं, एवढीच त्याची आकांक्षा. हा तरुण क्रांतिकारी तरुण नव्हे. आहे तसाच समाज त्याला हवा. फक्त त्यात त्याला प्रतिष्ठा हवी. हे तरुण convocation च्या वेळी म्हणाले, We don't want certificates, we want jobs हा corner–boy sub–cultureचा तरुण.

दुसरा वर्ग आहे Drop–outsचा. हे आहेत हिप्पीज, बिटनिक्स वगैरे यांची अनेक नावे आहेत. हे पलायनवादी आहेत,—Escopists. "We don't want to belong to any society"—आम्हाला कोणत्याही समाजाचं सभासद व्हायचं नाही; हा समाज आम्हाला नको. आम्हाला काम नको. असं त्यांचं म्हणणं. ते काम करीत नाहीत, काम करण्याची त्यांची इच्छा नाही. 'I hate all production' सगळ्या उत्पादक परिश्रमाचा मला तिटकारा आहे, असं याचं म्हणणं. त्यांना विचारायचं–'मग काय करतोस रे तू ?' यावर त्याचं म्हणणं, 'आम्ही फक्त जगतो', आणि जगतो !–That is the best thing to do जगणे हेच मुख्य आहे. तेवढंच आम्ही करतो." अन् मग, जगतो म्हणजे काम करतो ? L. S. D. घेतो. भांग, गांजा, मारिजुआना, आफू यांच्या सुधारलेल्या आवृत्त्या, ते घेत असतो. किंवा स्लीपिंग पिल्स. हे सारं टोकियोमध्ये, जपानमध्येही चालतं. रस्त्यावर, वाटेल तिथे मुलींच्या बरोबर हे लोक जातात, राहातात आणि ज्याला Break–up म्हणतात ते करतात.–Love–making हा मुलींचा प्रश्न नाही, असं मी का म्हणालो ? हे जे हिप्पीज आहेत, त्यांच्यापैकी पुष्कळसे असे आहेत की, ज्यांना हे अमली पदार्थ,या गोळ्या आणि त्या दिवशीचं जेवण त्या त्या क्षणाची मुलगी देत असते. ती कुठल्याही पुरुषाचं अनुरंजन करून थोडेसे पैसे मिळवते. त्या पेशात ह्या असल्या माणसाला ती जेऊ घालते. नशेच्या गोळ्या त्याला घेऊन देते. हे त्यांचं जीवन आहे. या हिप्पीजचा जॉन द बॅप्टिस्ट किंवा लिटररी फादर ज्याला म्हणता येईल, तो होता हेनरी मिलर. हा एक साहित्यिकांचा संप्रदायच आहे. हेनरी मिलर नंतर हेमिंग्वे, विल्यम फॉक्लंड, लेडी चॅटरलीज लव्हरचा लेखक डी. एच. लॉरेन्स, ह्या सगळयांचा हा संप्रदाय आहे. हा Existencialists पासून सुरू झालेला संप्रदाय–या हेनरी मिलरचं म्हणणं काय ?—तर "A world–wide revolution from top to bottom in all realins of human consciousness" माणसाच्या अवचेतनेच्या सर्व क्षेत्रात याला आमूलाग्र क्रांती हवी आहे. आणि या बीटनिक्सचं म्हणणं काय "Gurs is not a flight; ours is a search" आम्ही पलायनवादी नाही. "Man is not a product; not merely a social animal; at bottom he is a spirit." त्याला आत्मा आहे–at bottom आणि त्या आत्म्याच्या शोधार्थ त्यांच्यापैकी काही निघाले. तो शोध लागावा असा त्यांचा प्रयत्न.

तिसरा संप्रदाय आहे क्रांतीकारींचा, Street–corner sub–culture चा. म्हणजे, त्यांचे म्हणणे असे की आता सर्व चळवळी रस्त्यावर आल्या पाहिजेत. संस्था, संघटणा, पक्ष, यूनियन्स यांच्या आवारात आता चळवळ राहता कामा नये. सगळ्या चळवळी आवारातून बाहेर आल्या पाहिजेत. मर्क्सिस्ट्स, कम्यूनिस्टस् लेफ्टिस्टस् आणि एक्स्ट्रीम लेफ्टिस्ट्स् यांच्याही आवारातून आता चळवळ बाहेर पडली पाहिजे. क्रांती तर पाहिजे. क्रांती पक्षनिष्ठ राहता कामा नये. ती लोकनिष्ठ झाली पाहिजे. आम्हाला आमूलाग्र क्रांती

पाहिजे. आहे हा समाज माणसाला राहण्यासारखा नाही. ह्या समाजाच्या सगळ्या मूल्यांचा आम्ही इन्कार केलेला आहे. या समाजात आम्ही राहाणार नाही. To erase the old and to build the new from serop ! अगदी मुळापासून नवीन समाजाची उभारणी आम्ही करणार आहोत. चालू समाजाचा आम्ही विध्वंस करणार ही त्यांची प्रतिज्ञा. म्हणून, मजूरांची चळवळ यूनिअन्सच्या बाहेर पडून रस्त्यावर आली पाहिजे. विद्यार्थ्यांची चळवळ सुद्धा युनिअन्सच्या बाहेर पडली पाहिजे. पक्षाचे तर नावच राहिलं नाही. सगळ्याच चळवळी रस्त्यावर, चवाठ्यावर आल्या पाहिजेत. का ? तर त्या लोकनिष्ठ व्हाव्या म्हणून ह्या रस्त्यावरील चळवळीचे Prophets कोण आहेत ? त्यापैकी एक आहे शिनकारा. शिनकारा, ज्याने क्युबामध्ये कॅस्ट्रोबरोबर क्रांती केली. दुसरा आहे हो ची मिन्ह, व्हिएतनामचा. तिसरा आहे डॅनिअल फॅनविन्डिकिट, ज्याने फ्रांसमधे १९६८ साली क्रांतीचं निशाण फडकविलं. या सगळ्यांनी आपल्या क्रांतीचं वर्णन करणारी आणि त्यांच्या दिशेचे विश्लेषण करणारी पुस्तकं लिहिली आहेत. ही पुस्तके जेव्हा आपण बघतो तेव्हा आपल्याला दिसून येतं की, समाजात ज्याला आपण आतंकवादी, टॅरटिस्ट किंवा दहशतवादी म्हणतो तो हा क्रांतिकारी नव्हे. तिकडे जे हे घडत आहे, जे उत्पात, दंगे-धोपे, विध्वंस होतो आहे, तशा प्रकारचे दंगेधोपे, उपद्रव आपल्याही देशात होत आहेत. परंतु आपल्यामधे आहे ते फक्त स्ट्रीट-कार्नर कल्चर. आपल्या तरुणांमधे फक्त चवाठ्यांची संस्कृती आहे. उलट तिकडच्या तरुणांच्यासमोर एक उद्देश आहे. त्यांना आजचा समाज बदलायचा आहे का असा प्रश्न उत्पन्न होतो. What about the future ? असा प्रश्न केल्यास तो उत्तर देतो, We can not produce a blue-print-आमच्या जवळ आराखडा नाही. Future alone will be the wall-print ज्या वेळी परिस्थिती निर्माण होईल त्यातून आराखडा निर्माण होईल. But we have agreed on general principles नव्या समाजाची उभारणी ज्या तत्त्वावर केली जाईल, त्याबद्दल त्यांच्यात एकवाक्यता आहे. ही तत्त्वं कोणती ? १८७१ साली फ्रांसमधे एक असोसिएशन होतं. त्या असोसिएशनच्या उद्देशांचं वर्णन त्या वेळच्या असोसिएशनच्या संयोजकांत केलं आहे. आजचा क्रांतिकारक म्हणतो की ते उद्दिष्ट आणि आमचं उद्दिष्ट सारखं आहे. कुठलं उद्दिष्ट ? – To create a state that believes neither in government, nor in religion, nor in the army. असा समाज आम्ही निर्माण करू इच्छितो की ज्याचा प्रशासनावर, धर्मावर किंवा सैन्यावर विश्वास नसेल ! मार्क्स म्हणाला होता, — धर्म ही अफूची गोळी आहे. पण आजचा माणूस काय म्हणतो ? Religion has been reduced to pharmaceology which manufactures spiritual pills आध्यात्मिक गोळ्या या रस-शाळेत तयार होतात, लोकांना वाटण्यात येतात. त्या रस-शाळेचं नाव 'धर्म.' ही धर्माची आजची स्थिती आहे.

गांधींची जी उद्दिष्टे होती, ती आणि ही उद्दिष्टे यांच्यात जर फरक असला, तर आपण मला दाखवा. गांधी सुरुवातीला काय म्हणाला ? ईश्वर आहे हे सत्य आहे. पण मग त्याने काय बघितलं, त्याने बघितलं की देवळातला ईश्वर निराळा आहे, चर्चमधला, मशिदीतला, गुरुद्वारातला ईश्वर निराळा आहे. आणि हे सगळे ईश्वर एकमेकांच्या मुकाबल्यात उभे आहेत. ईश्वराच्या मुकाबल्यात जो उभा राहतो त्याचं नाव आहे सैतान. – ईश्वर ईश्वराविरुद्ध उभा राहिला म्हणजे सगळेच ईश्वर सैतान होऊन जातात. हे गांधींच्या लक्षात आलं. चर्च, देऊळ, मशीद ही आहेत ईश्वराची विशेषणं. तो देव तिथला, हा देव इकडचा, यांच्यात देव हा common factor आहे. तो cancel होऊन जातो आणि बाकीचं शिल्लक राहतं. म्हणून माझं म्हणणं असं आहे की, हे सगळे ईश्वर आपापल्या देवळात जरी नाहीत, तरी देवळाच्या बाहेर ते अवश्य यायला पाहिजेत. तरच ते देव राहू शकतील. म्हणून गांधींनी आपलं सूत्र पालटलं आणि नंतर सांगितलं,– सत्य हाच ईश्वर आहे. आज ज्या संघटित स्वरूपाचा धर्म आहे, त्या कर्माचा अर्थ आहे संप्रदाय – ही ख्रिश्चिनिटी नव्हे, ती चर्चिअॅनिटी आहे. Nearer the Church, farther from God संघटित धर्म हा ईश्वराभिमुख धर्म नसतो. संघटित धर्म हा लोकाभिमुख धर्म असतो. संघटित धर्म हा ईश्वर–विमुख धर्म असतो, लोक-विमुख धर्म असतो. म्हणून संघटित धर्मात तट पडतात. दुही माजते, कलह माजतो.

त्यामुळं गांधींने सामूहिक प्रार्थनेचा उपक्रम केला. ईश्वर हा एकच आहे, असा संकेत दिला.

सैन्य आणि सरकार यांच्या बाबतीत सगळ्या क्रांतिकारकांचे एकमत आहे. आपण कार्ल मार्क्सच्या प्रतिज्ञा पाही. कार्लमार्क्स हा क्रांतीचा जगातील पहिला पैगंबर जो मानव दडपलेला आहे. गांजलेला, परिवंचित आहे, ज्याचं सगळं गमावलेलं आहे, अशा मानवाचा हा पहिला पैगंबर. त्याने तीन गोष्टी सांगितल्या. एक तो म्हणाला, एक दिवस असा येईल की ज्या दिवशी गरीब-अमीर जगात राहणार नाही. मी पुष्कळ शोध घेतला, आणि मोठमोठ्या विद्वानांना विचारून पाहिले. पण कुठल्याही धर्मात अशी प्रतिज्ञा नाही. एक दिवस असा येईल की ज्या दिवशी गरीब-अमीर राहणार नाहीत. अशी प्रतिज्ञा मला कुणाच्याही धर्मात, धर्म-ग्रंथांत किंवा धर्मप्रवर्तकांच्या विचारात दिसून आली नाही.

दुसरी प्रतिज्ञा त्याने अशी केली की, एक दिवस असा येईल की राज्य राहणार नाहीत. महाभारतात अशा एका काळाचा उल्लेख आहे, ज्या वेळी राज्यही नव्हते, दंडही नव्हता. पण असा काळ पुढे येणार आहे, आणि या कलियुगात तो येणार आहे. Golden Age is not passed, it is ahead हे सत्ययुगामागे गेलेले नाही, ते पुढे येणार आहे, असा प्रत्यय काही कुठे प्रगट झालेला दिसला नाही. युद्धं, शस्त्रं राहणार नाहीत असाही एक दिवस येईल.

अहिंसा आहे. प्राण्यांचा वध करू नये-मांसाहार करू नये, इतकं सगळं मी वाचलं, येशू ख्रिस्ताचं एक वाक्य आहे-जो तलवार हातात घेईल त्याचा नाश तलवारीनेच होईल. पण त्या वाक्याकडे त्याच्या अनुयायाचं लक्ष गेलेलं नाही. तेव्हा, कुठल्याही धर्मात काही मार्क्सच्या यातील प्रतिज्ञा मला दिसून आल्या नाहीत.

थोडक्यात, हा क्रांतीचा क्षण आहे, क्रांतीचा क्षण म्हणजे, ज्यावेळी माणसांची स्वप्नं आणि सामाजिक वस्तुस्थिती ही एकमेकांकडे अभिमुख होऊन जातात त्या क्षणाला क्रांतीचा क्षण म्हणतात. Reality and Dream, Social Reality and social dream-सामाजिक स्वप्न आणि सामाजिक वस्तु-स्थिती यांचा ज्या वेळी संगम होतो तो क्रांतीचा क्षण. And that is the moment of ecstasy of History इतिहासाच्या आनंदोल्लासाचा तो क्षण असतो. ज्यावेळी माणुसकी आणि वास्तवता या एकाच दिशेने वाटचाल करू लागतात त्यावेळी क्रांती जवळ आली असं मानतात. आता क्रांती जवळ आली. पण जवळ आली एवढ्याने होणार नाही. क्रांती जवळ आणली पाहिजे. दोन क्रांतिकारकांमध्ये एकदा गंमतीचा वाद झाला. एक म्हणाला,-का रे, क्रांती किती लांब आहे? दुसरा म्हणाला,-आमच्या पक्षाचा पुढारी म्हणत होता, ती क्षितिजावर आहे. पहिला म्हणाला,-क्षितिज म्हणजे काय रे? दुसरा म्हणाला,-मला माहीत नाही, डिक्श-नरीमध्ये पाहून घेऊ. कोशात क्षितिज पाहलं आहे आम्ही-तिथे लिहिलं आहे-क्षितिज म्हणजे एक काल्प-निक रेषा, ज्या रेषेच्या जितक्या जवळ तुम्ही जाल तितकी ती तुमच्यापासून लांब लांब जाईल. म्हणजे, क्षितिजाला आम्ही आमच्या जवळ आणलं पाहिजे. क्रांती आम्ही जवळ आणली पाहिजे. म्हणून हा कॉन बेंन्डिक आपल्या पुस्तकात म्हणतो. पुस्तकाचं नाव मोठं मार्मिक आहे. Absolute communism-The Left-wing Alternative सगळे जे हे एक्स्ट्रीम लेफ्टचे लेफ्ट-विंगस आहेत त्यांनी जो पर्याय-विकल्प सुचविलेला आहे, त्याला हा लेखक म्हणतो obsolete -आता ते कालबाह्य झालेलं आहे. हा alternative उपयोग राहिलेला नाही. मग आज काय? The last word has not been said. The last word is naver said in history इतिहासामध्ये शेवटचे वाक्य कधीचं बोललं जात नाही. Act, not for others but with others. लोकांकरिता क्रांती नाही, लोकांबरोबर क्रांती. दाखला दिला आहे क्यूबाच्या क्रांतीचा. क्यूबाच्या क्रांतीवर चोवीस वर्षाच्या Regis Debray या तरुणाने "Revolution in the Revolution" हे पुस्तक लिहिलं आहे. ते पुस्तक लिहिल्याबद्दल त्याला तीस वर्षाची शिक्षा झाली आहे. आपल्या या पुस्तकात तो म्हणतो,-विसाव्या शतकाच्या आरंभी दोन क्रांत्या झाल्या. एक रशियामध्ये आणि दुसरी चीनमध्ये. पण त्या क्रांत्यांची जी प्रक्रिया होती ती प्रक्रिया लॅटिन अमेरिकन क्रांतीची असणार नाही-कारण, तिथली परिस्थिती भिन्न आहे. एक संकेत केला आहे त्याने. Revolution cant be exported

वाक्य स्टालिनचं आहे. क्रांतीची निर्यात होऊ शकत नाही. एका क्रांतीची नक्कल दुसऱ्या देशात होऊ शकत नाही–काही वर्षांपूर्वी आपल्याकडे एकाने थट्टा केली होती,–' रशियात पाऊस पडला की ह्या देशातला क्रांतिकारक इथे छत्री उघडतो.' म्हणजे नक्कलनवीस क्रांती करू शकत नाहीत. क्रांती दर एक देशात त्या त्या देशातील परिस्थितीप्रमाणे आणि त्या त्या देशातील लोकशक्तीप्रमाणे निरनिराळ्या प्रक्रियांनी होत असते. म्हणून हा लेख म्हणतो, लॅटिन अमेरिकेतील क्रांती लॅटिन अमेरिकेच्या परिस्थितीनुरूपच राहील. ती झारशाहीमधील रशियाच्या परिस्थितीनुरूप राहणार नाही किंवा चँगच्या चीनच्या परिस्थिनुरूपही राहाणार नाही.

आता, या सगळ्या क्रांतिकारकांचा शंकराचार्य आहे हरवर्ट मॉटक्यूस, हा प्रोफेसर आहे. त्याची दोन पुस्तकं विशेष प्रसिद्ध आहेत. One-dimensional Man हे एक, आणि Eros and Civilization हे दुसरं. पुस्तकं तरुणांच्या वावतीत लिहिलेली आहेत. त्यात एक वाक्य फार महत्त्वाचं आहे. Our means have prejudiced our Aims आमची जी साध्यं होती ती आमच्या साधनांमुळे दूषित झाली आहेत. साध्यनिरूप साधन पाहिजे, हे क्रांतीच्या प्रक्रियेतलं गांधींचं नवीन dimension आहे. तो असं म्हणाला होता की, साध्य असेल त्याला अनुरूप तुमचं साधन पाहिजे, तरच साध्य प्राप्त होऊ शकेल.

गांधीनं क्रांतीच्या प्रक्रियेत तीन नवीन परिमाणं (Dimensions) प्रविष्ट केली. एक, Individual contact क्रांतिकारकांच्या स्वतःच्या आचरणात, स्वतःच्या जीवनात क्रांतीची मूल्ये साकार झाली पाहिजेत. त्याचं नाव हृदयपरिवर्तन. हृदयपरिवर्तनाचा आरंभ स्वतःपासून होत असतो. ज्याचं स्वतःचं मत वदललेलं नसेल, ते जर स्वतः क्रांती करतील, तर माणसं बदलतील पण परिस्थिती बदलणार नसेल, ते जर स्वतः क्रांती करतील, तर माणसं वदलतील पण परिस्थिती बदलणार नाही. आपल्या देशात केरळपासून बंगालपर्यंत, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, सर्वत्र राज्यकर्ते वदलत गेले. पण परिस्थिती काही वदलली नाही. याचं कारण त्यांची स्वतःची मनंच पालटलेली नाहीत. क्रांतीची मूल्यं त्यांच्या स्वतःच्या जीवनात साकार झालेली नाहीत. हृदयपरिवर्तनाला Individual code of conduct म्हणतात. क्रांतिकारकाने स्वतःचं हृदयपरिवर्तन अगोदर केलं पाहिजे.

दुसरं परिमाण–dimension साधन सध्यानुरूप पाहिजे हे आहे. जे तुमचं साध्य असेल तसं तुमचं साधन पाहिजे. साध्य काय आहे ? Purification of human relationship. म्हणजे, माणसांचा माणसांशी जो संबंध आहे, त्या संबंधांचं शुद्धीकरण हे क्रांतीचं साध्य आहे. Paul Bendict म्हणतो, आम्ही responsibility ची, जवावदारीची मागणी केली. पण ही मागणी आम्ही का करू शकलो ? आमच्यामध्ये During the course of struggle a brotherhood developed एका बंधुत्वाचा विकास आमच्या संघर्षातून झाला, म्हणून–पण हा विकास जर फक्त सैनिकांत झाला असेल तर क्रांतीनंतर बंधुत्वाची स्थापना होणार नाही. सैन्याच्या प्रत्येक तुकडीत बंधुत्व असते, पण त्याला बंधुत्व म्हणत नाही. It is the espirit de-corpse ती सैनिक वृत्ती आहे. सैनिक वृत्ती आणि froternity किंवा बंधुत्व यांच्यात भेद आहे. हे जे बंधुत्व आहे, ते क्रांतीच्या प्रक्रियेतूनच विकसित झालं पाहिजे. क्रांतीची प्रक्रिया अशी हवी की ज्या प्रक्रियेतून माणसा–माणसातले अंतराय दूर होतील आणि माणसं एकामेकांच्या जवळ येतील. ही कुठली प्रक्रिया राहू शकेल ?

अहिंसा हा गांधींचा सिद्धांत नव्हे हे मला पुन्हा एकदा आपल्याला सांगावं लागेल. गांधी हा अहिंसावादी नव्हता–त्याने शस्त्रांची निंदा केलेली नाही युद्धाचीही निंदा केलेली नाही–War Resister नव्हता. Dis-armament वादी नव्हता. शस्त्रनिरपेक्ष–शौर्य, अशी वीर-वृत्ती–जिला शस्त्रांची आवश्यकता राहणार नाही अशी शस्त्रातीत-वृत्ती, तिची क्रांतीला आवश्यकता आहे. असे गांधींचे म्हणणे. फक्त शस्त्र-युद्ध-निषेधात वीरवृत्ती येत नाही. सगळे शांततावादी वीरवृत्तीचे नसतात. गांधी हा प्रतिकार-निष्ठ होता. वीर-प्रवृत्तीचा विकास समाजामधे व्हावा, या मनोवृत्तीचा तो होता. म्हणून गांधीनं बंधुत्वावर जोर दिला आहे. माणसं एकमेकांच्या जवळ आली पाहिजेत. ती एकमेकांपासून दूर होतात ती कशामुळे ? त्यांची तीन कारणे आहेत. एक सत्ता, दुसरी संपत्ती आणि तिसरं कारण, सत्ता–संपत्तीच्या दिमतीला आलेलं शस्त्रं. सत्ता,

संपत्ती, शस्त्र–ही तीन कारणं अशी आहेत की माणसा-माणसांत ती नित्य अतिशय उत्पन्न करतात. म्हणून ह्या तीनही साधनांचं निराकरण करणं ही क्रांती. पण हे निराकरण कसं करायचं ? ज्या उपायांनी ते करावं लागेल, त्यांत शस्त्र, संपत्ती आणि सत्ता यांचा उपयोग होता कामा नये. क्रांतीच्या प्रक्रियेतून सत्तेची प्रतिष्ठा, संपत्तीची प्रतिष्ठा किंवा शस्त्राची प्रतिष्ठा वाढता कामा नये.

म्हणजे, ही बुद्धीची अहिंसा नव्हे. ख्रिस्ताचीही ही अहिंसा नव्हे. ही महात्मा गांधींची अहिंसा नव्हे. ही जगातील Passifist अहिंसावाद्यांची अहिंसा नव्हे. गांधी म्हणतो की माणसा-माणसांतील मनं कलुषित करणारी जी कारणे आहेत, त्या कारणांचं निराकरण करीत असतांना माणसं जवळ आली पाहिजेत–संबंधाचं शुद्धीकरण झालं पाहिजे. यांचा अर्थ असा आहे की जर उत्पादक परिश्रम करायचे आहेत, उत्पादकांच्या जवळ औद्योगिक अवतार आहेत, तर त्यानं शस्त्राला शरण जाता कामा नये. अवतार धारण करणारा जर शस्त्राला शरण गेला, तर क्रांती होईल ती शस्त्राची, शस्त्र धारकाची. ती काही अवताराची क्रांती होणार नाही– तसंच, अवजार ज्याच्या हाती आहे तो जर संपत्तीला शरण गेला तर संपत्ती त्या क्रांतीचा खिमा करून तिला खाऊन टाकील. क्रांती खिशात घातल्यावाचून राहणार नाही.

क्रांती ही लोकक्रांती असावी. पण लोक म्हणजे कोण ? सत्ता, शस्त्र, संपत्ती यापैकी सामाजिक प्रतिष्ठेचे कोणतेही साधन ज्यांच्या जवळ नाही अशी माणसं. लोकसुलभ साधनांनी, साध्यानुरूप साधनांनी जी क्रांती करायची, तीच क्रांती.

या विषयी अगदी अलीकडची प्रक्रिया काय आहे. गनिमी कावा, गोरिला वॉर–फेअर. ज्या तरुण क्रांतिकारकांची मी आतापर्यंत नावे घेतली त्यांचा शेवटचा शब्द या बाबतीत कोणता? गोरिला वॉर–फेअर घेतला कोठून माओ पासून. माओ म्हणतो, The enemy advances, we retreat; the enemy halts, we harass; the enemy tires, we attack the enemy retreats, we persue. या प्रक्रियेचं नाव आहे गनिमी काटपाची प्रक्रिया. हे माओचं प्रिस्क्रिप्शन आहे. त्याचं एक लहानसं पुस्तक आहे. आपल्या देशातही ते असेल– माओच्या क्रांतीची प्रक्रिया आपल्या देशातही लोकप्रिय असण्याचं कारण हे की, माओची क्रांती ही शेवटची क्रांती होती, आणि ही किसानांची क्रांती होती. माओच्या क्रांतीपूर्वी रशियाची क्रांती झाली. तीत मजूर पुढे होता, किसान मागे होता. पूर्वीच्या त्या क्रांतीच्या मंत्रात मार्क्सने किसानाचं नावच घेतलं नव्हतं. किसान हा कम्यूनिस्ट पार्टीचा सभासद होऊ शकत नव्हता, सैनिक मात्र सभासद होऊ शकत होता. माओची क्रांती का नासली. त्यांचा किसान शिपाई झाला, जवान बनला. म्हणून ती क्रांती किसानांची न बनता जवानांची झाली. या देशात क्रांती झाली तर ती किसानांची झाली पाहिजे, आणि किसानाला जवान बनावं लागता कामा नये. म्हणून गांधी असं म्हणाला की, अवजाराला, हत्याराला शरण जावं लागू नये. ज्याच्याजवळ तिजोरी असेल त्याला अवजार विकत घेता येऊ नये. ज्याच्याजवळ शस्त्र असेल तो अवजाराला धाक दाखवू शकणार नाही. जरब दाखवू शकणार नाही, अशी क्रांतीची प्रकिया झाली पाहिजे. गांधीची क्रांतीबद्दलची कल्पना, तिच्या प्रक्रियेबद्दलची कल्पनाही अशी होती, म्हणून गांधीच्या अहिंसेला traditional non–violence म्हणता येणार नाही.

अहिंसा हे क्रांतिकारी मूल्य आहे, सामाजिक मूल्य आहे. गांधींची अहिंसा हे क्रांतिकारी सामाजिक मूल्य आहे म्हणून त्यात वीरवृत्ती आणि प्रतिकार, मानवोचित पुरुषार्थ, माणसांच्या संबंधांचं शुद्धीकरण करणारा पुरुषार्थ, याला सगळ्यात जास्त महत्त्व आहे. फ्रांसचे क्रांतिकारक म्हणाले,–We have broken the rules of history–इतिहासाचे सगळे नियम आम्ही मोडून टाकले आहेत, because they have become old and brittle इतिहासाचे नियम ठिसूळ झाले होते, जीर्ण झाले होते, बुरसटले होते, म्हणून हे नियम आम्ही पार मोडून टाकले आहेत, असे ते म्हणाले.

१९६८ साली पूर्वेतिहासाचा–pre–history अंत झाला आणि नवीन क्रांती–which demands not only bread but also roses–उदयाला आली आहे. ही क्रांती एका नवीन समाजव्यवस्थेचं स्वप्न पाहते आहे. म्हणून ती अभिनव क्रांती आहे. या क्रांतीच्या प्रक्रियेकडे लक्ष द्या असं त्यांचं आवाहान आहे.

आमचं एवढंच म्हणणं आहे की एक पाऊल पुढे चला–गनिमी काव्याची क्रांती ही काही लोक–क्रांती राहू शकत नाही. गनिमी कावा लोकक्रांतीचा लोक-सुलभ उपाय नाही. लोकसत्तेच्या स्थापनेकरिता लोकांची क्रांती झाली पाहिजे, आणि ती लोकक्रांती लोकांच्या पुरुषार्थात प्रकट झाली पाहिजे.

स्वराज्याच्या चळवळी, लोकसुलभ स्वराज्याचा सूत्रपात, लोकमान्य टिळकांनी केला. पण त्यांचं जे अवजार होतं, त्या अवजाराला धार लावण्याचं काम गांधींनी केलं. याचं गांधींनी कुठल्याही संप्रदायावर, कुठल्याही पक्षावर, कुठल्याही विचारसरणीवर भर दिला नाही. आजच्या क्रांतिकारकांची तक्रारही वाद, संप्रदाय वगैरेंच्या विरुद्धच आहे. ते म्हणतात. These are angles of several isms, armed with their polished and blunt tools of ideology आपापल्या विचारसरणींची बोथट पण चकचकित अवजारं घेऊन सगळ्या वादांचे Arch–angels–हे प्रवक्ते उभे आहेत. पण ते क्रांतीला उपयोगी नाहीत.

या दृष्टींनी जर आपण विचार केला, आणि या दिशेने जर आजच्या आमच्या तरुणांनी विचार केला तर या देशाला शस्त्र–निरपेक्ष शौर्यखेरीज दुसरा तरणोपाय नाही असं स्पष्ट होईल. आमच्या देशाची आजची परिस्थिती अशी आहे की, दुष्काळाच्या वेळी आम्हाला अमेरिकेकडून, रशियाकडून अन्न मागावं लागतं. असं असूनही आमचा तोरा असा की, रशियाने झेकोस्लोव्हाकियावर स्वारी केल्यावर आम्ही रशियाचा निषेध करतो. व्हिएतनामवर जे अत्याचार होत आहेत त्याचा आम्ही जोरदार निषेध करतो. आणि एकीकडे असा निषेध करीत असताना चीनने डोळे वटारताच आम्ही अमेरिकेकडे 'दुर्गे दुर्घट भारी.....' म्हणून हाक घालतो. पाकिस्तानचं संकट येऊ घातल्यावरोबर रशिया आमचा 'सुखकर्ता, दुःखहर्ता.....' बनतो. म्हणून माझं असं म्हणणं आहे की, अशा हिंदुस्थानाला शस्त्र–निरपेक्ष वीरवृत्तीची गरज आहे. कारण, शस्त्र-निरपेक्ष शौर्य नागरिकांचं शौर्य असतं. नागरिकांची धार आली हा इतिहासाचा दाखला आहे. याचं थोड-क्यात विवेचन मी करणार आहे—

या नागरिक शक्तीचा अभाव या देशात का आहे ? "परराष्ट्रीय धोरण चुकलं" वगैरे टीका वरवरच्या आहेत. एकमेकांविरुद्ध टीका केलेल्या आहेत त्या. एकदा गंमत झाली. दोन मॅजिस्ट्रेट सायकलीवरून चालले होते. सायकलींना दिवा नव्हता. पोलिसानी त्यांना पकडलं. त्याला काय माहित, हे मॅजिस्ट्रेट आहेत म्हणून ? दुसऱ्या दिवशी खटला भरण्यात आला. आपण मॅजिस्ट्रेट आहोत हे त्यांना कबूल करावं लागलं. मग त्यांनी संगनमत केलं–ठरवलं, माझा खटला तू चालव, तुझा मी चालवतो. कोर्टात उभे झाले. पहिल्याची चौकशी झाली. अपराध कबूल केला गेला. दुसऱ्याने त्याला 'पाच रुपये दंड' असा निकाल दिला. मग दुसरा अपराधाच्या जागी उभा राहिला. पुन्हा तेच प्रश्न, तीच कबुली. निर्णय मात्र पन्नास रुपये दंड. त्यावर दुसरा पहिल्याला म्हणाला, 'अरे लेका, आपलं संगतमत झालं होतं ना ? मी तर तुला पाचच रुपये दंड केला, अन् तू पन्नास' त्यावर पहिल्याने उत्तर केलं, अरे तुला माहित आहे, हा अपराध दुसऱ्यांदा घडला आहे. म्हणून याला deterrent punishment पाहिजे' हे आहे आपलं आजचं कारण. म्हणून, तो अत्यंत उथळ वर-वरचा विचार आहे. यासाठी, थोडा खोलात जाऊन विचार केला पाहिजे. इंग्रजांच्या पूर्वी या भारतात अखिलभारतीय नागरिकता नव्हती ही वस्तुस्थिती आहे. आता इतिहासकार इतिहास बदलतात. पण वस्तुस्थिती मात्र ही अशी आहे. इंग्रजी राज्याबरोबर अखिल–भारतीय नागरिक जन्माला आला. त्यापूर्वी नव्हता. आणि इंग्रज गेल्याबरोबर तो हळू हळू अंतर्धान पावत गेला. या देशात जे नागरिकत्व आहे ते चार प्रकारचं नागरिकत्व आहे. एक आहे हायफनेटेड सिटिझ-नशिप. दोन इंग्रजी शब्द जोडायचे झाले तर त्या दोहोमधे जी एक लहान आडवी रेघ जोडली जाते तिला 'हायपन' म्हणतात. हे सामाजिक नागरिकत्व आहे. तू कोण आहेस मी महाराष्ट्रीअन–भारतीय. तो कोण ? तामिळ-भारतीय. मघाशी सांगितल्याप्रमाणे भारतीय हा कॉमन फॅक्टर कॅन्सल झाला. बाकीचे शिल्लक राहिले.

दुसरी आहे डिनॉमिनॅशनल सिटीझनशिप–सांप्रदायिक नागरिकत्व. सांप्रदायिक नागरिकांमध्ये या देशात सर्वात मोठा अपराधी आहे मुसलमान–तो म्हणतो मी अगोदर मुसलमान आहे आणि नंतर भारतीय. याला कॉम्यूनलीझम् म्हणतात. When you make the denonination of your community the besis of your citize-

nship, you become communal. हिंदू काय म्हणाला ? तू लेका सांप्रदायवादी असशील, तर मग आम्ही प्रति–सांप्रदायवादी. तुझं राष्ट्रीयत्व जर इस्लामी असेल, तर हिंदुत्व हे आमचं राष्ट्रीयत्व आहे. आता, या दोहोंचा गुणाकार बेरीज केल्याने काही one positive होत नाही– हे सगळं negetive.

तिसरं नागरिकत्व आहे दुय्यम नागरिकत्व– "Secondary citizenship" जिथं ज्याची संख्या जास्त असेल तिथं ते मुख्य नागरिक आणि ज्यांची संख्या कमी ते तिथले गौण नागरिक. सगळ्या देशात हा प्रकार आहे. सगळे हे विसरले की लोकराज्य म्हणजे संस्थेचं राज्य नाही. लोकराज्य म्हणजे बहुमताचं राज्यमत अल्पसंख्यक हे बहुसंख्यक कसे होतात ? आणि बहुसंख्यक हे अल्पसंख्यक का बनतात ? मतांचं राज्य आहे, म्हणून संस्थेचं राज्य असेल तर बहुसंख्यक आणि अल्पसंख्यक आणि अल्पसंख्यक सदाच अल्पसंख्यक असणार,–अगदी यावच्चंद्रदिवाकरौ लोकमताचं राज्य, बहुमताचं राज्य म्हणणे लोकराज्य, पण आपल्या इथं आहे संस्थेचं राज्य. महाराष्ट्रात महाराष्ट्रीय मुख्य, महाराष्ट्रीयेतर गौण. कर्नाटकात कानडी मुख्य. सगळ्या प्रांतांत अशीच स्थिती आहे. ऑस्वेलने एक गंमतीचं पुस्तक लिहिलं आहे. आपल्याला माहित नसेल त्या पुस्तकाचं नाव एकोणिसशे चौऱ्यांशी. साम्यवादी हुकूमशाहीचे काय दुष्परिणाम होतील त्याचं त्यानं त्या पुस्तकात रेखाटलं आहे. दुसरं एक पुस्तक आहे. त्याचं नाव आहे Animal Farm माझ्या हातात नोबल प्राईझ असतं तर ते मी या पुस्तकाला देऊन टाकलं असतं. या पुस्तकात त्याने जनावरांच्या एका मळ्याचं वर्णन केलं आहे. हे वर्णन आपल्या संदर्भात मी माझ्या पद्धतीनं करणार आहे. एक मळा आहे जनावरांचा, तिथे निरनिराळ्या प्रकारची जनावरं आहेत, हत्तीपासून डुकरापर्यंत, अरबी घोड्यापासून गाढवापर्यंत. या जनावरांनी एकदा असा संकल्प केला की, आपण आपल्यासाठी एक घटना तयार करू. सगळे जमले. ठराव पास झाला–We the members of this house assembled in this Constituent Assembly, give to ourselves on this auspicious day this great Constitution यानंतर घटनेचं पहिलं कलम विचाराकरता पुढे आलं.–No animal shall kill another annimal. त्यावर कुत्रा उभा राहून म्हणाला, अरे लेकांनो, आता मी काय हाडं चघळत बसू ? नंतर मांजर उभं राहिलं. म्हणालं, अरे, पण तुम्हाला कळतं आहे का ? काही विवेक आहे, की नाही ? आता काय मी उंदीर खायचे बंद करायचं ?–मग दुरुस्तीचे प्रस्ताव पुढे आले–पहिली उपसूचना आली– No animal will kill another animal without cause आणि अशा रीतीनं पहिलं कलम खलाश झालं, दुसरं कलम पुढे आलं, All animals are equal. त्यावर हत्ती उभा राहिला व म्हणाला, 'काय लेकांनो, ही काय घटना आहे ? डुकरं आणि आम्ही सारखे ?' अरबी घोडे उभे राहिले व म्हणाले, 'गाढव आणि आम्ही काय बरोबरीचे आहोत ? तुमच्यात अक्कल नाही तर कशाला घटना तयार करता ? दुरुस्तीची उपसूचना पुढे आली.–All animals are equal, but some animals are more equal than otheres. अशा रीतीने दुसरंही कलम खलाश झालं–सगळी जनावरं बरोबरीची आहेत, पण काही जनावरं जास्त बरोबरीची आहेत. म्हणजे महाराष्ट्रात महाराष्ट्रीयन–महाराष्ट्रीयन अधिक बरोबरीचे. कर्नाटकात कानडी अधिक समान. पहिल्यांदा देशाची विभागणी भाषा एक असतानाही सांप्रदायाच्या नावावर झाली–पंजाब, बंगालमध्ये दुसऱ्यांदाही भाषा एक असताना सांप्रदायाच्या आधारावर शिखांची, हिंदूंची लिपीच्या नावाने पुन्हा विभागणी झाली. गुरुमुखी ही लिपी आहे, भाषा नाही. पण या देशात कुणी हा विचारच केला नाही की, लिपी निराळी असते आणि भाषा निराळी असते. दुकानावर पाटी लिहितात– "हेअर कटिंग सलून" आता काय सांगायचं त्या 'अंग्रेजी हटावो' वाल्यांना ? मुसलमान उर्दू करता भांडतो–आणि असल्या चळवळीचं नेतृत्व कॉलेजची शिकलेली मुलं, प्रोफेसर्स हे करीत असतात. या देशाचे तुकडे करणाऱ्या ज्या प्रतिगामी चळवळी येथे झाल्या, त्यांचं नेतृत्व सुशिक्षित माणसानं केलेलं आहे ही खेदाची गोष्ट आहे.

ही टीका नव्हे, माझी वेदना आहे. या सुशिक्षितांनी या देशात बहुराष्ट्रवाद आणला, संप्रदाय–वाद आणला, आणि बहुराष्ट्रवाद या देशात येत असताना हे सुशिक्षित मला सांगतात की, भाषा हे माणसांचं वैशिष्ट्य आहे. मी पुष्कळ अभ्यास केला. पण माणसांचं

वैशिष्टच भाषा आहे असं काही मला दिसलं नाही. माणसांचं वैशिष्टच भाषा नव्हे, वाणी आहे. जिला मातृभाषा म्हणतात तीही माणसाला शिकावीच लागते. मला "आई" म्हणणं शिकावं लागलं. माझ्या मुलाला "आई" म्हणणं शिकावं लागलं. पुष्कळांच्या नातवंडांना "ममी" म्हणणं शिकावं लागतं. हे सगळं शिकावंच लागतं. शिवाय, माणसाच्या भाषेचं भाषांतर होतं, पशूंच्या भाषेचं भाषांतर होत नाही. माणूस सगळ्या भाषा शिकू शकतो. त्याला त्यावद्दल अभिमान वाटतो.

तात्पर्य, एकमेकांबरोवर प्रेमाने राहण्याचा संकल्प व्यवहारात पूर्ण झाला पाहिजे तर ते राष्ट्रीयत्व–राष्ट्रीयत्वाचा विकास भाषावादाने होणं शक्य नाही. केरळचा माणूस, काश्मीरचा माणूस ही दोघे आगगाडीत भेटले तर ते एकमेकाशी वोलू शकत नाहीत, आपण कोण आहोत हे एकमेकांना सांगू शकत नाहीत. मला तुझी भाषा येत नाही हेही सांगू शकत नाहीत–आणि तरीही हे सारे म्हणतात–अंग्रेजी हटावो, अंग्रेजी हटावो.

वस्तुस्थिती अशी आहे मित्रांनो, की संस्कृत भाषेनंतर भिन्न भाषिकांना एका व्यासपीठावर आणलं असेल, तर ते इंग्रजी भाषेनं आणलं आहे. प्राचीन काळी संस्कृत भाषेची जी भूमिका होती, ती भूमिका या देशांत स्वराज्यापूर्वी इंग्रजीची होती. जी लोकांना जवळ आणते ती देवांची भाषा, जी त्यांना दूर नेते ती सैतानाची भाषा. वास्तविक पाहता, संस्कृत देखील राक्षसांची भाषा होती म्हणतात. मी विद्वान नसल्यामुळे मला हे माहीत नव्हतं. आजच एका वृत्तपत्रात वाचलं, वाल्मीकि रामायणातील हनुमानाचं वाक्य त्या लेखकानी दिलं आहे. हनुमान तेथे म्हणतो की मी सीतेशी जर ब्राह्मणांच्या म्हणजे संस्कृत भाषेत वोललो तर ती मला रावण समजून भिऊन जाईल. म्हणजे, रावण हा ब्राह्मण असल्यामुळे त्याची भाषा सस्कृत होती, आणि ती राक्षसाची होती, ते काही असो. इतिहासकारांवर माझा विश्वास नाही. कारण त्यांच्यात नेहमी वादच फार चालतो. शिवाजीच्या जन्मावद्दल इतका वाद की शंका वाटू लागते की शिवाजी जन्मला तरी होता का म्हणून. ही भाषा देवाची, राक्षसाची, स्वदेशी, विदेशी, हे सव झूठ आहे. भाषा माणसाची आणि माणसाची जी भाषा असेल, ती देव–भाषाच आहे. "वाचः प्रावृत्त संस्कृता श्रुतिशिरो वारणसी मेदिनी"–सगळ्या भाषा श्रुतींच्या भाषा आहेत. आणि सगळी मेदिनी वाराणसी आहे. हा संकल्प भव्य संकल्प आहे. हा झाला नाही तर काय होईल? आता तर भांडणच आहे. पण अशी कल्पना करा की, कामराजांना आणि इंदिराजींना एकीकडे भांडण करायचं आहे, पण दुभाष्यावाचून भाषण कसं करायचं? आणि हा दुभाषी जर धूर्त किंवा मूर्ख असला तर? म्हणजे हे असं आहे. पट्टाभींनी कांग्रेसचा इतिहास लिहिला. त्यात एक शब्द आहे–Canoonised रोमन कथॉलिक खिश्चनांचा हा शब्द आहे. एखाद्या माणसाला संत म्हणायचं असलं तर त्याचं Cannonisation होतं. एका कुठल्या तरी पुढाऱ्यावद्दल त्यांनी वाक्य लिहिलं आहे की, He was caunouised. म्हणजे हा, सतपदाप्रत पोहोचला लोकांनी त्याला संत मानलं. पुढे या वाक्याचं भाषांतर झालं, भाषांतराने Cannon हा शब्द फक्त ऐकला होता. आणि Cannon म्हणजे तोफ. तेव्हा त्याने भाषांतर केलं,–त्याला गोळी घालून मारून टाकलं– त्याला तोफेच्या तोंडी दिलं. काय ही अवस्था !

या देशातील सामान्य माणसं, या देशातील तरुण आणि तरुणी एकत्र शिकू लागले पाहिजेत, त्यांची लग्नं होऊ शकली पाहिजेत. अखिल भारतीय नागरिकाचा जन्म झाला पाहिजे. तो वहुराष्ट्र वादातून होणार नाही, वहुभाषा वादातूनही होणार नाही. म्हणून ही Secondary सिटीझनशिप. आणि शेवटचं नागरिकत्व आहे Fractional citizenship म्हणजे माणसाला संपूर्ण माणूस मानण्यात आलेले नाही. उदाहरणार्थः आदिवासी, अस्पृश्य आणि स्त्रीया. इंदिरा गांधी पंत-प्रधान झाली असेल. पण ती सबंध माणूस नाही, तिला सबंध आत्माही नाही. तीचं फक्त उच्च पद आहे. असो. असं आपल्या पुढाऱ्यांचं झालं आहे. पुढारी आता अखिल–भारतीय आकाराचे राहिले नाहीत. १९४७ नंतर जुनी पिढी जवळ-जवळ गेली. आता जे आहेत ते आपापल्या प्रांताच्या, भाषेच्या भावाच्या, जिल्ह्याच्या मापाचे आहेत. म्हणजे जो जितका आपल्या निष्ठेमध्ये संकुचित असेल, तितकी त्याला मते जास्त. तू राहुरीवाला की, विदर्भवाला मते, तू अकोलावाला–मते आणि अशी ही मते तू वोरगाव–मंजूवाला की अकोलावाला–मते आणि अशी ही मत घेणारा, हा जाऊन बसणार दिल्लीच्या खुर्चीवर. प्रासादशिखरस्तोऽपि काको न गरुडायते-

अनुक्रमणिका

ही सगळी खुजी, बुटकी माणसं आपल्या नावाच्या आकाराची हीच सगळी तिथे दिल्लीला जाऊन बसणार आणि योजना मात्र बनवणार. अखिल-भारतीय. आंतरराष्ट्रीय !

ही राजकारणाची परिस्थिती आहे. विज्ञानाच्या आणि संस्कृतीच्या क्षेत्रातही हीच परिस्थिती आहे. या देशाच्या आकाराचा माणूस हा जगाच्या आकाराचा माणूस झाल्यावाचून राहणार नाही, असे आश्वासन देव देऊन चुकला आहे, इथे इतके भेद इतक्या संस्कृती, इतका रंग, इतकी रूपं आणि इतक्या प्रकाराची विविधता आहे की, या देशाच्या आकाराचा जो होईल, तो विश्वाच्या आकाराचा झाल्यावाचून राहणार नाही. म्हणून या देशात भारत-निष्ठ मानवता आणि मानव-निष्ठ भारतीयता, या दोन मनोवृत्तीच्या विकासाची गरज आहे. भारतनिष्ठ मानवता म्हणजे भारतात जो मानव राहात असेल तो माझा आहे, आणि मानव-निष्ठ भारतीयता म्हणजे, आम्ही भारतावर प्रेम करतो, पण मानवावर त्याहीपेक्षा अधिक प्रेम करतो, अशी निष्ठा. गांधी म्हणाला होता, My religion knows no geographical limitations माझ्या धर्माला भौगोलिक मर्यादा नाही. And when that hour of trial comes, I hope I shall not be found wanting, and that my faith may transcend my love for India गांधी म्हणाला, ज्या दिवशी अशी परीक्षेची घडी येईल त्या दिवशी भारतावर माझं जे प्रेम आहे त्यापेक्षाही माझी निष्ठा जास्त व्यापक ठरेल, जास्त वलवत्तर ठरेल अशी मला आशा आहे.

मित्रांनो, या चार प्रकारच्या नागरिकत्वांतून आता भारतीय नागरिकत्वाचा विकास आपल्याला करायचा आहे. या देशातल्या क्रांतीचं जे एक उद्दिष्ट असलं पाहिजे आणि ज्या उद्दिष्टाला अनुरूप अशी आपली साधनं असली पाहिजेत, ती साधनं कशी असतील, तो कार्यक्रम कसा असला जाऊ शकेल ते मग माणसाने स्वतः ठरवावं.

तरुणांना माझी अशी आग्रहाची आणि कळकळीची विनंती आहे की, माझ्या पिढीच्या लोकांचं आणि त्यांच्या पूर्वीच्या पिढीच्या लोकांचं त्यांनी काहीही ऐकू नये. जो उपदेश करील, त्याचा निषेध करावा. पण एकच विनंती आहे. आमच्या कार्बन कॉपीज तुम्ही बनू नका. तुम्ही आज काय चालवलं आहे? तुम्ही आमच्या सेकंडहॅंड कॉपीज बनता आहात. आमच्या निवडणुकांमध्ये जर एक हजार रुपये खर्च होत असतील, तर तुमच्या कॉलेजच्या निवडणुकीमध्ये दहा हजार रुपये खर्च-सिनेमात जाहिरात करण्यासाठी, रस्त्यावर लिहिण्यासाठी वगैरे ! अन् परवा तर एका कॉलेजमध्ये सुरा भोसका-भोसकीचा प्रसंग आला होता म्हणे. तुम्ही जर आमची नक्कल करू लागलात तर लक्षात ठेवा, तुमचं जग हे सेकंडहॅंड जग होईल, कार्बन कापीचं जग होईल-आमच्या पेक्षा हिणकस, निकृष्ट फ्रांसच्या राज्यक्रांतीचा विद्यार्थी नेता म्हणाला होता, Between you and me, we can change this rotten society. आपण हे जग बदलू शकतो. पण भारताचा क्रांतिकारक काय म्हणतो ?—नाही. आम्ही फक्त तुमची नक्कल करू. मिनिस्टर्स जर एकपट करेल तर आम्ही दसपट करतो. आम्ही तरुण आहोत. मागच्या नेत्यांनी जर rivals चा-प्रतिस्पर्ध्यांचा-खून केला असेल, तर आम्ही Invigilator चा खून करू. तो जर पार्लमेंटमध्ये भ्रष्टाचार करीत असेल तर आम्ही परीक्षेच्या हॉलमध्ये करू. या अशा अनुकरण्यातून भारतीय नागरिकता निर्माण होणार कशी ? समाज बदलणार कसा ? यांच्यात काय धमक राहणार आहे ? काय चारित्र्य राहणार आहे ? ख्रिश्चन जेव्हा अमेरिकेत गेला तेव्हा तिथे त्याने एक नाच बघितला-मिनी-स्कर्ट-मधल्या एका बाईचा. तो संतापला. म्हणाला "याला तुम्ही कल्चरल प्रोग्राम म्हणता ? आपला कोट असा कंबरेवर घेऊन नाचण्याची संस्कृती आमच्या देशात चालत नाही."

ज्या ठिकाणी क्रांतीची खरी लालसा असते, उत्कट आकांक्षा असते, त्या ठिकाणी घटना एकसारख्या प्रचंड वेगाने घडत असतात, इतक्या वेगाने की त्यांचं भानही राहू नये. Our days and nights run into each-other in an endless flow of events आमच्याकडे मात्र आमच्या विद्यापीठांमधून लैंगिकतेचा स्फोट होतो आहे. त्यातून क्रांती काही होणार नाही.

या देशाला क्रांतीची गरज आहे. येथे गरीब आणि अमीर असा भेद राहता कामा नये. ब्राह्मण-भंगी भेद राहता कामा नये. हिंदू-मुसलमान-ख्रिस्ती

असा भेद राहता कामा नये. हे गौण नागरिकत्व, हे सामाजिक नागरिकत्व, या सगळ्या नागरिकत्वाचा अंत झाला पाहिजे. मला तरुण माणसांना हे सांगायचं आहे की, हे सगळं करायचं ते आपण करू शकाल. आपल्याला देवानं शक्ती दिली आहे. या देशाचं स्मशान बनवायचं असेल तर तुम्ही बनू शकता. मला त्याची फारशी खंत नाही. कारण मला तिकडेच जायचं आहे. पण तुम्हाला जगायचं आहे, राहायचं आहे. नंदनवनात जगायचं की स्मशानात जगायचं, ते तुम्ही ठरवा. पुढाऱ्याची जो वाट पाहील तो आजचा क्रांतिकारी नव्हे. अवताराची, विभूतीची जो वाट बघेल, तो आजचा क्रांतिकारी नाही.

नवीन इतिहासाचा कर्ता, पुरुष, विधाता हा सामान्य माणूस होणार आहे. कोणी संत नाही, कोणी राजा नाही, कोणी योद्धा नाही, कोणी वीरपुरुष नाही. आणि सावकार आणि सरकार तर मुळीच नाही. हा सामान्य माणूस स्वतःच्या पुरुषार्थात नवीन जग कसं निर्माण करू शकेल, याचा शोध तुम्ही घ्यायचा आहे. प्रश्नाची उत्तरं द्यायला मी आलो नाही. प्रश्नांच्या उत्तराचं दुकानदार आता pavement वर बसलेले आहेत. त्यांच्यावर माझा विश्वास नाही. salesmanship आहे ती उत्तरं खपविण्याची.

तुमच्या पुरुषार्थावर भावी समाजाची निर्मिती अवलंबून आहे. एकदा विनोबा पदयात्रेला निघाले. फार पहाटे निघत असत ते,–अंधारात. त्यादिवशी अमावास्येची रात्र होती. मी म्हटलं 'विनोबा, या अमावास्येच्या रात्री तुम्ही पदयात्रा करता फार त्रास होतो आम्हाला.' ते म्हणाले, 'अमावास्येची रात्र तुम्हाला प्रिय नाही ?' म्हटलं, 'नाही, मुळीच नाही पौर्णिमेची प्रिय आहे,' विनोबा मोठे रसिक आहेत. कवि–हृदय आहे त्यांचं. म्हणायला लागले, 'काय बोलता हे ? पौर्णिमेची तुम्ही स्तुती करता पण तिथं एकटा अत्याचारी चंद्र दिमाखात मिरवतो. एखाद्या ताऱ्यालाही संधी येथे नाही. कसलं पौर्णिमेचं महात्म्य तुम्ही वर्णन करता–ही अमावास्येची रात्र पहा. उदात्त, करूणाधी आहे. काजव्यांनाही चमकण्याची इथे संधी आहे.'

आजच्या देशात कुठलाही थोर पुरुष नाही. कुठलीही विभूती नाही. कुठलाही अवतार नाही. हे या कलियुगाचे भाग्य आहे. तरुणाला इतिहास घडविण्याची संधी येथे आहे. त्याच्या पुरुषार्थाला आव्हान आहे. हे आव्हान स्वीकारण्याची शक्ती आणि बुद्धी ईश्वर तुम्हाला देवो, हीच त्याच्या चरणी मी प्रार्थना करतो.

पं. नेहरूंच्या शब्दात महात्मा गांधी

चळवळी, महान परिश्रम, आणि चाकोरीबाहेरची नवनवी सहासे यांनी परिपूर्ण असे त्यांचे सुदीर्घ आयुष्य होते, तरी त्यात कुठेही बदसूर आढळायचा नाही. त्यांच्या सर्व नानाविध कार्यांचे अधिकाधिक सुरेल संगीत बनत गेले. त्यांनी उच्चारलेला प्रत्येक शब्द आणि केलेली प्रत्येक हालचाल त्यात बरोबर मिळून जाई. अशा रीतीने न कळत ते एक संपूर्ण कलाकार बनले, कारण जीवनाची कला त्यांनी हस्तगत केली होती; अर्थात पत्करलेली जीवनाची दिशा जगाच्या रूढ दिशेपेक्षा अगदी भिन्न होती. सत्याच्या आणि सज्जनतेच्या उपासनेतून इतर गोष्टींबरोबरच जीवनाची ही कलात्मकताही साह्य होते हे यावरून उघड झाले.

फ्रीडम फ्रॉमफिअर जवाहरलाल नेहरू

गांधींचे अर्थ-शास्त्र-विषयक विचार आणि समाज-वाद

—रा. कृ. पाटील

१. प्रस्तुत विषयाचा उहापोह करण्यापूर्वी, विषयाच्या दोन प्रमुख गोष्टींविषयी आपण आपल्या कल्पना स्पष्ट करून घ्यायला हव्यात. पहिली गोष्ट अशी की, अर्थशास्त्रविषयक सुसंगत अशी तत्त्वप्रणाली गांधींनी कधी तयारच केली नाही. तसे करण्याचा आपल्याला काही अधिकार आहे, असा दावाही कधी त्यांनी केला नाही. केवळ अर्थशास्त्राच्या क्षेत्रातच नव्हे तर दुसऱ्या कुठल्याही क्षेत्रात नवे म्हणून काही देण्याचा आपल्याला काही अधिकार आहे, असे त्यांनी कधीच म्हटले नाही. समाजापुढे ज्या समस्या आहेत त्या सोडविण्यासाठी सत्य आणि अहिंसा या दोन प्राचीन तत्त्वांचा प्रयोग करणे हेच मी आयुष्यभर करीत आलो, असे त्यांनी म्हटले आहे. आर्थिक म्हणा, सामाजिक म्हणा, राजकीय म्हणा,—कोणत्याही प्रश्नाच्या संबंधात त्यांनी या दोन तत्त्वांचाच प्रयोग केला. असे असल्याकारणाने गांधींच्या विचारसरणीत सुसंगत अशी अर्थशास्त्रविषयक विचारप्रणाली सापडणे कठिणच. त्यांनी एके ठिकाणी लिहून ठेवले आहे,–नीतिमत्तेच्या दृष्टीने जे चांगले नाही, ते अर्थशास्त्राच्या दृष्टीनेही चांगले असू शकत नाही. (What is not good morality can not be good economics). त्यांच्या दृष्टीने दैनंदिन व्यवहारातील जे प्रश्न समोर उभे राहिले त्यांची उत्तरे सत्य आणि अहिंसा या उभय तत्त्वांचा प्रयोग करूनच शोधून काढणे या क्रियेतूनच अर्थशास्त्रविषयक विचारांचा आविष्कार झालेला आहे. त्याबरोबरच, ज्या समस्येचे समाधान त्यांना करावयाचे असेल त्या संबंधात, प्रतिक्रिया म्हणून ते जो मार्ग चोखाळीत तो त्यांच्या अंतःप्रेरणेने दिलेल्या कौलाप्रमाणेच असे, विशिष्ट विषयावर सुसंगतपणे व खोलवर विचार करून निघणाऱ्या निष्कर्षाप्रमाणे काही त्यांचा निर्णय होत नसे. समस्या समोर आली की, तिच्याबद्दल त्यांच्या मनात तावडतोब प्रतिक्रिया उत्पन्न होई, ती सोडविण्यासाठी कोणता मार्ग अवलंबावयाचा त्याचा ते तावडतोब निर्णय घेत, आणि मग त्या सर्व गोष्टींचे मुद्देसूद विश्लेषण करून त्यांनी चोखाळलेला मार्गच सुसंगत कसा होता हे दाखवून देण्याचे काम तात्त्विक दृष्टीने विषयाचा विचार करणाऱ्यावर सोपवून स्वतः मोकळे होत.

गांधींची अर्थ–शास्त्रविषयक विचार–प्रणाली कशी होती याविषयी एवढे सांगितल्यानंतर, समाज–वादासंबंधीही थोडेसे सांगणे आवश्यक आहे. समाज–वादासंबंधीच्या कल्पना इतिहास–क्रमातूनच उत्क्रांत होत आलेल्या आहेत; आणि आज ह्या कल्पनांचे, चीनमध्ये आढळून येणारे स्वरूप, रशियन पद्धतीचे स्वरूप, भारतीय स्वरूप, अथवा इंग्लंडमधील स्वरूपावर आधारलेला विसाव्या शतकातील समाज–वाद असे वर्णन करणे चुकीचे होणार नाही किंवा ते अतिशयोक्तीचेही ठरणार नाही. या सर्व निरनिराळ्या स्वरूपात काही गोष्टी समसमान आहेत; पण त्याबरोबरच त्यात काही मूलभूत गोष्टीबाबत भेदही आहे. आणि या गोष्टींसंबंधी आपल्या कल्पना स्पष्ट झाल्याखेरीज आपल्याला या विषयाचे महत्त्व नीटपणे समजणार नाही. उत्पादनाच्या साधनांवर, वितरणावर आणि विनिमयावर (exchange) समाजाचे नियंत्रण असावे हे तत्त्व समाज–वादात अंगभूतच आहे; पण या नियंत्रणाचे प्रमाण आणि साधनांवरील मालकी या दोन गोष्टींबाबत मतभेद आहे. हा मतभेद चिनी आणि रशियन पद्धतीत काही अंशांचाच असला, तरी त्यांच्यात आणि भारतीय व ब्रिटिश स्वरूपात फार मोठ्या प्रमाणात फरक आहे. विनोबाजींनी सर्वोदयाची जी व्याख्या केलेली आहे ती–" Democratic socialism achieved through people 's

efforts" (लोकांच्या प्रयत्नाने प्राप्त झालेला लोकतंत्रात्मक समाजवाद) अशी आहे. ब्रिटनमध्ये वीसाव्या शतकातील समाजवादाला ज्या पद्धतीने मान्यता देण्यात आली, त्या पद्धतीत उत्पादनाच्या साधनांचे, वितरणाचे आणि विनिमयाचे राष्ट्रीयीकरण किंवा समाजीकरण करण्याचे कटाक्षाने टाळण्यात आले आहे. त्याने मध्यम मार्गावरच आग्रह धरला. यात मालक आणि मजूर या दोघांनाही उत्पादन वाढविण्यासाठी एकसारखेच प्रोत्साहन मिळावे आणि मालक-मजूर संबंध सुधारावे अशी व्यवस्था आहे. कारण, प्रत्येक व्यक्तीने सामाजिक उत्पादनात जेवढे सहकार्य केले असेल त्याच्या प्रमाणात त्याला योग्य मोबदला मिळाला पाहिजे असा समाजवादाचा आजही आग्रह आहे, आणि प्रचलित सामाजिक परिस्थितीत समान हक्काची व संधीची मागणी करणाऱ्या egalitarian समाजालाच सर्वात मोठा प्रत्यवाय होऊन बसलेला आहे.

२. गांधी आणि आधुनिक समाज-वादी ह्या उभयतांमध्ये मूलभूत फरक आहे तो त्यांच्या समाजाकडे आणि समाजाच्या समस्यांकडे पाहण्याच्या दृष्टिकोणात. समाज जसा आहे तसा मान्य करण्याची गांधींची दृष्टी होती. त्यांतील निरनिराळे सामाजिक स्तर, त्याच्या निरनिराळ्या गरजा ह्या सर्व गोष्टी त्यांनी आहेत तशा गृहीत धरल्या, आणि समाजातील अगदी खालच्या थरातील दीन-दुबळ्यांच्या प्रश्नाला तातडीने हात घालून तो सोडविण्याच्या प्रयत्नाला ते लागले. अशी ही उपेक्षित जनता भारताच्या खेड्या-पाड्यात आहे आणि असेच लोक भारताचे बहुसंख्य घटक आहेत. हे लोक शहरांच्या मानाने उपेक्षित आणि मागासलेले आहेत. एवढेच नाही तर त्यांच्याठायीं दारिद्र्यही पसरलेले असून त्यांच्यापैकी अनेकांना जीव-धारणेची साधनेही उपलब्ध नाहीत. ह्या कारणास्तव त्यांनी शेतकऱ्यांसाठी जमीन, आणि शेतकी-उद्योग ऋतुमानावर अवलंबून असल्याकारणाने ज्यावेळी तो उपलब्ध नसेल अशा वेळी करता येण्यासारखे धंदे, ह्या गोष्टींची मागणी पुढे ठेवली. खादी आणि ग्रामोद्योग यावर त्यांनी जो भर दिला तो ह्या अनुषंगाने. ह्या विचारानेच त्यांनी, सर्वांना उपजीविकेची साधने उपलब्ध होत असतानाच स्वावलंबनाच्या आधारावर ज्याचा पाया उभारला जाईल, अशा प्रकारची सामाजिक अर्थ-व्यवस्था ग्रामीण भागांसाठी आखली. जमीन संपूर्ण खेड्याच्या मालकीची असावी, संपूर्ण खेड्याचा त्या जमिनीवर अधिकार असावा, अशी त्यांची इच्छा होती. तसे झाले म्हणजे शेतकामामधून मिळणारी मजुरी आणि ग्रामीण उद्योग-धंद्यातून प्राप्त होणारी मजुरी यात आपोआपच परस्परसंबंध निर्माण होईल आणि समाजात समानता प्रस्थापित होऊ शकेल असे त्यांचे मत होते. अशा पद्धतीने गावातील काही लोक शेतकामात खपणारे तर बाकीचे उरलेले लोक ग्रामीण उद्योगात गुंतलेले, पण दोघेही एकमेकांच्या उत्पादनात सहभागी असणारे, अशी व्यवस्था होती. पशुपालन आणि शेती ह्यांची उभारणी सहकारी तत्त्वानुसार असावी असे गांधीचे मत होते. अशा रीतीने ग्रामीण जनता आपल्या सर्व गरजा स्वतःच्या उत्पादनाच्या साहाय्याने भागवू शकेल आणि माणसांच्या मजुरीच्या व मिळकतीच्या बाबतीत जवळ जवळ पूर्णांशाने समानता साधता येईल, असे त्यांचे म्हणणे होते. आपल्या आवश्यकतेपेक्षा अधिक असे जे उरलेले उत्पादन असेल, तेवढ्याचीच फक्त विक्री गावकऱ्यांनी करायची. ग्रामीण समाजाच्या गरजांप्रमाणे उत्पादन असायचे. जे असायचे ते मूलतः आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी, स्वतःच्या उपभोगासाठी; त्यातून जर काही शिल्लक उरले, तर त्याचा विक्रय करायचा. अशा रीतीने, शेती-धंदा म्हणजे गावाची गरज पूरी करण्याचे एक साधन, अशी दृष्टी उत्पन्न व्हावी असे त्यांचे मत होते.

३. समाज-वादी म्हणेल, शेत-जमीन ही राष्ट्राची गरज भागविण्याचे साधन आहे. तो म्हणेल, उत्पादन करायचे ते बाजार-पेठेसाठी, व्यापाराच्या -मागणी-पुरवठा इत्यादिकांच्या, नफा-तोटा वगैरेंच्या विचारानुरूप ते व्हायला पाहिजे. त्याच्या दृष्टीने, राष्ट्राच्या गरजा आणि त्या दृष्टीने देण्यात येणारा उत्पादनाचा अग्रक्रम यांचा विचार करून निश्चित करण्यात आलेल्या किंमतीचा प्रभाव शेती-उत्पादनावर पडणार. विशिष्ट परिस्थितीत शेतकऱ्याने सरकारला निर्धारित केलेल्या किंमतीवर ठरविलेला उत्पादनातील भाग विकत दिला पाहिजे अशी जबरदस्तीही करण्यात येणार. या किंमतीवर शेतकऱ्याने आपण होऊन आपला माल विकत देण्याचे नाकारले, तर त्याच किंमतीचे दर निश्चित करण्याचा अधिकार राज्य स्वतःकडे राखून ठेवणार. समाजवादी व्यवस्थेतसुद्धा जमीन ही शेती

करणाऱ्याच्याच मालकीची मानली गेली असली आणि सहकारी कार्यक्रमाला जरी त्या व्यवस्थेत पाठिंबा दिला जात असला तरी, बाजार–पेठेची मागणी पुरविण्यासाठी मालाचे उत्पादन तेथे होत असल्याकारणाने गावच्या उत्पादनातून पुरविल्या जातील याची शाश्वती कमीच. गावकरी मग उघड्या बाजारातच आपली खरेदी–विक्री करणार. स्वयंपूर्ण बनण्याचा अशा परिस्थितीत प्रश्नच नाही. मग शेतीधंद्याविरहित इतर उद्योगधंद्यात गावाला कामे मिळायची ती शहरी विभागात किंवा लहान–सहान कालवे तयार करणे, बांध वगैरे बांधणे अशासारख्या कामावर. समाजवादी व्यवस्थेखाली गावाच्या उत्पादन–सामुग्रीकडे पाहिले जाते ते राष्ट्राच्या संपत्तीचा एक भाग किंवा तिला सहाय्यक होणारा अंश म्हणून. राष्ट्राचा उद्देश पूर्ण करणे एवढेच गावखेड्याचे कार्य. गाव आणि उरलेला संपूर्ण देश या उभयतांमधे परस्परांची पिळवणूक करण्याचा, अपहार करण्याचा असा हा संबंध प्रस्थापित होतो. खरे पाहता वस्तुस्थिती अशी आहे की, समाजवादी देशात घडून आलेली सर्व औद्योगिक उन्नती, शेतकऱ्याच्या बाबतीत अन्याय करूनच झालेली आहे. "राष्ट्राचे कल्याण" सिद्ध व्हावे यासाठी हे असे करावेच लागते, अशा शब्दांनी शेवटी घडते तेच बरोबर आहे, असे सिद्ध करण्याचा मग खटाटोप केला जाऊ लागतो. या सर्व गोष्टींची उकल दुसऱ्या शब्दात करता येईल ती अशी,—समाजवादी व्यवस्थेत समाजाकडून व्यक्तीचे शोषण केले जात असते, पण गांधींच्या कल्पनेप्रमाणे निर्माण झालेल्या व्यवस्थेत व्यक्तीच्या पदरात त्याच्या श्रमाचा पुरेपूर मोबदला पडेल अशी हमी देऊन त्या द्वारा समाजाची उन्नती साधली जात असते.

४. जी वृत्ती या क्षेत्रात, तीच इतर क्षेत्रातही. औद्योगिक प्रगती झपाट्याने व्हावी यासाठी जास्तीत जास्त माणसे आणि कमीत कमी वेळात शेती–धंद्यातून काढून औद्योगिक क्षेत्रात आणून कामावर लावणे, या भूमिकेवरूनच समाजवादी राजवटीत पाउले उचलली जात असतात. यासाठी शक्य तेवढ्या कमी वेळात फार मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण घडवून आणणे हेच समाजवादी राष्ट्राचे उद्दिष्ट बनते, आणि त्यासाठी चालू घडीच्या गरजा पुऱ्या न करण्याची किंमत त्याला द्यावी लागते. "आज थोडी कळ सोसा,—उद्याच्या सुखासाठी!" हे बनते त्यांचे ब्रीदवाक्य. मग तो देश आपल्या अवजड उद्योगांसाठी यंत्रसामुग्रीची आयात करता यावी म्हणून स्वतःचे शेतीतून उत्पन्न केलेले धान्य वगैरे परदेशांना विकतो. आज आपले पोट मारून, लोकांची उपासमार आणि कुचंबणा करून का होईना, पण आपला देश लवकरात लवकर अत्याधुनिक असा, कारखाने व उद्योगधंदे यांनी संपन्न कसा बनेल, एवढाच विचार त्याच्यापुढे असतो. हेच त्याचे ध्येय बनते. हे ध्येय सिद्ध करण्यासाठी सत्ता आणि अधिकार यांचे केंद्रीकरण, ही एक आवश्यक बाब होऊन बसते.

५. गांधींच्या मताप्रमाणे सत्तेचा, अधिकाराचा कमीत कमी वापर करणारे सरकार हेच सर्वोत्तम सरकार होय.—That government is the best which governs the least. आपली काळजी आपणच घेऊ शकण्याची क्षमता लोकांच्या अंगी असायला हवी. म्हणूनच सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे, असे त्यांचे म्हणणे होते. व्यवस्थेत खालच्या थरांच्या हाती अधिक सत्ता, त्यांच्या हाती अधिक मोठ्या प्रमाणात साधन–सामुग्री, आणि वरच्या थरांकडून त्यांच्या कारभारात कमीत कमी हस्तक्षेप करणे, या गोष्टी ओघाने आल्याच. या दृष्टीने पाहिले असता, राज्याचा कारभार चालण्यासंबंधीची ही परिकल्पना नवीनच म्हणावी लागेल. आपणापैकी सर्वांनाच हिचे आकलन करता येणे सहज होईल की काय, याबद्दलही शंका वाटते; कारण, जेथे सत्ताधिकार आणि प्रजेवर कर लादण्याची शक्ती केंद्रित झालेली आहे अशा व्यवस्थेचीच आपल्याला सवय झालेली आहे. या नव्या व्यवस्थेत कर लागू करण्याचा अधिकार राहणार मुख्यत्वेकरून पंचायतींच्या हातात. ह्या पंचायती आपल्या उत्पन्नातला काही भाग पंचायत–समितीच्या वरिष्ठ संस्थेच्या हवाली करणार, त्या त्यांच्या वरिष्ठ संस्यांकडे, आणि अशा पद्धतीने वरच्या पायरीवरील संस्थांना आपल्या योगक्षेमासाठी खालच्या संस्थांकडून मंजूर झालेल्या रकमांवरच अवलंबून रहावे लागणार. समाज–संघटनेविषयीची गांधींची कल्पना त्यांनी या संबंधात वापरलेल्या जलावर्ताच्या उदाहरणातून उत्तमप्रकारे स्पष्ट होते. गाव हे केन्द्रबिंदू कल्पून त्याच्या सभोवार निर्माण होणाऱ्या मोठ्या आणि अधिक मोठ्या अशा परिसर–वर्तुळांना सत्ता आणि आधार प्राप्त होत जावो, अशी ही कल्पना आहे. जलावर्तात केन्द्रबिंदूपासून सारी शक्ती त्या केन्द्राभोवती वाढत जाणाऱ्या

आवर्तांना प्राप्त होत असते. हीच उपमा आणखी थोडी पुढे चालवून आजच्या भारताच्या परिस्थितीकडे जर आपण पाहिले, तर आपल्याला असे दिसून येईल की, ती अवस्था उलट उभा केलेल्या पिरॅमिडसारखी आहे. ह्या पिरॅमिडचे वरचे थर संख्येने आणि आकाराने खालच्या थरांपेक्षा अधिक मोठे आणि विशाल होत जातात, आणि म्हणून, ही उभारणी जसजशी अधिकाधिक विशाल बनत जाते तसतशी ती अधिकाधिक अस्थिरही बनत जाते. श्रीमंत अधिक श्रीमंत बनत आहेत, आणि श्रीमंत व श्रीमंतीकडे वाटचाल करू लागलेले गरीब या दोहोंमधली दरी, ते गरीब आपली परिस्थिती सुधारू लागलेले असले तरी, अधिकच विशाल बनत चालली आहे. लोकतंत्रात्मक समाजवादाचे जे रूप आज आपल्या देशात आहे, त्या व्यवस्थेतील उन्नतशील भारतीय समाजाचे चित्र हे असे आहे. हे अपरिहार्यच आहे. कारण, आपल्या प्रचलित व्यवस्थेत, ज्यांच्या हाती आर्थिक उत्पादनाची साधने आहेत अशाच माणसांना संपत्तीच्या वाढत्या उत्पादनाचे आर्थिक फळ प्राप्त होणार, आणि ते सुद्धा ज्या प्रमाणात ते उत्पादन वाढवतील त्या प्रमाणात. अशाप्रकारची परिस्थिती उत्पन्न न होऊ देण्यासाठी आवश्यक ती पाउले उत्पादन-वाढीवरोबरच उचलली गेली तरच ह्या प्रकाराला आळ बसू शकेल, एरव्ही नाही. आपण एक उदाहरण घेऊ. समजा, राज्य-सरकारने शंभर कोटी रुपये खर्च करून एक जल-विद्युत् प्रकल्प उभा केला. या प्रकल्पामुळे दहा लाख एकर जमीनीला पाणी-पुरवठा व्हावा अशी कल्पना. या योजनेप्रमाणे त्या जमिनीची किंमत समजा. पाचपटीने किंवा पाचशे टक्क्यांनी वाढायची आहे. याचा परिणाम काय होईल ते उघड आहे. वाढत्या दराने जमीन-महसूल आकारण्याचा जर अवलंब केला नाही किंवा, जमिनीचे समाजीकरण जर करण्यात आले नाही तर, या जमिनीपासून होणारा वाढता फायदा जमिनीच्या मूळच्या मालकांना त्यांच्या मालकीच्या जमिनींच्या प्रमाणात मिळणार हे स्पष्ट आहे. मोठ्या जमीन-मालकांना अधिक लाभ, लहानांना कमी, आणि स्वतःच्या मालकीची जमीन नसणाऱ्यांना काहीच नाही, असेच या परिस्थितीत होणार. उद्योग-वृद्धीच्या दुसऱ्या क्षेत्रातही हे असेच घडते. समाजवादामध्ये उद्योग-वृद्धीच्या प्रक्रियेला सुरूवात होत असतानाच राज्य-सरकारद्वारा संपूर्ण जमिनीचे, उद्योग-धंद्याचे आणि उत्पादनाच्या इतर साधनांचे समाजीकरण करून टाकीत असल्याकारणाने आणि अशा रीतीने उत्पादनाच्या साधनावरील खाजगी हक्कांचे उच्चाटन होत असल्यामुळे, सामाजिक अभ्युदयाचा लाभ संपूर्ण समाजालाच उपभोगता येणे सहज होते. पण या प्रक्रियेत आपल्यापुढे दुसरी एक नवीनच अडचण उभी राहात असते. ती अशी. सामाजिक अभ्युदयापासून मिळणारा लाभ जर सर्वांनाच समप्रमाणातच उपभोगायला मिळणार असेल, तर मग माणसाला आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करून काम करण्यासाठी उद्युक्त करणारा हेतूच कोणता उरला? भांडवलशाही अवस्थेत याच्या उलट असते, कारण तेथे माणूस आपल्या श्रमापासून निघणाऱ्या संपूर्ण लाभाचा स्वतःच उपभोक्ता असतो. हा एक असा पेच आहे, ज्यातून सुटका होण्याचा खराखुरा मार्ग समाजवादी जनसमुदायाला सापडलेलाच नाही. शेतीच्या कामात खासगी जमिनी व्यक्तिगत रूपाने वाहण्याची मुभा देऊन, आणि उद्योगाच्या क्षेत्रात शक्य होईल तोवर उत्पादनाच्या किंमतींचे दर निर्धारित करून किंवा मनुष्य ज्या प्रमाणात सामुदायिक प्रवासात सहभागी होतो त्या प्रमाणात त्याला योग्य मोबदला मिळेल अशी व्यवस्था करून या अडचणीतून पळवाट काढण्याचा प्रयत्न केला जात असतो. पण हे प्रमाण जर भरपूर आणि अधिक आकर्षक राहणीमानाचे ओझे वागविण्याइतके मोठे नसेल, तर अधिक जबाबदारीचा वाटा उचलण्यासाठी तरुणांना उद्युक्त करणे सोपे नाही. त्यांचा प्रश्न असा,- योग्य प्रमाणात लाभ जर आमच्या पदरात पडणार नसेल तर मग आम्ही एवढे अधिकचे श्रम करावेच कशाला? या सवालाला जवाब देता येतो तो फक्त नैतिक भूमिकेवरून, व्यावहारिक अशा भौतिक पातळीवरून नाही. त्या प्रश्नाला उत्तर द्यायचे म्हणजे "कर्तव्याची जाणीव ठेव, हक्कांची भाषा बोलू नकोस" हेच.

६. या ठिकाणी गांधींच्या विचार-धारेने समाजवादावर मात केली आहे असे दिसून येते. भौतिक पातळीवरील एक व्यवहार-शास्त्र या नात्याने समाजवादाला समानता प्रस्तापित करता येईल अशी समाजव्यवस्था घडवायची आहे, पण त्यात तत्त्वतः मूलभूत

असा पाया नाही. व्यावहारिक पातळीवरून कार्योन्मुख करणाऱ्या प्रेरणांची जर सोय करायची म्हटली, तर कोणत्याही समाजात वरिष्ठ वर्ग सर्व-सामान्यांपेक्षा अधिक उंच स्तराच्या जीवनमानावर आपला हक्क नेहमीच सांगणार हे उघड आहे. या दोन वर्गातील खिंड आपण होईल तेवढी कमी करू शकू कदाचित्, पण आजच्या परिस्थितीत ती अजिबात बुजविता येणे संभवनीय नाही. कारण आजचा समाज औद्योगिकतेचा समाज आहे आणि त्यात कामाच्या विभागणीप्रमाणे पराकाष्ठेचे भेद आलेले आहेत. याचे मूळ आहे, समाजवादाची भौतिक–सांपत्तिक आधारावर झालेली उभारणी. ह्यात गांधींनी याला जो पर्याय दिला तो, मानवी अस्तित्व आणि मानवी जीवन यांना भौतिकते-ऐवजी आध्यात्मिकतेचा पाया असावा, हा. त्यांच्या कल्पनेप्रमाणे, माणसाच्या जीवनाचा उद्देश भौतिक सुखसोयींचा उपभोग घेत राहणे हा नाही. कारण, या सुख-लालसेला अंतच नाही; जीवनाचा उद्देश आहे आत्मोपलब्धी. ही आत्मोपलब्धी केव्हा शक्य आहे ? माणूस आपण–होऊन आपल्या भौतिक गरजांना आळा घालील, सुव्यवस्थितपणे आपले जीवन जागण्यासाठी आवश्यक तेवढ्याच गरजांकडे तो लक्ष पुरवील व या दृष्टीने तो त्यांना अधिकात अधिक मर्यादा घालील, तेव्हा ! काळ जसजसा पुढे जात जाईल तसतसा या "कमीत कमी"चा व्याप अधिकाधिक विस्तृत होत जाईल, हे खरे. पण मुख्य लक्षात घेण्याचा जो मुद्दा आहे तो, मनुष्य जीवनाकडे कोणत्या दृष्टीने पाहतो हा. म्हणून माणसाचे जीवनातले कार्य नुसते स्वतःच्या सुखात लीन होऊन राहणे हे नसून आपल्या समाजाच्या, आपल्या बरोबरच्या इतर माणसांच्या कामी पडणे, त्यांची सेवा करणे, हे आहे. माणसाजवळ जर संपत्ती असेल तर त्याने 'मी या संपत्तीचा विश्वस्तमात्र (Trustee) आहे' अशा दृष्टीने पाहावे, आणि समाजाच्या हितासाठी त्या संपत्तीचा विनियोग करावा, या विश्वस्ताच्या सिद्धान्ताचे विषदीकरण करताना गांधी पुढे असेही म्हणतात की, हे विश्वस्ताचे कार्य कोणत्या पद्धतीने व्हावे ही गोष्ट व्यक्तीच्या इच्छेवर किंवा त्याच्या लहरीवर सोपविण्याचे कारण नाही, ते कायदा करून समाजाभिमुख बनविणेही शक्य आहे. हे उद्दिष्ट साधण्यासाठी समाजवाद बालाचा–अधिकाराचा प्रयोग करावा असे म्हणतो–लोकतंत्रात्मक समाजवाद लोकतांत्रिक संस्थांच्या द्वारा पु आणल्या गेलेल्या कायद्याच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साध्य करू म्हणतो. पण गांधीजी जरी कायद्याचा अवलंब करणे अग्राह्य मानीत नसले तरी, त्यांना हे उद्दिष्ट साध्य करावेसे वाटते ते शिक्षणाच्या, लोकांची दृष्टी बदलण्याच्या, जो काही बदल घडून येत आहे त्याचे महत्त्व श्रीमंत आणि गरीब या उभयतांनाही ज्यामुळे उमगेल अशा प्रकारच्या सार्वजनिक कार्यक्रमाच्या माध्यमातून.

७. तात्त्विक दृष्टीने विचार केला तर समाज–वाद, लोकतांत्रिक समाज–वाद आणि गांधी–वाद या तिन्ही परिकल्पनांचे काही प्रत्यक्ष परिणाम दिसून येतील. पहिला परिणाम विचारात घ्यायचा म्हणजे आर्थिक अभ्युदयाचे प्रमाण. समाजवादी व्यवस्थेत हे मान जास्तीत जास्त असे राहील, हे उघड आहे. कारण, त्या ठिकाणी समाजाला एक विविक्षित सांच्यात ढाळण्याच्या दृष्टीने अगदी प्रारंभिक अवस्थेपासूनच राज्य-सत्तेचे बळ आणि अधिकार वापरले जात असते. खासगी मालमत्तेचे संपूर्ण उच्चाटण केल्याशिवाय ही प्रक्रिया सुरूच होऊ शकत नाही. आणि सुरुवातीच्या अवस्थेत समाज–व्यवस्थेची उभारणी मालमत्तेवरील मालकी–हक्कावर केलेली असल्याकारणाने, हा बदल घात–पात आणि बंडखोरीचा धुमाकूळ याशिवाय घडून येऊ शकत नाही. रशिया आणि चीनमध्ये हा फेरबदल कसा घडून आला त्याचा इतिहास पाहिला म्हणजे ही गोष्ट लक्षात येईल. समाजवादात प्रचलित व्यवस्थेचे रूप बदलतानाच केवळ जोर–जबरदस्ती करावी लागते असे नाही तर, बदललेल्या व्यवस्थेची पुढची उन्नतीदेखील सरकारच्या बळाच्या वापरावरच अवलंबून राहते. आणि म्हणून लोकतांत्रिक व्यवस्थेत समाज ज्या अर्थाने 'स्वतंत्र' असतो त्याअर्थाने तो समाजवादी व्यवस्थेत स्वतंत्र कधी राहूच शकत नाही. सरकार आणि जनता या उभयतां-मधील मध्यस्थ म्हणून काम करण्यासाठी एक पक्ष असावाच लागतो. आणि या पक्षातसुद्धा व्यक्ति–माहात्म्य थैमान खालू लागते, त्याचा अधःपात होतो, आणि शासक व शासित यांच्यामधील दुवा साधण्याचे त्याचे जे मूलभूत कर्तव्य ते त्याच्याकडून होत नाही याला इतिहास साक्षीदार आहे. समाजवादी व्यवस्थेत, माणसावरील शिस्तबद्ध नियंत्रणाच्या जागी वस्तूवरील शिस्तबद्ध नियंत्रण आले की, समाजाचे 'स्वतंत्र–समाजात' रूपांतर घडेल हा सिद्धान्त तत्त्वतः आम्हाला

मान्य आहे; पण जगात तसे कुठेही आजवर घडलेले दिसत नाही. उलट, अशा प्रकारचे स्थित्यंतर जर व्हायचे असेल, तर त्यासाठी आजच्या राष्ट्रकुटुंबात एका अधिक विस्तीर्ण अशा आंतर्राष्ट्रीयत्वाची भावना उत्स्फूर्त झाली पाहिजे आणि तिने संकुचित स्वरूपाच्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेचे स्थान घ्यायला पाहिजे. आजच्या जगात हाच विचार ग्राह्य मानला जातो आहे असे दिसते. आंतर्राष्ट्रीय हितसंबंधावर—मग ते राजकीय स्वरूपाचे असोत अथवा अर्थ–नीतीच्या स्वरूपाचे असोत—याच विचाराचे प्रभुत्व आहे. पारस्परिक सहाय्याऐवजी नफ्यावर दृष्टी ठेवूनच आज आंतर्राष्ट्रीय व्यापार आणि देवाण–घेवाण पार्श्वभूमीवरून पाहिले असता, समाजवादाचा अंगीकार केलेल्या समाजाला स्वतंत्र समाजाचे स्वरूप कसे काय मिळू शकेल याची शंका वाटते. तसा काही प्रयत्न यदाकदाचित् जर कुठे झालाच, तर त्याकडे नाराजीच्या दृष्टीनेच पाहिले जाणार ! झेकोस्लाव्हाकियामध्ये असेच घडले. तेव्हा, अशा समाजाला निदान आणखी बराच काळ लोटेपर्यंत तरी, बंदुकीच्या नळांमधून वापरल्या जाणाऱ्या सरकारच्या शक्तीवरच अवलंबून रहावे लागणार. दुसरा मुद्दा असा की, एकानंतरची दुसरी राजवट यायची झाली की, या समाजाला नेहमीच अडचणींना तोंड देत रहावे लागणार. आजच्या समाजवादी राजवटीतील फेरबदल सुरळीतपणाचे, लोकांच्या जीवनाची समपातळी न बिघडू देता घडणारे असे होऊच शकत नाहीत. एका हुकुमशाहीला दुसऱ्या हुकुमशाहीत स्वतःला बदलून घ्यायचे असल्यामुळे हे असे होणे अपरिहार्य आहे, आणि म्हणून प्रत्येक बदलती राजवट हाणामारीची, रक्तरंजित अशीच असायची, हे ठरलेले आहे !

८. लोकतंत्रात्मक समाजवादाचे आज भारतात प्रयोग सुरू आहेत. येथे एका प्रकारे या व्यवस्थेची परीक्षाच होत आहे. या प्रयोगात गेल्या दोन दशकांचा आढावा घेतला असताना परिस्थिती फारशी आशाजनक वाटत नाही. आजची गरज लक्षात घेऊन त्या मानाने आर्थिक अभ्युन्नतीचा वेग साधला जायला हवा. तो तसा साधला गेलेला नाही. बेकारी झपाट्याने वाढीस लागलेली आहे. आणि आजच्या व्यवस्थेत आपल्याला काही भवितव्य आहे असा विश्वासच तरुण–वर्गात उरलेला दिसत नाही. निव्वळ समाजवादी व्यवस्थेत आर्थिक विकासाचा जो वेग असतो तो या लोकतांत्रिक समाजवादी व्यवस्थेत साधणे शक्य नाही हे निःसंशयच. कारण समाजवादी व्यवस्थेप्रमाणे या व्यवस्थेत खाजगी उपभोगावर कडक निर्बंध घालता येणे शक्य नाही. या व्यवस्थेची फायद्याची बाजू एवढीच की, येथील समाज स्वतंत्र आणि सुस्थिर असू शकतो, आणि अंकुशरहित व न्यायपूर्ण मतदानाच्या माध्यमाने येथे सत्तेचे हस्तांतर गुण्यागोविंदाने घडू शकते. पण उन्नतीशील समाजाच्या वाढत्या गरजा आणि वाढत्या आकांक्षांशी जुळता होईल असा प्रगतीचा व अभ्युन्नतीचा वेग साधणे येथे आवश्यक आहे. हे कसे घडवून आणता येईल हा आमचा आजचा प्रश्न आहे. आजच्या या व्यवस्थेखाली जनतेची क्रियाशीलता आणि खाजगी संस्थांची क्रियाशीलता जवळ जवळ पूर्णपणे खच्ची झाल्यासारखी झाली आहे, हा आमच्यापुढे असलेला दुसरा प्रश्न आहे. लोकतंत्रात्मक समाजवादी राज्य आणि हुकुमशाही समाजवादी राज्य यात आज एवढाच फरक उरलेला दिसतो की, पहिल्या प्रकारच्या राज्यात निरंकुश आणि न्याय्य मतदाने नियमितपणे होऊ शकत असतात, दुसऱ्या प्रकारच्या राजवटीत तसे होत नाही. पण हरघडी राज्यशक्तीवर आणि राज्ययंत्रणेवरच अवलंबून राहाण्याच्या दृष्टीने पाहिले असता या दोहोत फारच सारखेपणा दिसून येतो. लोकतंत्रात्मक समाजाचा खरा फायदा हा की, देशातील अभ्युन्नतीच्या कार्यात लोकांना स्वयंस्फूर्तीने पाउले उचलण्याची आणि पुढाकार घेण्याची सोय असली पाहिजे. आजच्या या परिस्थितीत ही गोष्ट आमच्या देशात नाही. या गोष्टीकडे लक्षच दिल्या जात नाही. आणि या दुर्लक्षामुळे आमची आजची लोकतंत्रात्मक समाजवादी व्यवस्था तग धरून चालू राहण्यास धोका उत्पन्न झाला आहे.

अर्थशास्त्राचे आणि राज्यशास्त्राचे सुसंगत, सिद्धान्त गांधींनी कधीच नव्याने निर्माण केलेले नाहीत, हे अगोदरच सांगितले आहे. मानवतेच्या आणि नीतिमत्तेच्या विचारावर आधारलेली अधिक चांगली व्यवस्था आपल्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संस्थांमधून कशी साधता येईल याच दृष्टीने त्यांनी आयुष्यभर या गोष्टींवर हल्ला चढविला. त्यांनी जीवनाच्या काही विशिष्ट ध्येयांवर आवर्जून भर दिला, आणि या ध्येयपूर्तीसाठी विशिष्ट स्वरूपाचा सार्वत्रिक

आंदोलनाचा मार्गही त्यांनी आम्हाला दिला. त्यामुळे समाजाची सद्सद्विवेकबुद्धी जागृत होण्यास आणि थोडक्याच वेळात हवा तो फेरबदल शांतपणे घडून येण्यास मदत झाली. मला असे वाटते की, आज भारतात सुरू असलेल्या लोकतंत्रात्मक समाजवादी कार्यक्रमाने जर गांधीप्रणीत पद्धतीचा अंगीकार केला नाही, तर या व्यवस्थेतील लोकतंत्रात्मकतेचा भाग पूर्णपणे धुवून जाऊन नाहीसा होण्याचा प्रसंग समोर येऊन उभा राहिल्यावाचून राहणार नाही. हा धोका खराखुरा आहे, काल्पनिक नाही.

जवाहरलालजींच्या शब्दात गांधीजी

त्यांच्या मरणात सुद्धा एक भव्यता होती, संपूर्ण कलात्मकता होती. कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी ते मरण म्हणजे त्या पुरुषाला आणि त्याने व्यतीत केलेल्या जीवनाला शोभेसा कळस होता. जगून त्यांनी जो पाठ दिला, तो मरून त्यांनी दृढतर केला. त्यांच्या प्रभावाची प्रभा पूर्ण फाकलेली असतानाच त्यांना मृत्यू आला. तो क्षण प्रार्थनेचा होता. अशाच क्षणी मरणे त्यांना आवडले असते यात शंका नाही. ऐक्याकरिता त्यांनी आपला बळी दिला. त्याच कार्याला ते सतत वाहिलेले होते, कोणीही जशी अकस्मात मरणाची इच्छा करावी, तसाच अकस्मात मृत्यू त्यांना आला.

* * *

गांधीजींचा वैयक्तिक परिचय नसलेल्यांना व केवळ त्यांच्या लेखावरूनच त्यांना ओळखणाऱ्यांना असे वाटणे संभवनीय आहे की, गांधीजी हे कोणी धार्मिक पेशाचे, अगदी कट्टर सोवळे, आंवट चेहऱ्याचे, दैववादी वृत्तीचे; आनंदभंग करणाऱ्या वृत्तीचे व जणु काय सोवळ्याचे प्रदक्षिणा घालणाऱ्या भिक्षुकासारखे असावेत. पण त्यांच्या लेखावरून त्यांना ओळखणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणे होय. कारण त्यांच्या लेखनापेक्षा त्यांचे व्यक्तिमत्त्व फारच मोठे होते. अतएव त्यांच्या लेखातील एखादा उतारा देऊन त्यावर टीका करणे अनुचित होईल. कट्ट्या दैववाद्याच्या अगदी उलट त्यांची वृत्ती होती. त्यांचे स्मित आल्हाददायी असे व त्यांचे हास्य इतरास हसवी आणि त्यांचा विनोद प्रसन्नता पसरी. निर्व्याज बालकास शोभेसे असे काही तरी त्यांच्या ठायी होते व ते अतिशय विलोभनीय असे होते. एखाद्या जागी प्रवेश करताच ते आपल्यावरोबर ताज्या हवेचा झोत आणीत असे वाटे. त्यायोगे सारे वातावरण एकदम उल्हसित होई.

'फ्रीडम फ्रॉम फिअर'—पं. जवाहरलाल नेहरू

लोकमान्य टिळक व महात्मा गांधी

—श्री. रंगराव दिवाकर
अनु.—श्री. वसंतराव आपटे, वर्धा

भारताला ब्रिटीशांच्या परकीय अंमलातून मुक्त करण्यासाठी झालेल्या स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास लिहिताना आणि जनतेच्या लढाऊ राष्ट्रवादातून शेवटी स्वराज्य मिळाले त्या स्वातंत्र्य समराची गाथा गायिली जाते तेव्हा, टिळक व गांधी या दोन नावांपेक्षा दुसरी कोणतीच नावे प्रमुखपणे आपल्याडोळ्यासमोर उभी राहत नाहीत. या दोन्ही महापुरुषांनी समर्पित जीवन व्यतीत केले. स्वातंत्र्य मिळावे इतकेच नव्हे तर भारतीय जनतेत स्वराज्याला आवश्यक असलेल्या गुणांची वाढ व्हावी, आपल्या संस्कृतीचा अभिमान वाटावा, या उद्देशाने आपल्या सर्व जीवनात एक ध्येय उराशी बाळगले व त्यासाठी संपूर्ण आयुष्य वेचले. दोघांचेही जीवन म्हणजे निष्कलंक चारित्र्य, सचोटी व प्रामाणिकपणा या सद्‌गुणांची मूर्तिमंत रूपेच होती. भारताची सर्वांगीण उन्नती व्हावी, भारताचे पुनरुत्थान व्हावे म्हणून त्यांनी अथक परिश्रम केले. राष्ट्राच्या व जनतेच्या भवितव्यतेवर "परमेश्वरी सत्तेचे" प्रभुत्व असते यावर दोघांचीही अतूट श्रद्धा होती. या परमेश्वरी सत्तेवरील श्रद्धेसोबतच भारतीय जनतेवर त्यांचा विश्वास असल्याने ती श्रद्धा सामर्थ्यवान झाली. त्यामुळे दोघेहीजण स्वराज्य व ते मिळविण्याच्या लोकशाही मार्गाबाबत निर्भयतेने सतत प्रतिपादन करीत राहिले.

मानवाची सतत प्रगती व्हावी, त्याचा उत्तरोत्तर विकास व्हावा, त्याचा मार्ग नेहमी उज्ज्वल रहावा म्हणून भारतीय संस्कृतीने युगानुयुगे अलौकिक बुद्धीमान महापुरुष निर्माण केले. टिळक व गांधी हे त्याच भारतीय संस्कृतीतून पुढे आले. त्यांचा विकास झाला. दोघांच्याही सार्वजनिक जीवनाची सुरवात एका विशिष्ट ध्येयाने सुरू झाली. आपल्या जनसेवेच्या कामात ते कधीच अडखळले नाहीत व कोणत्याही कष्टाला न डगमगता सतत सर्व प्रकारचे कष्ट व यातना भोगल्या. आत्यंतिक त्यागाला ते सदैव तयार राहिले. भारतीय जनतेवर त्यांनी उत्कट प्रेम केले व स्वतःला त्या जनतेशी एकरूप करून टाकले. त्यामुळेच त्यांना सतत स्फूर्ति मिळत राहिली व परिणामकारकपणे निष्काम व अनासक्त जीवन ते जगले. ध्येयावरची निष्ठा अढळ राहिली.

१८५६ साली टिळकांचा जन्म झाला. स्वराज्याकरिता सतत प्रयत्न करताना त्यांना १९२० साली मृत्यु आला. टिळकांनंतर १३ वर्षांनी गांधी जन्माला आले. १९४७ साली स्वराज्य स्थापनेपर्यन्त ते जगले. १९४८ साली "अहिंसेच्या द्वारातच सत्य" प्रस्थापना या तत्वासाठी शेवटी हुतात्मा म्हणून त्यांना मृत्यु आला. एका अर्थाने १९१५ पर्यन्त ते दोघेही समकालीन होते. लोककल्याण हेच जीवनाचे ध्येय मानून निरनिराळ्या ठिकाणी व वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांनी सेवा केली. १९१४ पर्यंत तर जगाच्या दोन वेगळ्या देशात ते काम करीत होते. परकीय सत्तेशी लढा देण्यासाठी राष्ट्रवादी शक्तींना सामर्थ्य संपन्न करण्यासाठी टिळकांनी भारतात प्रयत्न केले. तर साम्राज्यवादी ब्रिटीशांशी लढण्यासाठी "सत्याग्रह" नावाचे एक नवेच शस्त्र गांधींनी शोधले व दक्षिण आफ्रीकेत उपयोगात आणले. शेवटी त्याच सत्याग्रहाद्वारा भारताने परकी सत्तला घालविले. गांधीजी म्हणत असत की,

* "गांधी मार्ग" त्रैमासिकात प्रसिद्ध झालेल्या मूळ इंग्रजी लेखाचा श्री. व. गो. आपटे यांनी केलेला स्वैर अनुवाद.

"भारताच्या सर्व दु:खांवर" सत्याग्रह हाच एक परिणामकारक उपाय आहे. शेवटी गांधी १९१५ साली भारतात आले व देशाच्या राजकीय व सार्वजनिक जीवनात भाग घेऊ लागले. त्याचवेळी ते दोघेही खऱ्या अर्थाने स्थल, काल, विचार व कार्य या सर्वच बाबतीत समकालीन झाले. १ ऑगस्ट १९२० ला टिळक आपल्यातून निघून जाईपर्यंत त्या दोघांनीही एकमेकाला पूरक असेच काम केले व जणू काही गांधीजींसाठी स्वातंत्र्य लढयाचा मार्ग प्रशस्त व मोकळा करून दिला व टिळक गेले. अशा तऱ्हेने भारताच्या सार्वजनिक कार्यक्षेत्रांत दोघांनी फक्त ५ वर्षे ७ महिनेच बरोबरीने म्हणा किंवा समकालीन म्हणून काम केले. या काळातही भारतात येऊन एक वर्षाच्या मौन निरीक्षणानंतर गांधी १९१५ साली भारताच्या सार्वजनिक जीवनात भाग घेऊ लागले. त्याच वेळी त्या काळात टिळक चिरोल केससाठी इंग्लंडमध्ये तेरा महिने राहिले व तेथेच होमरूलसाठी काम करीत होते.

भारतात एकाच कार्यक्षेत्रात बरोबरीने काम करण्याचा या दोन थोर महापुरुषांचा काळ फार थोडा आहे. पण आपण हे लक्षात ठेवले पाहिजे, की भारताच्या आधुनिक इतिहासात पुष्कळ दृष्टीने हा काल (१९१५–१९२०) अत्यंत कसोटीचा व आणिबाणीचा होता. पहिल्या महायुद्धामुळे जगभरसुद्धा हा काळ अत्यंत अडचणीचा व गंभीर पेचप्रसंगांनी भरलेला होता. भारतात तर त्यावेळी अभूतपूर्व अशी जागृती होत आहे असे दृश्य दिसत होते. स्वराज्याकरिता जी लढाई द्यावयाची तीत कोणती साधने वापरावीत व कोणते मार्ग चोखाळावेत हे पाहण्याचा एक प्रकारे तो संक्रमण काळ होता. या अशा विलक्षण खळबळीच्या काळात या दोन महान झुंझार नेत्यांचा राष्ट्रीय प्रश्नावर कोणते उपाय योजावेत व कोणते मार्ग घ्यावेत या संबंधीचा विचार विनिमय विचारात घेतला असता त्या काळाला आलेले एक आगळे स्वरूप नजरेत भरते. त्यामुळे १९१५ ते १९२० या ५ वर्षांच्या काळातील भारताच्या परिस्थितीचा अभ्यास अत्यंत मनोरंजक, बोधप्रद व प्रसन्न असा आहे. या घडामोडीच्या काळात या दोन थोर महात्म्यांनी जो भाग घेतला व युगप्रवर्तक अशी कामे केली त्याच काळावर माझे लिखाण केन्द्रित करावयाचे आहे.

एखाद्या शाळकरी मुलाप्रमाणे या दोन महान नेत्यांची तुलना करून साम्य व विरोध दर्शविणे हे माझ्या दृष्टीने अयोग्य आहे. कारण मला दोघांपासून स्फूर्ति व प्रेरणा मिळाली आहे. हे एक खरोखर माझे भाग्यच होय. पुण्यात १७ जून १९१४ रोजी सकाळी केसरी कार्यालयात जाऊन टिळकांच्या पायावर डोके ठेवले व आशिर्वाद घेतला. त्या प्रसंगाचे पूर्ण व स्पष्ट चित्र आज मजसमोर आहे (आदलेच दिवशी मध्यरात्री, सहा वर्षांच्या तुरुंगवासानंतर टिळक सुटून आले होते). गीतेवरचे टिळकांचे पुस्तक "गीतारहस्य" प्रसिद्ध होण्यापूर्वीच टिळकांनी त्या वेळी त्या बाबतीत गीता तत्वज्ञानावर जी भाषणे दिली ती मी किती तल्लीनतेने ऐकली याचा विसर मला कधीच पडणार नाही. आम्ही काही मूठभर ग्रॅज्युएट तरुण त्यांच्याकडे देशसेवेबाबत मार्गदर्शन घेण्यासाठी गेलो असता त्यांनी आमच्या मनावर जो परिणामकारक ठसा उमटविला त्याचे विस्मरण होणे शक्यच नाही. त्याचप्रमाणे १९१९–१९२० मध्ये ज्यावेळी प्रथम गांधी हुबळीला आले असता त्यांचेशी माझे जे पहिले संभाषण झाले त्याची आठवण तेवढीच स्पष्ट व ताजी आहे. प्रत्येक जण आपआपल्यापरी, आपापल्या काळात व क्षेत्रात महान असाच झाला. भारताचे महान राष्ट्र म्हणून पुनरुत्थान व्हावे, देश स्वतंत्र्य, संपन्न व्हावा हेच टिळकांचे व गांधींचेह ध्येय होते. अर्थात् या ध्येय प्राप्तीसाठी जी साधने वापरावयाची व समोर आलेल्या प्रश्नांची उकल कशी करावयाची या बाबत दोघांच्यात बरेच मतभेद होते. दोघांनीही हे आपले मतभेद प्रगट केले. त्यात कोणताही आडपडदा राखला नाही. समोरचे आदर्श व त्याबाबतचे विचार यात मतभिन्नता असली तरी त्यामुळे त्यांनी आपल्यात फूट पडावी इतक्या प्रमाणात त्याला वाढू दिले नाही. आणि हीच त्यांच्या महानतेची खरी कसोटी आहे. जर आपल्यात फूट पडली किंवा संघर्ष निर्माण झाला, तर तो शेवटी ध्येयप्राप्तीला घातक ठरेल हे दोघेही जाणत होते. या बाबतीतला त्यांचा संयम म्हणजे त्यांच्या अंत:करणातले सौहार्द्र, संस्कारसंपन्नता आणि राजकीय क्षेत्रातील परिणत प्रज्ञता याचे द्योतक आहे. राष्ट्रीय ऐक्य कायम ठेवणे व त्याच समान ध्येयासाठी सतत प्रयत्नशील राहणे ह्यांचे महत्त्व दोघांनाही पूर्णपणे पटले असल्याने दोघेही त्याच बाजूने सतत प्रयत्न करीत असत.

असे पुष्कळ प्रसंग दाखवून देता येतील की, ज्यावेळी टिळक व गांधी यांनी परस्परावद्दलचा आदरभाव व प्रेम निःसंकोचपणे व्यक्त केला आहे. इतकेच नव्हे तर त्यांनी जे जे काम हातात घेतले त्याला परस्परांनी पूर्णपणे मदत केली. आफ्रिकेतल्या गांधींच्या लढयाला टिळकांनी पूर्वीच केसरीतून पूर्णपणे पाठींवा दिला होता. गांधी व कस्तूरबा भारतात आल्यावर त्यांच्या सत्काराचा जो पहिलाच समारंभ मुंबईत हिराबाग येथे १३–१–१९१५ रोजी झाला त्याप्रसंगी आपल्या शुभेच्छा व्यक्त करण्याचा हा पहिलाच प्रसंग टिळकांनी हातचा जाऊ दिला नाही. मुंबई सरकारच्या त्यावेळच्या (१९१५) पोलीस रिपोर्टात स्पष्टपणे नमूद केले आहे की, १३-१–१९१५ च्या या सभेत गांधीचे जे स्वागत झाले त्यात २५० लोक होते. सभेसाठी बोलावणे नव्हते तरी टिळक आपण होऊन गेले व त्या सभेत बोलले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले, "गांधींचा मानसन्मान करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्यच आहे. दूरच्या प्रदेशात भारताची मान ताठ रहावी म्हणून त्यांनी लढा दिला." पुढे ते म्हणाले, "असे शूर पुरुष भारतात निर्माण झाले पाहिजेत." प्रत्युत्तरात गांधी म्हणाले की, "मुंबईत टिळक भेटल्याने मला फार आनंद होत आहे. मी ज्यावेळी पुण्यात जाईन त्यावेळी त्यांना पुनः भेटून माझी आदरांजली अर्पण करीन." गांधीजी १९१५ च्या फेब्रुवरीत पुण्याला गेले. त्यावेळी ते गोखले व टिळकांना भेटले. गोखले यांना गंगेची उपमा देऊन त्यांनी टिळकांची महासमुद्राशी तुलना केली होती. गांधीजी गोखल्यांना आपले राजकीय गुरू मानीत हे सर्वांना माहीत आहेच. म्हणूनच त्यावेळी सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीत सामील होण्याचा विचार ते करीत होते. आपल्या संभाषणातून व पत्रव्यवहारातून गांधीजी टिळकांचा उल्लेख टिळक महाराज असा करीत. १७–३–१९१५ ला अहमदाबाद येथल्या आश्रमात दिलेल्या प्रार्थना प्रवचनात ते म्हणाले, "आज भारतात फक्त एकच माणूस असा आहे की, ज्याचेकरता लाखो लोक वेडे आहेत, ज्याचेकरता लाखो आपले प्राण वेचतील. तो माणूस, तो महापुरुष म्हणजे टिळक महाराज, त्यांनी गीतेच्या अंतरंग अर्थावर लिहिले आहे, "गीतारहस्य". युद्ध परिषदेत राजनिष्ठेच्या ठरावावर टिळकांना बोलण्याची परवानगी न दिल्यावद्दल गांधींनी त्यावेळच्या मुंबईच्या गव्हर्नरांची अगदी उघडपणे कानउघाडणी करून ठपका दिला होता. गांधी म्हणाले, "टिळक व त्यांच्या अनुयायांना दुर्लक्षणे किंवा त्यांचा अपमान करणे हे न पटण्याजोगे आहे. टिळक हे जनतेचे अत्यंत लोकप्रिय नेते आहेत." त्याप्रसंगी टिळकांचा हा जो उपमर्द केल्या गेला त्यावद्दल मुंबईच्या गव्हर्नरांनी टिळकांची उघडपणे माफी मागावी असे गांधींनी सुचविले. १–८–१९२० ला टिळक आपल्यातून गेल्यावर गांधींनी आपल्या 'यंग इंडिया' साप्ताहिकात त्यांचेवर जो मृत्यूलेख लिहिला तो एक अप्रतिम लेखाचा नमुनाच आहे टिळकांच्या झुंजार नेतृत्वाचे व लढाऊ वृत्तीचे व तदनुषंगिक गुणांचे त्यात वर्णन केले आहे. त्यानंतर कांग्रेस संघटनेतर्फे गांधीजींनीच स्वराज्याच्या लढाईसाठी म्हणून टिळक स्वराज्य फंड सुरू केला. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे." ही घोषणा प्रथम टिळकांनीच भारताला दिली.

टिळकांवद्दलची गांधींची ही प्रशस्ती सहज समजून येईल. गांधींनी ज्या वेळी भारताच्या राजकारणात प्रवेश केला, त्यावेळी टिळक आपल्या राजकीय नेतृत्वाच्या कीर्तीशिखरावर होते. परंतु त्याचबरोबर हेही लक्षात घेण्याजोगे आहे की, टिळकांनी भारताच्या राजकीय क्षितिजावरच्या ह्या नव्या ताऱ्याचे योग्य ते भविष्य केले होते, मूल्यमापन केले होते. एका अर्थाने भारताच्या राजकारणात त्यावेळी गांधी नवखेच होते. राजकारण व आपले जीवन व त्यातून उद्भवलेल्या प्रश्नांची उकल करण्याचे गांधींचे मार्ग वेगळे व आगळेच होते. असे असूनही एक श्रेष्ठ व ज्येष्ठ राजकारणी मुत्सद्दी या नात्यानी टिळकांनी गांधींच्या मधले सूप्त सामर्थ्य ओळखले आणि आपला सहकारी म्हणून उदारपणे त्यांचा गौरव केला. गांधीजींमधल्या ह्या सुप्त शक्तीची तेजस्विता टिळकांनी जाणली. गांधींची टिळकांशी जी पहिली भेट म्हणा मुलाखात म्हणा झाली त्यानंतर टिळकांनी कर्नाटकाच्या गंगाधरराव देशपांडे यांना सांगितले की, गांधी इतर सर्वांच्या पेक्षा खूपच पुढे जातील. टिळक स्वतः एक विद्वान व तत्वज्ञानी होते, तरी त्यांनी गांधींच्याकडे एक चारित्र्यसंपन्न संतपुरुष म्हणून पाहिले. कारण त्यांचे सर्व सामर्थ्य त्यांच्या अध्यात्मिक साधनेत आहे, असे ते मानीत. श्रीमती अवंतिकाबाई गोखले यांनी लिहलेल्या गांधीचरित्र ग्रंथाला टिळकांनी जी प्रस्तावना लिहली आहे

त्यात टिळकांनी गांधींजींबावतचे आपले मत योग्य प्रमाणात प्रगट केले आहे. प्रस्तावनेत गांधींच्या उच्चतम चारित्र्यसंपन्नतेबाबत अत्यंत आदराचे उद्‌गार काढले आहेत. गांधींचा मोठेपणा हा त्यांच्या उच्च नैतिकतेत आहे असे ते म्हणतात. पुढे टिळक लिहतात– "गांधींशी पुष्कळ बावतीत काहींचे मतभेद असतील पण त्यांनी आपल्या खाजगी व सार्वजनिक जीवनात आपल्या उत्तम चारित्र्यसंपन्नतेचा जो आदर्श समोर ठेवला व व्यवहारात आणला त्याबद्दल कुणाचेही दुमत असणे शक्य नाही." टिळकांच्या या लिखाणानंतर आपण पाहिले की इंग्लीश तत्व–चिंतक श्री. सी. इ. एम. जोडनी गांधींचे "नीतिसंपन्न अलौकिक महापुरुष" असे वर्णन केले आहे. प्रस्तावनेत पुढे टिळक लिहितात "सत्यावर अढळ श्रद्धा आणि अत्यंत कठीण प्रसंगी अडचणींच्यावेळी अलोट धैर्याने उभे राहणे हे आध्यात्मिक गुण आहेत. या गुणांचा गांधींच्यामध्ये परमोत्कर्ष झाला आहे." इतरांवर झालेल्या अन्यायविरुद्ध गांधींनी अनासक्त वृत्तीने जी निःस्वार्थ सेवा केली त्याबद्दल टिळकांनी त्या प्रस्तावनेत विशेष गुणगौरव केला आहे. गांधींच्या सत्याग्रह शिकवणीबाबत टिळक म्हणतात – "देशातला कायदा मानायचा की नाही अशी विलक्षण परिस्थिती निर्माण झाली व एकप्रकारे धर्मसंकट समोर उभे राहिले अशा वेळी गांधींनी हा निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग शोधला. हा निःशस्त्र प्रतिकार अडवणूक किंवा ज्याला गांधी सत्याग्रह म्हणतात तो मार्ग त्यांनीच शोधून काढला आहे. आणि आपल्या तपश्चर्येने त्याला पवित्रता आणली आहे. ही एक आध्यात्मिक शक्ती आहे. गांधींचे हे असे आध्यात्मिक जीवन आहे. त्याच दृष्टीकोणातून त्यांचे जीवन अभ्यासले जावे जेणे करून स्वतःचे नैतिक बल व आध्यात्मिक सामर्थ्य वाढेल."

मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे हे स्पष्ट आहे की, टिळक व गांधी यांच्यात पुष्कळ बाबतीत मतभेद होते तरी परस्परांना एकमेकाबद्दल अत्यंत आदर होता. दोघांनीही निरनिराळ्या प्रसंगी जी जी कामे हातात घेतली त्यांना परस्परांनी सहाय्यच केले व ज्यांनी जी जी बाजू घेतली त्याचा पाठपुरावाच दुसऱ्यांनी केला. गांधीजींना फक्त राजकीय तडजोड किंवा कसली तरी थातूर मातूर समजूत कधीच पसंत नव्हती. तरी १९१५ साली बेळगाव येथे भरलेल्या राजकीय परिपदेत टिळकांनी मवाळांशी जी राजकीय तडजोड केली त्याला गांधींनी मान्यताच दिली. गांधींना मुळातच एकता अत्यंत प्रिय असे. पहिल्या महायुद्धाच्या रिक्रूटभरतीबाबत गांधींचे टिळकांशी मतभेद होते तरी १९१८ मध्ये मुंबईच्या गव्हर्नराशी गांधींनी अत्यंत कडक धोरण स्वीकारले. चिरोला केसमध्ये ब्रिटीशांच्या कोर्टात न्याय मिळविण्याचा टिळकांचा विचार गांधींना पसंत नव्हता तरी टिळक पर्स फंडासाठी ज्यावेळी रक्कम जमविणे सुरू झाले त्यात गांधींनी खूप मदत केली. गांधींच्या वेगळ्या राजकीय दृष्टीकोनाची पूर्ण जाणीव असूनही टिळकांनी गांधींना कांग्रेसच्या व्यासपीठावर आणण्याची संधी वारंवार दिली. याचाच अर्थ हा की, टिळक गांधींकडे देशाला हितकारक अशी एक सतत वाढणारी सामर्थ्यसंपन्न व्यक्ती म्हणून पाहत होते. खेडा सत्याग्रहासारखी जी जी कामे गांधींनी आपणहून हाती घेतली त्याला टिळकांनी पाठिंबा दिला. शेवटी १९१९ च्या अमृतसर कांग्रेस अधिवेशनात दोघांचे दृष्टिकोन भिन्न असूनही टिळकांनी गांधींशी तडजोड केली व मिळवून घेतले.

टिळकांचे व गांधीचे लिखाण व त्याचे ग्रंथ अगदी वरवर चाळले तरी आपणास दिसून येईल की, त्या दोघांचेही चारित्र्य व चरित्र हे प्रमुखपणे भारतीय संस्कृतीतूनच विकसित झाले, त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. इतकेच नव्हे तर त्यांचे प्रेरणास्थान भारतीय संस्कृती व त्यातील आध्यात्मिक गुणसंपदा हेच होते. टिळक लहानपणापासूनच वेदाध्ययन व संस्कृत अध्ययनात वाढले. त्यामुळे ते संस्कृतचे गाढे अभ्यासक व विद्वान होते. गांधीजी वेद व उपनिषदांच्याकडे आपल्या आयुष्यात जरा उशीरा वळले, पण त्याची आई व घरचे धार्मिक वातावरण यामुळे त्यांना अनासक्त व समर्पित जीवनाची ओळख झाली. गांधींची नैसर्गिक व सहज सत्यनिष्ठा त्यांना आध्यात्मिक जीवनाचा शोध घेण्यात पदोपदी उपयोगी पडली. दोघांनीही गीतेवर भाष्ये लिहली आहेत. त्यांच्या अलौकिक प्रतिभेला गीतेचा संदेश जो वाटला तो त्यांनी आपल्या तत्त्वांशी सुसंगत असा मांडला. ज्या अर्थाने आपण गांधींना धार्मिक म्हणू त्या अर्थाने टिळक धार्मिक नव्हते. टिळक हे प्रकांड पंडित व गाढे विद्वान होते. तत्त्वज्ञानातील प्रमेये किंवा धर्म व दर्शन–शास्त्रातले

सिद्धांत मांडणे व समजून घेणे त्यांना फार सहज व सोपे होते. जणू काही सर्व ज्ञान त्यांच्या आटोक्यातच होते. गांधींच्या बाबतीत सगळेच वेगळे. धर्म व धार्मिक प्रश्नाबाबत व तत्त्वज्ञानाबाबतही गांधींचा दृष्टिकोन व्यावहारिक व सर्वधर्म समन्वयाचा होता. सगळ्या धर्मांचे व धर्मग्रंथांचे अध्ययन गांधींनी अत्यंत सहानुभूतिपूर्वक केले. पण हा सर्व धर्मांचा अभ्यास करताना त्यांची दृष्टी ही असे की, आपण मानवी जीवनाचा पाया म्हणून सत्य व अहिंसा ही जी तत्त्वे मान्य केली आहेत, त्या तत्त्वांच्या विकासासाठी या सर्वधर्म तत्त्वांचा व आचारांचा कितपत उपयोग होईल. सतत हे चिंतन केल्याने गांधींनी प्रचलित तत्त्वज्ञानापेक्षा एक वेगळे जीवन विषयक तत्त्वज्ञान अवलंबिले आणि जीवनभर आपल्या कर्म करण्याने त्याला एक सामर्थ्य प्राप्त करून दिले. टिळकांनी आपल्या धडाडीच्या व सतत कार्यप्रवण जीवनात राजकारणावरच भर दिला. परिणामतः ते या मर्यादेपर्यंत गेले की. सामाजिक व इतर सुधारणा पुढे हाती घेता येतील. कोणत्याही परिस्थितीत सामाजिक सुधारणांना अग्रहक्क वा अग्रक्रम नको असे ते म्हणत. गांधींची दृष्टीच वेगळी. ते सर्वच सुधारणा मग त्या राजकीय, सामाजिक वा धार्मिक असोत, समान दर्जाच्या व निकडीच्या आहेत असे मानीत. कोणत्याही सुधारणांना त्यांनी अग्रक्रम लावला नाही किंवा त्याचे तुकडे पाडले नाहीत. जीवनाचे प्रत्येक अंग हे महत्त्वाचेच मानले. त्यांच्या विधायक कार्यक्रमाचा हाच अर्थ होता व आहे. संपूर्ण जीवनाचीच उभारणी हा त्या कार्यक्रमाचा उद्देश असल्याने तो सर्व समावेशक व सर्व संग्राहक असा होता. कोणत्याही सुधारणा—मग सामाजिक काय किंवा आर्थिक काय—स्वातंत्र्याशिवाय शक्य नाही म्हणूनच गांधी ब्रिटिश शासनाविरुद्ध उभे राहिले.

टिळक व गांधींच्या जीवनविषयक दृष्टिकोनातला फरक अगदी लक्षात घेण्याजोगा आहे असे म्हणता येईल. सर्वसाधारणपणे चालत आलेल्या परंपरेला अनुसरून संपन्न झालेल्या भारतीय संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर टिळकांनी जीवनाकडे पाहिले व काम केले. उलट गांधींनी अध्ययनासाठी इंग्लंडला गेल्यापासूनच आपल्या जीवनाकडे एका विशिष्ट आदर्शावर दृष्टी ठेवून आपले आचरण सुरू केले. परिणाम असा झाला की, त्यांनी जीवनाला निग्रहपूर्वक एक आध्यात्मिक वळण दिले. असे करताना व्यावहारिक जीवनात त्याचा अंमल कसा करता येईल हे पाहिले. जे जे सत्य दिसले, वाटले व पटले त्यासाठी ते अखंड प्रयत्नशील राहिले. जीवनाच्या ह्या प्रारंभीच्या काळात अशा तऱ्हेने एक वेगळे आचरण सातत्याने चालू ठेवले. त्यामुळे त्यांनी आपल्या स्वतःचे असे एक जीवन तत्त्वज्ञान ठरविले व एक स्वतंत्र दृष्टिकोन अवलंबिला. हे खरे आहे की, ज्याला एखादे विशिष्ट तत्त्वज्ञान म्हणता येईल अशा बाबत त्यांनी काही लिहिलेले नाही किंवा खास त्यांचे स्वतःचे असे काही विशिष्ट दर्शनशास्त्र आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला नाही. पण एक स्वतंत्र जीवनपद्धती म्हणता येईल असा एक स्वतंत्र दृष्टिकोण विकसित केला. त्यालाच सत्याग्रह जीवनपद्धती असे म्हणता येईल. स्वतंत्रपणे एखाद्या जीवनदर्शनाचा अवलंब करून ते विकसित व्हावे याची टिळकांना आवश्यकताच वाटली नाही. तरीपण त्यांचा एक विशिष्ट जीवनविषयक दृष्टिकोन होता. त्याला निष्काम कर्मयोग म्हणता येईल. त्यांच्या गीतेच्या अभ्यासातून त्यांनी हाच गीतेचा संदेश आहे हे प्रतिपादले व त्यावरच त्यांनी सतत भर दिला. त्या विचारांचा गाभा हा होता की, जरी परमोच्च आध्यात्मिक सिद्धावस्था प्राप्त झाली, तरी शेवटपर्यंत कर्म करीत राहिलेच पाहिजे. ते सोडता कामा नये. त्यांनी कर्मावर हा जो एवढा भर दिला याचे कारण उघड आहे. भोवताली चालत असलेला अन्याय, भ्रष्टाचार, दुराचरण या बाबत उदासीनता व आत्मसंतुष्ट वृत्ती समाजात फार मोठ्या प्रमाणात होती. कोणताही प्रतिकार न करता हे सर्व सहन करणे व पाहत राहणे म्हणजे व्यक्तीची व समाजाची कर्तव्यभ्रष्टता आहे, असे ते मानीत.

टिळक व गांधी दोघेही अगदी पूर्णपणे राष्ट्रप्रेमी होते ह्यात वादच नव्हता. पुढे पुढे गांधींच्या जीवनात एक आंतर्राष्ट्रीय व मानवतावादी दृष्टिकोन आला असे म्हणावे लागेल. माझ्या अंतःकरणातली करुणा व मानवताप्रेम यामुळेच मी राष्ट्रप्रेमी आहे असे गांधी म्हणत. टिळकांची देशभक्ती व राजकीय विचार व चिंतन यावर पाश्चिमात्य राष्ट्रात विकसित झालेल्या राजकारणी विचारांची छाप होती. फक्त त्या राजकीय अर्थाने पाहिले तर गांधी राष्ट्रप्रेमी नव्हते. महायोगी अरविंदाप्रमाणेच गांधी असे मानीत की, भारताने जगाला एक नवीन मार्ग व नवीन संदेश द्याव-

याचा आहे. ते म्हणत, भारताने अहिंसक मार्गांनी स्वराज्य मिळविले तर खऱ्या अर्थाने तो मार्गदर्शक बनेल. शिक्षक होईल.

राष्ट्रीय समस्यांबाबत कोणते धोरण अवलंबावे याबाबत टिळक व गांधी यांच्यातल्या मतभेदांची बरीच उदाहरणे आपणांस सापडतील. त्या दोघांच्या जीवन-विषयक दृष्टिकोनामुळे हे मतभेद होते. सतत चिंतनाने टिळकांनी भारताने स्वराज्याबाबतची आपली कल्पना अगदी स्पष्ट व निश्चित केली होती. पाश्चिमात्य राष्ट्रांत ज्या तऱ्हेची लोकशाही आहे त्या पद्धती-नुसार लोकशाही ही त्यांची धारणा होती. इंग्रजी-माणसाला आपल्या देशात जेवढे अधिकार आहेत तेवढे भारतातल्या प्रत्येक नागरिकाला असावेत. हीच त्यांची मागणी होती. या उलट गांधींनी ब्रिटिश सरकारच्या न्यायप्रियतेवर पूर्ण विश्वास ठेवून आपल्या कामाची सुरवात केली. भारतात आल्यावर जनरल डायर आणि मायकेल ओडवायर यासारख्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी जी नृशंस व दुष्ट कृत्ये केली त्यामुळे त्यांच्या या ब्रिटिशांच्याबाबरच्या न्यायनिष्ठेला एक फार मोठा तडा गेला. त्यावेळी त्यांनी निश्चय केला की ब्रिटीश राज्य हे पूर्णपणे असत्यावर आधारलेले राज्य आहे व त्याचा शेवट केलाच पाहिजे. दक्षिण आफ्रिकेत त्यांनी सत्याग्रह पद्धतीचा जो विकास केला होता तीच पद्धत व रीती त्यांनी भारतात ब्रिटिशांशी लढण्यासाठी अगदी शेवटी स्वराज्य मिळेपर्यंत वाप-रली. निःशस्त्र प्रतिकार आणि असहकार याची कल्पना टिळकांनी १९०६ मध्ये व योगी अरविंदांनी १९१० मध्ये देशासमोर मांडली. पण त्या कल्पनेला, विचाराला अहिंसेचा भरभक्कम पाया देऊन, नैतिक आधारावर उभारलेले लढाईचे एक नवे तंत्र निर्माण करण्याचे श्रेय गांधीजींनाच द्यावे लागेल. ब्रिटिशांनी देऊ केलेल्या कायदेमंडळ व तत्सम संस्थाबाबत टिळ-कांच्या व गांधींच्या दृष्टिकोनात फरक होते. तरी पण अहिंसक असहकाराला टिळकांनी मान्यता दिली होती. येवढ्या खंडप्राय भारत देशात त्यावर अंमल कसा होईल याबाबत ते साशंक होते. ह्या अंमलबजावणी-बाबतच्या त्यांच्या भूमिकेला गांधींनी आपला मतभेद दर्शवून हा विश्वास प्रगट केला की ह्या शस्त्राचा उप-योग यशस्वीपणे करण्यात जनता समर्थ होईल. अर्थात ज्या तऱ्हेने लोकांनी एक प्रकारे बेपर्वा वृत्तीने सत्याग्रह शस्त्राचा वापर केला ते गांधींना निःसंशय मान्य नव्हते. तरी पण शेवटी दुसऱ्या महायुद्धाचेवेळी जो पेचप्रसंग निर्माण झाला व १९४२ साली त्यांनी "भारत छोडो"ची चळवळ सुरू केली तेव्हा परमेश्वरावर शेवटल्या परिणामाचा विचार करून ती चळवळ अत्यंत धैर्याने व शौर्याने सुरू केली. १९१८ साली रिक्रुट भरतीबाबतचा गांधींचा विशिष्ट दृष्टिकोन टिळकांच्या पेक्षा वेगळा होता. टिळकांचा भर प्रतियोगी सहकारि-तेवर, पूर्ण सहकारितेवर नव्हता. ब्रिटीश राज्यकर्त्यां-वर विश्वास ठेवून जर आपण प्रतियोगी सहकारिता करणार तर मग त्याच विश्वासाच्या पार्श्वभूमीवर पूर्ण सहकार का नसावा ही गांधीजींची भूमिका होती.

हे सर्व मतभेद निर्माण होण्याचे एकच कारण की, टिळक व गांधींनी आपल्या जीवनाने जे तत्वज्ञान अनुसरले तेच होय. सत्य व अहिंसा हेच खरे मूलगामी पायाभूत तत्वज्ञान आहे हे टिळकांना मान्य होते. पण दैनंदिन जगाच्या उलाढालीत व व्यवहारात त्याचा अंमल करता येईल किंवा त्या ठिकाणी ते लावले जाऊ शकेल हे त्यांना पटत नसे. टिळकांचे म्हणणे की, फक्त साधु व संतच त्या मार्गाने जाऊ शकतात. त्यांनीच तो रस्ता चोखाळावा. या उलट गांधींचे ठामपणे म्हणणे असे की, साधु व संतांसाठी एक तत्वज्ञान व साधारण स्त्री–पुरुषांसाठी एक वेगळे तत्वज्ञान असू नये; असणे शक्य नाही. सत्य व अहिंसा ही नैतिक मूलभूत तत्वे ती अंमलात आणताना किंवा व्यवहारात उतरविताना त्याला दोन वेगवेगळी परिमाणे (standard) लावणे हे बरोबर नाही. त्या मूलभूत तत्वात दोन शाखा नकोत. समाजात आजचा अन्याय, शोषण किंवा सामा-जिक दोष ह्याचे मूळ कारण म्हणजे आपले नैतिक आचारणाबाबतचे दुटप्पी वर्तन किंवा धोरण. टिळक आणि गांधी यांच्या मधला हा दृष्टिकोनातला फरक त्यावेळी अगदी उघडपणे जाहीर झाला व त्याला एका सार्वजनिक वादविवादाचे स्वरूप आले. ज्यावेळी गांधींनी असे लिहले की, टिळक व श्रीमती बेझंट बाई असा विचार करतात की "राजकारणात सर्व काही बरोबर (फेअर) असते" या विधानाचा टिळकांनी तीव्रपणे प्रतिवाद केला व असे सांगितले की मी असे तत्वज्ञान कधीच प्रतिपादले नाही. ते म्हणाले, अहिंसेचे तत्वज्ञान हे अगदी शेवटले अंतीम ध्येय आहे यावर माझा विश्वास आहे. पण मी राजकारणाचा व्यावहा-

रिक बाजूने विचार केला व प्रतियोगी सहकारितेचे बाजूने उभा राहिलो. गांधींच्या ठायी असलेल्या पराकाष्ठेच्या नम्रतेने ते म्हणाले, शास्त्रांचा अर्थ लावण्यात व विद्वत्तेत मी टिळकांशी वाद करूच शकत नाही. पण मला माझी मनोदेवता सुस्पष्टपणे व ठामपणे असे सांगते की जगात नैतिक आचरणाचे नियम किंवा नीतिमत्तेचा कायदा हा एकच एक असू शकतो. आणि दुष्टांशी, वाईट वागणुक करणाराशीसुद्धा प्रेमानेच मला वागले पाहिजे. गांधींनी एक अत्यंत अर्थपूर्ण उक्ति वापरली " शठं प्रति अपि सत्यम्."

या दोन महापुरुषांच्या बाबतीतले हे विचार प्रदर्शित केल्यानंतर मला थोडक्यात असे म्हणावयाचे आहे की टिळक व गांधी यांचा परस्परांवर जो परिणाम झाला तो फारच सत्प्रवृत्त स्वरूपाचाच होता. भारताच्या उत्थानाबाबतची जी दोघांनाही तळमळ होती त्यांनी ते भारून गेले होते. त्यामुळे परिणाम असा झाला की स्वातंत्र्य–समरातल्या सैनिकांत एकताच कायम राहिली. तरीपण त्या काळात लोकांचेवर जो परिणाम झाला तो मात्र नि:संशय वेगवेगळ्या प्रकारचा झाला. टिळकांच्या हयातीतच टिळकांचे काही अनुयायी गांधींचा तिरस्कार करीत. तरी गोष्ट अशी होती की टिळकांनी आपल्या सर्व अनुयायांना हे बजावले होते की ब्रिटिशांशी लढण्यात गांधीजी जी जी पावले उचलतील त्यात कोणताही अडथळा निर्माण करू नये. तरी सुद्धा टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अनुयायांनी हीच तिरस्काराची नीती चालू ठेवली. परकीय सत्तेविरुद्ध भारताचा आत्मा जागृत व्हावा व भारतात राष्ट्रीय वृत्ती वाढावी या दृष्टीने एक महान् राष्ट्रपुरुष म्हणून टिळकांनी जे जे केले त्याबद्दल गांधींच्या अनुयायांनी टिळकांना कधीच दूषण दिले नाही किंवा नावे ठेवली नाहीत.

आधुनिक भारताचा इतिहास व घटना यावर टिळक व गांधी यांचा प्रभाव काय पडला हे पाहू जाता हे अगदी स्पष्ट दिसून येते की, जेव्हा गांधींचा भारताच्या राजकीय क्षितिजावर उदय होत होता तेव्हा टिळकांच्या बद्दलचा जनतेला आदर व त्यांची लोकमान्यता फारच उंचावत चालली होती. परंतु १९१९ नंतर गांधी लोकमानसावर हळहळू परिणाम करू लागला. आपला ठसा उमटवू लागले. चंपारण, खेडा, विरमगाव व अहमदाबादचा मजूरलढा या ठिकाणी जे जे प्रश्न उद्भवले व त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यात त्यांना जे यश मिळाले त्यामुळे भारतीयांच्या हृदयांत त्यांचा प्रवेश झाला. आपण गांधींच्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न करू तर आपणाला निश्चितपणे यशाचा लाभ होईल असे जनतेला वाटू लागले. १९१९ च्या सुमारासच टिळकांनी हे पाहिले की, आता गांधींचाच काल सुरू झाला आहे; तेच या पुढले अग्रदूत आहेत हे जाणण्याचे श्रेय टिळकांना दिलेच पाहिजे. कायद्याच्या चौकटीत राहून काम करण्याचे दिवस संपले. सत्य अहिंसेवर आधारित सत्याग्रही गांधींच्या युगाची प्रभात उगवली आहे हे स्पष्ट दिसू लागले. परकीय सत्तेविरुद्ध प्रचंड लढा देण्यासाठी प्रतिकाराच्या अपार सामर्थ्याने देशाला संपन्न करून टिळकांनी बाजूला व्हावे आणि त्या प्रतिकार सामर्थ्याला एक विशिष्ट वळणदार घाट चढवून भारताला स्वातंत्र्य संपन्न करावे हेच जणू काही भारतमातेच्या ललाटी दैवाने लिहून ठेवले होते.

अहो हे दर जास्त आहेत

'रंगभूमी' ची वार्षिक वर्गणी अडीच रुपये होती. प्रत्येक अंकाची किंमत फक्त चार आणे होती. दर अंकात ४८ पाने मजकूर असे. म्हणजे वर्षात ५५० पाने तरी मजकूर लोकांना मिळत असे. अडीच रुपये वर्गणी ठेवली तरी देखील ही वर्गणी 'थोडीशी जबर' आहे अशी अनेकांनी तक्रार केली अशी नोंद आहे.

पत्रकार गांधीजी

—मा. ज. कानेटकर, सेवाग्राम, वर्धा

'असतील शिते तर जमतील भुते' या नियमानुसार कोणतीही व्यक्ती धनमानसंपन्न झाली म्हणजे तिच्याशी बादरायण नाते जोडण्याचा प्रयत्न करणारे अहमहमिकेने पुढे येऊ लागतात हा आपला नित्याचा अनुभव आहे. हा मनुष्यस्वभाव असल्यामुळे त्याबद्दल कोणालाही दोष देण्यात अर्थ नाही. अर्थात् ज्याचे मोठेपण जेवढे विशाल तेवढीच या नाते जोडू पाहणाऱ्यांची संख्या अफाट हे ओघाने आलेच. गांधीजींच्या बाबतीत या वृत्तीने परिसीमा गाठली असेल तर त्यात मुळीच नवल नाही.

गांधीजींना पत्रकारांच्या मेळाव्यात ओढले म्हणजे आम्ही पत्रकारांच्या अंगावर मूठभर मांस येते हे खरे. पण असे करीत असता आम्ही गांधीजींना अनिच्छेने का होईना पण लघुत्वाचा अहेर करीत असतो याचे आम्हाला स्वभावतःच भान उरत नाही. पत्रकार या शब्दाचा जो सामान्य रूढार्थ आहे त्या अर्थाने त्यांना पत्रकार म्हणून संबोधणे हे जवळपास त्यांची बदनामी करण्यासारखे आहे. याबद्दल मला मुळीच शंका नाही. हे विधान सहजासहजी गळी उतरायला बरेच कठीण आहे याची मला भरपूर जाणीव आहे. अतएव पुढील विश्लेषण.

गांधीजींच्या पत्रकारितेचे दर्शन पुढील घटनेत आहे. त्यांची कार्यप्रवणता ज्या वेळी शिखरावर होती, त्याच वेळी त्यांच्या 'यंग इंडिया'चा खप चाळीस हजारावर होता. तत्कालीन यंत्रांना मागणी पुरवणे जड जात असे. पण मौज अशी की पुढच्या अंकात जो मजकूर येऊ घातला असे, तो संबंधीत अंक प्रकाशित होण्यापूर्वीच जगातील व विशेषतः भारतातील सर्व प्रमुख पत्रातून शब्दशः प्रकाशित होऊन गेलेला असे. त्यामुळे खरे म्हणजे खुद्द 'यंग इंडिया'चे अंक रद्दीच्या भावाने सुद्धा विकले जावयास नको होते. पण होई उलट. या आगाऊ प्रकाशनाच्या नाकावर टिचून 'यंग-इंडिया'ची मागणी वाढीवरच राहिली. ही पत्रकारिता आणि आमची गल्लाभरू पत्रकारिता यांच्यात औषधापुरतेही साम्य शोधून सापडणार नाही. एखाद्याने आळसापायी दाढी वाढविली असेल तर त्याच्या आणि पू. विनोबांच्या दाढीत बाह्यतः काहीच फरक दिसणार नाही. म्हणून वाटेल त्या दाढीवाल्याने पू. विनोबांच्या ऐटीने वावरण्याचा प्रयत्न करणे हास्यास्पद ठरेल हे काय सांगावयास हवे ?

वऱ्हाडातले काही अक्षरशत्रु लोक लोकमान्यांचा 'केसरी' मागवीत आणि तो आला की त्या पत्राच्या घडीला अत्यंत श्रद्धापूर्वक नमस्कार करून ती घडी सुरक्षित जागी ठेऊन देत. 'गुरोस्तु मौनं व्याख्यानम्, शिष्यास्तुच्छिन्न संशयः' असेच समजा ना घटकाभर. दासबाबूंचा 'फॉर्वर्ड' सुरुवातीला इतका घाणेरडा छापला जाई की त्यातले एक अक्षरसुद्धा वाचता येत नसे. अशा पत्राचे कलकत्यास दहाहजार अंक भाविक वाचक विकत घेत आणि त्याची घडी मोठ्या अभिमानाने जवळ बाळगीत. एवंच या पत्रकारितेची जातच काही और आहे.

पत्रकारितेच्या या ज्या दोन स्पष्ट जाती आहेत त्यांतील मूलभूत फरक एका उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो. कोणत्याही लग्नसमारंभाची निमंत्रणे ऐपतीनुसार पाठविण्यात येतात. निव्वळ मोजके नातलग बोलावणारा हातानीच पत्रे लिहितो. पाचपन्नास पाठविणारा कदाचित् सायक्लोस्टाईल करून पाठवील. हजारांनी ज्याला निमंत्रणे पाठवायची असतात त्याला छापखान्याचा आश्रय घेणे भाग पडते आणि खर्चाचा जसा संकल्प असेल त्या-

प्रमाणे निमंत्रणपत्रिकांच्या सुबकपणावर खर्च करण्यात येतो. मला आलेल्या काही पत्रिकांचा प्रत्येकी खर्च आठ बारा आण्यापावेतोसुद्धा असेल. पण मुळात लग्न-समारंभच नाही आणि निमंत्रणपत्रिका मात्र एकाहून एक वरचढ अशा पाठवीत बसलेला दीडशाहणा अजून कोणी पाहिला नसेल. म्हणण्याचा भावार्थ असा की, लग्नसमारंभाचे अग्रमहत्त्व आहे; निमंत्रणपत्रिका हा नंतरचा अपरिहार्य परिपाक आहे.

गांधीजींच्या मनात प्रथम एखादी समाजोपयोगी चळवळ आकार घेत असे आणि नंतर त्या चळवळीत जनतेने भाग घेऊन चळवळीची 'शोभा'—नव्हे शक्ती वाढवावी म्हणून ते त्यांना सहकार्याचे निमंत्रण देत. या प्रक्रियेतून पत्रकार गांधी निर्माण झाले. एकदा चळवळ ठरली की, मग पानसुपारीस कमी लोक येतात की जास्त याची ते काळजी करीत नसत. क्वचित् तर ते असे म्हणत की, दुसरा एकही कोणी त्यांच्याबरोबर न आला तरी अमुक वेळी ते अमुक एक गोष्ट करणार. ठीकच आहे त्यावेळी पानसुपारीस कोणी येणार नाही म्हणून ब्राह्ममुहूर्तावर ठरलेले लग्न कोणी कसे चुकविणार ? आणि जेलमध्ये गेलो म्हणजे आपले पत्र कसे चालेल याचा त्यांनी कधीच धाक बाळगला नाही. पत्रसंचालनाच्या अखंडत्वाकरिता चळवळीत खंड पडलेला त्याना मान्य व्हावा कसा ? अर्थात् त्यांच्या गैरहाजरीतही त्यांचा 'यंग इंडिया' चालविण्यास राजाजी, महादेवभाई, कुमाराप्पा, कुरेशी अशांसारखे गांधीजींशी समरस झालेले सुयोग्य संपादक मिळत गेले हा भाग निराळा.

पुढारीपणाच्या दृष्टीने गांधीजी भारतात 'तयार माला'च्या स्वरूपात आले. त्यांची तपश्चर्या दक्षिण आफ्रिकेत पूर्ण झाली होती. भारतात आल्यावर अत्यल्पावधीत ते भारताचे एकमेव सर्वमान्य पुढारी बनले याचा ज्यांना विषाद वाटतो, त्यांनी कृपा करून गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत केलेल्या खडतर तपश्चर्येचा इतिहास वाचावा. तेथेही त्यांना 'इंडियन ओपिनिअन' नावाचे पत्र चालवावे लागले. पण क्रम मात्र तोच—आधी चळवळ आणि नंतर पत्रकारिता. तेथे त्यांनी 'टॉलस्टॉय फार्म' नावाची फेनिक्स येथे वसाहत वसविली आणि दीनबंधू अँड्रूजसारखा माणूस त्यांच्याकडे आकर्षित झाला. एवंच गांधीजींचे सर्व स्फुट लेखन, ग्रंथलेखन अथवा पत्रकारिता—यांच्यात मुळीच फरक करता येत नाही—ही सर्व त्यांना अभिप्रेत असलेल्या एखाद्या चळवळीभोवती पिंगा घालताना आढळतील. त्या सर्वांना एकच नाव द्यायचे असेल तर गांधीजींचे पत्रलेखन या नावानेच त्यांचे सर्व लेखन ओळखावे लागेल. ते अफाट पत्रव्यवहार करीत. एखाद्याचा एखादा खास प्रश्न असेल तर त्याला ते व्यक्तिशः पत्र लिहित. अनेकांनी एकच प्रश्न विचारला असेल तर त्यांना एखादे स्फुट अथवा अग्रलेख लिहावा लागे आणि एखादा प्रश्न अनेक व्यक्ती पुनः पुनः विचारण्याचा संभव असेल तर त्यांना सदर प्रश्नाबाबत पुस्तक लिहिणे भाग पडे. एवंच, मानवजातीची सेवा या त्यांच्या एकमेव ध्येयाकरिता ज्या ज्या स्वरूपात लेखणी राबविण्याची ज्या ज्या वेळी गरज पडे त्या त्या वेळी त्यांनी त्या त्या तऱ्हेने लेखणी राबविली. पैकी पत्रकारिता हे महत्त्वाचे का असेना पण निव्वळ एक खाते आहे हे विसरून चालणार नाही.

मात्र त्याचा अर्थ असा मुळीच नव्हे की, रूढार्थाने एखाद्या कुशल संपादकाच्या अंगी जे कौशल्य असावे लागते त्याचा त्यांच्यात अभाव होता. उलट, भारतीय जनतेवर त्यांचा जो प्रभाव पडला त्याच्या अनेक कारणांपैकी त्यांचे संपादन कौशल्य हे एक प्रमुख कारण होय. भारतीय जनतेवर प्रभाव पडला यात मोठेसे आश्चर्य नाही. पण खुद्द इंग्रज कार्यकर्ते अनेक वेळा किंकर्तव्यमूढ होत. त्यांच्या शुद्ध हृदयातून ते जे विचार आपल्या सोप्या आणि निःसंदिग्ध भाषेत मांडीत त्याच्यातील एक शब्दही बदलणे अथवा वगळणे शक्य नसे. कांग्रेसच्या ठरावांचा मसूदा पक्का करण्याचे काम अखेर त्यांचेकडेच सोपविण्यात येई हे सर्वांना माहीत आहे. इंग्रजीवरील त्यांचे प्रभुत्व अनन्यसाधारण होते, आणि कोणत्या शब्दाची, कोणत्या पवित्र्याची कोणावर कशी आणि कितपत प्रतिक्रिया होईल याबाबतचा त्यांचा अंदाज बहुधा चुकत नसे. यामुळेच त्यांचे मोठमोठे अनुयायी अखेर त्यांचे बिनतक्रार ऐकण्यास राजी होत. खुद्द स्वतः गांधीजी जेव्हा गोंधळत तेव्हा ते आपल्या 'आतील आवाजा'वर भिस्त ठेवीत. अनेकांना या आतील आवाजाची चेष्टा करण्याचा मोह आवरत नाही. कारण त्यांना त्याचा प्रत्ययच नसतो. पण 'आतला आवाज' फार जुना आहे. 'सताम्हि संदेह पदेषु वस्तुषु प्रमाणमन्तकरणप्रवृत्तयः' या सुभाषितात ज्या 'अंतःकरण प्रवृत्ती'चा

उल्लेख आहे तो आतला आवाजच होय. पण त्याकरिता 'संताम्' ही अपरिहार्य अट आहे. सज्जन असावे लागेल. भलत्यासलत्याला 'आतला आवाज' असत नाही.

गांधीजींचा जो पिंड होता त्याला जोडून ते जर अंतर्मुख वृत्तीचे असते आणि केवळ आत्मोन्नतीवरच त्यांचा कटाक्ष असता, तर पत्रकारितेच्या भानगडीत पडण्याऐवजी ते एखाद्या घनदाट जंगलात तपश्चर्या करण्याकरिता निघून गेले असते. पण त्यांची वृत्ती बहिर्मुख (objective) असल्यामुळे त्यांनी आत्मोन्नती बरोबरच विश्वोन्नतीवरही कटाक्ष बाळगला व त्यातून त्यांचे सर्व पत्रलेखन उद्भवले. हे सर्व लक्षात घेतले म्हणजे शामभटाची तट्टाणी आणि इंद्राचा ऐरावर यांची तुलना करणे जसे व्यर्थ मानावे लागेल तसेच आमची रूढ पत्रकारिता आणि पत्रकार गांधीजी यांच्यात साम्य शोधण्याचे प्रयत्न निष्फळ ठरतील.

निव्वळ गैरसमज टाळण्याकरिता शेवटी एक परिच्छेद लिहिणे भाग आहे. प्रत्येक पत्रकाराला गांधीजी, लोकमान्य अथवा दासबाबू बनता येणार नाही हे स्पष्ट आहे. आज पत्रकारितेने एखाद्या प्रचंड यंत्राचे स्वरूप घेतल्यामुळे जग पाहणाऱ्या आणि जगण्याचा सर्वांचा जन्मसिद्ध हक्क आहे, संपादकाचे या प्रचंड यंत्रात एखाद्या खिळ्यापेक्षा अधिक महत्व असू नये हेही क्रमप्राप्तच मानावे लागेल. परिणामी ध्येयवादित्वापायी स्वेच्छेने स्वतःचा घुव्वा उडवून घेणारे संपादक यापुढे अधिकाधिक अपवादात्मकच निघणार हेही उघड आहे. पण त्याबरोबर हेही तेवढेच खरे आहे व प्रलयांतापावेतो खरे राहील—की जगाचा जो इतिहास घडत आहे अथवा मानवजातीचे पुनःपुनः संभाव्य कडेलोटापासून जे रक्षण होत आहे ते मात्र आम्ही सर्व ज्यांना 'पागल' मानतो व म्हणतो त्यांच्यामुळेच होत गेले आहे व होत राहील. सदासर्वकाळ 'शुद्धीवर असणारे' 'व्यवहार चतुर' आणि 'पागल' दोघेही नेहमी जन्म घेत राहतील. काही 'पागल' असतील म्हणूनच 'व्यवहार चतुरांना' आपले 'व्यवहार' चालू ठेवता येतील आणि असे असले तरी हे 'पागल' आपणावर उपकार करीत आहेत याचा आम्हाला सोईस्कर विसर पडत राहून आम्ही त्यांना 'पागल' म्हणू व नसतील तर बनवू. जग हे असे होते, आज आहे व पुढेही असेच राहील. सवव पत्रकार मित्रांना कमीपणा आणण्याच्या दृष्टीने म्हणून, मी हा लेख लिहिला नाही अशी मी त्यांना नम्रपणे ग्वाही देऊ इच्छितो. पण ते रागावतील या भयाने जर मी गांधीजींच्या पत्रकारितेचे यथार्थ दर्शन घडविले नसते तर मी दोषी ठरलो असतो. या शृंगापत्तीतून सहृदय पत्रकार मित्र मला निभावून नेतील असा मला विश्वास आहे.

पं. नेहरूंच्या शब्दात गांधीजी

गांधीजी हे केवढे तरी अद्‌भुत पुरुष होते! जनतेवर त्यांचे सूक्ष्म प्रभुत्व होते. प्रतिकार करण्यास जवळजवळ अशक्य अशी आश्चर्यकारक मोहिनी त्यांच्यात होती. त्यांच्या लेखाभाषणाच्या पाठीशी त्यांचे जे व्यक्तिमत्त्व उभे असे, त्याची फारच थोडी कल्पना त्यांच्या लेखाभाषणावरून येते. त्यावरून एखाद्याला वाटे, त्यापेक्षा त्यांचे व्यक्तिमत्व कितीतरी उच्च होते. आणि त्यांनी भारताची जी सेवा केली ती तरी किती विशाल! भारतीय जनतेत केवढे धैर्य व केवढा पुरूषार्थ ओतला—केवढी शिस्त, केवढी सहिष्णुता, उद्दिष्टासाठी आनंदाने त्याग करण्याची केवढी शक्ती त्यांनी निर्माण केली! स्वतः अत्यंत विनम्र असताही त्यांनी केवढा स्वाभिमान जागृत केला! चारित्र्याचे दृढ अधिष्ठान धैर्य होय, असे ते म्हणत.

'फ्रीडम् फ्रॉम फिअर'—पं. जवाहरलाल नेहरू

महात्मा

मा. स. गोळवलकर

गेल्या पन्नास पाऊणशे वर्षात ज्या थोर विभूती आपल्या देशात होऊन गेल्या त्यापैकी व्यावहारिक–राजकीय क्षेत्रात ज्यांचा प्रभाव जनमानसावर फार मोठ्या प्रमाणात झाला त्यात महात्मा गांधी अग्रगण्य होते असे म्हटले तर ते वस्तुस्थितीला धरूनच होईल, यात कोणाचे दुमत होऊ नये. त्यांचे व्यक्तित्व बहुविध होते. धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजनैतिक असे अनेक पैलू त्यांच्या जीवनात ठळकपणे आपले असामान्यत्व दर्शवित आहेत. सामान्य जनांच्या मनावर इतकी पकड अन्य कोण्या व्यक्तीची या आधुनिक काळात वसलेली नाही. स्वाभाविकपणे त्यांच्या विविध विचारांची अनेक विचारवंत असहमत होते व आजही आहेत. त्यांच्या नावाचा जयजयकार करून स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्यात अहमहमिका करणारेही त्यांच्या सर्व विचारांशी सहमत नाहीत. ज्यांना स्वतःचा मोठेपणा स्वतःच्या बुद्धीने व गुणांनी प्रस्थापित करता आला असे अनेक नेते त्यांच्या संबंधी उत्कट आदर बाळगूनही त्यांचे सर्व विचार आपल्याला मान्य नाहीत असे असंदिग्धपणे म्हणत असत व आहेत. महामना पंडित मदनमोहन मालवीय व पंडित जवाहरलाल नेहरूंचे नाव या संदर्भात उल्लेखनीय आहे. या दोन्ही श्रेष्ठ पुरुषांशी माझा जो संबंध आला होता त्यात संभाषणाच्या ओघात त्यांनी महात्माजींची सर्वच मते आपल्याला ग्राह्य नसल्याचे स्पष्टपणे म्हटलेले मला स्मरते आहे. पण त्या बरोबरच महात्माजींवर त्यांचे उत्कट प्रेम होते, अत्यंत आदर होता हेही संभाषणाच्या ओघात त्यांनी अत्यंत भक्तीने म्हटले होते, याचीही स्पष्ट आठवण मला आहे. या श्रेष्ठ व्यक्तींच्या भक्तीत दिखावूपणा मुळीच नव्हता. पण ही भक्ती अंधश्रद्धेच्या रूपात विकृत झाली नव्हती याचीही जाणीव मला झाली होती.

महात्माजींसंबंधी पराकाष्ठेची भक्ती असणारा आणखी एक महापुरुष म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल होत. आपले सर्व कर्तृत्व, आपले संपूर्ण जीवनच त्यांनी महात्माजींना अर्पण केले होते. सरदार पटेलांशी झालेल्या भेटीत हा समर्पणभाव प्रकर्षाने जाणवत होता. सरदारांचे आपले स्वतंत्र व्यक्तित्व होते. कॉंग्रेसला महात्माजींकडून प्रेरणा व मार्गदर्शन प्राप्त होत असली तरी एक अनुशासनबद्ध संगठित व म्हणून कार्यक्षम संस्था म्हणून कॉंग्रेसची जडणघडण करून त्या प्रेरणेला प्रत्यक्षात उतरविण्याची यंत्रणा निर्माण करणे ही कामगिरी मुख्यत्वेकरून सरदारांचीच होती. याची त्यांना जाणीव होती व त्यांच्या संघटन कौशल्याचा आधार नसता तर एकटे महात्माजी काय व किती करू शकले असते यासंबंधी त्यांचे विचार स्पष्ट होते. एकापरी महात्माजींच्या अनन्यसाधारण महत्वाला सरदारांच्या कॉंग्रेस संस्थेच्या बांधणी–उभारणीच्या पायाभरणीच्या कर्तृत्वाचा आधारच कारणीभूत होता असे म्हटले तर अतिशयोक्ती वाटू नये. तरी त्यांनी दूरवरचा विचार करून आपले वेगळे व्यक्तित्वच जणू ठेवले नाही. असे असूनही महात्माजींशी त्यांचे सर्वच बाबतीत एकमत होते असे नाही. इंग्रजी राज्य जाऊन कॉंग्रेसच्या हातात सत्ता आल्यावर असे मतभेदाचे प्रसंग उद्‌भवले होते असे दिसते. शासन चालविताना व्यावहारिक दृष्टी ठेवून काम करावे लागते त्यात परिस्थितीशी असंबद्ध असे तात्विक म्हणविले जाणारे विचार ढवळाढवळ करू लागले तर सर्व विचका होण्याचा संभव असतो. त्या काळात महात्माजींच्या प्रार्थनासभेत त्यांचेकडून व्यक्तविले जाणारे काही विचार व त्या विचारांप्रमाणे शासनाने वागावे असा त्यांचा आग्रह अव्यावहारिक दिसल्यामुळे ते सरदारांना मुळीच पटत नसत. तरी महात्माजींवरच्या भक्तीमुळे ते त्या

विचारांसमोर नमत असत. पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्यासंबंधीच्या महात्माजींच्या आग्रहाचा व त्याकरिता त्यांनी आरंभिलेल्या उपवासाचा यासंबंधी उल्लेख करता येण्यासारखा आहे. त्यावेळची सरदारांची व्यथित अवस्था मला त्यांच्याशी झालेल्या भेटीत प्रत्यक्षच अनुभवावयाला मिळाली.

महात्माजींवर अलोट भक्ती असणाऱ्यांच्या मनातही असे मतभेद होते व शेवटी शेवटी तर अगदी उवग आल्यासारखे त्यांना झाले होते हे ध्यानात घेतले म्हणजे अन्य पक्षांतील विचारी पुरुषांच्या व कोणच्याही पक्षांशी संबद्ध नसलेल्या पण अत्यंत बुद्धिमान अशा व्यक्तींच्या मनात असे मतभेद तीव्रतेचे जाणवले तर आश्चर्य वाटायला नको.

आपल्या देशाच्या राजकारणात महात्माजींचा उदय झाल्यापासून हा अनुभव येऊ लागला होता. युरोपातील प्रथम म्हणजे १९१४–१९१८ च्या महायुद्धात इंग्रजांना सर्वप्रकारे जनधनादी द्वारा साह्य करावे त्यात कसलीही अट घालू नये हा त्यांचा आग्रह व त्या दृष्टीने सैन्यभरतीकरिता त्यांनी केलेला प्रचार कोणालाही पटत नव्हता. लोकमान्यादी अतिश्रेष्ठ राष्ट्रभक्त बुद्धिमंतांनी युद्धप्राप्तीनंतर लगेच भारताला स्वातंत्र्य देण्याची असंदिग्ध घोषणा इंग्रजांनी करावी या अटीवरच त्यांच्याशी सहकार्य करावे अन्यथा मुळीच साह्य करू नये हा विचार कोणच्याही कसोटीवर खरा उतरणारच होता. शत्रूची अडचण ही आपली सुसंधी हा राजकारणातील दंडक, पण महात्माजींची उदारतेची पण सर्वथा अव्यावहारिक भूमिका. इंग्रजांच्या अडचणीत त्यांना कोंडीत न धरता सहकार्य केले तर ते त्याचे मूल्य म्हणून आपणहून स्वातंत्र्य देतील असा त्यांचा विश्वास. यात पुढे घडलेल्या घटनांनी त्यांचा विचार अनाठायी होता हेच सिद्ध केले–काही झाले तरी "पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनम्" हे सत्य आहे.

युद्धानंतरच्या अपमानास्पद घटनांनी एकप्रकारे चिडून इंग्रजांशी पूर्ण असहकार करण्याचा त्यांचा निर्णयही असाच विवादास्पद ठरला. ज्या सुधारणा इंग्रजांनी देऊ केल्या होत्या त्या राबवून अधिकारांकरिता झगडावयाचे व प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वाप्रमाणे इंग्रजांशी जशास तसे या न्यायाने वागावयाचे हा व्यवहारनीतीचा विचार त्यांना पटला नाही. पण असहकाराची चळवळ मध्येच थांबवून पदरी पडणाऱ्या अपयशातून आपला बचाव करण्याची पाळी आल्यावर त्याच व्यवहारनीतीला त्यांना पाठिंबा देणे भाग पडले व देशबंधू चित्तरंजनदास आदी धुरंधरांच्याने तत्वाखाली वैधानिक कार्यक्रमांचा अंगिकार करण्यात आला.

असहकाराच्या स्वरूपासंबंधी व त्याकरिता जनसाधारणाला ज्या स्वरूपाचे आवाहन करण्यात आले होते त्यासंबंधीही मतभेद तीव्र होते. एक वर्षात स्वराज्याची घोषणा आकर्षक होती. पण वस्तुस्थितीला धरून नव्हती असे अनेकांचे मत होते. शेवटी तेच मत खरे ठरले. विद्यार्थ्यांनी शाळा महाविद्यालये सोडावी, त्यांचेवर बहिष्कार घालावा या योजनेवर तर फार मोठमोठ्या पुरुषांनी प्रखर टीका केली होती व असा बहिष्कार पुढे विद्यार्थ्यांत अनुशासनहीनता, उद्दंडता, उच्छृंखलता, चारित्र्यहीनता आदि दोषांना जन्म देईल व सर्व नागरिकजीवन अस्ताव्यस्त होऊन त्याचा बिचका होईल, अशा बहिष्कारादि कार्यक्रमातून एखाद्या वेळेस स्वातंत्र्य मिळाले तरी त्यानंतर राष्ट्राच्या उत्कर्षाकरिता लागणारे ज्ञानोपासना, शिस्त, चारित्र्यादि गुण एकदा विस्मृत झाले की पुन्हा प्रस्थापित होणे अत्यंत जड जाईल, शिक्षकांची, अधिकारावर नियुक्त असणाऱ्यांची अवहेलना करण्याची प्रवृत्ती निर्माण करणे सोपे पण त्या अनिष्ट वृत्तीला नंतर आवर घालणे अशक्यप्राय होईल अशी चेतावणी अनेक विचारवंतांनी दिली पण त्यावेळच्या आवेशात तिकडे दुर्लक्ष केले गेले. इतके नव्हे तर अशा विचारवंतांची हेटाळणी देखील करण्यात आली. आज चारित्र्याची समस्या, विद्यार्थ्यांची अनुशासनहीनता यासंबंधी आपले पुढारी निदान शाब्दिक तरी चिंता व्यक्त करीत आहेत. पण विद्यार्थ्यांना राजकीय चळवळीकरिता उद्दामपणे वागण्यास प्रोत्साहन देणाऱ्या त्यावेळच्या कार्यातून व प्रत्येक लहान–मोठ्या प्रसंगी याच शिस्तहीनतेची उजळणी करीत जाण्याच्या राजकीय आंदोलनातून हा भस्मासूर उभा राहिला आहे हे प्रांजळपणे मान्य केले जाते, असे दिसत नाही. ज्यांची हेटाळणी केली, ज्यांना दुरुत्तरे केली त्यांचीच खरी दूरदृष्टी होती हे मान्य करण्याची सत्यप्रियता दुर्लभ आहे.

या संदर्भात महात्माजींचा आणखी एक आग्रहही उल्लेखनीय आहे. त्याचे परिणाम फार दूरगामी

झाले असून आजही ते भोगावे लागत आहेत. स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकण्याच्या हेतूने इंग्रजांनी मुसलमानांना हाताशी धरून त्यांना वेगळा सुभा मागण्याकरिता प्रवृत्त केले व त्याचवेळी हिन्दु व मुसलमान या दोन्ही समाजांनी स्वातंत्र्याचे उभय-पक्षी मान्य स्वरूप आखून एकमुखी मागणी केली तर ती मान्य करण्याचा आभास उत्पन्न केला. त्यांच्या डावात आपले मोठमोठे नेते सापडले व हिन्दु-मुसलमान एकता निर्माण करण्याची खटपट करू लागले. महात्माजी कट्टर हिन्दू म्हणून सर्व धर्म समान मानण्याची त्यांची उपजत उदारता होती. त्या उदार-पणात गेल्या सहस्राधिक वर्षाचा इतिहास डोळ्या-आड करून त्यांनी वाटेल ते मूल्य देऊन मुसलमान समाजाला आपल्याकडे वळवून घेण्याचा प्रयत्न चालू केला. त्या समाजाचे घडवून आणलेले दंगे, केलेले अत्याचार, मलबारात घडवून आणलेले बंड, आदि सर्व भयंकर कृतींकडे डोळेझाक करण्याची व त्यांचे स्तोम माजविण्याची नीती अवलंबिली. या संबंधीचा इतिहास देण्याचे कारण नाही. या नीतीशी आपली असहमती महामना पं. मदनमोहन मालवीय, लाला लजपतराज, भाई परमानंद, श्री. विजयराघवा-चार्य आदि थोर देशभक्तांनी जोराने प्रकट केली होती व ते तसेच महाराष्ट्र व अन्य प्रांतातील लोकमान्य टिळकांचे निष्ठावान् अनुयायी, या सर्वांनी काँग्रेसमध्ये असतानाच हिंदुमहासभेच्या संघटनेला बलवान बनविण्यास्तव परिश्रम केले. अल्पसंख्यकांच्या बाबतीतल्या त्या नीतीचे परिणाम सर्व विदित आहेत. मातृभूमीच्या लांछनास्पद विभाजनापर्यंत एकापेक्षा एक राष्ट्राला अपमानकारक, हानीकारक घटनांना ऊतच आला होता. तरी त्या नीतीचा त्याग करण्याकडे प्रवृत्ती झाली नाही. उलट अधिकाधिक जिद्दीने तीच नीती खरी व योग्य अशा धारणा करून घेऊन वागण्यात आजपर्यंत निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांत जणू चढाओढ लागलेली दिसते. हिंदु हे नावही असहनीय व अल्पसंख्यकांच्या उद्दंडपणाला न्याय मानून त्यांचे अधिकाधिक तुष्टीकरण हे जणु-काही ब्रीद झाल्यासारखे दिसते. यात राष्ट्राच्या खऱ्या स्वरूपाचे विस्मरण झाले आहे व त्यातून सर्व प्रकारच्या फुटीर वृत्ती वाढीस लागल्या आहेत त्यामुळे निरनिराळ्या विरोधी देशांना चंचुप्रवेशामागोमाग मुसलप्रवेश करण्यास वाव मिळत आहे हे उघडपणे दिसत असूनही त्या सर्व नाशकारी नीतीला चिकटून राहण्याचा दुर्धर दुराग्रह वाढीस लागलेला प्रत्ययास येत आहे.

महात्माजींच्या अशा विचारांशी मतभिन्नता असणे हे राष्ट्राचा शुद्ध विचार करणाऱ्यांच्या व राष्ट्र-हितार्थ तळमळ करणाऱ्यांच्या दृष्टीने स्वाभाविक व योग्य मानले पाहिजे. पण महात्माजींचे व्यक्तित्व अनेक पैलूंचे होते. त्यांची हिन्दुधर्मातील श्रद्धा, हिंदु-जीवनाचा मानबिंदु अशा गोवंशाच्या संरक्षणाची व त्यांची हत्या सर्वथा बंद व्हावी त्याकरिता स्वशासनाने कडक कायदा करावा यासंबंधीची तळमळ, त्यांची अस्पृश्य म्हणविल्या गेलेल्या उपेक्षित बांधवांना मानाचे स्थान मिळवून देण्याची आर्थिक, सामाजिक, शैक्षणीक आदि सर्व दृष्टींनी उन्नती करण्याची कळकळ, परधर्मियांकडून अशिक्षित, भोळ्या व आर्थिक अडचणीत जीवन कंठणाऱ्या वनवासीं, दलित बांधवांना धर्मभ्रष्ट करण्याच्या कार्यासंबंधी तीव्र नापसंती, समाजवाद, साम्यवाद आदी नावांनी केवळ भौतिकतेचा प्रचार करणाऱ्या समाजाला, सुव्यवस्थित, संयमित जीवनाच्या सुसंस्कृततेतून गुंडागर्दी, अत्याचार, बलप्रयोग आदींचा अवलंब करण्यास शिकविणाऱ्या असंस्कृततेला वाढ-विणाऱ्या कार्यकलापांसंबंधी स्पष्ट विरोध अशा अगणित श्रेष्ठ पवित्र गुणांची त्यांच्या नावाचा स्वतःच्या स्वार्थाकरिता जयघोष करणाऱ्या, त्यांचे भक्त म्हणविणाऱ्यांकडून उपेक्षा व एक प्रकारची हेटाळणी ही वाढत असलेले पाहून मन उद्विग्न होते. त्यांच्या या गुणांमुळे जनमनात त्यांच्यासंबंधी अपार प्रीती व श्रद्धा होती व ती राहील, राहिली पाहिजे.

अनेक विवादास्पद अव्यवहार्य सिद्ध झालेल्या विचारांचें त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले असले तरी त्यांची स्मृती सदैव आदरपूर्वक लोक आपल्या अंतःकरणात जपून ठेवीत आहेत याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचा अढळ आत्मविश्वास, धर्माच्या श्रेष्ठ जीवनमूल्यावरची निष्ठा, तदनुरूप स्वतःचे जीवन घडविण्याची सचोटी व आपले दोष आपल्या चुका प्रांजळपणे, प्रकटपणे मान्य करण्याची सत्यप्रियता इत्यादि असामान्य गुण होते हे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

(पुढील मजकूर पान २४२ वर)

स्वाभिमान व स्वनिष्ठा हाच गांधीवादाचा आशय आहे

--प्रा. वि. म. दांडेकर

महात्मा गांधींच्या लोकोत्तर व्यक्तिमत्वाचे मूल्यमापन करताना अनेकांनी त्यांना अनेक नावांनी संबोधिले आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंनी त्यांना राष्ट्रपिता म्हटले. मला वाटते, सर्व संबोधनात हे संबोधन अधिक सार्थ आहे. महात्मा गांधींनी खऱ्याखुऱ्या अर्थाने भारताची राष्ट्रीय घडण केली. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीकरता त्यांनी देशव्यापी चळवळ उभारली आणि शेवटपर्यंत तिचे नेतृत्व केले. त्याकरता आवश्यक ते राजकारणी व्यवहार-कौशल्य त्यांचेपाशी होते. परंतु तेवढ्याने राष्ट्रपिता या संबोधनास ते पात्र झाले नसते. कारण राजकीय स्वातंत्र्यप्राप्ती हा राष्ट्रीय घडणीचा केवळ एक भाग आहे. निव्वळ व्यवहार कुशल राजकारणाने कदाचित् स्वातंत्र्यप्राप्ती झाली असती, परंतु राष्ट्रनिर्मिती झाली नसती. राष्ट्राची घडण करावयाची तर राजकारणाला राजकीय तत्त्वज्ञानाची जोड द्यावी लागते हे त्यांनी आरंभीच ओळखले आणि प्रथमपासूनच आपल्या राजकारणाला तात्त्विक व नैतिक अधिष्ठान दिले.

असे तत्त्वज्ञान सामान्य जनापर्यंत पोचवावयाचे तर त्याला थोडाबहुत आचारधर्म चिकटवावा लागतो. महात्मा गांधी हे एक अत्यंत कुशल समानधुरीण असल्याने त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाला जनमनाची पकड घेईल असा आचारधर्म चिकटवला आणि शिस्तबद्ध राजकीय संघटना उभी करण्यास आवश्यक म्हणून या आचारधर्माचा आग्रह धरला. दुर्दैवाने महात्मा गांधींच्या काही अनुयायांना एवढा आचारधर्मच काय तो समजला. असा आचारधर्म स्थलकाल परिस्थितीसापेक्ष असतो आणि असावयास हवा हेही ते विसरले. दैनंदिन सामाजिक व राजकीय व्यवहार संभाळण्याची जबाबदारी जशी महात्मा गांधींवर होती तशी या अनुयायांवर नव्हती. त्यामुळे खुद्द महात्मा गांधींनाही परवडणार नाही. असा आचारधर्माचा आग्रह त्यांनी धरला. " गांधीपेक्षाही कट्टर गांधीवादी " म्हणून त्यांना कोणी म्हटले तर " आपले काही चुकत तर नाही ना ?" असा विचार करण्याऐवजी त्यांना स्वतःचे कौतुकच वाटू लागले. या मंडळींनी गांधीवादाच्या नावाखाली एक नवीन कर्मकांडाचे स्तोम माजविले. कर्मकांडाच्या खोड्यात स्वतःला आणि गांधीवादाला अडकवून घेऊन सारा व्यवहारच अशक्यप्राय केला. स्वतःचे हसे करून घेतले आणि गांधीवाद अव्यवहार्य ठरविला.

या ऐकांतिक गांधीवाद्यांच्या दुसऱ्या टोकाला स्वतःला बुद्धीवादी म्हणवून घेणारी काही मंडळी होती. राजकारणाला तात्विक व नैतिक अधिष्ठान हवे ही गोष्टच मुळात या मंडळींच्या बुद्धीला गम्य झाली नाही. याचे कारण राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीव्यतिरिक्त राष्ट्र उभारणीचे काही कार्य आहे, हेच त्यांना उमगले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीपुरते बोलावयाचे तर तेही त्यांच्यासारखे दहा-वीस बुद्धीमान आपल्या राजकीय कौशल्याने इंग्रजापासून मिळवू शकतील अशी त्यांची मनोमय खात्री होती. ही मंडळी सर्व दृष्टींनी बुद्धीवान असली तरी जनमानसासंबंधीचे त्यांचे अज्ञान आश्चर्यकारक होते. राजकीय स्वातंत्र्यप्राप्ती आणि नवराष्ट्र उभारणीच्या या साऱ्या खटाटोपात जनताजनार्दन आणि जनमानस यांचा संबंध काय याचेच आकलन त्यांना कधी झाले नाही. सहाजिकच महात्मा गांधींच्या सर्वस्पर्शी, धुरंधर राजकीय नेतृत्वापुढे ही मंडळी हतप्रभ झाली.

महात्मा गांधींच्या पश्चात् राष्ट्राच्या नेतृत्वाची धुरा पंडित जवाहरलाल नेहरूंचेकडे आली. पंडित नेहरू बुद्धीवादी असले तरी त्यांना जनमानसाची पूर्ण ओळख होती. राजकारणाला तात्विक व नैतिक

अधिष्ठान हवे हा गांधीवादाचा आशय त्यांनी जाणला होता. त्यामुळे त्यांनीही आपल्या राजकारणास गांधीवादाशी विरोधी वा विसंगत नाही परंतु तरीही स्वतंत्र अशा राजकीय तत्वज्ञानाची जोड दिली आणि राष्ट्र उभारणीचे कार्य चालू राहिले.

पंडित नेहरूंच्या पश्चात् आज पुनश्च याविषयी बुद्धीभ्रंश झालेला दिसतो. भारताच्या राष्ट्र उभारणीचे कार्य अजून अपुरे आहे. ते आणखी काही पिढ्या चालू ठेवल्याशिवाय भारताचे राष्ट्रीय जीवन निर्वेध होणार नाही. सामाजिक व राजकीय नेत्यांची ही प्राथमिक जबाबदारी आहे इत्यादि गोष्टींचा आज विसर पडला आहे. सहाजिकच राजकारणाला तात्विक व नैतिक अधिष्ठान राहिलेले नाही आणि त्याची गरजही वाटेनाशी झाली आहे. किंवहुना सर्व तात्विक वा नैतिक विचारांची 'पुस्तकी' म्हणून अवहेलना करावी आणि तत्वशून्य राजकारणाचा 'व्यवहारवाद' म्हणून उदोउदो करावा अशी प्रथा पडत आहे. एकांतिक गांधीवाद्यांनी एके काळी माजविलेल्या कर्मकांडाच्या स्तोमाची ही प्रतिक्रिया आहे.

म्हणून राजकारण, समाजकारण किंवहुना सर्व मानवी व्यवहार यांना काही तरी तात्विक वा नैतिक अधिष्ठान हवे हा जो गांधीवादाचा आशय, त्याचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. तात्विक अधिष्ठान म्हणजे तत्वज्ञानाची लोखंडी चौकट नव्हे. राजकारण, समाजकारण हे बोलून चालून मानवी व्यवहार आहेत. त्यात वावरावयाचे तर व्यावहारिक तारतम्याचे स्वातंत्र्य हवे. परंतु म्हणून योग्य काय अयोग्य काय, न्याय्य काय अन्याय्य काय, नैतिक काय अनैतिक काय, यासंबंधीचा निर्णय करणे सुटत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. हे निर्णय सुसंगतपणे करावयाचे तर कोणत्यातरी तात्विक, नैतिक निकषाची गरज भासते. उपमाच द्यावयाची तर संगीतातील षड्जाची देता येईल. संगीतात षड्जाला जे महत्व आहे तेच महत्व राजकारणात, समाजकारणात तात्विक वा नैतिक अधिष्ठानाला आहे. कलाकार त्याच्या आंतरिक स्वरात मिळेल तो षड्ज स्वीकारतो. त्यावर आपली बैठक स्थिर करतो. एवढे केले म्हणजे कोणताही राग कोणत्याही ढंगाने गाण्यास तो मोकळा असतो. मात्र स्वीकारलेला षड्ज त्याला सोडता येत नाही. षड्ज सुटला तर कलाकार काय गातो ते त्याचे त्यालाही कळणार नाही. तो भरकटत जाईल. सूर आणि बेसूर याचा निर्णय करता येणार नाही. किंवहुना संगीत संगीतच रहाणार नाही. तीच गोष्ट राजकारणाची आहे. राजकारणाला तात्विक, नैतिक अधिष्ठान नसेल तर योग्य काय अयोग्य काय, न्याय्य काय अन्याय्य काय, नैतिक काय, यांचा निर्णय करता येणार नाही. राजकारणाच्या दृष्टीने हे सर्व प्रश्न अप्रस्तुत आहेत असे काही व्यवहारवादी मानतात. सत्तास्पर्धा एवढेच राजकारणाचे स्वरूप त्यांना समजते. त्यांना एवढेच सांगावयाचे की, केवळ सत्तास्पर्धेत टिकून रहाण्याकरतासुद्धा राजकारणाला तात्विक, नैतिक अधिष्ठान असावे लागते. तत्वशून्य, दिशाहीन, सत्तास्पर्धेत भरकटत जाणारे राजकारण सामान्य जनता फार काळ मान्य करीत नाही. निव्वळ छक्क्यापंजांचे राजकारण खेळून सत्तेवर अबाधित रहाता येते अशी कोणा सत्ताधीशांची समजूत झाली असेल, तर तो निव्वळ भ्रम आहे. त्याचा निरास होण्यास फार काळ लागणार नाही.

विशाल मानवतावाद आणि त्याच्याशी सुसंगत असा स्वाभिमान आणि स्वनिष्ठा हे गांधीवादाचे षड्ज-पंचम आहेत. विशाल मानवतावादाने महात्मा गांधींनी आपल्या राजकारणास आवश्यक ते नैतिक अधिष्ठान दिले. स्वाभिमान व स्वनिष्ठेची तार छेडून त्यांनी राष्ट्र जागृतीचा मंत्र दिला. महात्मा गांधी उभे राहिले आणि भारत उभा राहिला. त्याकरिता राजकीय स्वातंत्र्य आणि आर्थिक विकास यांचीही वाट पहावी लागली नाही. राजकीय पारतंत्र्यात आणि आर्थिक दारिद्र्यातही देशाला मानवतावादाच्या नैतिक अधिष्ठानावर स्वाभिमानाने आणि स्वनिष्ठेने मान ताठ करून उभे राहणे शक्य आहे, हे त्यांनी स्वतःच्या उदाहरणाने सिद्ध करून दाखविले.

गरीब माणसाने स्वाभिमानाने जगावयाचे तर दारिद्र्याबरोबर येणारे सर्व न्यूनगंड सोडून दिले पाहिजेत आणि आपले अंथरुण पाहून पाय पसरण्यास शिकले पाहिजे. श्रीमंत माणसाचा सहवास घडला म्हणजे गरीब माणसाला आपल्या अन्नवस्त्राबद्दल सहाजिक कमीपणा वाटतो आणि तो श्रीमंती अन्नवस्त्राचे नुसते नाटक करू पाहतो. असल्या न्यूनगंडाने श्रीमंती येत नाही. मात्र स्वाभिमान नष्ट होतो आणि अंती अपमान पदरी येतो. महात्मा गांधींनी देशाला क्षणा-

अनुक्रमणिका

र्षात या न्यूनगंडापासून मुक्त केले आणि त्याचे प्रतीक म्हणून आपले अन्नवस्त्र, पुरे अपुरे असेल तसे, स्वाभिमानाने वापरण्यास शिकवले. गांधीवाद्यांनी त्याचा मतितार्थ बाजूस ठेवला आणि या साध्या व्यवहारी स्वाभिमानी शिकवणीचा अर्थ केला की, माणसाने आपल्या भौतिक गरजाच शक्यतितक्या कमी केल्या पाहिजेत, हीच गांधीवादाची शिकवण आहे. त्यातून काही प्रामाणिक कर्मकांड आणि पुष्कळशी भोंदूगिरी निर्माण झाली.

स्वाभिमानाबरोबरच महात्मा गांधींनी देशाला स्वनिष्ठेची शिकवण दिली. स्वनिष्ठा म्हणजे आम्ही आमच्यापाशी आहेत या साधनांनिशी स्वतःच्या पायावर ऊभे राहू आणि एक एक पाऊल पुढे टाकू हा विश्वास. स्वावलंबनाने, स्वनिष्ठेने मनुष्य अंतर्मुख होतो. आपण आपल्यापाशी असलेल्या सर्व साहित्याचा, साधनांचा पूर्ण उपयोग करून घेत आहोत का, हा प्रश्न सतत विचारीत राहतो. या उलट परावलंबनाचे आहे. परावलंबी मनुष्य बहिर्मुख असतो. येणाऱ्या जाणाऱ्याच्या तोंडाकडे पहात असतो. कोणाच्या तरी सहाय्याखेरीज आपण आपल्या पायावर उभे राहूच शकत नाही, अशीच मनाची धारणा असली म्हणजे मनुष्य स्वतःचे सामर्थ्य, साहित्य व साधने यांचा विचार करीत नाही. आधुनिकता, अद्यावतता यांनी दिपून गेल्यामुळे त्याला आपल्यापाशी असलेले साहित्य व साधने निरुपयोगी वाटतात आणि तो अधिकाधिक परावलंबी बनतो.

आपणापाशी असलेल्या साहित्यसाधनांचा पूर्ण उपयोग म्हणजे स्वनिष्ठा. तिचे प्रतीक म्हणून महात्मा गांधींनी सूतकताईचा कार्यक्रम सांगितला. परंतु गांधीवाद्यांनी त्याचाही मतितार्थ बाजूस ठेवून त्याचे कर्मकांड केले आणि त्यात सोवळे ओवळे आणले. आहेत या साधनांवर निष्ठा म्हणजे नवीन साधने निषिद्ध असे ठरविले आणि आर्थिक प्रगती तत्वतःच अशक्य केली.

स्वाभिमान व स्वनिष्ठा या गांधीवादाच्या मूळतत्वांचा अशा रीतीने गांधीवाद्यांनी विपर्यास केल्यामुळे स्वतःस बुद्धीवादी म्हणवून घेणाऱ्या गांधीवादाच्या टीकाकारांना साहजिकच फावले. गांधीवादाने गरीब माणसास स्वाभिमानाने जगण्यास शिकवले. बुद्धिवाद्यांनी त्याचा अर्थ केला की, गांधीवादास दारिद्र्यच मंजूर आहे. गांधीवाद हा तत्वतःच संपन्न जीवनाच्या विरोधी आहे. गांधीवादाने गरीब माणसास असेल त्या साहित्यानिशी कामास प्रवृत्त केले. बुद्धिवाद्यांनी त्याचा अर्थ असा केला की, गांधीवादाचा नवीन साधनास आणि पर्यायाने विज्ञानासच विरोध आहे. तात्पर्य, गांधीवाद हा भौतिक व आर्थिक प्रगतीस विरोधी व मारक आहे, असे बुद्धिवाद्यांनी ठरविले.

सध्या व्यवहारवादाचा अंमल जारी आहे. व्यवहारवादाला तात्त्विक व नैतिक अधिष्ठानाचे तर वावडे आहेच. परंतु साधा स्वाभिमानही आर्थिक विकासाच्या आड येतो. स्वाभिमान व स्वनिष्ठा या ऐवजी मतलब व स्वार्थ ह्याच आर्थिक विकासाच्या प्रेरणा आहेत असे व्यवहारवाद्यांनी ठरविलेले दिसते. त्यामुळे व्यवहारवादाचाच एक भाग म्हणून गांधीवादाचे केवळ ढोंग राहिले आहे. बाकी गांधीवादातील स्वाभिमान व स्वनिष्ठेचा विसर पडलेला आहे. आज देश स्वतंत्र असला तरी स्वातंत्र्यरक्षणास अपरिहार्य अशा समजुतीने देश आर्थिकदृष्ट्या पूर्वीपेक्षा सुस्थितीत असताही अधिक आर्थिक विकासास आवश्यक अशा समजुतीने, व्यवहारवादी राजकीय व सामाजिक नेते आणि राज्यकर्ते जगभर लाचारपणे, दीनपणे भीक मागत हिंडत आहेत. जेमतेम पंचवीस–तीस वर्षांपूर्वीच पारतंत्र्य व दारिद्र्य यांना न जुमानता स्वाभिमामाने उभे ठाकलेले महात्मा गांधी आणि आज स्वेच्छेने परतंत्र, पराधीन आणि परभृत बनलेले स्वतंत्र भारताचे नेते ही दोन चित्रे शेजारी शेजारी ठेवून बघण्याजोगी आहेत.

राज्यकर्त्यांनी अंगिकारलेले हे परावलंबी धोरण देशात खोलवर रुजले आहे. कोठं काही फुकट मिळते का, हे शोधत राज्यकर्ते जगभर भीक मागत हिंडत आहेत आणि सरकारकडून काही फुकट पदरात पाडून घेता येते का याचा शोध घेत देशातील नागरिक धावाधाव करीत आहेत. याला म्हणतात कल्याणकारी शासन. आपण बाहेर भीक मागावी आणि देशात लोकांना भीक मागण्यास शिकवावे असा हा सत्तेवर राहण्याचा सोपा मार्ग सापडला आहे. मग स्वाभिमान व स्वनिष्ठेची आठवण कोणास होणार ?

ही अधोगती थांबवावयाची असेल तर राष्ट्रकारणास मानवतावादाचे अधिष्ठान दिले पाहिजे आणि राष्ट्र उभारणीकरता स्वाभिमान व स्वनिष्ठेचा

मंत्र जागृत ठेवला पाहिजे, गांधीवादाची ही त्रिसूत्री आहे. तिचे प्रतिबिंब दैनंदिन व्यवहारात पाडू शकेल असा एक सर्वव्यापी, सर्वस्पर्शी कार्यक्रमही महात्मा गांधींनी सांगितला आहे. तो आजही उपयोगी पडण्यासारखा आहे. वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता आणि मळमूत्र, शेणकाडी इत्यादी त्याज्य वस्तूंचा संपूर्ण उपयोग हा तो कार्यक्रम होय. केवळ वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेने गरीब जीवनही किती तरी प्रसन्न करणे शक्य आहे. केवळ स्वच्छतेने नव्वद टक्के रोगराई नष्ट होईल. त्याकरता कोणाच्याही मदतीची गरज नाही. स्वच्छता हो ज्याने त्याने आपल्या घरात आणि गावात करण्याची गोष्ट आहे.पण म्हणूनच ती आम्हास नको वाटते. औषधाने भागते पण रोजची उठण्याबसण्याची स्वच्छता कशाला? आज औषधपाण्याचा, दवाखान्याचा प्रसार झाला आहे. परंतु वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेत फारसा फरक पडलेला दिसत नाही. सार्वजनिक आरोग्य सुधारलेले दिसते ते औषधाने, स्वच्छतेने नाही. प्रत्येकाला आपल्या गावात दवाखाना हवा. परंतु गावातील दुर्गंधी नाहीशी करण्यास कोणी तयार नाही. मलमूत्र, शेणकाडी इत्यादी वस्तू नीट गोळा करून त्यांचा सेंद्रिय खताकरता उपयोग केला तर गावातील दुर्गंधी जाईल, रोगराई नष्ट होईल, आणि शिवाय शेतीच्या उत्पादनास हातभार लागेल. हे करण्याकरता कोणाची मदत लागत नाही. हे आपले आपण करावयाचे आहे. भूमीतून आपण जो सत्वांश घेतो तो भूमीस परत करावयाचा आहे. तसे केले तर हीच भूमी आपणास अधिक आधार देईल. इतके हे साधे तत्त्व आहे. मग ते आपण का करीत नाही? कारण स्वावलंबन, स्वाभिमान, स्वनिष्ठा यासंबंधी लोकशिक्षण व लोकजागृती करण्यापेक्षा परकीयांकडून रासायनिक खते भीक मागून आणणे सरकारला सोपे वाटते. आणि मलमूत्र, शेणकाडी यांचा रोजचा व्यवहार करण्यापेक्षा सल्फेटचे पोते उघडून शेतात टाकणे शेतकऱ्यास सोईचे वाटते. हे आज सुखकर वाटणारे परावलंबन परिणामी आत्मघातकी ठरल्याखेरीज राहणार नाही हीच गांधीवादाची मुख्य शिकवण आहे.

स्वाभिमान, स्वनिष्ठा आणि त्यांचे प्रतिबिंब दैनंदिन जीवनात पडू शकेल असा सर्वव्यापी, सर्वस्पर्शी कार्यक्रम हाच गांधीवादाचा आशय आहे. आज त्याचे पुनरुत्थान झाले. पाहिजे.

['धरती' (कोल्हापूर) षण्मासिकाच्या महात्मा गांधी जन्मशताब्दी विशेषांकात प्रकाशित. मे १९६९]

(पान २३८ वरून)

यंदा दि. २ आक्टोबर १९६९ ला त्यांची जन्मशताब्दि मोठ्या उत्साहाने साजरी करण्याचा सर्व देशबांधवांचा संकल्प आहे. या संबंधीचे समारंभ धूमधडाक्याने होतीलच. पण नुसते समारंभ करून समाधान मानून घेणे चालणारे नाही. त्यांच्या जीवनाचा सूक्ष्मतेने अभ्यास करून त्यात प्रकट झालेले श्रेष्ठ चिरकालीन गुण समजून ते पिढीपासून पिढी सर्वांनी आत्मसात् करणे आवश्यक आहे. राष्ट्रार्थ सर्वस्व वाहून, शुद्ध सात्विक गुणांनी युक्त होऊन प्रत्येक माणूस राष्ट्राचा उत्कृष्ट कार्यकर्ता व्हावा व अखिल मानवतेला आपल्या सर्वसंग्राहक उदार वागणुकीने भूषणभूत ठरावा याकरिता त्यांचे डोळस अनुकरण करण्याचा निश्चय करावयास पाहिजे.

भगवत्कृपेने सर्व देशबांधवात ही सदिच्छा निर्माण होवो व आपले राष्ट्र सर्व सद्गुणसंपन्न बनून आपले स्वत:सिद्ध जगद्गुरुपद प्राप्त करो व यातून महात्माजींची कीर्ती अक्षय टिको.

'रस्त्यावरील राजकारण' आणि गांधीजी

—प्रा. डॉ. ना. र. देशपांडे

भारतीय राजकारणाच्या सध्याच्या अवस्थेमध्ये 'रस्त्यावरील राजकारण' याला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. प्रस्थापित लोकशाही पद्धतीच्या मार्गाने विशिष्ट मागण्या पुऱ्या होण्याची शक्यता नाही, असे दिसू लागले की, या मागण्या 'रस्त्यावरील राजकारणा'द्वारे पुऱ्या केल्या जातील, अशी धमकीवजा भाषा प्रचलित राजकारणामध्ये सर्रास वापरली जात आहे. 'रस्त्यावरील राजकारण' याचा आशय राज्यघटनेने किंवा नियम कायद्यांनी संमत केलेल्या मार्गांच्या बाहेर जाऊन किंबहुना त्यांना असंमत असेल, अशा मार्गांनी राजकीय प्रश्नांची सोडवणूक करणे, असा सर्वसाधारण केला जातो. यामध्ये प्रस्थापित शासनावर दबाव आणण्याचा आशय अभिप्रेत आहेच. परंतु, हा दबाव सनदशीर किंवा वैध मार्गाने न आणला जाता जनक्षोभाचा वणवा पेटवून त्याचा दबाव शासनावर आणण्याचा प्रयत्न केला जातो. भारत स्वतंत्र झाल्यापासूनच्या गेल्या दोन दशकांमध्ये या प्रकारच्या राजकारणाला पुष्कळच अवसर मिळाला. विशेषत: ज्या प्रश्नावर लोकक्षोभ सहजरीत्या निर्माण होण्याची शक्यता जास्त, असे भाषावार प्रांतरचना, प्रादेशिक सीमावाद किंवा जातीय संबंध यासारखे प्रश्न महत्व पावल्यामुळे 'रस्त्यावरील राजकारणा'ला मोठ्या प्रमाणावर वाव मिळाला.

राजकारणामध्ये साधनांच्या स्वरूपाबद्दल विशेष चिकित्सा करण्याची आवश्यकता नाही. साध्य हेच महत्त्वाचे, आणि त्या दृष्टीने साधन उपयुक्त ठरणारे असेल, तर ते श्रेयस्कर मानावे, अशी केवळ राजकारणी भूमिका असेल, तर 'रस्त्यावरील राजकारणा'चे साधन जो विशिष्ट हेतू साधण्यासाठी उपयोगात आणले जाते, तो हेतू साध्य करण्याच्या दृष्टीने कितपत प्रभावी आहे, यावरूनच त्याबद्दल निर्णय घ्यावा लागेल. परंतु, राजकीय तत्त्वज्ञानामध्ये व्यवहाराचे एक अंग म्हणून त्याचा विचार करावयाचा असेल तर त्याच्या मूल्यमापनाला निराळे निकष लावायला हवेत. 'रस्त्यावरील राजकारणा'त मुख्यत: जनसामर्थ्याचा प्रभाव हीच निर्णायक शक्ती असल्यामुळे बऱ्याच वेळा जनसामर्थ्याच्या प्रभावाला प्रत्यक्ष राजकारणामध्ये ज्यांनी मोठ्या प्रमाणावर उठाव दिला, त्या महात्मा गांधींच्या राजकीय चळवळीचा संदर्भ दाखल्यादाखल दिला जातो.

केवळ घटनेने नमूद केलेल्या किंवा सनदशीर समजलेल्या मार्गांव्यतिरिक्त जनसामर्थ्याचा संघटीत प्रभाव राजकारणामध्ये कार्यान्वित करण्याचे महत्त्वाचे कार्य गांधीजींनी केले आहे, ही गोष्ट खरी. नि:शस्त्र प्रतिकार, सविनय कायदेभंग किंवा सत्याग्रह या मार्गांनी महात्मा गांधींनी जनशक्तीचे सामर्थ्य संघटीत करून राजकारणामध्ये त्याचा प्रभावीरीत्या उपयोग केला जे राजकारण अगोदरच्या काळात काही थोड्या सुशिक्षित आणि जागृत कार्यकर्त्यांपुरते मर्यादित राहत असे, ते गांधीजींच्या काळामध्ये सर्वसामान्य जनतेमध्ये पसरू लागले. राजकीय कृती ही घटनेने निर्देशिलेल्या सनदशीर मार्गापुरती मर्यादित न राहता नव्या स्वरूपात, नव्या क्षेत्रामध्ये व्यक्त होऊ लागली. सर्वसामान्य जनता कायदेभंग, बहिष्कार किंवा सत्याग्रह या मार्गांनी राजकारणामध्ये भाग घेऊ लागली. म्हणून, एका अर्थाने कायदेमंडळातील राजकारणाचे युग संपून 'रस्त्यावरील राजकारणा'च्या युगाला गांधीजींच्या काळातच प्रारंभ झाला, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

परंतु, गांधीजींनी राजकारणाचे क्षेत्र विस्तृत केले आणि त्यावर पूर्वीच्या काळी असलेल्या मर्यादा ढिल्या केल्या ते केवळ तत्कालिन लाभाकडे दृष्टी ठेवूनच नव्हे.

राजकारणामध्ये सर्व सामान्य जनतेला गोवून घेताना ते गोवणाऱ्याची जबाबदारी फार मोठी आणि महत्वाची गांधीजींना अभिप्रेत होती. सत्याग्रह हे जे मुख्य साधन राजकारणामध्ये गांधीजींनी नव्यानेच मोठ्या प्रमाणावर सुरू केले, त्याचे एक विशिष्ठ तत्त्वज्ञान होते; आणि गांधीजींच्या काळामध्ये ज्या राजकारणाचा विस्तार सर्वसाधारण जनतेप्रत पोचला, ते राजकारण आज त्याला 'रस्त्यावरील राजकारण' संबोधले जाते, त्या स्वरूपाचे नसून सत्याग्रहाच्या तत्वज्ञानावर आधारलेले होते. सत्याग्रहाच्या तत्वज्ञानाशी संबंध नसलेले 'रस्त्यावरील राजकारण' गांधीजींना अभिप्रेत नव्हते.

सत्याग्रहाच्या तत्वज्ञानासंबंधी गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेमध्ये या साधनांचा उपयोग करायला सुरवात केल्यापासून बरेच विचारमंथन केले आहे. भारतामध्ये स्वातंत्र्य संपादनापर्यंत निरनिराळ्या प्रसंगी सत्याग्रहाच्या साधनाचा वापर केला आणि त्या सर्वप्रसंगी सत्याग्रहाच्या तत्वज्ञानासंबंधी त्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. परंतु या सर्व प्रसंगी ज्या एका महत्वाच्या सूत्रावर गांधीजींनी विशेष भर दिला आहे, ते सूत्र म्हणजे सत्याग्रह करणाऱ्याच्या ठिकाणी आवश्यक असलेली विशिष्ट पात्रता ही होय. १९४० साली वैयक्तिक सत्याग्रहाची मोहीम सुरू करून गांधीजींनी पहिला सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली आणि सत्याग्रही म्हणून निवड होण्यासाठी काही कठिण निकष पुरे करण्याची आवश्यकता दर्शवून दिली. इतर सत्याग्रहाच्या चळवळीच्या वेळेला ही गोष्ट इतकी स्पष्ट झाली नसली, तरी सत्याग्रहाच्या चळवळीचे यश हे सत्याग्रह्याच्या पात्रतेवर अवलंबून आहे. या गोष्टीवर त्यांनी नेहमीच भर दिला. याचे एक उदाहरण त्यांनी आपल्या आत्मवृत्तामध्ये वर्णिलेले आहे. हिमालयाएवढी चूक, असे ज्याचे वर्णन गांधीजींनी केले, ते खेडा जिल्ह्यातील कायदे भंगातील चळवळ पूर्वतयारी शिवाय सुरू केली, त्याला उद्देशून गांधींनी ते शब्द उच्चारले होते. यासंबंधी आपल्या आत्मचरित्रात गांधीजींनी म्हटले आहे की, खरा सत्याग्रही तोच की, जो समाजाच्या कायद्याला ज्ञानपूर्वक, स्वेच्छेने मान देणे हा धर्म आहे, असे समजून मान देईल आणि अशा तऱ्हेने ज्याने समाजाच्या नियमांचे हेतूपूर्वक पालन केले आहे, त्याच्या अंगीच त्या नियमांच्या नीति, अनीतीचा न्याय करण्याची शक्ती येते व त्यालाच विशिष्ट नियमांचा भंग करण्याचा अधिकार प्राप्त होतो. ज्या लोकांना अशा तऱ्हेचा अधिकार प्राप्त झालेला नाही त्यांना कायदेभंग करायला सांगणे, ही आपली हिमालयाएवढी चूक झाली, असे गांधीजींना वाटले.

या अनुभवावरून कायदेभंग किंवा सत्याग्रह या चळवळीमध्ये भाग घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पूर्वतयारी करायला पाहिजे याची जाणीव गांधीजींना झाली; आणि स्वयंसेवक दल निर्माण करण्याची आवश्यकता त्यांना विशेषत्वाने जाणवू लागली. ही जी पूर्व तयारी सत्याग्रहात भाग घेणाऱ्या व्यक्तींची व्हावयास पाहिजे, ती केवळ प्रचारामधून होण्यासारखी नाही. गांधीजींचा रचनात्मक कार्यक्रम हा एका अर्थाने या पूर्वतयारीचा एक महत्वाचा भाग होता. या कार्यक्रमामध्ये कार्यकर्त्याला कामाची शिस्त लागावी, अशी तर योजना होतीच, परंतु त्याशिवाय सामाजिक न्याय आणि आर्थिक विकास यांना पोषक ठरलेल्या कार्यक्रमाची उभारणी मानवी श्रमाच्या मूल्यावर आधारून करण्याचा आशय अभिप्रेत होता. विधायक किंवा रचनात्मक कार्यामध्ये शिस्तबद्ध रीतीने सहभागी होणारा कार्यकर्ता हा सत्याग्रही म्हणून आवश्यक असलेली पात्रता अंगी बाळगू शकेल अशी गांधीजींची कल्पना होती.

गांधीजींनी सुरू केलेल्या अनेक चळवळींबाबत लोकांना पुष्कळ वेळा गूढ वाटत आले आहे. प्रत्यक्ष राजकारणाचे नेतृत्व स्वीकारून स्वातंत्र्याचा लढा चालवित असताना रचनात्मक कार्यक्रम, अस्पृशोद्धार, मद्यपानबंदीची चळवळ, भंगीमुक्ती या आणि अशा अनेक कार्यक्रमांमध्ये गांधीजी स्वतः लक्ष घालीत. एवढेच नव्हे तर, राजकारणातील अनुयायी नाही अशा सर्व कार्यक्रमांमध्ये सक्रिय भाग घेण्याला लावीत. यामुळे लोकांना त्यांच्या राजकारणाच्या स्वरुपाबद्दल संदेह वाटू लागला. परंतु, राजकारणाचा पाया विस्तृत करण्यासाठी म्हणजे मोठ्या संख्येने सामान्य जनतेला राजकारणामध्ये भाग घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी राजकीय चळवळीचे नेतृत्व करणाऱ्याची लायकी आणि पात्रता वाढविण्याची आवश्यकता गांधीजींना पहिल्यापासून जाणवत होती. आणि हे सर्व विविध कार्यक्रम दैनंदिन राजकारणाशी प्रत्यक्ष संबंधित नसले, तरी राजकारणामध्ये नेतृत्व करणाऱ्याच्या ठिकाणी आवश्यक असलेले गुण वाढविणारे होते. दुर्दैवाने खुद्द गांधीजींच्या अनुयायी म्हणविणाऱ्या पुष्कळांना त्यांच्या रचनात्मक

कार्यक्रमामागील ही भूमिका आत्मसात करता आली नाही. याचा परिणाम असा झाला की, गांधीजींच्या समाधानासाठी त्यांच्या या कार्यक्रमाला तोंडदेखला पाठिंबा देऊन त्यांच्या राजकीय चळवळीमध्येच प्रामुख्याने अनुयायांनी लक्ष घातले, आणि या चळवळीमुळे वाढलेल्या जनशक्तीच्या संघटित सामर्थ्याचा राजकीय हेतूपूर्तीसाठी उपयोग करून घेतला. याचा परिणाम असा झाला की, राजकारणामध्ये नेतृत्व करणाऱ्या कार्यकर्त्यांचे व्यक्तिमत्व ज्या दृष्टीने एकात्म स्वरूपात जीवनाच्या निरनिराळ्या अंगांचा समावेश करून वाढायला हवे होते, तसे ते न वाढता एकांगी स्वरूपातच वाढले. भारतामधील राष्ट्रवादी चळवळ ही राजकारणावर विशेष भर देऊन राष्ट्रीय जीवनाच्या इतर अंगांचा त्या दृष्टीने कमी विकास करणारी झाली, हे या एकांगी वाढीचेच गमक म्हणता येईल.

रचनात्मक कार्यक्रमामध्ये अनुस्यूत असलेली व्यक्तिगत जीवनाची शिस्त ही एकात्म व्यक्तिमत्वाच्या विकासाला पोषक ठरणारी होती. रचनात्मक कार्यक्रमाची उभारणी समतेच्या पायावर झालेली होती. आणि ही समता मुख्यतः विकेंद्रीकरणाच्या साधनांच्याद्वारे कार्यान्वित करता येणार होती. गांधीजींना अभिप्रेत असलेल्या भारताच्या आर्थिक पुनर्रचनेबद्दल गांधीजींच्या अनुयायातसुद्धा महत्त्वाचे मतभेद होते. परंतु, संपत्तीचे आणि विशेषतः उत्पादनाच्या साधनांचे केंद्रीकरण होऊ नये. आणि प्रत्येक व्यक्तीला आपल्या कुवतीनुसार आणि कलानुसार आर्थिक विकासाची संधी मिळावी, ही सूत्रे कोणत्याही आर्थिक योजनेमध्ये पायाभूत मानली पाहिजेत. या गांधीजींच्या मतांबद्दल फारसे दुमत नव्हते. हा दृष्टीकोन किंवा मतप्रवाह वाढीला लागावा अशा तऱ्हेची योजना गांधीजींच्या रचनात्मक कार्यक्रमांमध्ये अभिप्रेत होती. याहीपेक्षा भारतीय समाजाच्या पुनर्रचनेच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची बाब सामाजिक समतेची भावना निर्माण करण्याची ! ती केवळ तात्त्विक चर्चेच्या द्वारा होणार नाही, तर प्रत्यक्ष लोकांच्या दैनंदिन आचरणामधून वाढीला लागली पाहिजे. हे गांधीजींनी ओळखले असल्याकारणाने अस्पृश्यता निवारणासारख्या कार्याला त्यांच्या कार्यक्रमामध्ये विशेष महत्त्वाचे स्थान मिळाले. जे कार्यकर्ते प्रत्यक्ष व्यवहारामध्ये सामाजिक समता, आर्थिक आणि राजकीय विकेंद्रीकरण यांच्याशी सुसंगत असलेली कार्यपद्धती अंगी बाणवतील तेच कार्यकर्ते भारतीय राजकारणाला अभिप्रेत असलेले लोकशाहीनिष्ठ आणि प्रगतिपर असे नेतृत्व देऊ शकतील, अशी महात्माजींची श्रद्धा होती. या दृष्टीने त्यांचा हा सर्व रचनात्मक कार्यक्रम त्यांच्या राजकारणाचा महत्त्वाचा भाग होता.

खुद्द गांधीजींच्याच हयातीमध्ये त्यांच्या राजकीय चळवळीचा ज्या मानाने लोकांनी पाठपुरावा केला, त्या मानाने त्यांच्या रचनात्मक आणि इतर कार्यक्रमांचा न केल्यामुळे राष्ट्रवादी चळवळीची वाढ एकांगी झाली, याचा उल्लेख वर आलाच आहे. परिणाम असा झाला की, स्वातंत्र्य संपादनाच्या वेळेला राजकीय चळवळ ही सत्ता संपादन करण्याइतक्या प्रगल्भ अवस्थेला पोचली असूनसुद्धा सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये भारतीय राष्ट्रवादाचा आशय बराचसा स्थिर अवस्थेतच राहिला. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या २० वर्षांमध्ये भारतीय जीवन हे या दोन क्षेत्रांमध्ये मंद गतीने विकास पावू शकले याचे कारण हेच. आता राजकीय सत्ता लोकप्रतिनिधींच्या हाती आली असून सुद्धा त्या सत्तेचा वापर प्रत्यक्ष व्यवहारामध्ये सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित करण्याकरिता होईल याची ग्वाही देता येत नाही. कारण, राजकारणावर सामाजिक आणि आर्थिक दृष्टीकोनाचा अंकुश ठेवण्याची परंपराच आपल्या राजकारणात निर्माण झाली नाही.

अशा अवस्थेत 'रस्त्यावरील राजकारणा'चा पुरस्कार हा गांधीजींच्या एकंदर तत्त्वज्ञानाशी सुसंगत नाही. एवढेच नव्हे, तर तो सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानाला पूर्णपणे विरोधी आहे, असे म्हटले पाहिजे. कारण, आज ज्या स्वरूपात 'रस्त्यावरील राजकारणा'चा ज्या प्रमाणात पुरस्कार किंवा वापर केला जातो, तो केवळ राजकीय सत्तास्पर्धेमधील एक साधन म्हणून. त्याला कोणत्याही तऱ्हेचा सामाजिक किंवा आर्थिक आशय आहे, असे म्हणणे कठीण आहे. या साधनाचा वापर करणारे राजकीय कार्यकर्ते सत्याग्रहाला आवश्यक असलेली शिस्तीची कोणतीही बंधने स्वतः पाळण्यास तयार नसतात. समाजाचे नियम पाळण्याची शिस्त ज्याने स्वतःच्या अंगी बाणवली आहे, त्यालाच त्या नियमांसंबंधी बरे वाईट ठरविण्याचा अधिकार येतो, असे गांधीजी म्हणत. पण, यासाठी लोकांना समाजाच्या शिस्तीचे बंधन पाळण्याची सवय अंगी बाणवण्याचे

शिक्षण कार्यकर्त्यांनी देणे आवश्यक आहे. आजचे राजकीय कार्यकर्ते अशा तऱ्हेचे शिक्षण देत नाहीत. उलट, प्रस्थापित नीतिनियमांबद्दल अनादराची भावना वाढेल अशा तऱ्हेची शिकवण ते देत असतात. आपण सुरू केलेल्या चळवळींमधून हिंसा निर्माण होते आहे, असे दिसू लागल्यास ती चळवळ थांबवायची. एवढेच नव्हे, तर आपल्या कृतीबद्दल प्रायश्चित्त घेण्याची तयारी दर्शवायची, ही नीति गांधीजींच्या सत्याग्रहामध्ये अभिप्रेत होती. या उलट, आज लोकक्षोभाचा दबाव शासनावर पडावा यासाठी या लोकक्षोभाच्या प्रदर्शनामध्ये थोड्याबहुत प्रमाणात तरी हिंसाचार होणे आवश्यक आहे, अशी आजच्या 'रस्त्यावरील राजकारणा'च्या पुरस्कर्त्यांची भूमिका असते. राजकीय नेत्यांनी आर्थिक आणि सामाजिक समतेला पोषक असे प्रत्यक्ष कार्य करण्याची भूमिका गांधीजींना अपेक्षित असली, तरीसुद्धा त्यांच्या हयातीमध्येच ही गोष्ट शक्य झाली नाही. सध्या राजकारण म्हणजे सत्तेचे राजकारण असे जवळजवळ समीकरणच झाल्यामुळे राजकारणातील कार्यकर्त्यांकडून अशी अपेक्षा बाळगणेच अवास्तव ठरेल. तेव्हा 'रस्त्यावरील राजकारणा'चा पुरस्कार करणाऱ्यांनी गांधीजींच्या नावाचा किंवा सत्याग्रहाच्या तंत्राचा समर्थनासाठी उपयोग करणे, हे गांधीजींना आणि सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानाला निश्चितपणे अन्याय करणारे ठरेल.

महात्मा गांधी व 'पेटंट एन्व्हलप्स'

एकदा कृष्णदास दुपारच्या वेळी गांधींच्या खोलीत गेले. गांधी मोठ्या आनंदाने स्वतःशीच हसत आहेत, असे त्यांना दिसले. गांधींच्या हसण्याचे व आनंदाचे कारण काय ?

कृष्णदासना गांधी म्हणाले, 'आपल्याकडे इतक्या तारा येतात, त्याचे काय करावे हे मला कळत नव्हते, म्हणून मी तारांचे कागद फाडून टाकीत असे. मला हा कागदांचा नाश करतांना बरे वाटत नसे. त्याचा काय उपयोग करता येईल. त्याचा मी विचार करीत होतो. पण मला आता एक उपाय सापडला', असे म्हणून त्यांनी तारेचा एक कागद घेतला आणि त्याची घडी कशी घालावी व लिफाफा कसा करावा हे दाखवले. कृष्णदासांना हा नवाच उद्योग लागला.

गांधीजी आपल्या पत्राकरिता या लिफाफ्यांचा उपयोग करू लागले. त्या लिफाफ्यांना त्यांनी 'पेटंट एन्व्हलप्स' असे नांव दिले. ते स्वतः हे लिफाफे आनंदाने वापरीत. आश्रमात काही काळ ही साथच पसरली असेल. पण गांधींची उपयोगप्रवण दृष्टी त्यात दिसते. प्रत्येक वस्तुचा जास्तीत जास्त उपयोग केला पाहिजे हे त्यांचे तत्व होते. त्यामुळे पैसे वाचत. गांधीजी हे लिफाफे जसे वापरत तसेच आलेले लिफाफे फाडून त्याचा लिहिण्याकरिता उपयोगही करीत. पत्र लिहिण्याऐवजी कार्ड लिहिण्याकडे त्यांचा कटाक्ष. चार ओळीकरिता पत्र लिहिणे आणि पोष्टांना जास्त पैसे देणे त्यांना पसंत नसे. कोणी अशी पत्रे लिहिली तर त्यांना ते असला अनाठायी खर्च न करण्याकरता बजावीत व थोडक्यात पत्र लिहा असे म्हणत. वॉर एकॉनमी म्हणून शेवटी शेवटी ज्या गोष्टी सरकार करू लागले आहे, त्याची सुरवात गांधींनी फार पूर्वीच केली होती.

जीवनयज्ञ

--ग. त्र्यं. माडखोलकर

शेलेने म्हटले आहे की, "आमच्या डोळ्यांपुढे जे दिव्य भास, जी उज्ज्वल स्वप्ने तरळतात, ती आत्मसात् करण्यासाठी, व्यवहारात उतरवण्यासाठी आम्ही धडपडतो. पण ती पाहाता पाहाता नाहीशी होतात आणि आमच्या हाती निराशा पडते."

जीवन हे मृगजळ आहे, असे जे मनाला वाटते, ते याच कारणामुळे. असे मृगजळ की, ज्याच्यामागून धावताना उरी फुटून मरण यावे. दिव्य भासांच्या,--उज्ज्वल स्वप्नांच्या मागून धावता धावता उरी फुटलेल्या अशा अनेक ध्येयवाद्यांच्या अस्थींनी मानवी इतिहासाचा मार्ग भरलेला आहे.

सत्य, अहिंसा, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव हे सगळे शतकानुशतके मानवाच्या डोळ्यांपुढे तरळत असलेले दिव्य भास--ही सगळी उज्ज्वल स्वप्नेच नाहीत काय? ते भास आत्मसात् करण्यासाठी, ती स्वप्ने व्यवहारात आणण्यासाठी ज्या व्यक्ती धडपड करतात, त्यांच्या कपाळी कोणता भोग येतो? हरिश्चंद्रावर राज्य गमावण्याचा आणि तारामतीचा लिलाव करण्याचा प्रसंग आला. रामचंद्रावर वनवासाची आणि सीतात्यागाची आपत्ती ओढवली; व शिबिराजाला तर आपले स्वतःचे शरीरच मुळी ससाण्याला द्यावे लागले. या पौराणिक कथा आहेत, असे कोणी म्हणेल. पण, इतिहासकाळातही, आपल्याला प्रतीत झालेल्या सत्यासाठी, वधस्तंभावर जाणारे किंवा अग्निकाष्ठे भक्षण करणारे हुतात्मे अनेक होऊन गेलेले आढळतील.

हे दिव्य भास, ही उज्ज्वल स्वप्ने मानवी व्यवहारात आणण्यासाठी,--त्या उद्देशाने आपले स्वतःचे जीवन हे त्यांचे प्रयोगक्षेत्र करण्यासाठी, ज्यांनी सर्व आयुष्य व्यतीत केले, अशा विसाव्या शतकातील अलौकिक विभूतीत महात्मा गांधी यांना जगाने अग्रपूजेचा मान दिलेला आहे. रवीन्द्रनाथांनी असे म्हटले आहे की, "यज्ञाला देहधारी व्हावे असे वाटले आणि तो गांधी होऊन अवतरला!" तथापि, महात्माजी हे स्वतः यज्ञ होते यज्ञरूप होते, असे म्हणणे कितपत योग्य होईल? मला वाटते, गांधी हे याजक होते, यज्ञ नव्हत. त्यांचे जीवन हा यज्ञ होता. त्या यज्ञात त्यांनी सर्वस्वाचे,--शरीरापासून तो आत्म्यापर्यंत स्वतःच्या सगळ्या पार्थिव आणि अपार्थिव संपदेचे,--हवन केले. ते हवन करताना त्यांनी काहीही मागे ठेवले नाही, केव्हाही मागे वळून पाहिले नाही. हा त्यांचा जीवनयज्ञ परिपूर्ण होता. आणि शेवटी, यज्ञनारायणाच्या कृपेने, तो स्वयंपूर्णही झाला. यज्ञनारायणाने त्यांना स्वतःलाच मुळी शेवटी यज्ञवली केले आणि त्या जीवनयज्ञाची सांगता केली. याजक आणि यज्ञ यांचे अशा रीतीने अखेर अद्वैत झाले. त्यामुळेच कदाचित् असे म्हणता येईल की, हा अद्वितीय याजक शेवटी स्वतःच यज्ञ होऊन गेला. विश्वकवीची भविष्यवाणी सार्थ झाली, पण ती अशा रीतीने!

असा अद्वितीय याजक जगात बहुधा दुसरा झाला नसावा. ज्ञात जगात तरी नाहीच. केवळ इतिहासालाच नव्हे, तर पुराणांना सुद्धा जे ज्ञात नाही, त्यांनी जे नमूद केलेले नाही, ते घडलेच नाही, असे म्हणावे लागते. जगातली सगळी पुराणे म्हणजे मानव जातीच्या अगदी बाल्यावस्थेपासूनच्या स्मृतिसंचयाची भांडारे आहेत. म्हणूनच त्यात नाना परीच्या नवलाईच्या चिजा आढळतात,--ज्या चिजांवर आपण व्यवहारी पृथग्जन विश्वास ठेवीत नाही. अशा नवलकथांत, याजक हाच स्वेच्छेने स्वतः यज्ञवली झाल्याचे उदाहरण महाभारताच्या शांतिपर्वातील कपोताख्यानात आढळते, तेवढेच! दधीचीने आत्मयज्ञ केला. पण, तो देवांची आपण गिळून टाकलेली अस्त्रे वज्र तयार करण्यासाठी, त्यांना परत देण्याकरिता! गांधीहि यज्ञवली झाले, पण ते स्वेच्छेने नव्हत. ते तर सव्वाशे वर्षे--उपनिषदांनी सांगितलेले पूर्ण आयुष्य,--जगण्याचा संकल्प करून बसलेले होते. तो संकल्प अहंकारी नव्हता किंवा ती जीवनलालसाही नव्हती. तर आपण

आरंभिलेले सत्याचे प्रयोग यशस्वी झालेलेप हावेत, यासाठी तो शुभ संकल्प होता.पण, यज्ञनारायणाने त्यांच्या यज्ञाची सांगता त्यांच्या स्वतःच्या बलिदानाने केली; त्यांनी जन्मभर केलेल्या यज्ञाच्या सांगतेचे अवभृथ स्थान यज्ञनारायणाने त्यांना कंठस्नान घालून केले.

यज्ञ होणे सोपे आहे; पण याजक होणे आणि यज्ञ करणे, हे मात्र सोपे नाही. एकामागून एक तीन अश्वमेध केल्याबद्दल धर्मराजाच्या ठिकाणी अहंकार उत्पन्न झाला. तेव्हा, साक्षात् धर्मानेच मुळी मुंगुसाचे रूप धारण करून, त्या यज्ञात त्याने सोडलेले दानोदक अपुरे आणि उणे असल्याचे,–अहंकारामुळे त्याचा पुण्यक्षय होऊन गेल्याचे त्याच्या प्रत्ययाला आणून दिले. ज्याच्या दानशौर्याच्या कीर्तीने आजपर्यंत सगळे जग दुमदुमत आलेले आहे, त्या कर्णाने, इंद्राला कवच–कुंडले देताना, वासवी शक्तीचा मोबदला घेतला. इथे त्याच्या दानयज्ञाला लांच्छन लागले. सुळावरच ढेपर्यंत ख्रिस्ताची हिम्मत कायम होती. पण त्याला जेव्हा शूलारोहणाच्या यातना असह्य झाल्या आणि त्याचा जीव तहानेने कासावीस होऊन गेला, तेव्हा तो कळवळून उद्गारला, "आत्मा खरोखरीच तयार आहे, पण शरीर दुबळे आहे." (The spirit, truly, is ready, but the flesh is week) आणि, आपल्या परमपित्याला त्याने आर्तवाणीने आळवले, "देवा,अरे माझ्या देवा, तू मला का सोडलेस ?" (My God, my God, why hast thou forsaken me?) इथे ख्रिस्ताचे मनोबल खचलेले दिसते.

एकवचनी रामचंद्राने असे म्हटले होते की, "लोकाराधनासाठी स्नेह, दया, सौख्य,–फार काय, जानकीसुद्धा !–यांचा जरी मला त्याग करावा लागला, तरी माझे मन व्यथित होणार नाही." "यदि वा जानकीमपि–फार काय, जानकीदेखील !"– असा जो उद्गार त्या सत्यसंधाने काढला, तेथे त्याच्या आत्मयज्ञाची परिसीमा होऊन गेली. कारण तो जानकीजीवन होता,–जानकी हे त्याचे जीवन होते आणि तोही जानकीचे जीवन होता. पण, जानकीला सोडल्यावर देखील माझे मन व्यथित होणार नाही, असे जरी त्याने म्हटले, तरीही तो व्यथित होऊन गेला. क्षीण आणि कृश होऊन गेला. त्याची जीवनेच्छा मावळून आणि लोपून गेली. खरा याजक तोच की, जो आपल्या प्रियवस्तूचे,–"किमपि द्रव्यम्" अशा प्रियजनाचे,–हवन-सुद्धा प्रसन्न चित्ताने करतो. रामचंद्राने लोकाराधनासाठी,—नृपतिपदाच्या चारित्र्याचा आदर्श निर्माण करण्यासाठी,—हवन केले. पण ते व्यथित चित्ताने. यजनकर्म यथासांग पार पडले, पण डोळ्यांना अश्रुधारा लागल्या. चवदा वर्षे वनवासाला जाताना त्याच्या डोळ्यातून टिपूसही पडले नव्हते. सीतेला अग्निदिव्य करावयाला सांगतानाही त्याच्या हृदयाला द्रव आला नव्हता. पण तिचा त्याग करताना मात्र डोळ्यातून धारावर्षाव झाला.

असाच कसोटीचा प्रसंग गांधीजींवरही आला. क्रिप्स शिष्टाई विफल झाल्यानंतर जेव्हा फाळणीच्या योजनेने फणा वर काढला, तेव्हा गांधीजी उद्गारले होते की, "देशाचे विच्छेदन म्हणजे माझ्या देहाचेच विच्छेदन होय !" (Vivisection of India would be vivesection of myself) हा त्यांचा उद्गार त्यांच्या जीवनातील आत्यंतिक निष्ठेचा निदर्शक होता. त्यांनी जी उज्ज्वल स्वप्ने जन्मभर पाहिली, ज्या स्वप्नांच्या सिद्धतेसाठी आमरण धडपड केली, त्यातले अतिवांच्छित स्वप्न हिंदु–मुस्लिम ऐक्य हे होते. ते ऐक्य हो देशाच्या स्वातंत्र्याची आणि अभंगतेची त्यांनी कोनशिला मानलेली होती. म्हणूनच, १९४७ च्या मेमध्ये फाळणी जेव्हा अटळ आहे असे त्यांच्या प्रत्ययाला आले, – सरदार आणि पंडितजी हे सुद्धा फाळणीला संमती द्यावयाला तयार आहेत, असे त्यांच्या अनुभवाला आले,—तेव्हा त्यांच्या जिवाची विलक्षण तळमळ होऊ लागली.

त्या तळमळीच्या भरात गांधीजी ता. १ जून रोजी पहाटे थोडे आधीच उठले आणि बिछान्यावर पडल्या पडल्या स्वतःशीच उद्गारले, "आम्ही भलत्याच मार्गाने जात आहोत, हे मला स्पष्ट दिसत आहे. आज त्याचे परिणाम कदाचित् पूर्णतया जाणवणार नाहीत. पण देशाच्या विच्छेदनाची किंमत देऊन जे हे स्वातंत्र्य आम्ही मिळवीत आहोत, त्याचे भवितव्य भेसूर आहे. ते पाहाण्यासाठी भगवन्ताने मला जिवंत ठेवू नये, अशी माझी त्याला प्रार्थना आहे. पण, जर मी जिवंत राहिलोच, जर हे अरिष्ट भारतावर ओढवले आणि त्याचे स्वातंत्र्य धोक्यात आले, तर त्याचा विचार करताना, या म्हाताऱ्याच्या आत्म्याने किती विलक्षण यातना भोगल्या, हे भावी पिढीला कळू दे. भारताच्या विच्छेदनाला हा गांधी सहभागी होता, असे पुढे

कोणीहि म्हणू नये." (I see clearly that we are setting about this business the wrong way. We may not feel the full effect immediately, but I can see clearly that the future of independence gained at this price is going to be dark. I pray that God may not keep me alive to witness it....But should the evil I apprehend overtake India and her independence be imperilled, let posterity know what agony this old soul went through thinking of it. *Let it not be said that Gandhi was party to India's vivisection.*)

या तळमळीच्या भरातच ते डॉ. राजेंद्रप्रसाद यांना एकदा म्हणाले होते, "खोटेपणा, ढोंग आणि फसवणूक ही भोवती धिंगाणा घालीत असता, मला आता जगण्याची इच्छा नाही." (.. .I have no longer the desire to continue to live with falsehood, hopocrisy and deception stalking all around.)

पण, फाळणी घेऊन स्वातंत्र्य जसजसे जवळ येऊ लागले, तसतशी गांधीजींची ही भूमिका सुटत गेली, धारणा ढळत गेली, वज्रनिर्धार वितळत गेला.

अखेर, ता. २ जून १९४७ रोजी वर्किंग कमिटीने जेव्हा लॉर्ड माऊंटबॅटन यांनी सादर केलेल्या फाळणीच्या योजनेला मान्यता देण्याचा ठराव केला, तेव्हा गांधीजी त्या ठरावाची तरफदारी करावयाला पुढे आले. ते पाहून लोकांना साहजिकच आश्चर्याचा आणि उद्वेगाचा धक्का बसला. लोकांची त्यांच्यावरील श्रद्धा हादरून गेली; व पत्रांचा आणि प्रश्नांचा वर्षाव सर्व बाजूंनी त्यांच्यावर सारखा होऊ लागला. त्यांना असे प्रश्न विचारण्यात आले की, "आता आपण काय करणार आहात? काँग्रेसच्या या ठरावाविरुद्ध आंदोलन करणार की नाही? आजपर्यंत बारा तेरा वेळा आपण अन्नसत्याग्रह केलात. प्राण कंठी आले, तरी यश येईपर्यंत तोंडात पाणी घातले नाहीत. दोन वेळा तर हरिजनांच्या प्रश्नावर आपण प्रायोपवेशनही केलेत. आता आपण या फाळणीच्या प्रश्नावर प्रायोपवेशन करणार की नाही? देशाचे विच्छेदन टाळण्यासाठी स्वतःचे प्राण पणाला लावणार की नाही?"

लोकांच्या या सगळ्या प्रश्नांना गांधीजींनी ता. ९ जून रोजी सायंप्रार्थनेच्या वेळी जाहीर रीतीने उत्तर दिले. त्यांनी असा खुलासा केला की, "देशाचे विच्छेदन म्हणजे माझ्या देहाचेच विच्छेदन होय, असे विधान ज्या वेळी मी केले, त्या वेळी मी लोकमत बोलून दाखवीत आहे, अशी माझी खात्री होती. पण, आता लोकमत माझ्या पाठीशी नाही, असे दिसते. अशा स्थितीत मी काय लोकमतावर जुलूम करू?" (When he made the statement in question, he believed, he was voicing public opinion. But, when public opinion was against him, was he to coerce it?)

यावर गांधीजींना पुन्हा असा प्रश्न विचारण्यात आला की, "फाळणी हे असत्य (untruth) आणि अरिष्ट (evil) आहे, असे आपण आजपर्यंत कंठरवाने सांगत आलात. असत्याशी आणि अरिष्टाशी कधीही तडजोड होऊ शकत नाही, असेही अनेकदा आपण घोषित केलेत. मग आता त्या असत्याविरुद्ध आणि अरिष्टाविरुद्ध आपण उठाव का करीत नाही?" या त्यांच्या प्रश्नाला गांधीजींनी असे उत्तर दिले, "जी गोष्ट सिद्ध झालेली, मूर्त रूपाला येत असलेली मला दिसत आहे, तिच्याविरुद्ध उठाव करण्याची माझी इच्छा नाही." (......But I have no desire to launch any struggle against what promises to be an accomplished fact.)

गांधीजींचे हे सगळे खुलासे, ही उत्तरे आणि हे उद्गार पाहून लोकांना असे वाटले की, आपल्या भूमिकेपासून ते ढळले. त्यांच्या आयुष्यातला जो हा सर्वांत कसोटीचा प्रसंग आलेला होता, त्या प्रसंगाच्या कसोटीला ते काही उतरले नाहीत. रामचंद्र आणि ख्रिस्त यांच्याप्रमाणेच गांधीजींचेही मनोबल या कसोटीच्या प्रसंगी अपुरे आणि उणे ठरले.

केवळ अपुरे आणि उणे ठरले, एवढेच नाही; तर ऐन स्वातंत्र्यप्राप्तीच्या मुहूर्तावर आपल्या सगळ्या स्वप्नांचा चक्काचूर झालेला पाहून त्यांचे मन खचून गेले.

मीराबेहेनने लिहिलेच आहे की, "स्वतंत्र भारताला योग्य मार्गाला लावण्यासाठी सव्वाशे वर्षे जगण्याची बापूंची इच्छा होती. पण, देश स्वतंत्र झाल्यावर एकदा कुणाजवळ तरी मी त्यांना असे बोलतांना

ऐकले की, "तुम्हाला या स्वातंत्र्याबद्दल काय वाटते, हे मला माहित नाही, पण माझ्या दृष्टीने मात्र ते स्वातंत्र्य मृगजळ ठरले." त्यांची जीवनेच्छा मंदावत चालल्याचे मला स्पष्ट दिसत होते. ती पुन्हा कशी जागृत करावी, हे मला समजेना. आमच्या 'पशुलोका'तील नवा गोळवाडा जेव्हा तयार झाला, तेव्हा मी त्यांना विचारले, "या गोळवाड्याचे उद्घाटन करण्यासाठी आपण माझ्या आश्रमात येता का ?" तेव्हा ते उद्गारले, "प्रेतावर अवलंबून राहाण्यात काय अर्थ आहे ?" ते उत्तर ऐकताच माझे मन खचून गेले. ("I don't know what you think of this freedom," I heard him say one day to someone, "for me it is a disillusionment. .....What is the good of counting on a corpse ?")

असेच उद्गार आपल्या हत्येच्या एक दिवस आधी, ता. २९ जानेवारी ११४८ रोजी, अमेरिकन वृत्तपत्रप्रतिनिधी कु. मार्गारेट हिच्याजवळही त्यांनी काढले. त्या दिवशी दुपारी २–३० वाजता ती त्यांची मुलाखत घ्यावयाला आली होती. तिने त्यांना विचारले, "सव्वाशे वर्षे जगण्याची आपली इच्छा अजूनही कायम आहे का ?" तेव्हा गांधीजी उद्गारले, "जगात घडत असलेले अनर्थ पाहून माझी ती इच्छा नाहीशी होऊन गेली. मला या अंधतमात जगण्याची इच्छा नाही." (I have lost that hope because of the terrible happenings in the world. I don't want to live in darkness.)

ता. ३० जानेवारी रोजी सायंकाळी काठेवाडचे शिष्टमंडळ त्यांच्या मुलाखतीची वाट पहात असल्याचे जेव्हा मनुबेनने त्यांना सांगितले, तेव्हा प्रार्थनेसाठी जाण्याच्या घाईत असताना ते उद्गारले, "तू त्यांना असे सांग की, मी जर जिवंत राहिलो, तर आज सायंप्रार्थनेहून परत येताना त्यांनी माझ्याशी बोलावे." (Tell them that, if I remain alive, they can talk to me after the prayer on my walk.)

पण ती वेळ आलीच नाही.

आपल्याभोवती चालू असलेली भीषण यादवी आणि रक्तपात पाहून गांधीजींची जीवनेच्छा पार लुप्त होऊन गेली होती. यादवी पाहिल्यावर श्रीकृष्णाची जीवनेच्छा लोपली त्याप्रमाणे !

त्यानंतर भगवंताला एका पारध्याच्या तीराने मरण आले, महात्माजींना बंदुकीच्या गोळीने ! आत्मरक्षणाचा प्रयत्न दोघांनीही केला नाही. कारण जीवनेच्छा मुळी उरलीच नव्हती.

लौकिक दृष्टीने त्यांची हत्या झाली. आपण त्यांना हुतात्मा म्हणून या अर्थाने गौरवतो की, आपल्या ध्येयासाठी ते बळी गेले. या दोन्ही समजुती आपापल्या परीने वास्तवच आहेत. पण, जीवनेच्छा नष्ट होणे,–आणि तीही आपण इच्छामरणी आहोत असा आत्मविश्वास असलेल्या गांधीजींसारख्या महान् आत्म्याची होणे,—हाच त्यांच्या बाबतीत मृत्यु समजला पाहिजे. १९४७ च्या मार्चपासून १९४८च्या जानेवारीपर्यंत तो दहा महिन्यांचा काळ त्यांनी विलक्षण मनःस्तापात काढला! स्वातंत्र्य आले, पण ते यादवी आणि विच्छेदन घेऊन, विद्वेष आणि हिंसा यांचे थैमान घेऊन आले. स्वातंत्र्याच्या आगमनाच्या मंगल समयी ही घोर अनर्थपरिणामी निराशा आपल्या कपाळी येईल, असे त्यांना स्वप्नातही कधी वाटले नव्हते.

या भीषण दुर्घटनेमुळेच हा जगाच्या इतिहासातला अद्वितीय याजक स्वतः शेवटी यज्ञबली आणि यज्ञ होऊन गेला. गौतमबुद्धाला तर नाहीच, पण ख्रिस्ताला सुद्धा आपल्या डोळ्यांसमोर स्वतःच्या स्वप्नांचा असा चुराडा होत गेलेला पहावा लागला नाही. ख्रिस्त सुळावर गेला, तो या भावनेने आणि समाधानाने की, आपल्या या रक्ताभिषेकाने अवघ्या मानवजातीच्या पापांचे क्षालन होऊन जाईल. बुद्धाच्या चरणांवर तर त्या काळातले महाराजे आणि सम्राट नतमस्तक होऊन गेलेले होते. पण कदाचित् ही सुद्धा महात्माजींची अद्वितीयताच म्हणता येईल. बुद्ध आणि ख्रिस्त हे समाधानाने निर्वाणाला गेलेले असले, तरी त्यांचे कार्य सफल झाले, असे आज कोणीही म्हणावयाला धजणार नाही. त्यांच्याच प्रणालिकेतला हा तिसरा धर्मपुरुष ! हा महात्मा शेवटी स्वयमेव यज्ञबली आणि यज्ञ झाला, ही त्याची केवढी थोरवी ! यज्ञनारायणाने या याजकाला जणू अग्रपूजेचा मान दिला.

"ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्" ही भगवद्वाणी म्हणजेच गांधीजींचा जीवनयज्ञ !

चरखा – एक समाधियोग

—दि. ब. पंडित

जीवनाचे संगीत म्हणून जे काही म्हणतात ते महात्माजींच्या कानी सूतकताईच्या सरंजामातून गुंजत असले पाहिजे. त्यांच्या जीवनातील संगीत या सरंजामातूनच प्रकट व्हावे हेही स्वाभाविक आहे. कारण याच साधनांनी करोडो दरिद्री खेडुतांच्या हृदयाचा संवाद त्यांच्या हृदयाशी सांधला होता. या संवादातूनच त्यांना चरखा हा 'विधवेचा मित्र आणि सांत्वन होय' याची प्रचीती आली. भारतीय विधवा अश्राप, मुग्ध, व्यथित दीन व्यक्तीचे प्रतीक होय असेच आपण मानायला हवे.

महात्माजींनी या वर्गाच्या जीवनात आल्हाद उमलावा म्हणून आपल्या हाती चरखा धारण केला त्यावेळी आधुनिक अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या उद्योगाला मूर्खपणाचा एक प्रकार म्हणून बाजूला सारले. औद्योगिक क्रान्तीने युरोपात अर्थशास्त्राचा नवा विचार आणला. विपुल निर्मितीने दिपून गेलेल्या मनांनी ज्यावेळी हा विचार पत्करला त्यावेळी यात परमार्थत: काही पापविचार आहे हे त्यांच्या मनातच आले नाही. यातील उत्पादन अनेकांनी करावयाचे पण त्या उत्पादनावर स्वामित्व मात्र त्यापैकी कोणाचेच असावयाचे नाही. यात फार मोठा अन्याय आहे याचा विचारही कोणाला शिवला नाही. उत्पादक किंवा उद्योगपती म्हणून ज्यांनी मिरवायचे त्यांचे हात उत्पादनातील प्रक्रियेने कधीच विटाळायचे नाहीत आणि ज्यांचे हात काम करून तुटायची पाळी येई त्यांना उत्पादक या पदवीवर हक्क सांगता यायचा नाही यातील हास्यास्पद विसंगतीचा कोणी विचारही केला नाही. पण हेही विधान धाडसाचे होईल. या विसंगतीची वोच काही उदार हृदयांना छळत असेच. ज्यांचे श्रम त्यांचेच सृजन आणि त्यांचीच त्या सृजनाने भौतिक आणि आत्मिक तृप्ती ही परंपरा यंत्रयुगाला धिक्कारून पुन्हा स्थापायला महात्माजींना अडगळीत पडलेला चरखा शोधून काढावा लागला.

यंत्रावर जे उत्पादन होते त्यात श्रमणारा त्या निष्पत्तीचा धनी नसतो. त्या निष्पत्तीवर त्याचे नियंत्रण नसते. फक्त उत्पादनाचे एक सजीव अवजार म्हणून मजुरीच्या मोबदल्यात तो आपले हात त्या यंत्राच्या धन्याला विकून बसलेला असतो. तो उत्पादनात क्रियावान असूनही त्याच्या सृजनाच्या प्रवृत्तीचे समाधान त्याला लाभत नसते. त्याचे जीवन अतृप्त, क्रोधाविष्ट आणि म्हणून असुंदर होऊन गेलेले असते. कारण अभावितपणेच त्याच्या सृजनशील हातांना यंत्रातील एका पूर्जाची हीन प्रतिष्ठा पत्करावी लागलेली असते. तो पूर्जा सजीव आहे. पण निष्प्राण आहे. त्याचा आत्मा हरपलेला असतो.

असे व्हावयाचे कारण कदाचित् त्याच्या हातून होणाऱ्या कामाचा आणि त्याच्या सहजप्रवृत्तींचा संवाद तुटला हेही असू शकेल. माणसाची प्रकृती सृजनशीलतेने अपार नटलेली आहे. मानवी हातांचे हे भाग्य कोणाही प्राण्याच्या वाट्याला आलेले नाही. त्याच्या जिव्हाळ्याचे कोणतेही काम म्हणजे त्याच्या सृजनशीलतेचा रम्य आविष्कार. ती निर्मिती त्याच्या जिव्हाळ्याने नटलेली असते आणि म्हणूनच सुंदरही असते. यंत्रे माणसांच्या हातांना राबवून घेतात पण त्यांना सृजनशीलतेचा ओलावा लाभू देत नाहीत. माणसांचे हात ज्यावेळी यांत्रिक उत्पादनात गुंतले त्याचवेळी सृजनपूर्ण निर्मितीला मुकले गावचा कुंभार माती खणून आणण्यापासून सुघटित सुघड भाजून पक्का करीपर्यंत सगळ्या प्रक्रियांचा नियामक स्वामी असतो. उत्कृष्ट क्रॉकरीच्या कारखान्यातील कामगार फक्त कोणत्यातरी एका आंशिक प्रक्रियेमध्ये गुंतलेला असतो. त्याच्या हातून अनेक नग पारित होत असतात पण त्यापैकी

कोणत्याही नगाचे कोणते स्वरूप असावे हे ठरवायचा त्याला हक्क नाही. त्याला मजुरीची प्राप्ती भरपूर असेल पण आत्म्याची संपन्नता त्याला पारखी आहे.

कलानिर्मिती ही माणसाच्या सृजनशीलतेचे सर्वात सुंदर स्वरूप असेल पण कलानिर्मितीसाठी पूर्वानुभवांचा पाक बनून तो प्रतिभेच्या मुशीत ओतण्याची कधी दैवीशक्ती तर कधी साधनेची जोड सगळ्यांच्याचपाशी असू शकत नाही. तरीही प्रत्येकाचा अहम्, त्याचे मन, त्याची बुद्धी सर्वकाही प्रकट होण्यासाठी सतत धडपडत असतात. कामगाराला त्या प्रवृत्तीचे दमन करीत रहावे लागते. कारागिराला ती दाबावी लागत नाही. कलाकाराला ती दावणे शक्यच नसते. कलावंत आपल्या श्रमांनी थकला तरी त्याने तृप्तीचे वैभव उपभोगिलेले असते. कारागीर श्रमला तरी संतृप्त असतो, कारण त्याचा आत्मा स्वाविष्कारानंतरचा विसावा भोगीत असतो. वापडा कामगार श्रमांनी थकतो आणि अतृप्तीने खंतावतो. यंत्रयुगाने अशा खंतावलेल्या अतृप्त आत्म्यांचे अखंड उत्पादन चालविले आहे.

माणसाच्या कोणत्याही प्रवृत्तीचे किंवा तज्जन्य संवेगाचे दमन झाले तर त्यांचे अन्यथा अपनयन किंवा उन्नयत होते असे मानसशास्त्र सांगते. अशा उन्नयताचे प्रकटरूप सृजनशीलतेच्या सौन्दर्यात आकाराला येते असे म्हणतात. पण सृजनशीलतेचेच नित्य दमन होऊन ती आतल्याआत खदखदत राहिली तर तिचे उन्नयन कोणत्या रूपात प्रकट होणार ? अशा वेळी उत्पादन आणि निर्मिती यांची सांगड तुटते कारण निर्मिती कामकऱ्याच्या सौदर्याविष्काराचे माध्यम होय ही कल्पना उत्पादनाच्या अर्थशास्त्रातील मजुरीच्या विचाराला मान्य नाही. म्हणून मजूर उत्पादनात सहभागी असूनही तो निर्मितीला मुकतो. माणसाचा मजूर करून टाकणाऱ्या यंत्राने माणसाची येथे सगळ्यात मोठी हानी केलेली आहे. मानवी आत्म्याच्या आविष्काराला मजुरीत मनाई आहे. त्याच्या कामाचे मोल दामात होते पण समाधानात होत नाही. म्हणून मजूर पूर्ण मानव उरत नाही. त्यात निर्जीव पूर्जेपणा येणे अपरिहार्य आहे.

सूत कातताना पूर्ण जाण राखून काता असे महात्माजी म्हणत त्याचा हाच अर्थ असेल का ? निर्मितीच्या विविध प्रक्रियांचे आपण नियमन करून त्या निर्मितीच्या स्वामित्वाचा अधिकार ज्या हाती राहिला ते हात धन्य होत. कारण त्यांच्या मनाने त्यांच्या हाताची सतत सोबत राखलेली असते. या सोबतीत त्याचे हात गतिशील आणि कुशल होत जातात आणि मन प्रगल्भ नी संपन्न होत जाते. अगदी सरळ सांगावयाचे म्हणजे तो धनवान नाही तरी 'श्री'मान होत जातो. मनात प्रादुर्भूत होणाऱ्या दुर्निवार वाम प्रवृत्तींना सहजी बाजूला सारून मनाला निर्मितीच्या तंद्रेत गुंतवून एका समाधियोगाने पवित्र करण्याचे काम चरखा न कळत करीत असतो. मनाला निर्मितीच्या तंद्रेत गुंतवून ठेवण्याचे सगळ्यात सोपे साधन म्हणजे सूतकताई.

सगळ्याच अंगांनी विपन्नतेने गांजलेल्या दरिद्रनारायणाच्या आत्म्याला सृजनशील निर्मितीची कवाडे मोकळी करून क्रीडा करायला ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणे वाव देणाऱ्या चरख्याचे पुनरुज्जीवन करणाऱ्या गांधींना याच एका कारणास्तव महात्मा म्हटले असते तरी चालले असते. एकदा चरखा आला की सोबत त्याचे सहचारी भाव येणारच असे विनोबा म्हणतात.

संघर्ष-निर्मूलन आणि सत्याग्रह

—एन्. जी. एस्. किनी

या लेखातून सत्याग्रहाच्या तंत्राचे शास्त्रीय दृष्टिकोणातून मी विश्लेषण करणार आहे. अशा विश्लेषणाकरता सध्याची परिस्थिती विशेष अनुकूल आहे, असे मला वाटते. याला कारणे दोन. एक कारण असे की, आजपर्यंत जी जी सत्याग्रह-आंदोलने झाली, त्या वेगवेगळ्या सत्याग्रहांचे सम्यक्‌दर्शन घडविणारे अभ्यास-ग्रंथ आता मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले आहेत. आणि दुसरे असे की, स्वतंत्र भारतात नव्याने जी सत्याग्रह-आंदोलने होत आहेत त्यात सत्याग्रहाच्या तंत्रातच अनेक बदल होत चालल्याचे दिसून येत आहे.

सत्याग्रहाच्या तंत्राचा द्रष्टा ऋषी गांधी होता. संघर्ष मिटवण्याकरता सत्याग्रहाच्या नवनव्या रूपांचा विकास करणे, आणि प्रत्यक्षात या नव्या तंत्राचा वापर करणे, या दोन गोष्टींचे श्रेय गांधींकडे जाते, याबद्दल दुमत नाही. गांधींनी ज्या सत्याग्रहाचा पुरस्कार केला तो सत्याग्रह, एका दृष्टीने कर्मयोगाचाच एक दुसरा तेजस्वी आविष्कार मानायला हरकत नाही. पण, कर्मयोगाचा एक तेजस्वी आविष्कार म्हणूनच केवळ नव्हे, तर सामाजिक आणि राजकीय परिवर्तनांचा एक क्रांतिकारी मार्ग म्हणूनही या सत्याग्रहाचे विशेष महत्त्व आहे. परिवर्तने केव्हा घडून येतात ? प्रचलित संस्था किंवा आंगवळणी पडलेल्या चाली-रीती यात बदल घडवन आणण्याची गरज निर्माण होते, त्या वेळी. किंवा, जीवनामध्ये होणाऱ्या परिवर्तनांची जुन्या संस्था आणि चालीरीती दखल घेण्यांचे नाकारतात, तेव्हा. समाजाच्या विशिष्ठ अंगांना या सामाजिक स्थित्यंतराची जाणीव झालेली असते. त्या दिशेने पुढे जाण्यासाठी ते धडपडत असतात, आणि या पुरोगामी धोरणाशी जुन्याला कवटाळून बसणारे सहमत होत नाहीत. अशा वेळी संघर्षाला प्रारंभ होतो. आणि संघर्ष सुरू झाला म्हणजे तो मिटविण्यासाठी सत्याग्रहाची उपाय-योजना पुढे येते. संघर्ष मिटविण्याचे सत्याग्रहाचे तंत्र कोणते ? संघर्षातील प्रतिस्पर्ध्यांमधला परस्पर-विरोध नाहीसा करून त्या जागी सौहार्दाची भावना निर्माण करणे. अशा या सत्याग्रहाचा सिद्धांत आणि त्याचा वापर यांची मीमांसा करून, गांधींच्या शंभराव्या जन्मदिवशी माझी आदरांजली मी त्यांना अर्पण करीत आहे.

२

इ. स. १८९० पासून स्वातंत्र्य-प्राप्तीच्या काळापर्यंत गांधींनी सत्याग्रहाचे जे जे प्रयोग केले, आणि स्वातंत्र्योत्तर काळात गांधींचे अनुयायी म्हणविणाऱ्यांनी ज्या पद्धतीच्या सत्याग्रहाचे अवलंबन केले, त्या सगळ्या सत्याग्रहांचे स्वरूप अत्यंत गुंतागुंतीचे झालेले आहे. सत्याग्रहाची ही निरनिराळी रूपे आणि त्यांचे तंत्र समजून घेण्याच्या दृष्टीने सत्याग्रहाचे वर्गीकरण करणे सोयीचे होणार आहे. त्या दृष्टीने सत्याग्रहाच्या तंत्राचे तीन वर्ग पाडता येतील.

(१) सत्याग्रह—योगाचा एक तेजस्वी आविष्कार म्हणून,

(२) सत्याग्रह—संघर्ष मिटविण्यासाठी टाकलेला एक अहिंसाचारी पवित्रा म्हणून,

(३) सत्याग्रह—अडवणुकीच्या मार्गांचा (Blajckmail) अवलंब म्हणून वरील वर्गीकरणात पुढे दिलेल्या गोष्टी आधारभूत मानल्या आहेत. एक, सत्याग्रहाला उद्युक्त करणारी प्रेरणा, दुसरे, सत्याग्रहाच्या बाबतीत धारण केलेला दृष्टिकोण, तिसरे, सत्याग्रहाला आरंभ करणाऱ्या नेत्यांची वागणूक, आणि चवथे, सत्याग्रहांतून निष्पन्न झालेले फलित.

योगाचा एक तेजस्वी आविष्कार म्हणून सत्याग्रहाचा वापर फक्त गांधींनी आणि त्यांच्याबद्दल नित्तांत श्रद्धा बाळगणाऱ्या त्यांच्या काही मोजक्या अनुयायांनीच केला. गांधी जिवंत असतानाच त्यांच्या मार्गदर्शनाखाली ज्या दुसऱ्या काही लोकांनी सत्याग्रह केला त्यांचा तो सत्याग्रह दुसऱ्या वर्गात मोडणारा होता. डावपेचाच्या दृष्टीने हा दुसऱ्या प्रकारात मोडणारा सत्याग्रह त्यांना अधिक श्रेष्ठ वाटला. कारण, हिंसाचारापेक्षा हा डावपेचाचा मार्ग अधिक उपयोगी, असे त्यांना वाटले. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरच्या काळात भारतात सत्याग्रहाचा उपयोग विशिष्ट गटांच्या किंवा व्यक्तिगत स्वरूपाच्या हेतुपूर्तीसाठी केला जात आहे. अशा आंदोलनाचा प्रारंभ जरी सत्याग्रहाने होत असला तरी त्याचा शेवट सामुदायिक हिंसाचार आणि अराजकतेत व्हावा हीच त्याच्या पाठीमागील भूमिका असते.

३

सत्याग्रह हा योगाचाच एक आविष्कार आहे असे मी म्हटले, त्याचे कारण काय? उत्तर असे. योग कशाला म्हणतात? अनन्य–निरपेक्ष अशा तत्त्वांशी व्यक्तिसापेक्ष तत्त्वाची एकसंघ सांगड घालण्याची जी प्रक्रिया, जे तंत्र, त्याला 'योग' असे म्हणतात. गांधींच्या दृष्टीने सत्याग्रह हे असेच एक तंत्र होते. प्राप्त परिस्थितीत जे व्यक्तिगत स्वरूपाचे सत्य त्यांना प्रतीत होई, त्या सत्याची अहिंसेच्या सर्व निरपेक्ष अशा तत्त्वांशी सांगड घालण्याचे तंत्र म्हणजे सत्याग्रह, असे त्यांना वाटत होते. ही सांगड घालण्याचे कार्य फक्त जो जीवनमुक्त आहे तोच करू शकतो. कारण, सर्वाभूती एकच आत्मतत्त्व वसत असल्याची प्रचीती त्याचे ठायी उदित झालेली असते, आणि ती तशी उदित होताच सर्वनिरपेक्ष अशा अहिंसेचे त्याला आकलन होते. संघर्षातल्या प्रतिस्पर्ध्यांना जे सत्य अभिप्रेत असते ते सापेक्ष (relative) असते. आणि म्हणून त्या सत्याची व्याख्या प्रत्येक व्यक्तीनुसार निरनिराळी होऊ शकते. अशा परिस्थितीत संघर्ष मिटविण्याचा गांधींना एकच मार्ग दिसला. तो म्हणजे सर्वनिरपेक्ष अहिंसेचा उपयोग करणे. या सर्वनिरपेक्ष अहिंसेच्या योगाने प्रतिस्पर्ध्यांना सर्वाभूती नांदणाऱ्या एकात्मतेची जाणीव होते आणि अंतराय नष्ट होतो. सर्वाभूती एकच आत्मा वसत असल्याची जाणीव होणे म्हणजेच आत्मप्रचीती, यालाच 'योग' म्हणतात. व्यक्तिसापेक्ष सत्य कोणतेही का असेना? विशिष्ट परिस्थितीतील संघर्ष, कोणत्याही कारणास्तव निर्माण झालेला का असेना? आफ्रिकेत भारतीयांचे रजिस्ट्रेशन करण्याच्या कारणावरून तो उद्भवला असला काय, अहमदाबादेच्या गिरणीमजूरांवर झालेल्या अन्यायामधून तो उद्भवला असला काय, किंवा भारतीयांच्या स्वराज्याचा प्रश्नावरून निर्माण झालेला असला काय, संघर्ष मिटवून मेळ साधण्याचे तत्त्व एकच. ते म्हणजे अहिंसा, आणि शेवटी फलश्रुतीही एकच, दोघांचे संमीलन, मैत्री! विरोधी पक्षांमध्ये कडवटपणा कुठे नावालाही उरणार नाही–नये अशी मैत्री!

कर्मयोगाचा अवलंब करीत असल्यामुळे गांधींनी साधनांवर भर दिला आहे. साधन ही एकच गोष्ट अशी आहे की, जिच्यावर आणि जिच्या निवडीवर माणसाचा तावा चालू शकतो. म्हणून गांधींनी साधनांच्या शुचितेवर भर दिला. कर्म–फलाच्या आसक्तीचा त्याग केल्यानंतर मग रागा–लोभाला आणि द्वेष–तिरस्काराला वावच उरत नाही, असे त्यांचे मत होते–कर्मयोग एवढेच सांगतो की, फलाची आसक्ती सोडून कर्म करा, मग ते कर्म हिंसात्मक का असेना? भगवान कृष्णाने अर्जुनाला युद्धास म्हणजे हिंसाचारासच प्रवृत्त केले ना? म्हणजे, सर्वनिरपेक्ष शुद्ध अहिंसा ही कर्मफलाच्या आसक्तीच्या त्यागाच्या परिणामातून निर्माण होते असे काही नाही. गांधींनी मात्र या दोहोंत कार्य–कारण–परंपरेचा भाव आहे, असे मानले होते आणि म्हणूनच, योगाचा एक नवीन तेजस्वी आविष्कार उदयाला आला. गीतेचा योग आणि गांधींचा योग, दोन्हीही कर्म–योगच. कारण गांधींनीही कर्मावरच भर दिला. परंतु गीतेतील कर्मयोगातून हिंसा वगळली नव्हती, आणि गांधींच्या कर्मयोगाला फक्त अहिंसा तेवढीच अभिप्रेत होती. म्हणूनच, गांधींजी कर्मयोगाचा एक नवा तेजस्वी आविष्कार आहे, असे मी म्हणतो.

–४–

सत्याग्रह म्हणजे सत्याचा धरलेला आग्रह–अन्याय नाहीसा करून त्या ठिकाणी न्यायाची स्थापना झाली पाहिजे, हा आग्रह. अन्यायाचा प्रतिकार करायचा, तो अहिंसेच्या मार्गाने. आणि अहिंसा वापरायची,

ह्याचा अर्थ आत्मक्लेश भोगण्याची तयारी ठेवायची. आत्मक्लेशाला 'तपस्या' असे नाव आहे. ही आत्मक्लेशाची तपस्या सात्त्विक प्रवृत्तीची आहे. त्यामुळे, प्रतिस्पर्धी पक्षांनी एकमेकांविरुद्ध धारण केलेली उठावाची मनोभूमिकाच नाहीशी होते. परिणाम असा होतो की, सत्याग्रह करणारा आणि सत्याग्रहाचा विरोध करणारा, हे दोघेही, संघर्षाचा विषय बनलेल्या वस्तुस्थितीकडे एकाच दृष्टीने, म्हणजे समदृष्टीने पाहू शकतात. निव्वळ आत्मक्लेश हे एक निष्पक्षस्वरूपाचे तत्त्व आहे. विनाशक कार्यासाठीही त्याचा उपयोग होऊ शकतो, हा त्यातील धोका आहे. हा धोका टाळावा म्हणून आत्मक्लेशाच्या दोन्ही बाजूंना विधायक कार्यक्रम आणि अहिंसा यांचे कुंपण घातले आहे. जो जीवन्मुक्त आहे, त्यालाच फक्त खरी अहिंसा आचरता येते, ही गोष्ट आपण विसरता कामा नये. कारण, अशा जीवन्मुक्ताच्या ठायी 'सत्य' आणि 'ऋत' एकरूप झालेले असतात. सत्य म्हणजे, एखादी गोष्ट खरी किंवा न्याय्य असल्याची मनोमन खात्री आणि ऋत म्हणजे बाह्य वस्तुस्थिती (objective reality). विधायक कार्यक्रमाची व्याख्या अशी,–प्रचलित व्यवस्थेत फेरबदल घडवून आणण्याचा, किंवा ती प्रचलित व्यवस्था अन्यायपूर्ण असल्यामुळे तिला आमूलाग्र नवे रूप देण्याच्या उद्देशाने तयार केलेला कार्यक्रम. 'विधायक' हा शब्द अर्थसापेक्ष आहे. परिस्थितीप्रमाणे, वेळप्रसंगाप्रमाणे, स्थल–कालाप्रमाणे तो बदलू शकतो. प्रचलित अन्याय नष्ट करायचा ही विधायक कार्यक्रमाची एक बाजू तर झाली; परंतु दुसरी कोणती न्यायपूर्ण व्यवस्था त्या जागी आणून बसवायची, हा विधायक कार्यक्रमासमोर खरा प्रश्न आहे.

–५–

धार्मिकतेचा भाग असलेला योगाचे एक स्वरूप असलेला म्हणून म्हणा, अथवा धर्मातीत अशा भौतिक स्वरूपाच्या लढ्याचे स्वरूप म्हणून म्हणा, सत्याग्रह हा अहिंसक मार्गाने केलेला प्रतिकार आहे हे स्पष्ट आहे. प्रतिस्पर्ध्यांनी एका सामाजिक कराराद्वारे परस्परात देवाण–घेवाण घडवून आणण्याचा तो एक प्रभावी मार्ग आहे ह्यात संशय नाही. विपक्षी हा आपल्यापेक्षा कोणीतरी निराळा आहे, दुसरा आहे, असे येथे मानले जात नाही. विरोधकाचा नायनाट करावा किंवा समाजातून त्याचे उच्चाटण करावे असे तर मुळीच मानले जात नाही. उलट, सत्याग्रही आणि त्याचा विरोधक हे दोघेही एकाच समाज व्यवस्थेचे घटक आहेत असे येथे गृहीत धरले जाते.* सहकार्याचे हे एक नवीन तंत्र आहे. त्यायोगे झगडणाऱ्या व्यक्तींना व समुदायांना एकत्र आणले जाते. एका विशाल मानवी समाजाचे घटक म्हणून. आपापसातील बंधुभाव वाढावा ह्याकरिता त्यांना वाव दिला जातो. हा बंधुभाव, हे सौहार्द्र निर्माण करणारी प्रक्रिया थोडक्यात अशी सांगता येईल. संघर्ष म्हटला की, दोन पक्ष आलेच. त्यातला कोणतातरी एक पक्ष लढ्याचे पहिले पाऊल उचलणार. हे पहिले पाऊल उचलायचे, म्हणजे आत्मक्लेश भोगावे लागणारच. ह्या आत्मक्लेशाच्या द्वारे प्रतिस्पर्ध्याचे हृदय–परिवर्तन घडवून आणायचे, आणि हृदय–परिवर्तनातून सह–भावना आणि परिणामी सहजीव हे निर्माण व्हायचे—तात्पर्य, आत्मक्लेश म्हणजे नव्या समाजाच्या निर्मितीसाठी केलेला यज्ञ.

बंधुभावाने प्रेरित झालेल्या नव्या समाजाचा जन्म हिंसेतून होणे अशक्य आहे. आणि यदाकदाचित् तो झालाही तरी, निव्वळ हिंसेच्या द्वारा त्याला टिकवून धरणे शक्य नाही. एका नव्या समाजाच्या रचनेकरिता साम्यवाद्यांनी हिंसात्मक क्रांती केली, ह्या हिंसात्मक क्रांतीच्या पायावर नव्या शांतीपूर्ण समाजाची उभारणी त्यांना करावयाची होती. परंतु प्रत्यक्षात तसे झाले नाही. त्यांचा शांतता पूर्ण समाजाचा दावा एक आत्म–वंचना ठरली.

६

सत्याग्रहाच्या बऱ्याच वैशिष्टयपूर्ण घटनांचे अध्ययन केल्यानंतर बंदोपाध्याय यांनी नुकतेच असे आग्रहपूर्वक प्रतिपादन केले आहे की, जेथे उद्दिष्टे मर्यादित स्वरूपांची आहेत अशी सत्याग्रहाची काही उदाहरणे वगळली तर एरव्ही विरोध मिटविण्यात सत्याग्रह खरोखरी कितपत यशस्वी होऊ शकतो ह्याबद्दल दाट संशय वाटतो. ज्या ठिकाणी खोलवर रुजलेले इतिहासाचे, आर्थिक स्वरूपाचे किंवा धर्मासंबंधीचे

---

* Kennelt and boulding:–" Conflict and Defenee, – A " General Theory ", Harper and row; New york, 1962.

प्रश्न गुंतलेले असतील किंवा जेथे निष्ठुर झोटिंगशाहीचा अंमल असेल, अशा ठिकाणी सत्याग्रह यशस्वी होण्याचा संभव कमीच.*

खोलवर मूळ धरून बसलेल्या ऐतिहासिक, वांशिक, धार्मिक आणि आर्थिक स्वरूपाच्या विरोधाला तोंड देण्याचा प्रसंग आला तर प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा होऊन बसणार, ह्यात शंकाच नाही. पण तसे पाहिले तर, अहेतुकपणे मूळ धरून बसलेल्या पूर्वग्रहांना आणि विचार–प्रवृत्तींनाच खरोखरी परंपरागत संस्था चिकटून बसलेल्या दिसून येतात. म्हणून अशा संस्थांना विरोध करायचा तर, त्यांच्या विरुद्ध उभ्या ठाकलेल्या प्रतिस्पर्धी सत्याला केव्हा ना केव्हा ठसठशीतपणे प्रतिकाराचे पाऊल उचलावे लागणारच. परंतु त्या बरोबरच हेही ध्यानात ठेवायला पाहिजे की, अशा एकट्या–दुकट्या सत्याग्रहाने अशा अवस्थेत नवा समाज निर्माण होत नसतो. अन्यायाच्या दुःखावर फुंकर घालण्याचे काम फार तर एकटा–दुकटा सत्याग्रह करू शकेल. म्हणून, काही विशिष्ट व्यक्तींनी सुरू केलेली मोहीम ह्या दृष्टीने सत्याग्रहाकडे न पाहता, ती एक सतत चालू असणारी कार्य–प्रक्रिया आहे; अशा दृष्टीने जर आपण सत्याग्रहाकडे पाहिले, तसेच बराच काळ लोटल्यानंतर घडून आलेल्या त्या सत्याग्रह प्रक्रियेच्या परिणामाकडे लक्ष दिले तर, खोलवर रुजलेल्या ऐतिहासिकादिक कारणांचे उन्मूलन करण्याचे सामर्थ्य सुद्धा सत्याग्रहाच्या या सतत चालू असणाऱ्या प्रक्रियेच्या ठायी आहे, हे आपल्याला दिसून येईल. इ. स. १९१६ पासून तो स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळापर्यंत गांधींनी वेळोवेळी निरनिराळ्या अनेक चळवळी उभारल्या. ह्यापैकी प्रत्येक चळवळ ही न्याय मिळविण्याकरिता केलेला एक स्वतंत्र प्रयत्न होता असे आपण मानता कामा नये. स्वातंत्र्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या आणि सतत कार्यान्वित असलेल्या एका लांबलचक प्रक्रियेत ह्या चळवळी म्हणजे लहान लहान टप्पे होते असा दृष्टिकोन आपण ह्या बाबतीत स्वीकारला पाहिजे. तसा विचार केला म्हणजे सत्याग्रहाच्या माळेमधील ह्या निरनिराळ्या आंदोलनांचे मणी आपापल्या जागी कसे चपखल बसताहेत ते आपल्याला दिसून येते.

ह्या स्वातंत्र्याचे उद्दिष्ट साधण्यासाठी हवी होती राष्ट्रीय जागृती, राष्ट्रीय संघटना, आणि सर्व–साधारण जनतेला लढा देण्यासाठी सुसज्जता. त्यासाठी खादी, बहिष्कार वगैरे सारखी आंदोलने बाह्यदृष्टीने विलग आणि विभिन्न स्वरूपाची वाटली तरी ती एकाच कार्यक्रमात लहान लहान अविभाज्य घटक होते. ह्या सर्वसंग्राहक स्वरूपाच्या, स्वातंत्र्याच्या, उद्देशाच्या दृष्टीने गांधींची जी कार्यपद्धती यशस्वी ठरली, पण विलगपणे एका–एका चळवळीचा जर आपण विचार केला तर त्यांच्यापैकी अनेक अयशस्वीच ठरल्या. ह्यावरून सिद्ध होते ते हेच की, जेथे सामाजिक संघर्षात फार खोलवर रुजलेल्या कारणांचा गुंता झालेला असतो, त्या ठिकाणी एकट्या–दुकट्या उठावणीने प्रश्न सुटत नाही, तर त्यासाठी लांबलचक स्वरूपाच्या लढ्याच्या पद्धतीचा अवलंब करावा लागतो. तेव्हाच यश हाती पडते.

पण, बंधु–भावाने प्रेरित झालेल्या समाजाच्या उभारणीचा प्रश्न जेव्हा आपण विचारात घेतो त्यावेळी सुरू केलेल्या उठावणीत यश पदरी पडले किंवा नाही हा निर्णयाचा योग्य निकष म्हणता येणार नाही. अहिंसेच्या परिणामकारकतेचा खरा निकष आहे कटुतेचा, प्राणहानीचा आणि आतंककारी उत्पातांचा जास्तीत जास्त अभाव.

७

योगाची एक पद्धती म्हणून आपण सत्याग्रहाचा विचार केला. त्याकडे पाहण्याची एक दुसरी दृष्टी आहे. संघर्षाच्या अवस्थेत, अहिंसात्मक पद्धतीने घेतलेला एक पवित्रा आणि विरोधकांवर टाकलेला डाव म्हणूनही त्याच्याकडे पाहता येईल. ह्या प्रकारच्या सत्याग्रहात धार्मिकतेचा अंश गृहीत धरलेला नसतो. त्याची प्रकृतीच धर्मनिरपेक्षतेची असते. ह्या ठिकाणी सत्याग्रहाचा उपयोग केला जातो तो जाणून–बुजून टाकलेला युद्धातला एक डाव म्हणून. वायव्य–प्रांतात खुदाई खिदमदगारांनी उपयोगात आणलेली अहिंसा, १९२१ मध्ये काठगढ येथे S. E. Stokes ने बिगारीचे उन्मूलन व्हावे म्हणून केलेल्या चळवळीतली अहिंसा, १९५५ मध्ये अमेरिकेत मॉंटगोमरी येथे नीग्रो लोकांनी केलेला सत्याग्रह इत्यादी घटना लक्षात घेतल्या म्हणजे जी एक गोष्ट आपल्या ध्यानात येते ती ही की, सत्या-

---

* J. Bandopadhyaya : Social and Political thoughts of Gandhi : Allied Publishers, Bombay, 1969.

ग्रहातून धार्मिकतेचा आधार निराळा केला जाऊ शकतो आणि युद्धातला पवित्रा म्हणून भौतिक क्षेत्रात त्याचे तंत्र वापरले जाऊ शकते. एका अर्थाने, यशापयशाची कारणे हुडकून काढण्याच्या उद्देशाने पहायचे झाल्यास, गांधींनी केलेले सारे उठाव ह्याच वर्गात मोडणाऱ्या सत्याग्रहाची उदाहरणे आहेत, असे आपल्याला म्हणता येईल.

या संदर्भात नुकताच, १९६६ मध्ये Simon Pantev–Brick या लेखकाने एक सिद्धांत मांडला आहे.*—Effectiveness in the function of organized force and action supported by numbers."—"संख्येचा आधार असलेली, सुसंघटित शक्तीची आणि कृतीची परिणामकारकता." सत्याग्रहाची काही विवक्षित उदाहरणे घेऊन त्यांचे विश्लेषण केल्यानंतर त्याने हा सिद्धांत मांडला आहे. रजिस्ट्रेशन अॅक्ट (१९०६–१९१३), सिअल जजमेंट (१९१३), चंपारण्य (१९१६–१९१७), खेडा (१९१६), अहमदावादेतील गिरणी–कामगार (१९१८), कोटगढ (१९२१), व्हायकॉम (१९२४), बार्डोली (१९२८), मिठाचा सत्याग्रह (१९३०), मांटगोमरी (U. S. A. १९५५), या सर्व प्रसंगात सुसंघटित शक्ती, संख्या, कृती, योग्य वेळी उचलली गेलेली पाउले आणि परिणामकारकता या गोष्टी विद्यमान होत्या, आणि त्या सर्व चळवळी यशस्वी झाल्या. १९१९ ची राउलेट अॅक्टसंबंधीची उठावणी तग धरू शकली नाही, कारण त्या प्रसंगी संघटनेची आणि अहिंसात्मक शक्तीची उणीव पडली. आणि म्हणून १८–४–१९१९ रोजी ती उठावणी तहकूब करावी लागली. १९२०–१९२२ ची असहकाराची चळवळ बारगळली, कारण प्रत्यक्ष क्रियाशीलतेच्या दिशेने पाऊल उचलले गेले नाही, म्हणून. १९३२–१९३४ ची सविनय कायदेभंगाची चळवळ अयशस्वी ठरली. याचे एक कारण दडपशाही हे होते. दुसरे कारण असे, आपले डाव–पेच कसे टाकावे याचा विचार करायलाही नेत्यांना वेळ मिळाला नाही, कारण ते सगळे तुरुंगात बंद केले गेले. १९४२ च्या "भारत छोडो" चळवळीला तर वरीच हानी सोसावी लागली, कारण चळवळ सुरू होण्याआधीच नेत्यांची उचलबांगडी झाली. चढाईच्या धोरणाच्या अभावी ही चळवळ परिणामकारक होऊ शकली नाही.

ह्या उदाहरणावरून जी गोष्ट सिद्ध होते ती ही की, प्रतिपक्षावर मात करता यावी म्हणून वापरल्या जाणाऱ्या सत्याग्रहाच्या डावाची अंतिम परिणामकारकता बराच इतर गोष्टींवर अवलंबून असते. अशा प्रसंगी अहिंसात्मक हल्ला चढविण्यात येतो तो प्रतिपक्षाची शारीरिक दृष्ट्या खच्ची करण्यासाठी नसून त्याचे नीतिधैर्य नमोहरम करण्याच्या उद्देशाने असतो. आत्म–क्लेष सोसले जातात ते त्या प्रसंगाला नाटकी पद्धतीने ठसठशीतपणे उठाव देण्यासाठी आणि विवाद्य विषयासंबंधी लोकमत जागृत करण्यासाठी, आणि त्याला विशिष्ट रूप देण्यासाठी. लोकमत जागृत झाले तर दडपशाही करण्यात अडथळे उत्पन्न होतात. अहिंसात्मक प्रतिकाराचा उपयोग करणाराचे उद्दिष्ट सीमित असायला पाहिजे. हाती घेतलेला प्रश्न अगदी तातडीने सोडविणे अगत्याचे असलेला आणि ज्याचा परिणाम अनेकांवर होणार आहे असा असावा. संख्या–बाहुल्य आणि संघटन यांची त्याला गरज असते. लढा सुरू करणाऱ्याने पहिले पाऊल उचलण्याची आपली संधी कधी गमावता कामा नये, नाहीतर तो गाफील असताना अचानक कोंडीत पकडला जाणे शक्य असते. अशी परिस्थिती असली तर सत्याग्रह यशस्वी होतो. पण त्यासाठी दोन्ही पक्षांची संस्कृती एक असली पाहिजे आणि प्रतिपक्ष्याच्या उदात्त वृत्तींना आवाहन करण्याची शक्यता असली पाहिजे.

नात्सी हुकुमशाहीखाली आलेल्या नार्वे देशाच्या उदाहरणावरून दुसरी एक गोष्ट पुढे येते ती ही की, जेथे लोकमत सर्वप्रकारे दडपलेले असते तेथे सत्याग्रहाच्या संगठन–पद्धतीत थोडा फेरबदल करणे आवश्यक आहे. लोकमताला जेथे वाव नाही त्या ठिकाणी वंदत्या आणि ऐकीव बातम्या पसरवल्या जाऊ शकतात. हुकुमशाहीखाली आलेल्या देशांनी जर वदंत्या आणि बातम्या पसरविण्याच्या क्रियेचा आधार घेतला तर शेवटी यश त्यांच्या पदरी न पडण्याचे कारण नाही. देशात लोकमताला जेथे काम करता येणे अशक्य करून टाकण्यात येते, तेथे मग देशाबाहेरच्या लोकमताचा उपयोग करून घेणे आवश्यक ठरते.

* Simonc Pantev–Brick :— Gandhi against Machiavellianism", Asia Publishing House, Bombay, 1966.

-८-

एखाद्या विशिष्ट गटाच्या किंवा व्यक्तिगत स्वरूपाच्या उद्देश्यपूर्तीसाठी अडवणुकीचे धोरण स्वीकारून सत्याग्रहाचा अवलंब करण्याची उदाहरणे भारतात स्वातंत्र्योत्तर काळात कितीतरी दिसून आली आहेत. (१) वैयक्तिक हितसंबंधाचा ज्यात पूर्ण अभाव आहे आणि (२) विधायक कार्यक्रमाचा अंगीकार करणे ह्या दोन गोष्टींवर जो गांधींनी भर दिलेला आहे त्या दोन गोष्टींना अशा सत्याग्रहात अजिवात फाटा दिला जातो आहे. गांधींना अभिप्रेत नसलेल्या पद्धतीच्या सत्याग्रहांचे पेवच फुटल्यासारखे झाले आहे. जेथे अडवणूक म्हणून सत्याग्रहाचा वापर केला जातो, जेथे शेवटी सामूहिक हिंसाचार उत्पन्न होतोच. खरं म्हणजे हिंसाचाराचे साधन म्हणूनच त्यांची योजना केलेली असते. असा हिंसाचार सुरू झाला की, सत्ताधिकाऱ्यांना सामोपचाराची बोलणी करायला पुढे यावेच लागेल, हा त्यांच्या मागचा डाव असतो. ह्या स्वरूपाचे सत्याग्रह इतके सर्वपरिचित आहेत की, त्यांची चर्चा आपण ह्या ठिकाणी करण्याचे प्रयोजनच नाही.

ह्या ठिकाणी मला एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते ती ही की, सत्य आणि ऋत ह्या उभयतांचे एकीकरण केवळ जीवन-मुक्ताच्याच बाबतीत शक्य आहे. अशा या एकीकरणाच्या भूमिकेवरून पुढे सत्याग्रहाचा मार्ग आचरणे केवळ त्यालाच शक्य आहे, कारण स्वतःच्या व्यक्तिगत स्वरूपाच्या किंवा विशिष्ट गटाच्या हितसंबंधाचा विचार लेशमात्रही त्याच्या ठायी उरलेला नसतो. वर उल्लेख केलेल्या आडमुठ्या धोरणाचा अवलंब करणाऱ्या सत्याग्रहींच्या बाबतीत, त्यांची न्याय आणि सत्याबद्दलची मनोमय कल्पना त्यांच्याशी संबंधित असलेल्या अधिक विशाल समाजाच्या हिताचे संवर्धन कितपत करू शकेल हा मोठाच प्रश्न आहे. ऋतांशी एकरूप बनलेले सत्यच खरे, बोल्डिंगने हेच म्हटले आहे. "The modern world is so complex that the truth about it can not be perecived by commonsense or by mystical insignt, important as these things are. We must have more delicate and quantitative sampling and processing of information provided by methods of social science if we are really to test the truth of our images of social and political systems."*

ह्यावरून सिद्ध होते ते हेच की, सत्याग्रही जर जीवन्मुक्त नसेल तर त्याला, स्वतःची प्रतिमा किंवा आपल्या न्यायान्यायाच्या कल्पना दुसऱ्यांवर लादण्याचा अधिकार नाही; सामाजिक शास्त्रांच्या जटिल प्रक्रियांमधून तावूनसुलाखून निघालेल्या या प्रतिमा असतील, तर मात्र गोष्ट वेगळी !

---

* Kenneth E. Boulding:-- "Why did Gandhi Fail ?" Gandhi Marg, October 1964.

पं. नेहरूंच्या शब्दात महात्मा गांधी

या पुरुषांत अद्‌भुत पुरूषार्क होता. आत्मविश्वास ओतप्रोत भरलेला होता व त्यांच्यात असामान्य प्रतीची शक्ती साठलेली होती व्यक्तिमात्राची समानता व स्वतंत्रता यांचा कैवार ते घेत. मात्र हे सर्व ते गरिबांतील गरीब लोकांच्या दृष्टीनेच पाहत. अशा पुरुषाने हिंदी जनतेला लुब्ध केले व लोहचुंबकाप्रमाणे आकर्षित केले यात आश्चर्य नाही. भूतकाळ व भविष्यकाळ यांना सांधणारा दुवा, असे ते बहुजनसमाजाला वाटत, आणि भयाण वर्तमानकाळ हा चैतन्यपूर्ण व आशापूर्ण अशा भविष्यकाळात प्रवेश करण्याचे द्वार आहे, असे त्यांना गांधीजीमुळे भासे.

'फ्रीडम फॉम फिअर'— पं. जवाहरलाल नेहरू

गांधी विचारप्रणाली आणि भारतीय राजकारण

—रघुनाथ विष्णुपंत रानडे

१९१८ ते १९४८ ह्या कालखंडात भारतीय राजकारणाचे वैचारिक आणि संघटनात्मक नेतृत्व महात्मा गांधींकडे होते. राजकारणाचा आशय आणि दिशा याचे निर्धारण त्यांनी केले. असे वारंवार बोलले आणि लिहिले जाते आहे. गांधी जन्म शताब्दीच्या ह्या वर्षांत तर विचारवंतामधे महात्मा गांधींच्या भारतीय जीवनावरील प्रभावाचे वृद्दीकरण करण्यात चढाओढ चालू झालेली दिसते. कृतज्ञता प्रगट करताना अतिशयोक्ती टाळता येत नाही, हे खरे असले तरी स्वतंत्र भारतीय जीवनाच्या पुनर्रचनेच्या संदर्भात गांधीवादाचे उदात्तीकरण ही प्रक्रिया सांप्रतच्या समाज परिवर्तनाच्या दृष्टीने अनिष्ट आहे. गांधी मार्गाने स्वातंत्र्य मिळाले, त्याच मार्गाने स्वतंत्र भारताचे सर्व प्रश्न सुटतील ह्या गांधीवाद्यांचा आग्रह आणि आमचे राजकारण गांधीवादी आहे असा सत्ताधाऱ्यांचा दावा ह्या दोन्ही गोष्टी माझ्या मते बरोबर नाहीत. गेल्या २२ वर्षातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक फलिताच्या नैराश्याने भांबावलेले भारतीय मन त्यामुळे अधिकच वैफल्याने ग्रासले जाईल. असे होऊ नये म्हणून गांधीविचारप्रणालीचे यथार्थ मूल्यांकन होणे आवश्यक आहे. या लेखात असा अल्प प्रयत्न केला आहे.

समाजजीवनात तत्वप्रणाली (ideology) आवश्यक बाब असते. या तत्वप्रणालीत चार गोष्टींचा समावेश होतो. (१) समाज रचनेसंबंधीच्या कल्पना, (२) रचना विकाससंबंधीच्या ऐतिहासिक प्रक्रियांबाबत कल्पना, (३) समाजजीवनातील मूल्यांकित घटना आणि (४) समाज जीवनातली मूल्ये आणि उद्दिष्टे. या चार गोष्टींनी युक्त असलेली तत्वप्रणाली व्यक्तींना, समाजजीवनाच्या भूतकालीन, वर्तमान आणि भविष्यातील अस्तित्वाच्या अनुषंगाने क्रियाशील करीत असते. समाज जीवनातली क्रियाशीलता विचारात घेत असताना तेथील तत्वप्रणालीची दखल न घेता केली गेलेली मीमांसा चुकीची ठरते. भारतीय जीवनातील १९१८ ते १९४८ या कालखंडातील राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासामधील घटनांचा अर्थ महात्मा गांधींच्या विचारप्रणालीच्या संदर्भात लावण्याचा प्रयत्न कितपत यशस्वी ठरतो ?

गांधी विचार प्रणालीमधे सामाजिक जीवनासाठी श्रेयस्कर मानलेल्या कल्पनांमधे पाच महत्वाच्या आहेत. (१) सत्याग्रह, (२) अहिंसा, (३) साधन शुचिता, (४) आर्थिक संबंधातील विश्वस्तवाद, आणि (५) राजकीय सत्तेचे अहिंसक स्वरूप. भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी झालेल्या भारतीय समाजाने ह्या पाच गोष्टींना आपल्या अस्तित्वाचा भाग मानला होता काय ? ह्याचे उत्तर १९१९ पासून १९४८ पर्यंत घडलेल्या घटनांच्या अनुषंगाने शोधायला हवे. त्या कालखंडात राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधींकडे होते. म्हणून त्यांच्या विचारप्रणालीनुसार चळवळीला रूप आणि आकार मिळत गेला असे मानणे चुकीचे आहे.

राजकीय चळवळीसाठी सत्याग्रहाचा उपयोग महात्मा गांधींनी भारतात सर्व प्रथम १९१९ च्या एप्रिलमधे रौलट कायद्याचा विरोध करण्यासाठी केला. त्यावर्षीच्या फेब्रुवारीमधे त्यांनी सत्याग्रह संघांची स्थापना केली. सत्याग्रहाचे स्वरूप हरताळ होते. हरताळ पाळण्याचा आदेश देत असताना महात्मागांधींना देशातील राजकीय असंतोषाची कल्पना होती. तरीही त्यांनी तसा आदेश दिला. कारण हरताळामधून जे उद्भवले तसे घडेल अशी महात्मा गांधींना कल्पना नव्हती. असंतोषाला संघटित स्वरूप देताना उग्रतेची मात्रा क्रांतीकारक बनण्याची शक्यता नाही अशी खात्री असल्याशिवाय त्यांनी तसा आदेश दिला नसता. पण

घडले ते त्यांना अभिप्रेत नसलेले. हरताळ चळवळीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे वर्णन करताना सर व्हॅलेंटीन चिरोल म्हणतात. "The movement assumed the underiable character of an organised revolt against the British Raj." क्रांतीची अवस्था निर्माण करणाऱ्या या जनआंदोलनामागील प्रेरक शक्ती महात्मा गांधींची सत्याग्रह कल्पना होती हे मानणे चुकीचे आहे. हिमालयाच्या आकाराची चूक झाली असे म्हणून महात्मा गांधींनी (हरताळ) सत्याग्रह मागे घेतला. हे सर्व एक आठवड्यात घडले. आठ दिवसांपूर्वी सत्याग्रहाला लायक असलेला भारतीय समाज त्यासाठी अपात्र ठरला. खरी गोष्ट अशी आहे की, महात्मा गांधींचे भारतीय राष्ट्रीय आंदोलनाच्या उग्रतेचे निदान चुकले. क्रांतीला कार्यप्रवण झालेला भारतीय समाज गांधी विचारप्रणालीने प्रभावित झालेला असता तर असे न घडते. जनतेची क्रांतीप्रवणता कॉंग्रेस नेतृत्वाला त्या दिशेने नेत गेली. १९२० च्या कलकत्ता अधिवेशन (ज्यादा) प्रसंगी अध्यक्ष लाला लाजपत राय म्हणाले,– "It is no use blinking the fact that we are passing through a resolutionary period. Traditionally, we are a slow going people; but when we decide to move, we do move quickly and by rapid studies. No living arganism can altogether escape resolution in the course of its existance."

स्वातंत्र्य आंदोलनाला सत्याग्रहाचे अधिष्ठान देण्याचा महात्मा गांधींनी पुन्हा १९२१ मध्ये प्रयत्न केला. जनतेमधील आणि कॉंग्रेसच्या नेतृत्वामधील वाढता असंतोष आणि क्रांती विचारांना सत्याग्रहाच्या चौकटीत बसविण्याच्या प्रयत्नातून १९२१ ची असहकाराची चळवळ गांधींनी पुकारली. ३१ डिसेंबर १९२१ च्या आत स्वराज्य मिळणार ही महात्मा गांधींची घोषणा त्या आंदोलनात भाग घेणाऱ्या हजारो लोकांना आणि नेहरू, सुभाषसारख्या नवीन पिढीतील नेत्यांना विश्वासार्ह वाटली का? आंदोलनाने सर्व देश पेटल्यासारखा झाला. गांधी खेरीज सर्व पुढारी आणि हजारो सत्याग्रही तुरुंगात गेले. एक वर्षात स्वराज्याची कल्पना खोटी आहे हे न समजण्याइतकी जनता आणि पुढारी दुधखुळे नक्की नव्हते. ह्या संदर्भात सुभाषचंद्र बोस आणि जवाहरलाल नेहरू यांचे उद्‌गार महत्वाचे आहेत.

"What his real expectations were, I was unable to understand. Either he did not want to give out all his secrets prematurely or he did not have a clear conception of the tacties whereby the hands of the Government could be forced." ("Indian struggle 1920-1934" P. 64)

"It was obvious to most of our leaders Swaraj meant something much less than independence. Gandhiji was delightfully vague on the subject, and he did not encourage clear thinking about it either.....having put our faith in him we gave him an almost blank cheque, for the time being at least." Autobiography P 76-73.

१९२१ च्या शेवटच्या महिन्यात असहकाराच्या चळवळीला अत्यंत उग्र स्वरूप मिळाले. महात्मा गांधी सोडून बाकी सर्व पुढारी तुरुंगात होते. जनतेमध्ये असंतोष वाढत होता. सरकारचे दमन चालू होते. स्थानिक जिल्हा कॉंग्रेस समित्यांनी महात्मा गांधींपुढे असहकाराची पुढची पायरी म्हणून करबंदी आंदोलन सुरू करण्याची विनंती केली. गांधींनी काय करावे? करबंदी आंदोलन देशव्यापी न करता एका बारडोली पुरते स्वतः करण्याचा त्यांनी मनोदय जाहीर केला. घोषणा केली न केली तोच चौरी चौरा हत्याकांड घडले. गांधींनी १२ फेब्रुवारी ला बारडोली ठिकाणी वर्किंग कमिटीमध्ये असहकार आंदोलन मागे घेतल्याचे जाहीर केले. ह्याची प्रतिक्रिया लोकांवर काय झाली हे सुभाषचंद्र बोस यांच्या खालील उद्‌गारांवरून स्पष्ट होते.

"To sound the order of retreat just when public enthusiasm was reaching the boiling point was nothing short of a national calamity. The principal lieutenents of the Mahatma, Deshbandhu Das, Pandit Motilal Nehru and Lala Lajpat Rai, who were all in prison, shared the popular resentment. I was with the Deshbandhu at that time, and I could see that he was

beside himself with anger and sorrow" (The Indian Struggle, P. 90) मोतीलाल नेहरू, लाजपतराय आणि इतर पुढाऱ्यांनी महात्मा गांधींना लिहिलेल्या पत्रातील आक्षेपांना महात्मा गांधींनी दिलेले उत्तर मासलेवाईक आहे. तुरुंगात डांबलेली माणसे कायद्याच्या दृष्टीने मृत असल्याने निर्णय घेण्याच्या जबाबदारीला ते पात्र नाहीत असा त्यांनी निर्वाळा दिला. १९२१ च्या लोक आंदोलनाच्या मूळाशी सत्याग्रही तत्वज्ञान होते हे कशाच्या आधाराने म्हणावे? असंतोषाने पेटलेला भारतीय समाज सत्याग्रहाच्या स्वप्नरम्य कल्पनांनी प्रेरीत झाला होता असे म्हणणे म्हणजे सामाजिक जीवनातील वास्तव्याकडे जाणूनबुजून डोळेझाक करणे आहे.

१९२१चे स्थगित केलेले सत्याग्रह आंदोलन पुन्हा १९३१ मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सुरू झाले. का? सत्याग्रहाचा फसलेला प्रयोग यशस्वी व्हावा म्हणून? नाही. वाढत्या असंतोषाला क्रांतीचे संघटित स्वरूप न मिळावे म्हणून. ह्या संदर्भात महात्मा गांधींचे उद्गार लक्षात घेण्यासारखे आहेत.

"I would welcome even utter failure with non-violence unintrained, rather than depart from it by a hair's breadth to achieve a doubtful success." (The Times, 8th May 1931).

"The Party of violence is gaining ground and making itself felt. It is my purpose to set in motion that force (non-violence) as well against the organised violence force of the British Rule as the unorganised violence force of the growing party of violence. To sit still would be to give rein to both the forces above mentioned." (Gandhis letter to the Viceroy, 2nd March 1930).

१९३० च्या सत्याग्रह कार्यक्रमात तीन गोष्टींचा समावेश होता. मीठ कायद्याचा भंग, परदेशी कापडाचा बहिष्कार आणि परदेशी कापड दुकाने व दारू दुकानांसमोर पिकेटींग. परंतु या कार्यक्रमांच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आंदोलनाने तावडतोब उग्र स्वरूप धारण केले. प्रक्षोभक जमावांना काबूत ठेवण्यासाठी गोळीबाराचा उपयोग करणे सरकारला भाग पडले. अशाच एका प्रसंगी गढवाल फौजेने गोळीबार करण्याचे नाकारले. वास्तविक महात्मा गांधींनी या नकाराचे अहिंसेचा विजय म्हणून स्वागत करायला हवे होते. पण त्यांची प्रतिक्रिया फार वेगळी झाली. त्यांचे खालील उद्गार त्यांच्या अहिंसेच्या व सत्याग्रहाच्या कल्पनेचा फोलपणा सिद्ध करणारे आहेत.

"A soldier who disobeys an order to fire breaks the oath which he has taken and renders himself guilty of criminal disobedience. I can not ask officials and soldiers to disobey; for when I am in Power, I shall in all likelyhood make use of those same officials and those same soldiers. If I taught them to disobey I should be afraid that they might do the same when I am in power" (M. Gandhis letter to the French Journalist Charles Petrasch, Monde, 20th February 1932).

१९३० चे सत्याग्रह आंदोलन अधिकाधिक तीव्र होत गेले. सर्वसाधारण जनता गांधीजींच्या अहिंसेच्या आग्रहाला न जुमानता सर्व देशभर हिंसाचार वाढीला लागला. सरकारने जाहीर केलेली महात्मा गांधींचे अनुयायी त्यांना न जुमानता हिंसक कृत्यांना प्रोत्साहन देत आहेत. जनआंदोलनावरील महात्मा गांधींची पकड पूर्णपणे सुटली असतानाही सरकारने त्यांना का पकडले हे १९३१ च्या राजकारणातले कोडे अजून सुटलेले नाही. त्यांना तुरुंगात टाकल्यामुळे उलट आंदोलन आणखीच तीव्र झाले. तशी सरकारची दडपशाही वाढली. भारतीय जनता आणि सरकार यांच्या दरम्यान सुरू झालेल्या या संघर्षाचे स्वरूप युद्धमय बनत चालल्याचे वृत्त तत्कालीन ब्रिटीश वर्तमान पत्रांतून पूर्णपणे आढळून येते. Obgerver च्या ५ जुलै १९३० च्या अंकातील मुंबईच्या बातमीपत्रात लिहिले होते. "But for the presence of troops and armed police, the Government of Bombay would be overthrown in a day, and the administration would be taken up by the congress with the assent of all."

अखेर या आंदोलनातून काय निघाले? ४ मार्च १९३१ रोजी गांधी-इरवीन करार होऊन आंदोलन

घडले ते त्यांना अभिप्रेत नसलेले. हरताळ चळवळीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे वर्णन करताना सर व्हॅलेंटीन चिरोल म्हणतात. "The movement assumed the underiable character of an arganised revolt against the British Raj." क्रांतीची अवस्था निर्माण करणाऱ्या या जनआंदोलनामागील प्रेरक शक्ती महात्मा गांधींची सत्याग्रह कल्पना होती हे मानणे चुकीचे आहे. हिमालयाच्या आकाराची चूक झाली असे म्हणून महात्मा गांधींनी (हरताळ) सत्याग्रह मागे घेतला. हे सर्व एक आठवड्यात घडले. आठ दिवसांपूर्वी सत्याग्रहाला लायक असलेला भारतीय समाज त्यासाठी अपात्र ठरला. खरी गोष्ट अशी आहे की, महात्मा गांधींचे भारतीय राष्ट्रीय आंदोलनाच्या उग्रतेचे निदान चुकले. क्रांतीला कार्यप्रवण झालेला भारतीय समाज गांधी विचारप्रणालीने प्रभावित झालेला असता तर असे न घडते. जनतेची क्रांतीप्रवणता कांग्रेस नेतृत्वाला त्या दिशेने नेत गेली. १९२० च्या कलकत्ता अधिवेशन (ज्यादा) प्रसंगी अध्यक्ष लाला लाजपत राय म्हणाले,– "It is no use blinking the fact that we are passing through a resolutionary period. Traditionally, we are a slow going people; but when we decide to move, we do move quickly and by rapid studies. No living arganism can altogether escape resolution in the course of its existance."

स्वातंत्र्य आंदोलनाला सत्याग्रहाचे अधिष्ठान देण्याचा महात्मा गांधींनी पुन्हा १९२१ मध्ये प्रयत्न केला. जनतेमधील आणि कॉंग्रेसच्या नेतृत्वामधील वाढता असंतोष आणि क्रांती विचारांना सत्याग्रहाच्या चौकटीत बसविण्याच्या प्रयत्नातून १९२१ ची असहकाराची चळवळ गांधींनी पुकारली. ३१ डिसेंबर १९२१ च्या आत स्वराज्य मिळणार ही महात्मा गांधींची घोषणा त्या आंदोलनात भाग घेणाऱ्या हजारो लोकांना आणि नेहरू, सुभाषसारख्या नवीन पिढीतील नेत्यांना विश्वासार्ह वाटली का? आंदोलनाने सर्व देश पेटल्यासारखा झाला. गांधी खेरीज सर्व पुढारी आणि हजारो सत्याग्रही तुरुंगात गेले. एक वर्षात स्वराज्याची कल्पना खोटी आहे हे न समजण्याइतकी जनता आणि पुढारी दुधखुळे नक्की नव्हते. ह्या संदर्भात सुभाषचंद्र बोस आणि जवाहरलाल नेहरू यांचे उद्गार महत्वाचे आहेत.

"What his real expectations were, I was unable to understand. Either he did not want to give out all his secrets prematurely or he did not have a clear conception of the tacties whereby the hands of the Government could be forced." ("Indian struggle 1920-1934" P. 64)

"It was obvious to most of our leaders Swaraj meant something much less than independence. Gandhiji was delightfully vague on the subject, and he did not encourage clear thinking about it either.....having put our faith in him we gave him an almost blank cheque, for the time being at least." Autobiography P 76-73.

१९२१ च्या शेवटच्या महिन्यात असहकाराच्या चळवळीला अत्यंत उग्र स्वरूप मिळाले. महात्मा गांधी सोडून बाकी सर्व पुढारी तुरुंगात होते. जनतेमध्ये असंतोष वाढत होता. सरकारचे दमन चालू होते. स्थानिक जिल्हा कॉंग्रेस समित्यांनी महात्मा गांधींपुढे असहकाराची पुढची पायरी म्हणून करबंदी आंदोलन सुरू करण्याची विनंती केली. गांधींनी काय करावे? करबंदी आंदोलन देशव्यापी न करता एका बारडोली पुरते स्वतः करण्याचा त्यांनी मनोदय जाहीर केला. घोषणा केली न केली तोच चौरी चौरा हत्याकांड घडले. गांधींनी १२ फेब्रुवारी ला बारडोली ठिकाणी वर्किंग कमिटीमध्ये असहकार आंदोलन मागे घेतल्याचे जाहीर केले. ह्याची प्रतिक्रिया लोकांवर काय झाली हे सुभाषचंद्र बोस यांच्या खालील उद्गारांवरून स्पष्ट होते.

"To sound the order of retreat just when public enthusiasm was reaching the boiling point was nothing short of a national calamity. The principal lieutenents of the Mahatma, Deshbandhu Das, Pandit Motilal Nehru and Lala Lajpat Rai, who were all in prison, shared the popular resentment. I was with the Deshbandhu at that time, and I could see that he was

beside himself with anger and sorrow" (The Indian Struggle, P. 90) मोतीलाल नेहरू, लाजपतराय आणि इतर पुढाऱ्यांनी महात्मा गांधींना लिहिलेल्या पत्रातील आक्षेपांना महात्मा गांधींनी दिलेले उत्तर मासलेवाईक आहे. तुरुंगात डांबलेली माणसे कायद्याच्या दृष्टीने मृत असल्याने निर्णय घेण्याच्या जबाबदारीला ते पात्र नाहीत असा त्यांनी निर्वाळा दिला. १९२१ च्या लोक आंदोलनाच्या मूळाशी सत्याग्रही तत्वज्ञान होते हे कशाच्या आधाराने म्हणावे ? असंतोषाने पेटलेला भारतीय समाज सत्याग्रहाच्या स्वप्नरम्य कल्पनांनी प्रेरीत झाला होता असे म्हणणे म्हणजे सामाजिक जीवनातील वास्तव्याकडे जाणूनबुजून डोळेझाक करणे आहे.

१९२१चे स्थगित केलेले सत्याग्रह आंदोलन पुन्हा १९३१ मध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सुरू झाले. का ? सत्याग्रहाचा फसलेला प्रयोग यशस्वी व्हावा म्हणून ? नाही. वाढत्या असंतोषाला क्रांतीचे संघटित स्वरूप न मिळावे म्हणून. ह्या संदर्भात महात्मा गांधींचे उद्‌गार लक्षात घेण्यासारखे आहेत.

"I would welcome even utter failure with non-violence unintrained, rather than depart from it by a hair's breadth to achieve a doubtful success." (The Times, 8th May 1931).

"The Party of violence is gaining ground and making itself felt. It is my purpose to set in motion that force (non-violence) as well against the organised violence force of the British Rule as the unorganised violence force of the growing party of violence. To sit still would be to give rein to both the forces above mentioned." (Gandhis letter to the Viceroy, 2nd March 1930).

१९३० च्या सत्याग्रह कार्यक्रमात तीन गोष्टींचा समावेश होता. मीठ कायद्याचा भंग, परदेशी कापडाचा बहिष्कार आणि परदेशी कापड दुकाने व दारू दुकानांसमोर पिकेटींग. परंतु या कार्यक्रमांच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आंदोलनाने ताबडतोब उग्र स्वरूप धारण केले. प्रक्षोभक जमावांना काबूत ठेवण्यासाठी गोळीबाराचा उपयोग करणे सरकारला भाग पडले. अशाच एका प्रसंगी गढवाल फौजेने गोळीबार करण्याचे नाकारले. वास्तविक महात्मा गांधींनी या नकाराचे अहिंसेचा विजय म्हणून स्वागत करायला हवे होते. पण त्यांची प्रतिक्रिया फार वेगळी झाली. त्यांचे खालील उद्‌गार त्यांच्या अहिंसेच्या व सत्याग्रहाच्या कल्पनेचा फोलपणा सिद्ध करणारे आहेत.

"A soldier who disobeys an order to fire breaks the oath which he has taken and renders himself guilty of criminal disobedience. I can not ask officials and soldiers to disobey; for when I am in Power, I shall in all likelyhood make use of those same officials and those same soldiers. If I taught them to disobey I should be afraid that they might do the same when I am in power" (M. Gandhis letter to the French Journalist Charles Petrasch, Monde, 20th February 1932).

१९३० चे सत्याग्रह आंदोलन अधिकाधिक तीव्र होत गेले. सर्वसाधारण जनता गांधीजींच्या अहिंसेच्या आग्रहाला न जुमानता सर्व देशभर हिंसाचार वाढीला लागला. सरकारने जाहीर केलेली महात्मा गांधींचे अनुयायी त्यांना न जुमानता हिंसक कृत्यांना प्रोत्साहन देत आहेत. जनआंदोलनावरील महात्मा गांधींची पकड पूर्णपणे सुटली असतानाही सरकारने त्यांना का पकडले हे १९३१ च्या राजकारणातले कोडे अजून सुटलेले नाही. त्यांना तुरुंगात टाकल्यामुळे उलट आंदोलन आणखीच तीव्र झाले. तशी सरकारची दडपशाही वाढली. भारतीय जनता आणि सरकार यांच्या दरम्यान सुरू झालेल्या या संघर्षाचे स्वरूप युद्धमय बनत चालल्याचे वृत्त तत्कालीन ब्रिटीश वर्तमान पत्रांतून पूर्णपणे आढळून येते. Obgerver च्या ५ जुलै १९३० च्या अंकातील मुंबईच्या बातमीपत्रात लिहिले होते. "But for the presence of troops and armed police, the Government of Bombay would be overthrown in a day, and the administration would be taken up by the congress with the assent of all."

अखेर या आंदोलनातून काय निघाले ? ४ मार्च १९३१ रोजी गांधी-इरवीन करार होऊन आंदोलन

मागे घेण्यात आले. गोलमेज परिषदा आणि त्यानंतरचा १९३५ चा भारतीय शासनाचा कायदा हेच या आंदोलनाचे फलित म्हणता येईल. स्वायत्त शासनाच्या दृष्टीने ही वाटचाल नक्की होती. पण हे सर्व सत्याग्रहाने झाले किंवा आंदोलनाने स्वातंत्र्य-युद्धाचे स्वरूप घेतल्याच्या भितीमुळे साम्राज्यवादी सरकारने भारतीय जनतेपुढे नमते घ्यावे लागल्यामुळे झाले ? गांधीप्रणालीवर आधारलेल्या सत्याग्रहाने जर हे झाले असते तर १९३४ मध्ये महात्मा गांधींनी काँग्रेस सोडली नसती. काँग्रेस सोडतेवेळी त्यांच्या मनातले शल्य त्यांनी जाहीर केले होते.

क्रिप्स योजना असफल झाल्यानंतर ८ ऑगस्ट १९४२ रोजी काँग्रेस वर्कींग कमिटीने केलेल्या ठरावाप्रमाणे देशव्यापी अहिंसक आंदोलनाचे नेतृत्व करण्याचे सर्वाधिकार महात्मा गांधींना बहाल करण्यात आले. या अहिंसक आंदोलनामुळे काही आठवडयातच भारतीय जनता राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून, संयुक्त राष्ट्रांच्या युद्धप्रयत्नात सहभागी होऊन, जपानी आक्रमणाचा प्रतिकार यशस्वीपणे हिंदुस्थानचे स्वतंत्र सरकार करू शकेल असा महात्मा गांधींचा आंदोलनाचा निर्णय घेते वेळी दावा होता. पण गांधींना अभिप्रेत असलेले अहिंसक आंदोलन झालेच नाही. ८ ऑगस्ट रोजी ठराव संमत करून काही तास होतात न होतात तोच ९ ऑगस्ट रोजी सकाळी गांधींसकट सर्व पुढारी पकडले जाऊन तुरुंगात डांबले गेले. पुढे जे घडले ते महात्मा गांधींना अभिप्रेत असलेल्या अहिंसक, सत्याग्रही मार्गाने नव्हे. १९४२ ची जळवळ रीतसर क्रांतीयुद्ध होते. काँग्रेसचा आणि गांधींचा त्याच्याशी कोणताही संघटनात्मक संबंध नव्हता. २१ सप्टेंबर १९४५ रोजी काँग्रेसच्या वतीने जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल आणि गोविंद वल्लभपंत यांनी आपल्या सहीनिशी जाहीर निवेदन केले की, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने किंवा गांधीजींनी कोणतीही चळवळ सुरू केलेली नव्हती. गांधींनी इशारा दिल्याशिवाय कोणतीही चळवळ सुरू करू नये असा काँग्रेसजनांना आदेश होता. महात्मा गांधींनी स्पष्ट केले की, त्यांनी तसा इशारा केव्हाही दिला नव्हता.

१९१९, १९२१, १९३० आणि १९४२ च्या राजकीय आंदोलनात सहभागी होणाऱ्या भारतीय जनतेच्या मनात गांधी विचारप्रणाली नव्हती. गांधी तत्त्वप्रणालीच्या मुशीमध ही आंदोलने टाकली गेली नव्हती हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी वरील विस्तारपूर्वक विवेचन केले आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा तीव्र होत जाऊन त्याचे पर्यवसान क्रांती युद्धात होणे हा सार्वत्रिक, सामाजिक प्रक्रियांचा नियम डावलण्याची ताकद महात्मा गांधींच्या अहिंसक आणि सत्याग्रही कार्यक्रमात नव्हती. अहिंसा आणि सत्याग्रहाच्या कल्पनांचा खोटेपणा स्वातंत्र्य प्राप्तीचे वेळी झालेल्या विभाजनामुळे पूर्णतः सिद्ध होऊन गांधीवादाची राजकारणातील अव्यवहार्यता जगजाहीर झाली. काँग्रेसच्या हातात स्वतंत्र भारताची राजकीय सत्ता आल्याबरोबर काँग्रेसच्या नेतृत्वातून महात्मा गांधी खडयासारखे बाजूला टाकले जाणे ही गांधीवादाची शोकांतिका लोकांच्या मनात घर करण्यापूर्वीच महात्मा गांधींचा वध झाला. काँग्रेसने याचे भांडवल केले आणि गांधीवादाचा उपयोग स्वतःच्या राजकारणाचे समर्थन करण्यासाठी केला. अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळाल्याचा खोटा आणि अशास्त्रीय युक्तिवाद करून समाज परिवर्तनाच्या वास्तविक प्रक्रियांचे आकलन नव्या पिढीला आणि विशेषतः सामाजिक आणि आर्थिक दृष्टया मागासलेल्या जनतेमधील नवीन पिढीला होऊ नये म्हणून गांधी तत्त्वप्रणालीचा प्रचार करण्यासाठी लक्षावधी रुपयांच्या योजना तयार होऊ लागल्या आणि सर्वोदयी कार्यकर्ते त्यांना कळत न कळत राबवले जाऊ लागले. त्यातला अखेरचा अंक म्हणून गांधी जन्मशताब्दीसाठी सरकारी यंत्रणा आज उपयोगात आणली जात आहे. प्रत्यक्ष राजकारणात मात्र गांधीवादाला कधीही न स्वीकारणारे काँग्रेसी नेतृत्व वेगळयाच तत्वप्रणालीने प्रेरित झाल्याचे उत्तरोत्तर सिद्ध होत चालले आहे. आजच्या काँग्रेसी शासनाची तत्वप्रणाली गांधीवाद नाही. राजकीय सत्ता टिकवून ठेवण्यासाठी अधिकाधिक प्रमाणात हिंसेचा वापर करणे. आर्थिक नियोजनांतून श्रीमंताचे अधिक श्रीमंत होत जाणे व गरिबांचे अधिक गरीब होत जाणे, आणि राजकीय सत्तेचा आधार विकेंद्रित करण्याच्या नावाखाली विशिष्ठ सामाजिक वर्गातील व्यक्तींचाच समावेष सत्ता रचनेत करून घेणे ह्या राजकीय प्रक्रियेच्या मागील तत्वप्रणाली गांधीवाद नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या समाजातील वरच्या वर्गातील लोकांच्या हितसंबंधाच्या वृद्धीची जोपासना

करणाऱ्या तत्वप्रणालीचा वारसा-आजचे सत्ताधारी चालवित आहेत. स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात ह्या तत्वप्रणालीला राष्ट्रवाद म्हणून ओळखले जाई. उग्र राष्ट्रवादी चळवळीमधून उद्‌भवलेल्या राजकीय स्वातंत्र्याचा फायदा मागील २२ वर्षांत समाजातील वरच्या स्तरांना प्राप्त झाल्याचे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. उपेक्षित वर्गातील बहुसंख्यक जनतेचा भ्रमनिरस होऊन त्यांनी राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनासाठी दुसरी प्रखर तत्वप्रणाली स्वीकारू नये म्हणून गांधीवादाची पुनर्व्याख्या करून ती लोकांच्या जाणीवांमधे उतरवण्याचे प्रयत्न गांधीजन्मशताब्दी निमित्ताने फार मोठ्या प्रमाणावर केले जात आहेत. हे उदात्तीकरण अनिष्ट आहे असे मी सुरवातीला म्हटले ते ह्याचमुळे.

अहिंसा आणि लोकशाहीमधील Rule of Law चे समीकरण साधण्याचा प्रयत्न आज विचारवंतांमधे आढळून येतो. सार्वजनिक जीवनातील कोणतेही हिंसापूर्ण कृत्य लोकशाहीला धरून नाही असा आग्रह धरणे म्हणजे पर्यायाने Status Quo ला कायम ठेवणे आहे. लोकशाही सुरक्षित राहावी म्हणून अहिंसावादाचा उपयोग करून घेण्यामागे, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनासाठी उद्यत झालेल्या उपेक्षित समाज घटकांना नामोहरण करणे हाच मुख्य उद्देश आहे, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. अहिंसा हे समाज परिवर्तन प्रक्रियेमधील प्राथमिक मूल्य नाही ह्या सत्याकडे डोळेझाक करणे ढोंगीपणाचे लक्षण आहे. सरकारने केलेली हिंसा व्यवस्थेसाठी आवश्यक म्हणून इष्ट मानणे आणि व्यवस्था बदलण्यासाठी लोकांनी केलेली हिंसा मात्र अनिष्ट ह्या दुहेरी मूल्यांकनाला ढोंगीपणाशिवाय दुसरे काय म्हणणार ?

गांधीवादामधील साधन-शुचिता ही कल्पना आज फार मोठ्या प्रमाणात उचलून धरली जात आहे. साधनाची उपयोगिता किंवा परिणामकारकता ह्या कल्पना तर्कसंगत वाटतात. पण शुचिता हे विशेषण साधनाला लावणे तर्कविसंगत आहे. साधनाला नैतिक आशय असूच शकत नाही. कशासाठी साधन वापरले जाते आणि त्यासाठी ते परिणामकारक आहे किंवा नाही हे साध्यपूर्तीनंतरच ठरत असल्यामुळे ते वापरण्यापूर्वीच त्याची परिणामकारकता शुचितेच्या आधाराने ठरविली जाणे हे तर्कसंगत नाही. स्वतः महात्मा गांधींनी वापरलेली साधने लोकांना निंद्य वाटली. कारण, त्यांना महात्मा गांधींच्या उद्दिष्ट मूल्यांबाबद शंका होती. समर प्रसंगी पड खाऊन चळवळ स्थगित करणे, आत्मशुद्धीसाठी केलेल्या उपवासाची जाहिरातबाजी करणे, प्रतिस्पर्ध्याला नामोहरण करण्यासाठी केल्या गेलेल्या उपाययोजना, लैंगिक जीवनातील सत्याचा साक्षात्कार व्हावा म्हणून केलेले प्रयोग इ० प्रसंगी महात्मा गांधींनी उपयोगात आणलेल्या साधनांची योग्य–अयोग्यता ठरविताना त्यांना अभिप्रेत असलेल्या उद्दिष्टांच्या संदर्भातच गांधींच्या समर्थकांनी आणि विरोधकांनी विचार केलेला आहे. साधनाचे मूल्यांकन साध्याच्या संदर्भात करण्याची स्वाभाविक मानसिक प्रक्रिया नाकारणे म्हणजे स्वतःची फसवणूक करणे आहे. पण स्वतःची फसवणूक सहसा कोणी जाणून बुजून करीत नाही. साधनशुचितेच्या घोषणेमागे दुसऱ्याची फसवणूक करणे हाच मुख्य उद्देश असतो. आम्ही वापरतो ती साधने शुचिर्भूत आहेत, तुम्ही वापरता ती अशुद्ध म्हणून ती वापरू नका, असे आग्रहाने प्रतिपादित करणाऱ्यांच्या मनात प्रामुख्याने त्यांच्या स्थानाच्युतिची भिती असते. आज साधनशुचितेचे प्रस्थ करणाऱ्या व्यक्ती प्रामुख्याने ह्या सदरात मोडणाऱ्या आहेत.

गांधीवादामधील विश्वस्तवादाची अव्यवहार्यता आणि अशास्त्रीयता सिद्ध करण्यासाठी फारसे विवेचन आवश्यक नाही. ही कल्पना संपत्तीवाद्यांना मान्य नाही आणि संपत्तीहीनांना तर मुळीच मान्य नाही. संपत्ती संस्थेच्या ऐतिहासिक विकास प्रक्रियेच्या अज्ञानातून निर्माण झालेली ही कल्पना साधनशुचितेच्या कल्पने इतकीच तर्कहीन आणि लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करण्यासाठी वापरली गेलेली गोष्ट आहे. आर्थिक विषमतेच्या पोटी निर्माण होणाऱ्या विग्रहाला काही काळ का होईना थोपवून धरण्याच्या प्रयत्नातून निर्माण झालेला हा विचार आहे. समतापूर्ण आर्थिक व्यवस्थेच्या निर्मितीला ह्या कल्पनेचा उपयोग नाही. शेतमालकी मधील विषमता दूर व्हावी म्हणून कांग्रेस सरकारने केलेल्या शेतकी सुधारणांच्या संदर्भात महात्मा गांधींनी १९३४ मध्ये उत्तर प्रदेशातील जमीनदारांना दिलेले आश्वासन, गांधी तत्त्वप्रणाली सर्वसामान्य जन-

तेच्या आशा-आकांक्षापासून किती भिन्न होती हे समजण्याच्या दृष्टीने वाचनीय आहे. महात्मा गांधी म्हणतात, "I shall be no party to dispossessing the propertied classes of their private property without just cause. My objective is to reach your heart and convert you so that you may hold all your private property in trust for your tenants and use it primarily for their welfare. The Ramrajya of my dream ensures the rights alike of Prince and pauper. You may be sure that I shall throw the whole weight of my influence in preventing a class war. Supposing there is an attempt unjustify to deprive you of your property you will find me fighting on your side. Our socialism or communism should be based on non-violence and on the harmonious cooperation of Labour and capital, the land-lord and tenant.', (Maratha, 12th August 1934.)

भारतीय जनतेने आपल्या दास्य विमोचनाकरता केलेल्या आंदोलनाच्या मनोभावनेचा आधार महात्मा गांधींनी जमीनदारांना दिलेल्या आश्वासनातून प्रगट होणाऱ्या तत्त्वप्रणालीमधे दाखविण्याच्या धाष्टर्याला ढोंग नाही तर दुसरे काय म्हणावे ?

महात्मा गांधींना अभिप्रेत असलेली अहिंसक राज्यसत्तात्मक यंत्रणा त्यांनी कधीही स्पष्टपणे विषद केली नाही. त्यांना तशी अभिप्रेत नव्हती हे त्यांनी एका फ्रेंच पत्रकाराला दिलेल्या उत्तरात (गढवाल फौजेने गोळीबार करण्याचे नाकारले ह्या बाबतीत विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना) स्पष्टपणे दिसते. ज्या गोष्टींवर आपला विश्वास नाही अशांच्या संबंधाने लोकांना गोंधळात टाकणाऱ्या कल्पना प्रगट करणे ही गांधी विचारांची महत्वपूर्ण शैली आहे. गांधीवादाचा वारसा चालविणाऱ्या कांग्रेसी शासकांना राबवण्यासाठी प्राप्त झालेली राज्य सत्तात्मक यंत्रणा कितपत अहिंसक आहे आणि भविष्यामधे ती तशी बनण्याची कितपत शक्यता आहे याचे उत्तर माझ्या मते कोणालाही नकारात्मकच द्यावे लागेल.

गांधीतत्त्व प्रणालीतील सुरवातीला नमूद केलेल्या पाच कल्पनांचा उपयोग भारतीय समाजाने आपल्या आपल्या राजकीय व्यवहारात-स्वातंत्र्य आंदोलनामधे आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समाजाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक पुनर्रचना करण्यासाठी-समाज जीवनातील आवश्यक असलेली तत्वप्रणाली (ideology) म्हणून केला नाही. हा वरील विवेचनातून निघणारा निष्कर्ष आहे. मग कोणत्या तत्त्वप्रणालीच्या अनुषंगाने भारतीय समाजाने आपल्या राजकीय व्यवहाराची वाटचाल केली ? माझ्यामते समाजवादी तत्त्वप्रणाली हे याचे उत्तर आहे. समाजवादाकडे वाटचाल करणाऱ्या भारतीय राजकारणाची समाजवादी परंपरा स्वातंत्र्यपूर्व काळात कशी तयार होत गेली याची मीमांसा करीत असताना आणि भविष्यातील समाजवादी व्यवस्था कशी राहील याची वास्तववादी पण शास्त्रीय व्याख्या करीत असताना गांधीवादाच्या उदात्तीकरणामुळे भारतीय मन भांबावून जाण्याची शक्यता विचारात घेणे आज अत्यावश्यक आहे. गांधी आणि गांधीवाद याचे ऐतिहासिक कार्य संपुष्टात आले आहे असे कबूल केल्याने महात्मा गांधींचा मोठेपणा कमी होत नाही. भारतीय राजकारणात भारतीय जनतेने आणि राजकीय पुढाऱ्यांनी महात्मा गांधींचे निरंकुश नेतृत्व स्वीकारले होते हे जितके सत्य आहे तितकेच गांधीवाद त्यांनी स्वीकारला नव्हता हेही सत्य आहे. नेतृत्व टिकवून ठेवण्याकरता जितकी गांधीवादाची झिलाई आवश्यक होती तितकीच त्यांनी स्वीकारली. ऐतिहासिक प्रक्रियेमधे ते अनिवार्य होते. अन्यथा गांधी आणि नेहरू यांच्या सहकार्याची मीमांसा कशी लावता येणार ? सामाजिक परिवर्तनाच्या बाबतीत अत्यंत प्रतिगामी विचारप्रणालीचे प्रतिपादन करणारे महात्मा गांधी आणि अत्यन्त पुरोगामी कल्पना मांडणारे जवाहरलाल नेहरू यांच्यामधील compromise ही ऐतिहासिक अनिवार्यता होती. त्यामुळे १९४७ पूर्वीचे राजकारण compromise वर आधारलेले होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या ऐतिहासिक अवस्थेतील राजकारणाचे स्वरूप बदलून ते commitments चे राजकारण बनणे हे अनिवार्य आहे. हे असे बनत जाण्यामधे गांधीवाद सहाय्यक न ठरता भारतीय मनात गोंधळ आणि वैफल्य निर्माण करेल असे माझे प्रांजळ मत आहे. महात्मा गांधींच्या

ऐतिहासिक मोठेपणाचे यथार्थ मूल्यांकन करणारे श्री. रजनी पामदत्त यांचे विवेचन देऊन हा लेख संपवितो.

" The social significance of Gandhi's historical role as the chosen representative and ablest leader of bourgeois nationalism in the critical transitions of modern period has in practice coincided with his political role, despite the superficial contradiction between his social philosophy and the bourgeois outlook. The glaring contradictions and in adequacies in his many utterances and teachings, which can be easily picked out and exposed by the most elementary critic, are in fact the key to his unique significance and achievement. No other leader could have bridged the gap, during this transitional period, between the actual bourgeois direction of the national movement and the awakening, but not yet conscious masses. Both for good and evil, Gandhi achieved this, and led the movement, even appearing to create it. This role only comes to an end in proportion as the masses begin to reach clear consciousness of their on interests without need of mythological concealments." (India To-day P. 510.)

एक संगीतमधुर कल्पना : 'कुमार गंधर्व व गांधीराग'

गांधीजन्मशताब्दीनिमित्त ज्या नव्या गोष्टी होणार आहेत त्यात संगीतापासून आकाशातील नक्षत्रमालेपर्यंत सगळे विषय पुनीत होऊन निघणार आहेत. म. गांधींना संगीत प्रिय होते. गांधींच्या पूर्वीच्या आणि नंतरच्याही अनेक पुढाऱ्यांना संगीताचे वावगेच होते नि आहे ! पण म. गांधींचे तसे नव्हते. त्यांना संगीत आवडत होते एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या प्रार्थनेमध्ये संगीताला मानाचे स्थान दिलेले होते. पंडित विष्णु दिगंबर पलुसकर यांच्याकरवी त्यांनी 'वंदेमातरम' या लोकप्रिय राष्ट्रगीताला सुंदर चालही लावून घेतली. ज्या थोर नेत्याने संगीताला राजकारणात एवढे महत्त्व आणून दिले त्या नेत्याच्या नावाने संगीतात एक नवा 'राग' निर्माण करण्याची कल्पना म्हणूनच स्वागतार्ह आहे. सुप्रसिद्ध गायक कुमार गंधर्व यांनी 'गांधीराग' या नावाचा एक नवाच राग तयार केलेला असून गांधीजयंतीच्या दिवशी तो लोकांसमोर प्रथमच मांडला जाणार आहे. मध्यप्रदेशचे माहिती खात्याचे मंत्री श्री. बैरागी यांच्या सहकार्याने कुमार गंधर्वांनी हा नवा 'गांधीराग' तयार केला आहे. श्री. बैरागी हे स्वतः चांगले रचनाकार आहेत, आणि कुमार गंधर्व तर संगीतात नवे नवे प्रयोग करण्याबद्दल महशूरच आहेत. भारतीय संगीतामध्ये एक नवीन चीज या रागामुळे निर्माण होणार आहे. कुमार गंधर्व आणि बैरागी यांनी सात सुरांच्या निराळयाच छटा-मिश्रणाने आता 'गांधीराग' हा वेगळाच राग सिद्ध केला आहे. म. गांधींना संगीत आवडत होते व मानवी जीवन सुखी करण्याचे सामर्थ्य संगीतात आहे याची जाणीवही त्यांना चांगली होती. तेव्हा त्यांच्या नावाने त्यांच्या जन्मशताब्दीच्या मंगल वेळी, एक नवाच 'गांधी-राग' जगाला पेश करण्याची कल्पनाच अतिशय संगीत-मधुर आहे !

म. गांधींची जीवन-साधना

—प्रा. सुरेश म. डोळके

गांधीवाद नावाचा एखादा 'वाद'–ism–किंवा एखादी शास्त्रीय विचारपद्धती अस्तित्वात आहे असे नाही. खुद् गांधीजीदेखील 'गांधीवाद' म्हणून काही चीज अस्तित्वात नाही, असे म्हणत असत.[१] त्यांनी आपले जीवनदर्शन शास्त्रशुद्ध पद्धतीने लिहून काढावें अशी विनंती त्यांना अनेकदा करण्यात आली होती, पण त्या विनंतीचा त्यांनी कधी स्वीकार केला नाही. उलट, 'एखादा संप्रदाय माझ्या मागे असावा अशी माझी इच्छा नाही,' असेच उत्तर विनंती करणारांना दिले.[२] मला वाटते, याचे कारण असे असावे की, गांधीवाद ही एक जीवनसाधना आहे; ते एक जीवन-दर्शन आहे. जीवन हे अखंड सृजनशील असल्यामुळे जीवनदर्शन हे देखील अखंड गतिमान्, अविरत सृजन-शील असते. बुद्धी ही जीवनाचे आकलन काही प्रमाणात करू शकते; पण बुद्धी कितीही विकसित झाली तरी ती जीवन-सत्याचे संपूर्ण आकलन करू शकेल हे गांधीजींना मान्य नव्हते जीवनसत्य म्हणजे जीवनाचे साकल्याने दर्शन करून देणारे सत्त्व! याचा अर्थ, म. गांधी हे बुद्धिविरोधी होते असा नव्हे. उलट, प्रत्येकाला पूर्ण बुद्धिस्वातंत्र्य द्यावे, असेच ते मानीत असत. किंबहुना, तसा त्यांचा आग्रह होता, असेही म्हटल्यास चालेल. "मी 'महात्मा' म्हटला गेलो म्हणून माझे वचन प्रमाण आहे असे समजून कोणी चालू नये. 'महात्मा' कोण हे आपल्याला माहीत नाही. म्हणून चांगला मार्ग हा की, 'महात्म्या'चे वचनदेखील बुद्धीच्या कसोटीवर घासून घ्यावे आणि ते कसास न उतरल्यास त्याचा त्याग करावा "[३] असे खुद् गांधीजींनीच म्हटले आहे. पण तरीही, बुद्धीबरोबरच अंतःकरणाचाही उल्लेख केल्यावाचून ते राहत नसत. इतकेच नव्हे तर, बुद्धीपेक्षा अंतःकरणा-लाच अधिक महत्त्व द्यावे, श्रद्धा ही बुद्धीपेक्षाही श्रेष्ठ आहे,[४] असेही ते म्हणत असत. त्यामुळे, म. गांधी हे बुद्धिप्रामाण्यवादी नसून अंतःकरणप्रामाण्यवादी होते; किंवा, अधिक काटेकोर शब्दात सांगायचे तर, ते 'आत्मप्रामाण्यवादी' होते असेच म्हटले पाहिजे. आत्म्याच्या प्रेरणेतून व आत्म्याच्या प्रकाशातच गांधींचे जीवन-कार्य उत्स्फूर्त व व्यतीत झाले. सारांश, जीवन-सत्याचे संपूर्ण आकलन होण्यासाठी बुद्धी ही पुरेशी नाही; त्याकरिता जीवनावर अपार श्रद्धा ठेवून, जीवनाच्या अंगोपांगांशी संपूर्ण समरस होण्याचा प्रयत्न करीत करीत, आत्म्याच्या प्रेरणेनुसार, सत्याचा अखंड शोध घेत राहणे हीच सर्वश्रेष्ठ साधना आहे अशी गांधींची समजूत होती व ही 'वाट पुसत' प्रयोगशील असे त्यांचे आचरण होते.

शिवाय असे की, गांधीजी कोणी तत्त्वज्ञानी नव्हते: त्यांनी कुठलीही तत्त्वपद्धती किंवा कुठलाही ज्ञान-मार्ग शोधून काढला नव्हता किंवा तयार केला नव्हता. त्यांची बुद्धी आत्मप्रवण आणि वृत्ती प्रयोगशील असल्यामुळे त्यांच्या विचारात कधी साचेबंदपणा आला नाही किंवा त्यांच्या दृष्टिकोणाला कधी सिद्धान्ताचे अंतिम स्वरूपही प्राप्त झाले नाही. तो

---

१. "There is no such thing as 'Gandhism" ['All men are Brothers' (Life and Thoughts of Mahatma Gandhi, as told in his own words.) Unesco Publication, 4th impression, March 1960], p. 47.

२. 'I do not want to leave any sect after me.'—A. M. B., p. 47.

३. गांधी-विचार-दर्शन (खंड ९), पृ. १२.

४. 'Faith transcends reason'–Mahatma Gandhi's Ideas (C. F. Andrews), p. 45.

सदोदित लवचिक, गतिमान् असाच राहिला. गांधींचे आणखी एक वैशिष्टच असे की, आपल्या नीतिमूल्यांचा साक्षात्कार समाजजीवनात घडला पाहिजे अशी त्यांची निष्ठा होती व त्यामुळे त्यांना प्रतीत झालेली सत्यं त्यांनी सामाजिक जीवनाला आणि राजकीय संघर्षांना लागू केली. हे प्रयोग आचरीत असताना आपली नीतिमूल्ये, विशेषत: सत्य–अहिंसा म्हणजे काय, हे समाजाला शिकविण्याची तर त्यांची तयारी असेच, पण त्यापूर्वी व त्यापेक्षाही, ते स्वत:लाच शिकविण्याची व तदनुसार आपल्या जुन्या विचारांचा त्याग करण्याची, नव्या गोष्टी शिकण्याची, आपल्या पूर्वानुभूतीतला अपुरेपणा मान्य करण्याची आणि त्याप्रमाणे आपल्या आचरणात वदल करण्याचीही त्यांची तयारी असे. आणि म्हणूनच, कुठल्याही बौद्धिक 'वादा'च्या, तार्किक 'दर्शना'च्या किंवा शास्त्रीय विचारपद्धतीच्या चौकटीत गांधींचे विचारदर्शन सामाविले जात नाही. विज्ञान नव्हे, तर आत्मज्ञान हेच त्यांच्या जीवन–कार्याचे अधिष्ठान होते. आत्मप्रेरणेच्या प्रकाशात, सत्याचा अखंड शोध घेत घेत कर्मयोग आचरणे हेच त्यांच्या जीवनाचे स्वरूप होते. आत्मप्रेरणा आणि आचार-प्रवणता यांच्या तादात्म्यातून स्फुरलेला तो एक जीवनयोग होता. तत्त्व आणि आचार यांची एकात्मता असलेली ती एक जीवनरीती होती. त्यामुळे, अखंड गतिमान् असलेले एक 'जीवनदर्शन' किंवा सतत प्रयोगशील असलेली एक 'जीवनसाधना' असेच गांधींच्या मार्गाचे वर्णन केले पाहिजे.

गांधींच्या जीवनसाधनेला व्यक्तिधर्म आणि समाजधर्म अशी दोन अंगे वरवर पाहणाराला दिसतात. यांपैकी व्यक्तिधर्माला, जुना शब्द वापरायचा झाला तर, 'यति'–धर्म असेही म्हणता येईल. यतिधर्माचा चित्तशुद्धीवर संपूर्ण भर असतो. सत्य, अहिंसा इ० व्रतांच्या आचरणाने वासना–विकारांवर विजय मिळवावयाचा व संपूर्ण चित्तशुद्धी साधावयाची हा यति-धर्माचा विशेष होय. यतिधर्मानुसार, संपूर्ण चित्तशुद्धी हाच वैयक्तिक मोक्ष होय ! यालाच महात्मा गांधींनी 'आत्मदर्शन' किंवा 'ईश्वराचा साक्षात्कार' असे म्हटले आहे. वस्तुत: या मार्गात काही नवीन आहे असे नाही: सत्य व अहिंसा या सनातनधर्माचाच तो एक आविष्कार आहे; आणि बुद्ध, महावीर इ० भारता-तल्या धर्मोपदेशकांनी हा वैयक्तिक मोक्ष आपापल्या जीवनात प्रत्यक्ष आचरूनही दाखविला होता. "सत्य व अहिंसा हे पर्वतांइतके प्राचीन आहेत"[५] असे खुद्द गांधीजींनीच म्हटले आहे. जो 'वीतरागभयक्रोध' झाला त्याला ईश्वरप्राप्ती होते;––नव्हे, तो ईश्वर-स्वरूपच होतो असा सनातन हिंदु धर्माचा मुळी सिद्धांतच आहे. गीतेनेही—

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रित: ।
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागता: ॥[६]

या शब्दात हाच सिद्धान्त सांगितलेला आहे. अर्थात, सत्य, अहिंसा, संयम इ० यमनियमांच्या आचरणाने वैयक्तिक मोक्ष साधणे किंवा आत्मदर्शन प्राप्त करून घेणे हा मार्ग भारताला नवीन आहे असे नाही.

पण, गांधींची नवीनता अशी की, त्यांनी या वैयक्तिक मोक्षाचा उपयोग समाजाच्या उद्धारासाठी करून घेतला. आत्मदर्शनाचे तंत्र त्यांनी सामाजिक कल्याणाशी जोडून दिले व व्यक्तिजीवनातील मोक्षाची सफलता समाजजीवनात अनुभवण्याचा प्रयोग केला. वैयक्तिक मोक्ष साधणारे प्राचीन काळातील अनेक धर्मचिन्तक यतिमार्गी-निवृत्तिवादी–वनलेले आपल्याला दिसतात. भारतीय दर्शनपरंपरेतले बौद्ध, जैन यांच्या-सारखे धर्म-पंथ संन्यासावरच भर देणारे आहेत. वैयक्तिक मोक्ष साधणाऱ्या 'वीतरागी' आत्मवाद्यांचा कल समाजापासून दूर जाण्याचा, सामाजिक संघर्ष टाळण्याचा असतो. आत्मदर्शन हाच त्यांचा जीवनहेतू, तेच त्यांचे 'श्रेय' असते आणि त्यात यत्किंचितही बाधा येऊ नये म्हणून सर्वसंगपरित्याग हाच त्यांना गवसलेला सर्वश्रेष्ठ मार्ग असतो. कदाचित्, सामाजिक संघर्षात चित्ताची शुद्धता आणि समता टिकणे कठीण आहे याची त्यांना प्रतीती आली असेल व त्यामुळेही, आपल्या चित्तशुद्धीत व आत्मशांतीत व्यत्यय येऊ नये म्हणून, सामाजिक जीवनापासून निवृत्त होणे हा मार्ग त्यांना स्वीकार्य वाटला असेल. कारण काहीही असले तरी त्यामुळे, व्रताचरणाने शुद्ध झालेल्या त्यांच्या आत्म-दृष्टीचा लाभ समाजाला होऊ शकला नाही, त्यांनी साधलेल्या आध्यात्मिक उन्नतीला सामाजिक क्रांती

---

५. 'Truth and non-violence are as old as hills.'—A. M. B., P. 47.

६. भगवद्गीता, ४–१०.

करता आली नाही, त्यांच्या आत्मशक्तीला सामाजिक जीवनाची अंगे उजळून टाकता आली नाहीत, हे मात्र खरे! त्यांचा मोक्ष त्यांच्यातच विराम पावला! या मोक्षाने त्यांची वैयक्तिक उन्नती झाली असेल; पण समाज मात्र त्या उदात्ततेपासून, उत्थानापासून, उन्नतीपासून 'मुक्तच' राहिला. आत्मनिष्ठांच्या या सामाजिक पलायनवादामुळे समाज तर त्यांच्या आत्मशक्तीपासून वंचित झालाच, पण खुद्द त्यांचे स्वतःचेही धर्मजीवन सत्याच्या दृष्टीने एकांगीच राहिले! भारतीय संस्कृतीने आध्यात्मिक क्रांती खूप केली पण तिला सामाजिक क्रांती करता आली नाही याचे कारण हेच असावे, असे मला वाटते. वस्तुतः असे व्हायला नको होते. कारण उपनिषदातच मुळी—

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविशेच्छतं समाः।
एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे॥[७]

असे सांगितले आहे. तरीही, कर्मसंन्यासाचे मत नंतरच्या काही उपनिषत्कारांनी सुरू केले, बुद्धाने ते दृढ केले व बौद्धांचा पराजय करणारे 'ब्रह्मचर्यादिव प्रव्रजेत्'[८] म्हणणारे शंकराचार्यही त्याला कारणीभूत झाले. याचा परिणाम असा झाला की, समाज तर गाढ अंधारात शिरलाच, पण अलौकिक आत्मसामर्थ्याचे पुरुष 'त्याहून घोर अंधारात' शिरले!

म. गांधींनी मात्र आत्मदर्शन व सामाजिक उद्धार यांचा समन्वय साधला. पण, त्याला 'समन्वय' तरी कसे म्हणावे?—आत्मदर्शन हे त्यांच्या जीवनाचे अंतरंग आणि समाजसेवा व राजकारण हे त्यांच्या जीवनाचे बाह्यांग होते असेच म्हटले पाहिजे. कारण, वैयक्तिक मोक्ष आणि सामाजिक उद्धार यात गांधींच्या दृष्टीने फरकच नव्हता. समाजसेवा हा त्यांच्या व्यक्तिधर्माचा अपरिहार्य भाग, त्यांच्या वैयक्तिक मोक्षाचा अंगभूत आविष्कार होता. व्यक्तिधर्माची सांगता समाजधर्माशिवाय, किंवा आत्मशुद्धीची पूर्णता समाजशुद्धीशिवाय होऊ शकत नाही हे सत्य त्यांनी ओळखले होते. आत्मप्राप्ती ही नुसत्या चिंतनाने होणे शक्य नाही, समाजनिरपेक्ष असे आत्मचिंतन धर्मदृष्टचा एकांगी असते; म्हणून, आत्मदर्शनाचा प्रवाह समाजजीवनात खेळविण्याची, आत्मशक्तीने समाज 'कोंदाकोंदी' भरून टाकण्याची आणि त्याकरिता समाजाशी समरस होण्याची मानवाची सेवा करण्याची आवश्यकता आहे, असे त्यांचे मत होते. "मानवाच्या सेवेच्या द्वारा मी ईश्वराचे दर्शन घेण्याचा प्रयत्न करीत आहे. कारण, ईश्वर स्वर्गात नाही किंवा खाली पाताळातही नाही; तर तो मानवमात्रात भरलेला आहे हे मी जाणतो"[९] असे ते म्हणतात. आत्मदर्शनासाठीच व आत्मदर्शनातूनच गांधींच्या जीवनातील सर्व व्यापार, त्यांची प्रत्येक प्रवृत्ती आणि कृती उदित होत असे. फुलाला कितीही पाकळ्या असल्या तरी त्याचे सौरभ–सर्वस्व जसे त्याच्या मृदुसूक्ष्म अशा परागकणात साठलेले असते, तसेच गांधींच्या जीवनाला सामाजिक, राजकीय – अशी कितीही अंगे असली तरी त्यांचे मूळ त्यांच्या आत्मदर्शनाच्या तळमळीत, त्यांच्या जीवन–साधनेच्या रीतीत सामावलेले होते. आपण जे राजकारण करतो ते देखील स्वतःच्या मोक्षासाठीच करतो अशी त्यांची समजूत होती. "ज्याची मला कैक वर्षे आस लागून राहिली आहे, ते म्हणजे आत्मदर्शन होय, ईश्वराचा साक्षात्कार होय, मोक्ष होय. माझी सगळी हालचाल त्याच दृष्टीने होते. माझे लिहिणे–करणे सर्व याच दृष्टीने आहे आणि माझे राजकारणाच्या क्षेत्रात उडी घेणेही त्याच्याचकरिता आहे."[१०] असे गांधींनी म्हटले आहे. समाजातच अध्यात्माचा साक्षात्कार झाला पाहिजे अशी गांधींची निष्ठा असल्यामुळे त्यांनी समाजसेवेला जसे नीतिमूल्यांचे अधिष्ठान दिले होते तसेच, राजकारण हे आपल्यातील 'धर्मबुद्धीची वाढ' करण्याचे एक साधन आहे अशी त्यांची श्रद्धा असल्यामुळे त्यांनी राजकारणालाही धर्ममय बनविले होते. गांधी हे व्यवहारी तत्त्वज्ञ आणि राजकीय संत होते. धर्मविरहित राजकारणाला त्यांच्या दृष्टीने काहीच

७. ईशावास्य, २. ["इहलोकी कर्मे करीत करीतच शंभर वर्षे जगण्याची इच्छा धरावी. तुला देहवंताला हाच मार्ग आहे. याहून वेगळा मार्ग नाही. मनुष्याला कर्म चिकटत नाही, फल-वासना चिकटते."—विनोबाकृत भाषांतर]

८. बृहदारण्यकभाष्य, अ. ४, ब्रा. ५.

९. 'I am endeavouring to see God through service of humanity, for I know that God is neither in heaven, nor down below, but in every one'. 'Young India', 4 August 1927.

१०. गांधी–विचार–दर्शन (खंड ९); पृ. (१३).

किंमत नव्हती. गांधीजी हे ऐनवेळी गोंधळ करून सोडणारे एक धंदेवाईक राजकारणी आहेत असा त्यांच्यावर कित्येकदा आरोप केला जात असे. राजकारण हा रूढ अर्थाने एक धंदा आहे व या धंद्यात केवळ राजकीय नफातोटा किती झाला यावरून या धंद्याची यशस्विता किंवा अयशस्विता मापली पाहिजे, या सर्वसामान्य संकेतातून अशा प्रकारचे आरोप निर्माण होतात. गांधींनी राजकारणाकडे रूढ अर्थाने कधी पाहिलेच नाही; त्यांचे राजकारण त्यांच्या धर्मातूनच निर्माण होत असे. त्यांच्या राजकारणाचा आधार ईश्वराविषयी निष्ठा आणि मानवजातीविषयी प्रेम हाच होता. म्हणून, राजकारणात देखील 'रामराज्य' प्रस्थापित करण्याची आवश्यकता ते बोलून दाखवीत असत. अशा तऱ्हेचा राजकारणी पुरुष व्यावहारिक अशा सरकारी कामकाजात कदाचित् अयशस्वी ठरत असेल; पण आपल्या देशबांधवांच्या मनात मानवजातीच्या कल्याणाबद्दल व स्वातंत्र्याबद्दल दुर्दम्य अशी निष्ठा निर्माण करण्याच्या आणि सत्याच्या मार्गाने ध्येयप्राप्त्यर्थ आत्मबल उत्पन्न करण्याच्या कामात मात्र तो यशस्वी होत असतो. राजकीय स्वातंत्र्य हा या मार्गातील केवळ एक टप्पा, केवळ एक पथ–स्तंभ ठरतो. सत्य, अहिंसा, संयम इ० यमनियमांनी केवळ व्यक्तीचीच उन्नती साधते असे नसून समाज आणि राजकारण यांचीही उन्नती करण्याकरिता सत्य–अहिंसादि यमनियमांची जरूरी असते हे तत्त्व गांधींनीच प्रथम प्रत्यक्षात आचरून दाखविले. त्यांनी आत्मोद्धार हेच जगदुद्धाराचे साधन व जगदुद्धार हीच आत्मोद्धाराची सफलता मानली होती.

भारतातले प्राचीन तत्त्वचिंतक आणि म. गांधी यांच्यात मुख्य फरक हा होता की. गांधींच्या आत्मदर्शनात समाजनिरपेक्षतेला मुळी थाराच नव्हता. त्यांचे अध्यात्म, प्राचीन यतींप्रमाणे समाजनिरपेक्ष व म्हणून एकांगी नव्हते तर ते समाजाचे उत्थान घडवून आणणारे, समाजाला धर्ममय बनविणारे, प्रवृत्तिपर व लढाऊ असे होते. त्यांनी समाजात राहून समाजाला शुद्ध करण्याचा, आपल्या आत्मदर्शनात समाजाला सहभागी करण्याचा, असत्प्रवृत्तीशी सत्प्रवृत्तीने लढण्याचा अध्यात्ममय पण युयुत्सु मार्ग समाजाला दाखविला. प्राचीन धर्मविचारकांच्या निवृत्तिवादामुळे भारतातील आध्यात्मिक संस्कृती ही समाजक्रान्तीला जी पराङ्मुख झाली होती, तिला गांधींनी समाजोन्मुख केले. त्यांनी सत्य, अहिंसा इ० शाश्वत मूल्यांची केवळ व्यक्तिगत मोक्षासाठीच उपासना केली नाही तर त्यांच्या आधाराने सामाजिक अन्यायांचे आणि राजकीय पारतंत्र्याचे उन्मूलन करण्याचा अध्यात्ममय मार्ग जगाला दाखविला व त्याचे धुरीणत्वही स्वतः स्वीकारले. सत्य व अहिंसा यांचा समन्वय साधून, सत्याग्रहाच्या रूपाने, त्यांनी भारताच्या पुरातन आध्यात्मिक संस्कृतीला सामाजिक व राजकीय क्रांती करण्याचा एक नवाच मार्ग, एक नवाच युगधर्म दाखविला व या युगधर्माची दीक्षाही राष्ट्राला अनुष्ठानपूर्वक दिली.

–२–

संन्यास आणि कर्मयोग–धर्म आणि व्यवहार–यांचा समन्वय जुन्या धर्मग्रंथांनीही केलेला आहे. ईशावास्योपनिषदाने—

विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह ।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥११॥"

असे स्पष्ट सांगितलेले आहे. भगवद्गीता हा तर मुळी समन्वयात्मकच ग्रंथ आहे. ज्ञान आणि कर्म, सांख्य आणि योग, स्मार्त आणि भागवत, सिद्धावस्था आणि व्यवहार, आत्मिक आणि भौतिक जीवन, इतकेच नव्हे तर 'ब्रह्म' आणि 'निर्वाण'–अशा अनेक निष्ठांचे समन्वय भगवद्गीतेने प्रतिपादिलेले आहेत. भगवद्गीतेनेच मोक्ष आणि व्यवहार यांचा समन्वय साधण्याचा मोठा प्रयत्न केला आणि लोकसंग्रहातून मोक्षाचा मार्ग दाखवून दिला. खुद्द गांधीजींचेही मत "त्याने (गीताकाराने) मोक्ष आणि व्यवहार यांचे दरम्यान असा भेद राखलेला नाही. उलट धर्माला व्यवहारात उतरविले आहे" असेच होते.[१२] मग, आत्मदर्शन व सामाजिक उद्धार यांत एकत्व साधण्यात गांधींनी नवीन काय केले, असा प्रश्न उपस्थित होतो; आणि त्याचे उत्तर 'साध्य–साधनांचा अभेद' गांधींनी निरपवादपणे व निरपेक्षपणे प्रतिपादिला व प्रत्यक्षात आचरूनही दाखविला, असे

११. 'जाणीव आणि नेणीव, ह्या दोहोंसह, जे त्या आत्म–तत्त्वाला जाणतात, ते त्या आत्मतत्त्वाच्या आधारे, नेणिवेने मृत्यु तरून, जाणिवेने अमृत गाठतात' (विनोबाकृत भाषांतर).

१२. 'अनासक्तियोग', प्रस्तावना.

द्यावे लागते. गीतेत साध्यसाधनांचा निरपवाद अभेद नाही काय, असा पुन्हा एक प्रश्न इथे निर्माण होतो; आणि त्याचे उत्तर दोन प्रकारांनी द्यावे लागते : एक तर गीतेत साध्यसाधनांचा अभेद निरपवादपणे प्रतिपादिलेला आहे की नाही याबद्दल विचारवन्तांत मतभेद आहेत; आणि दुसरे असे की, गीतेने असे प्रतिपादन केलेले असले तरी, या तत्त्वाला निरपवादपणे प्रत्यक्ष कृतीत मात्र गांधींनीच पहिल्यांदा उतरविले. साध्य व साधन यांच्यात संपूर्ण तादात्म्य असावे असे गांधींचे मत होते व ते त्यांनी, व्यक्तिगत जीवनातच केवळ नव्हे तर सामाजिक आणि राजकीय जीवनातसुद्धा, प्रत्यक्ष आचरून दाखविले ही त्यांची या बाबतीतली नवीनता व विशेषता होय.

साध्य-साधनात अभेद असावा असे प्रायः सर्वच विचारक बुद्धीने प्रतिपादन करतात. पण प्रत्यक्ष आचरणाची वेळ आली की, साध्यप्राप्त्यर्थ साधनांना मुरड घालण्याची प्रवृत्तीही ज्ञानवान् कर्मयोग्यांत आढळते, असे इतिहासाचे दाखले आहेत. इतकेच तव्हे तर साध्याला डोळ्यांसमोर ठेवून, ते गाठण्याकरिता साधनांना मुरड घालणे हे धर्ममयच आहे असेही प्रतिपादन करण्याचा, साधनांच्या परिवर्तनाला साध्यसापेक्ष असे नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा प्रयत्नही अनेक आत्मज्ञानी पुरुषांनी व धर्मग्रंथांनी केलेला दिसतो. चित्ताची शुद्धता व समता टिकणे कठीण आहे म्हणून सामाजिक कर्तव्यांपासून निवृत्त होणाऱ्या संन्यासमार्गी यतींचा जसा एक पंथ, तसाच समाजात वागताना समाजाच्या अभ्युदयासाठी, अपवाद म्हणून का होईना, आत्म्याच्या शुद्धतेकडे कानाडोळा करणाऱ्या आत्मज्ञानी कर्मयोग्यांचा हा दुसरा पंथ आहे !

गीता आत्मज्ञानपूर्वक कर्मयोगाचा उपदेश करते व साम्यबुद्धी पुरुषाने, आत्मज्ञान झाल्यानंतरही, 'लोकसंग्रहार्थ' कर्मयोगाचेच आचरण करावे, असे प्रतिपादिते. पण, कर्मयोगाचे आचरण करीत असताना जर आत्मज्ञानी पुरुषाला, समाजाच्या कल्याणाकरिता, शाश्वत नीतिधर्मांना विसंगत असे वर्तन करणे अपरिहार्य झाले तर, अपवाद म्हणून त्याने ते करावे व त्यासाठी प्रायश्चित्त घ्यावे असेही, प्राचीन शास्त्रकारांनी सांगितले आहे. अर्थात, हे अपवाद करताना कर्त्याची दृष्टी समाजाच्या चिरंतन कल्याणावरच खिळलेली असावी व ते कल्याण साधण्याकरिताच त्याला, अशुद्ध साधनांचा स्वीकार, अपरिहार्यपणे करणे भाग पडलेले असावे. म्हणजे, नित्य नीतिधर्मांना अपवाद करताना बाह्य क्रियेपेक्षा त्या क्रियेला प्रवृत्त करणाऱ्या आंतरहेतूलाच, किंवा साधनापेक्षा साध्यालाच आत्मज्ञानी पुरुष महत्त्व देत असतो; किंबहुना, 'पूर्णापासून ढळलेले जग' 'पूर्णाकडे' नेण्याकरिताच तो नित्य नीतिधर्मांना अपरिहार्यपणे अपवाद करीत असतो, असे म्हटले पाहिजे. नीतिमत्ता ही जड कर्मात नसून ती कर्त्याच्या बुद्धीवरच अवलंबून असते या न्यायाने कर्माकर्मविवेचन करताना गीतेनेही कर्माच्या बाह्य फलापेक्षा कर्त्याच्या निष्काम, सम व निःसंग बुद्धीलाच अधिक महत्त्व दिले आहे. लो. टिळकांनी 'गीता-रहस्या'त याविषयी लिहिताना, अपूर्ण जगात पूर्ण पुरुषालाही जो अशुद्ध साधनांचा स्वीकार करावा लागतो तो विश्वाच्या पूर्णतेसाठीच होय असे प्रतिपादिले आहे; आणि साधनांची शुद्धता ठरविताना बाह्य क्रियेपेक्षा आंतरहेतूलाच खरे महत्त्व असते असे म्हटले आहे.

महाभारतातल्या 'विदुरनीती'तही या प्रश्नाची चर्चा आलेली आहे. विदुर धृतराष्ट्राला सांगतो—

> **अक्रोधेन जयेत्क्रोधं असाधुं साधुना जयेत् ।**
> **जयेत्कदर्यं दानेन जयेत् सत्येन चानृतम् ॥**[१३]
>
> — म. भा., उद्योग., ३९–७३, ७४.

शांतिपर्वात युधिष्ठिराला उपदेश करताना भीष्मांनीही—

> **कर्म चैतदसाधूनाम् असाधुन् साधुना जयेत् ।**
> **धर्मेण निधनं श्रेयो न जयः पापकर्मणा ॥**[१४]
>
> — म. भा., शान्ति, ९५–१६, १७.

अशी या नीतीतत्त्वाची महती गायिली आहे.

---

१३. 'क्रोधाला अक्रोधाने म्हणजे शांतीने जिंकावे; असाधूला म्हणजे दुर्जनाला साधुत्वाने जिंकावे (७३); कृपणाला दानाने जिंकावे आणि असत्याला सत्याने जिंकावे. . ' [भाषांतर: दा. सा. यंदे प्रकाशित उद्योगपर्व–पूर्वार्ध, पृ. १२७].

१४. 'दुष्टाच्या असाधु म्हणजे दुष्ट कृत्याचे साधुपणाने निवारण करावे; कारण, पापकर्माने मिळणाऱ्या जयापेक्षा धर्माने म्हणजे नीतीने मरण आले तर श्रेयस्कर होय.' [भाषांतर: लो. टिळक, गीता-रहस्य, पृ. ३६८].

अनुक्रमणिका

वरील व इतरही प्राचीन वचनांचा विचार करून लो. टिळक म्हणतात--" केव्हाही झाले तरी लोकसंग्रहार्थ दुष्टांचा निग्रह करणे, हे भगवंताप्रमाणे साधुपुरुषाचेही धर्मदृष्टचा पहिले कर्तव्य होय. 'साधुपणाने दुष्टावा जिंकावा' या वाक्यातही दुष्टाव्याचा जय किंवा निवारण करणे हे साधुपुरुषाचे मुख्य कर्तव्य आहे ही गोष्ट पहिल्याने गृहीत धरूनच, मग तत्सिद्धयर्थ प्रथम उपाय कोणता योजावा याचे निदर्शन केले आहे."[१५]

— आणि लगेच टिळक म्हणतात, "साधुपणाने निवारण होणे शक्य नसेल तर जशास तसे होऊन दुष्टाचे निवारण करू नये, त्याच्या दुष्ट कृत्यास खुशाल बळी पडावे, असे आमच्या धर्मग्रंथकारांनी कोठेही प्रतिपादन केलेले नाही." आपल्या या म्हणण्याच्या पुष्टचर्थ प्राचीन ग्रंथांतील वचनेही टिळकांनी सादर केलेली आहेत. "अक्रोधेन जयेत् क्रोधं —" हे नीतितत्त्व ज्या विदुराने धृतराष्ट्राला सांगितले त्या विदुरानेच मुळी "यस्मिन्यथा वर्तते यो मनुष्यस्तस्मिंस्तथा वर्तितव्यं स धर्मः। मायाचारो मायया वर्तितव्यः साध्वाचारः साधुना प्रत्युदेयः"[१६] — 'ज्याच्याशी जो मनुष्य जसा वागतो त्याच्याशी त्याने तसे वागावे, हा धर्म आहे. कपटाने वागणाराशी कपटाने वागावे, आणि भलेपणाने वागणाराशी भलेपणाने वागावे' असेही एक नीतितत्त्व धृतराष्ट्राला सांगून ठेवले आहे!

सारांश, सर्वभूतहित हेच आत्मज्ञानी पुरुषांचे कार्य असते व दुष्टाव्याचा प्रतिकार साधुपणाने होणे शक्य असले तर प्रथम तो साधुपणानेच करावा, हाच धर्म आहे. पण, साधुपणा जर कोणत्याही कारणाने पुरी पडत नसेल तर प्रसंगविशेषी व नाईलाज म्हणून, सर्वभूतहित साधण्यासाठीच, आत्मज्ञानी पुरुषाला जर अपरिहार्यपणे अशुद्ध साधनांचा पोशाख स्वीकारावा लागला व 'जशास तसे' या न्यायाने वागावे लागले, तर तेवढ्याने त्याची समत्वबुद्धी डागळली जात नाही किंवा विश्वाला पूर्णावस्थेकडे नेण्याचे त्याचे कार्य बाधित होत नाही, असा टिळकांच्या एतद्विषयक प्रतिपादनाचा इत्यर्थ आहे. म्हणजे, साध्यप्राप्तीकरिता शुद्धच साधनांचा वापर करावा, तोच परम धर्म आहे असे टिळकांचे मत होते; पण टिळकांनी या नित्यधर्माला अपवादही मानलेले आहेत व हा अपवाद-मार्ग गौण किंवा प्रायश्चित्तार्ह असला तरी साम्यबुद्धीचे प्रामाण्य व समाजाच्या पूर्णावस्थेचे ध्येय जर त्याला लाभले असेल तर तो आचरणीय आहे, असे आपले मतही व्यक्त केले आहे. निराकार परब्रह्म अवतार धारण करते त्यासारखेच हे आहे!

म. गांधींना मात्र बाह्य क्रिया व आंतरहेतू यांच्यातली फारकत यत्किंचितही मान्य नव्हती. साधन व साध्य यांत त्यांच्या दृष्टीने फरकच नव्हता. साधन व साध्य एकच आहेत, अभिन्न आहेत, तदात्म आहेत; व म्हणून, साधन जर अशुद्ध असेल तर त्यातून चांगले साध्य निष्पन्नच होणार नाही अशी त्यांची निष्ठा होती. "साधन हे बीज आहे, साध्य हे झाड आहे. अर्थात् बीजाचा आणि झाडाचा जसा संबंध तसाच आणि तितकाच संबंध साधन आणि साध्य यांच्यात आहे. सैतानाची भक्ती करून ईश्वरभजनाचे फळ मिळणे शक्य नाही" असे गांधीजी म्हणतात.[१७] पुण्यकर्माचा परिपाकसुद्धा मूलतः साधनाच्या शुचितेवरच सर्वस्वी अवलंबून असतो. अगदी स्वार्थनिरपेक्ष, फलाशारहित कर्माचीही साधना जर असत्य आणि हिंसा यांनी युक्त असेल तर ते पुण्यकर्म या पदवीला पात्र होऊच शकणार नाही. म्हणून, लोकसंग्रहासाठी व अपरिहार्य म्हणूनही, आत्मज्ञानी पुरुषाने हिंसा व असत्याचरण यांचा स्वीकार करू नये, अशी गांधींची विचारसरणी होती. "ज्याप्रमाणे शंकराचार्यांच्या नावावर जीव-ब्रह्म-अद्वैत चालतो, त्याचप्रमाणे गांधीजींचा मुख्य विचार साधन-साध्य-अद्वैत असल्याचा मला भास होतो" असे या बाबतीत विनोबांनी म्हटले आहे.[१८]

वस्तुतः आत्मज्ञानी पुरुषांच्या बाबतीत साध्य आणि साधन असा प्रश्नच उद्भवू नये. कारण, जेथे व्यवहार हा आसक्तीपूर्वक व स्वार्थमूलक होतो तेथेच, विशिष्ट फलांच्या मोहाने, मनुष्य साधनांचा विधिनिषेध बाळगीत नाही. पण, आत्मज्ञानी पुरुषांचे सर्व व्यवहार केवळ सत्यप्राप्तीसाठी व पूर्ण अनासक्तीने होत असल्यामुळे अशा व्यवहारात अशुद्ध साधनांचा

---

१५. गीतारहस्य (आ. ८वी, १९६३), पृ. ३६८.
१६. महाभारत : उद्योगपर्व, ३७–७.
१७. गांधी-विचार-दर्शन, (खंड ४); पृ. ४५.
१८. 'साम्ययोग', सप्टेंबर १९६८.

उपयोग करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अंतर्बाह्य शुचिता कशी असते हे ज्ञानदेवांनी एका सुंदर दृष्टान्ताने सांगितले आहे —

> ... निर्वालुनि कनकें । भरिला गंगापीयूखें
> तेया कलशाचें सारिखें । शौचासि गा ॥
> जें आंगि निष्कामु आचारु । जीवि विवेकु साचारु
> सबाह्य जाण आकारु । शुचित्वाचा ॥[१९]

'शुद्ध बावनकसी सोन्याचा कलश घासून पुसून स्वच्छ करावा आणि तो गंगोदकाच्या अमृताने भरावा तशी ही अंतर्बाह्य शुचिता असते. निष्काम कर्माचे बाह्य आचरण आणि अंतरी विवेकाचा प्रकाश म्हणजेच अंतर्बाह्य शुचितेचा आकार होय.' अशा पुरुषाच्या बाबतीत साधन हेच साध्य होऊन बसते. त्याच्या दृष्टीने साधनातच साध्य सामावलेले असते. ध्येय-प्राप्तीचा सारा मार्ग, ध्येयप्राप्तीची सुरुवातीपासून शेवटपर्यंतची सारी क्रिया हा ध्येयप्राप्तीचाच भाग नसतो का ? ध्येयाच्या मार्गावर उचललेले प्रत्येक पाऊल म्हणजे ध्येयप्राप्तीचाच अंश असतो. अमूर्त अशा साध्याचे दृश्यस्वरूप म्हणजेच साधन होय !

अर्थात, समाजाच्या अभ्युदयावर दृष्टी ठेवूनसुद्धा, अपवादामुळे व अपरिहार्यतेमुळे का होईना, असत्य व हिंसा यांचा जो स्वीकार करावा लागतो तो आत्मज्ञानी पुरुषाच्या आत्मशुद्धीला कलंकित केल्याशिवाय, त्याच्या आत्मदर्शनात बाधा निर्माण केल्याशिवाय राहत नाही. कारण, असत्य व हिंसा या केवळ जड, शारीरिक क्रिया नाहीत; ते आत्म्याचे धर्म आहेत. व म्हणून कितीही शुद्ध हेतू मनात बाळगून अशुद्ध मार्गाचे आचरण केले तरी ते आत्मशुद्धीला कलंकित केल्याशिवाय राहत नाही. शिवाय, 'आत्मवत्सर्वभूतानि' या ज्ञानी पुरुषाच्या भूमिकेला ते सर्वथैव विसंगत आहे. कारण, प्राणिमात्राशी 'मद्भावा'ने वागण्याचे जे ज्ञानी पुरुषांचे कार्य, त्या कार्यालाच मुळी अशुद्ध साधनांच्या वापराने धक्का बसतो. आपल्याला जे प्रतिकूल वाटते तसे वर्तन इतरांबरोबर केले तर 'समदर्शित्व' कुठे राहिले ? आणखी असे की, मनुष्यातील श्रेष्ठ वृत्ती जागृत करणे, लोकांना अधिकाधिक सत्यनिष्ठ व प्रेममय बनविणे आणि अन्ती समाज पूर्णावस्थेला नेणे हे जे आत्मज्ञानी पुरुषांचे कार्य, ते अशुद्ध साधनांच्या वापराने कसे साधेल ? आत्मज्ञानी पुरुषाने जर अशुद्ध साधनांचा वापर केला तर ते त्याच्या 'समदृष्टी'ला तर विसंगत व विघातक होईलच; पण लोकांच्या हृदयात सत्यनिष्ठा व प्रेम निर्माण करण्याचे आणि खरे व शाश्वत समाजहित साधण्याचे, म्हणजे समाज पूर्णावस्थेला नेण्याचे कार्यही त्याला करता येणार नाही. उत्तम साध्यासाठी अशुद्ध साधनांचा उपयोग केला तर अशुद्ध साधनाचा रंग उत्तम साध्यात उतरल्याशिवाय, व त्यामुळे साध्यही कलुषित झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून, जगाला पूर्णावस्थेला नेण्याचा खरा उपाय शुद्ध साधनांचा वापर करून व आग्रह धरून जगातील अपूर्णता नाहीशी करीत राहणे हाच आहे. अर्थात, जगाच्या कल्याणासाठी देखील, अशुद्ध साधने वापरण्याचा हक्क कोणाही साधकाला नाही. कशीही परिस्थिती आली तरी—

> आकाश हें ओसरो । पृथिवी वर वीरो
> परि नेणे मोहरों । चित्तवृत्ती ॥[२०]

अशा खंबीर 'चित्तवृत्ती'ने साधनांच्या शुचितेला चिकटून राहणे हेच आत्मज्ञानी पुरुषांचे खरे कर्तव्य ठरते.

म. गांधी हे साध्य-साधनांचे पूर्ण अद्वैत मानणारे होते. याला विरोधी भासणारे उल्लेख गांधी-विचारात अगदी आढळतच नाहीत असे नाही. 'Young India' च्या दि. ४-११-१९२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या अंकात, विशिष्ट परिस्थितीत, समाजाच्या विशिष्ट अवस्थेत, विशिष्ट प्रकारची हिंसा करणे मनुष्याचे-अहिंसाधर्मी मनुष्याचेही-कसे कर्तव्य ठरते याची गांधींनी मीमांसा केली आहे. या लेखात गांधी म्हणतात —

> "......Even man-slaughter may be necessary in certain cases. Suppose a man runs amuck and goes furiously about sword in hand and killing anyone that comes his way, and no one dares to capture him alive. Any one who dispatches this lunatic, will earn the gratitude of the community and be regarded a benevolent man.
>
> From the point of view of Ahimsa it is the plain duty of every one to

१९. ज्ञानेश्वरी (रा०), १६-१९४,१९५.

२०. ज्ञानेश्वरी (रा०) १३-४९४.

kill such a man. There is indeed one exception if it can be so called. The yogi who can subdue the fury of this dangerous man may not kill him. But we are not dealing with beings who have almost reached perfection; we are considering the duty of the society, of the ordinary erring human beings."२१

भाषान्तर--" . . .काही बाबतीत मनुष्य-हिंसा देखील आवश्यक ठरू शकते. कल्पना करा की, रागाने बेफाम झालेला एक मनुष्य हातात तरवार घेऊन मार्गात येईल त्याला ठार करीत सुटला आहे आणि त्याला जिवंत पकडावयास कोणीही धजत नाही. जो कोणी या माथेफिरूचा समाचार घेईल त्याला समाज परोपकारी समजेल व त्याला समाजाची कृतज्ञताही मिळेल.

अहिंसा-दृष्टीने अशा मनुष्याला ठार मारणे हे प्रत्येकाचे स्पष्ट कर्तव्य आहे. यालाही तसेच म्हटले तर एक अपवाद आहे. एखादा योगी जर या घातक मनुष्याचा उन्मत्तपणा शांत करू शकेल तर त्याने त्याला मारू नये. पण, जवळजवळ पूर्णावस्थेस पोचलेल्या विभूतींचा आपण विचार करीत नसून सामान्य प्रमादी मनुष्यांच्या व समाजाच्या कर्तव्यासंबंधीच आपण विचार करीत आहोत."

—यावरून, समाजाच्या अपूर्णावस्थेत अपूर्ण व्यक्तीला समाजहितासाठी अपरिहार्य म्हणून, इतर मार्ग नाहीसे झाल्यावर, हिंसा करावी लागते व ती करणे या व्यक्तीचे या परिस्थितीत कर्तव्य ठरते, असे गांधींचे मत होते.

लो. टिळक व म. गांधी यांच्या साध्यसाधन-विचारांची तुलना केली तर असे दिसते की, टिळक आणि गांधी यांच्यात सिद्धावस्थेच्या बाबतीत काहीच फरक नव्हता. परमावधीचे नीतिधर्म हे दोघांनाही तात्त्विक दृष्टया सारखेच मान्य होते. या नीतिधर्मांचे शुद्ध स्वरूप ज्या समाजात पूर्णपणे प्रतीत होईल असा सत्यनिष्ठ व प्रेममय समाज निर्माण करणे, म्हणजे समाज पूर्णावस्थेला नेणे, हे आत्मज्ञानी पुरुषांचे कार्य आहे असेच दोघांचेही मत होते. हे कार्य आत्मज्ञानी पुरुषाने शुद्ध बुद्धीनेच व 'आत्मवत्सर्वभूतेषु' अशा आत्मौपम्य दृष्टीनेच केले पाहिजे यावद्दलही त्यांच्यात मतभेद नव्हता. चित्तशुद्धी याचा खरा अर्थ, स्वार्थबुद्धी सुटून ब्रह्मात्मैक्य ओळखणे हा आहे, हे दोघांनाही सारखेच मान्य होते. सारांश, टिळक आणि गांधी यांच्या आध्यात्मिक नीतिशास्त्रात किंवा तत्त्वज्ञानात फरक नव्हता. त्यांच्यात जो काही फरक आपल्याला दिसतो तो फक्त आचारधर्मात दिसतो ! पूर्णावस्थेतून व्यवहारात उतरले म्हणजे अत्युच्च धर्माधर्मात थोडाबहुत फरक करावा लागतो असे टिळकांचे मत होते. पण येथेही लक्षात ठेवले पाहिजे की, "आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन्"– 'आततायी मनुष्य धावून आला तर त्याला काही विचार न करता मारावे' या मनुस्मृतीतील उपदेशा-प्रमाणे टिळकांचे मत नव्हते; तर दुष्टाव्याचा प्रतिकार आधी साधुपणानेच करावा, दुष्टाव्याचा प्रतिकार करण्याचा सर्वश्रेष्ठ मार्ग साधुपणा हाच आहे,– तोच धर्म आहे; पण, साधुपणाने दुष्टाच्या दुष्ट कृत्याचे निवारण होत नसेल तर, लोकसंग्रहार्थ अपरिहार्य म्हणून, 'कंटकेनैव कंटकम्' या न्यायाने त्याचे निवारण करावे, असे टिळकांचे मत होते. अशा प्रसंगी करावी लागणारी हिंसा ही धर्म्य आहे व म्हणून या हिंसेने अहिंसेच्या आत्म्याचा भंग होत नाही, किंवा अहिंसा-धर्मात प्रत्यवाय येत नाही अशी टिळकांची समजूत होती. याला '**लोकमान्यांचा अहिंसाधर्म**' म्हणावयास हरकत नाही. दुष्टाने केलेली निरुपद्रवी लोकांची हिंसा आणि अहिंसाधर्माचे पालन करणाराने केलेली दुष्ट हिंसकाची हिंसा या दोहोत टिळकांच्या दृष्टीने फरक होता. म. गांधींनीही, सामान्य प्रमादी मानवांच्या समाजात अपूर्ण व्यक्तीला समाजहितासाठी सर्व मार्ग थकल्यावर अपरिहार्य म्हणून हिंसा करावी लागते, व ही हिंसा ही त्या परिस्थितीत अहिंसेच्याही दृष्टीने त्या व्यक्तीचे कर्तव्य ठरते असे म्हटले आहे.

याचा अर्थ, टिळक आणि गांधी यांच्या वर्तन-तत्त्वांत फरक नव्हता असा नव्हे ! टिळकांनी, आत्मज्ञानी पुरुषाच्याही दृष्टीने, नित्य नीतिधर्मांना, अपरिहार्य म्हणून का होईना, अपवाद मानलेले आहेत. म. गांधी यांनी वरील उदाहरणात जो अपवाद सांगितलेला आहे तो अपूर्ण पुरुषाचा आहे. तो सिद्ध

---

२१. 'Young India', 1924-26, P. 969.

पुरुषाने स्वीकारावयाचा आचार नव्हे ! उलट, एखादा योगी जर त्या हिंसक व्यक्तीचा बेफामपणा शांत करू शकेल तर त्याने त्याला मारू नये, अहिंसेनेच त्याचे निवारण करावे असे गांधीजी म्हणतात. 'अक्रोधेन जयेत् क्रोधम्–' हा मार्ग सर्वश्रेष्ठ आहे, समाजाच्या पूर्णावस्थेत तो अपवादरहित व नित्य रूपाने अस्तित्वात राहील हे तात्त्विक दृष्ट्या टिळकांनाही मान्य होते. किंबहुना, 'समाजाच्या अपुऱ्या अवस्थेतही पुष्कळ प्रसंगी शांततेने जे काम होते ते रागाने होत नाही.[२२] असे टिळक म्हणतात. पण, साम्यबुद्धी पुरुषाच्याही दृष्टीने समाजाच्या अपूर्णावस्थेत याला अपवाद करावे लागतात व 'जशास तसे' हे धोरण स्वीकारावे लागते, असे टिळकांचे मत होते. म. गांधी मात्र आत्मज्ञानी पुरुषाच्या दृष्टीने, समाजाच्या अपूर्णावस्थेतसुद्धा, नित्य नीतिधर्मांना अपवाद मानावयाला तयार नव्हते. हाच या दोन महापुरुषांमधला महत्त्वाचा फरक आहे, असे मला वाटते.

'अक्रोधेन जयेत् क्रोधम्–' हे नीतितत्त्व टिळकांनी आपले आचार–तत्त्व म्हणून गृहीत केलेले नव्हते. गांधींनी मात्र हे नीतितत्त्व हेच आपले साधन, हेच आपले आचरण-तत्त्व, आच आपला आचार–मार्ग म्हणून स्वीकारला होता. टिळक आणि गांधी यांच्या अहिंसाधर्मात तत्त्वतः फरक नसताना त्यांच्या आचारधर्मात हा फरक कां पडला?—याची चार कारणे संभवतात.

(१) भारताच्या राजकीय स्वातंत्र्याकरिता लढत असताना त्या राजकीय लढ्याच्या प्राप्त परिस्थितीत 'अक्रोधेन जयेत् क्रोधम्–' या नीतितत्त्वानुसार केलेले आचरण पुरे पडत नाही याचा टिळकांना अनुभव आला असावा. व त्या परिस्थितीत अपरिहार्य म्हणून 'जशास तसे' या वर्तनतत्त्वाचा स्वीकार करणे भाग आहे असे त्यांना वाटले असावे.

(२) टिळक हे आधी राष्ट्रवादी व नंतर मानवतावादी तर गांधी हे आद्यन्ती मानवतावादी होते. टिळकांच्या सर्व क्रिया राष्ट्रवादातून व भारताच्या राजकीय स्वातंत्र्याकरिताच घडत होत्या तर गांधींचा सर्व आचार मानवतावादातूनच प्रस्फूर्त झालेला होता. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व ते मी मिळवीनच' हा जो महामंत्र टिळकांनी राष्ट्राला दिला त्याचे मूलकारण टिळकांचा हा राष्ट्रवादच होय! टिळक आदर्शवादी होते हे खरे; पण त्यांचे प्रथम ध्येय भारताचे राजकीय स्वातंत्र्य हे होते. स्वराज्याच्या अभावी बाकी सर्व व्यर्थ आहे, अशी त्यांची भावना होती. उलट, म. गांधी हे राष्ट्रभावनेपेक्षा मानवतेला अधिक महत्त्व देणारे होते. मानवतेच्या सेवेकरिता आपल्या राष्ट्राचा जरी बळी द्यावा लागला तरी गांधींची त्याला मान्यता होती.[२३]

(३) टिळक हे आदर्शवादी असले तरी आधी वस्तुनिष्ठ व नंतर आदर्शनिष्ठ तर गांधी हे व्यवहारकुशल असले तरी सुरुवातीपासून अखेरपर्यंत आदर्शनिष्ठ होते.

(४) टिळक आणि गांधी यांच्यावेळच्या सामाजिक अस्मितेतील व सामाजिक परिस्थितीतील फरक हाही या दोघांच्या आचारधर्मात फरक पडावयाला काही प्रमाणात कारणीभूत आहे.

--३--

सत्य हाच गांधींचा परमेश्वर व अहिंसा हा त्या सत्याकडे जाण्याचा मार्ग होता. 'ईश्वर म्हणजे सत्य' असे म्हणण्यापेक्षा 'सत्य हाच ईश्वर' असे गांधीजी म्हणत असत. "सत्यापरता नाही धर्म। सत्य तेचि **परब्रह्म**" किंवा "सत्य तू सत्य तू सत्य तू **विठ्ठला**"[२४] असे आपल्या संतकवींनीही म्हटले आहे.

ईश्वर हा प्रेममय असतो या समजुतीनुसार "ईश्वर म्हणजे प्रेम" असेही म्हणता येईल. पण, 'प्रेम' या शब्दाला अनेक अर्थ असू शकतात व प्रेम हे व्यक्तीगणिक बदलू शकते किंवा कमीअधिकही असू शकते. विकार या अर्थानेही 'प्रेम' हा शब्द

२२. गीतारहस्य, पृ. ३६३.

२३. "..a country has to be free in order that it may die, if necessary, for the benefit of the world. My love, therefore, of nationalism or my idea of nationalism is that my country may become free, that if need be the whole of the country may die, so that the human race may live."—'Gandhiji in Indian Villages', P. 170.

२४. तुकाराम.

वापरला जाऊ शकतो व या अर्थाने मनुष्याचे प्रेम अव-नतीकारक देखील असू शकते. पण सत्याच्या बाबतीत तसे नाही. "सत्याच्या बाबतीत दोन अर्थ मला कधी आढळले नाहीत" असे गांधीजी म्हणतात.[२५] म्हणून 'ईश्वर म्हणजे प्रेम' यापेक्षाही 'ईश्वर म्हणजे सत्य' असेच म्हणणे गांधींना सयुक्तिक वाटते.

शिवाय असे की, ईश्वर न मानणारे लोक जगात असू शकतात. हिंदु धर्मातच मुळी चार्वाकादिकांचे पंथ ईश्वराचे अस्तित्व नाकारणारे म्हणून गाजून गेलेले आहेत. पण, सत्याच्या बाबतीत तसे म्हणता येणार नाही. 'सत्य' या शब्दाचा मूळ अर्थ पाहिला तरी ही गोष्ट लक्षात येईल. 'सत्' या संस्कृत शब्दाचा अर्थ 'असणे' असा आहे. 'जे (अस्तित्वात) आहे ते सत्य.' आणि म्हणूनच, जे (अस्तित्वात) आहे ते नाकारणारा म्हणजे सत्य न मानणारा, ज्याला जसे प्रतीत होईल तसे का होईना, पण सत्य न मानणारा माणूस जगात आढळणार नाही. ईश्वर न मानणाऱ्यांकडूनही सत्याच्या अस्तित्वाविषयी, आवश्यकतेविषयी किंवा सामर्थ्या-विषयी शंका घेण्यात आलेली नाही. सत्य शोधून काढण्याच्या भरात काही दार्शनिक आणि विचारवन्त हे ईश्वराच्या अस्तित्वाविषयी साशंक झालेले आहेत आणि काहींनी तर ईश्वराचे अस्तित्वच मुळी नाकारलेले आहे! किंबहुना, ईश्वराचा अभाव हेच त्यांच्या दृष्टीने सत्य ठरले!–ईश्वराचा शोध घेण्याचा त्यांचा प्रयत्न संपला, पण सत्याचा शोध घेण्याचा मात्र त्यांचा प्रयत्न अविरत चालूच राहिला. भयंकर गुन्हे करून समाज-व्यवस्था उत्सन्न करून सोडणारे गुन्हेगारही ईश्वर मानणार नाहीत कदाचित्, पण त्यांना सत्याचा मात्र आश्रय घ्यावाच लागतो. आपल्या टोळीतील परस्परां-बद्दल विश्वास, आपसात केलेल्या तोंडी करारमदारांची परिपूर्ति–इत्यादि रूपांनी ते सत्याचेच पालन करीत असतात, असे म्हटले पाहिजे. "सर्वं सत्ये प्रतिष्ठितम्" किंवा "सर्वं सत्येन वर्धते" असे सांगून महाभारत-कारांनी सत्याचे सर्वश्रेष्ठत्वच प्रतिपादन केलेले आहे.– या निरनिराळ्या दृष्टींनी विचार केला तर सत्य हे ईश्वरापेक्षाही श्रेष्ठ ठरते. आणि म्हणून, 'ईश्वर म्हणजे सत्य' असे न म्हणता 'सत्य हाच ईश्वर' असे गांधींनी जे म्हटले, ते यथार्थ वाटते.

सत्य म्हणजे काय? या प्रश्नाचे निश्चित उत्तर मात्र गांधींनी दिलेले नाही. 'अंतरातील आवाज तुला जे सांगतो ते सत्य समज'[२६] असे गांधींचे यावर उत्तर आहे. पण, यावर आक्षेप असा येऊ शकतो की, निरनिराळे लोक निरनिराळ्या सत्यांचे प्रतिपादन करू शकतात; व प्रत्येक जण 'माझेच सत्य आहे; कारण माझा अंतरात्मा मला असेच सांगतो' असे म्हणू शकतो. अशा परिस्थितीत एकाला जे सत्य वाटेल तेच दुसऱ्याला असत्य वाटू शकेल, म्हणजेच सत्यासत्यात परस्परविरोध निर्माण होऊ शकेल. अशा अवस्थेत खरे सत्य,––ज्याला गांधीजी पूर्ण सत्य (the Absolute Truth) किंवा चिरंतन तत्त्व (the Eternal Pirnciple) म्हणतात ते,— कसे ओळखावे? या प्रश्नाला मात्र गांधींनी नि:संदिग्ध उत्तर दिलेले नाही. ते एवढेच म्हणतात––"ज्यांच्या-मध्ये पुरेपूर नम्रता नाही अशा कोणालाही सत्य सापड-णार नाही एवढेच मी तुम्हाला खरोखर नम्र भावाने सांगू शकेन. सत्यसागराच्या पृष्ठभागावर तुम्हाला तरंगत राहावयाचे असेल तर तुम्हाला शून्यवत् झाले पाहिजे."[२७]

सत्य म्हणजे काय, याचे उत्तर असे देता येईल की जो पूर्ण अनासक्त झाला, त्याच्या आत्म्याला जे प्रमाण वाटते ते सत्य! पूर्ण निरासक्त माणसाला खोटे बोलावेसे वाटणार नाही. कारण, फलासक्ती असल्याखेरीज खोटे बोलण्याचा मोहच होणार नाही. आसक्तीतूनच असत्याचा जन्म होत असतो. म्हणून, आसक्तीचे संपूर्ण निर्मूलन हाच असत्याचे निर्मूलन करण्याचा खरा मार्ग आहे. कोणत्याही असत्याच्या मुळाशी फलप्राप्तीची आसक्तीच वास करीत असते. म्हणून, वासनाभाव हाच सत्याच्या शोधनाचा व प्राप्तीचा खरा उपाय ठरतो.

सारांश, 'पूर्णपणे निरासक्त झालेल्या मनुष्याच्या आत्म्याला जे प्रमाण वाटते ते सत्य' असे म्हणावयास

---

२५. "I never found a double meaning in connexion with truth." Yong India, 31 Dec. 1931.

२६. 'गांधीजींचे मानस' (अनुवादक : अण्णा-साहेब सहस्रबुद्धे, मा. पु. लिमये; जानेवारी १९४९) पृ. २२.

२७. गांधीजींचे मानस, पृ. २२.

हरकत असू नये. अशा माणसाच्या केवळ वाचेतच सत्य असणार नाही तर त्याच्या विचारात आणि आचारातदेखील सत्य अवतरेल. अर्थात, सत्य हे प्रत्येक मानवी हृदयात वसत असते व तेथेच प्रत्येकाने त्याचा शोध घेतला पाहिजे. मानवी हृदयातच सत्याचा उगम व त्याची परिणतीही असते. ते ओळखण्याकरिता व्रताची मात्र आवश्यकता आहे, व हे व्रत म्हणजे पूर्ण आसक्तीचे व्रत होय! वासनाशून्य होऊन आत्मानुभूतीसाठी धडपड करणे व ती करीत असताना 'अंतःकरणप्रवृत्ती'ला जे प्रमाण वाटेल त्याचे निर्भयपणाने आचरण करणे हाच सत्याच्या शोधनाचा एकमेव मार्ग आहे. या मार्गाने जाणाराला सत्याचे जसे दर्शन होईल, तसे त्याने आचरण मात्र ठेवले पाहिजे. कारण, सत्याचे दर्शन प्रत्यक्ष, साकार स्वरूपात होणे तर कधीच शक्य नाही, ते क्रियेच्याच रूपाने होत असते. सत्याच्या शोधकाचे आचरण हेच त्याला झालेल्या सत्याच्या दर्शनाचे प्रत्यक्ष स्वरूप होय. हे आचरण करीत असताना त्याच्यावर कितीही संकटे कोसळली तरी त्याने आपल्या मार्गापासून रेसभरही ढळता कामा नये. हा मार्ग कठीण, अत्यंत दुर्घट, तरवारीच्या धारेसारखा तीक्ष्ण आहे खरा; पण, 'आता कोण पाहे मागे परतोनि'[२८] अशा निष्ठेने व निर्धाराने त्याने याच मार्गाची कास धरली पाहिजे. एकदा या मार्गाला लागल्यावर

> **न मिळो खावया न वाढो संतान ।**
> **परि हा नारायण कृपा करो ।।**
> **ऐसी माझी वाचा मज उपदेशी ।**
> **आणीक लोकांसी हेचि सांगे ।।**
> **विटंबो शरीर होत कां विपत्ति ।**
> **परि राहो चित्तीं नारायण ।।**[२९]

अशा वृत्तीनेच त्याने आचरण केले पाहिजे. सत्याकडे,– पूर्ण सत्य या चिरंतन तत्त्वाकडे–जाण्याचा हाच एक मार्ग आहे.

अर्थात्, हे सत्य समाजनिरपेक्ष नसते हे मुद्दाम लक्षात घ्यायला हवे. सत्य हे सर्वव्यापक तत्त्व आहे. त्यामुळे सत्याच्या शोधकाला व उपासकाला जीवनातून निवृत्त होता येणार नाही. जीवनाच्या कोठल्याही क्षेत्रातून त्याला बाजूला राहता येणार नाही. सारे जगच, मनुष्यमात्राचे सारे जीवन–जीवनाची सर्व अंगोपांगे–सत्याच्या अधिकाधिक जवळ नेण्याची, सत्याने 'कोंदाकोंदी' भरून टाकण्याची त्याने धडपड केली पाहिजे; जीवनाचा अणुरेणू सत्याच्या प्रकाशाने उजळून काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. "सत्यावर असलेल्या माझ्या भक्तीच्या योगाने मी राजकारणाच्या क्षेत्रात खेचला गेलो आहे"[३०] असे गांधीजी जे म्हणतात, त्याचेही मर्म हेच होय !

आता यावर एकच शंका घेता येईल : माणसाला पूर्ण सत्याचे आकलन झाले असे केव्हा म्हणावे ? आणि ते होतपर्यंत त्याच्या कल्पनेत येणाऱ्या सापेक्ष सत्यालाच तो पूर्ण सत्य समजणार नाही का ?— यावर उत्तर असे की, पूर्ण सत्याचे दर्शन घेण्याचा हाच एक मार्ग आहे. वासनाशून्य होऊन आत्म्याच्या प्रेरणेनुसार व प्रामाण्यानुसार आचरण करणे यापरता सत्याच्या शोधनाचा दुसरा मार्ग नाही. मात्र, जोपर्यंत संपूर्ण सत्याची अनुभूती आलेली नाही तोपर्यंत आपल्या कल्पनेत येणाऱ्या सापेक्ष सत्यालाच पक्के चिकटून राहिले पाहिजे. हे सापेक्ष सत्य इतरांच्या सत्या-संबंधीच्या कल्पनेहून भिन्नही असेल. पण, पूर्ण सत्याचा उपासक इतरांना प्रतीत झालेल्या सत्याचा अधिक्षेप करणार नाही किंवा सत्यासंबंधीच्या आपल्या कल्पनेप्रमाणेच इतरांनी वागले पाहिजे अशी जबर-दस्तीही करणार नाही. कारण, सत्य हे असत्यालाही धिक्कारीत नसते. ते असत्याला स्वतःच्या तेजाने प्रकाशमय करते आणि स्वतःसारखे बनवून सोडते. सूर्य हा अंधाराचाही 'मित्र' असतो. अशा रीतीने, वासनाशून्य माणसाच्या आत्म्याला प्रतीत झालेले सत्य हेच अन्ती पूर्ण सत्य ठरते. पूर्ण सत्याची प्राप्ती होत-पर्यंत ते सापेक्ष सत्य हाच त्याचा या मार्गावरील दीपस्तंभ आहे. या दीपस्तंभाच्या प्रकाशात मार्गक्रमण केल्यानेच त्याला सत्य–सूर्याचे दर्शन होईल.

–४–

"सत्याचे संपूर्ण दर्शन अहिंसेच्या पूर्णानुभूती-नंतरच होणे शक्य आहे"[३१] असे गांधीजी म्हणतात.

---

२८. तुकाराम.

२९. तुकाराम–गाथा (सरकारी प्रत), अ० ५४७.

३०. गांधीजींचे मानस, पृ. २५.

३१. गांधीजींचे मानस, पृ. २४.

सत्याशिवाय ईश्वर नाही व अहिंसेशिवाय धर्म नाही, अशी गांधींची धारणा होती. 'सत्य आणि अहिंसा हे माझे श्वासोच्छ्वास आहेत' असेही गांधीजी म्हणत असत.

'अहिंसा' या शब्दाचा गांधींचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. 'अहिंसे'चा केवळ शब्दार्थच पाहिला तर तो 'हिंसेचा अभाव' असा होतो. पण, गांधींना 'अहिंसे'चा केवळ एवढाच अर्थ मान्य नव्हता. शब्दाच्या अर्थापेक्षाही, तो शब्द ज्या भावनेचे प्रतीक व प्रतिबिंब आहे ती भावना गांधींना अपेक्षित होती. त्यामुळे, त्यांच्या दृष्टीने, 'अहिंसा' म्हणजे नुसता हिंसेचा अभाव (Non-violence) नव्हे; अहिंसा म्हणजे सार्वभौम प्रेमाचे सनातन जीवनतत्त्व ! सत्याप्रमाणेच तेही स्वयंभू आणि शाश्वत आहे. अहिंसेचा पर्याय प्रेम, सद्भाव आणि प्रेमाचा अर्थ अहिंसा ! अहिंसा ही केवळ अभावात्मक वृत्ती नाही; अत्यंत कार्यप्रवण, पराकाष्ठेची क्रियाशील अशी ती शक्ती आहे. म्हणून, अहिंसक होण्यास माणसाने हिंसा करता कामा नये एवढेच पुरेसे नाही; त्याने अकारण, अकृत्रिम, निरपेक्ष प्रेम केले पाहिजे. प्रतिपक्षाला मारण्याचे बळ अंगात असूनही त्याला न मारणे एवढीच काही अहिंसा नव्हे, शारीरिक बळाला शारीरिक बळाने उत्तर न देणे एवढाच त्याचा अर्थ होईल. अहिंसा याहून पुढे जाते. प्रतिपक्षाच्या शारीरिक बळाचे नव्हे, तर त्याच्या हृदयातील दुष्टतेचे प्रेमाने सद्भावनेत रूपान्तर करते तेव्हाच अहिंसा सार्थक ठरते.

अहिंसेला जगात कोणी दुष्ट दिसतच नाही. सुष्ट-दुष्ट अशा कोटी (Categories) अहिंसेच्या दृष्टीने अस्तित्वातच नसतात. तिला सर्वजण सुष्टच दिसतात. अर्थात्, दुष्ट देखील तिला स्वकीयच वाटतात. 'विनाशायच दुष्कृताम्' नव्हे, 'आत्मवत् सर्वभूतेषु' अशी तिची वृत्ती असते. 'दुष्कृतांचा विनाश' हा अहिंसेचा बाणा नव्हे, दुष्कृत्यांचा प्रतिकार, दुष्प्रवृत्तींचे निर्मूलन हे तिचे ब्रीद आहे. गांधींनी या बाबतीत गीतेचा अर्थ थोडा बदलवून टाकला आहे. "मामनुस्मर युद्धच" यातील 'युद्ध' शब्दाचा अर्थ वाढवून 'सत्याग्रह' हा युद्धाचाच एक प्रकार आहे हे त्यांनी जसे दाखवून दिलें, तसेच "विनाशायच दुष्कृताम्" याचाही अर्थ, दुष्टाच्या दुष्टपणाचा नाश करा पण दुष्टाचा नाश करू नका, असा त्यांनी नवीन लावला आहे. दुष्ट मनुष्यातील दुष्टतेचे, पापी माणसाच्या हृदयातील पापवृत्तीचे प्रेमाने परिवर्तन केले की तिथे सत्प्रवृत्तींची प्रतिष्ठापना होणारच व मग दुष्ट मनुष्यच अस्तित्वात राहणार नाही, अशी या प्रेम-धर्माची धारणा आहे. म्हणूनच, गांधींना दुष्टाव्याविषयी तिरस्कार तर होताच, पण दुष्टाविषयी जिव्हाळा त्यापेक्षाही अधिक होता. अन्यायाविषयी चीड तर होतीच, पण अन्यायी माणसाविषयी आत्मीयता त्याहूनही अधिक होती.... गांधींनी दुष्टाव्याच्या निवारणात दुष्टाविषयीच्या आत्मीयतेचे अमृत ओतले.

अहिंसा दुष्ट माणसाचेही संरक्षण करते. कशी?— त्याच्यातली दुष्टता नाहीशी करून, त्याच्यातली मानवता जागृत करून ! दुष्टाला वाचवायचे तर त्याच्यातल्या दुष्टतेचे परिवर्तन करणे प्राप्त आहे. हे परिवर्तन करणारा प्रेम-धर्म म्हणजे अहिंसा. जे प्रेम कसल्याही प्रकारची अपेक्षा करीत नाही किंवा ज्या प्रेमाला कोणत्याही प्रकारचे कारण लागत नाही, तर जे प्रेम केवळ दुसऱ्याच्या दुष्टतेचा किंवा शत्रुत्वाचा मोबदला म्हणून पुढे करण्यात येते, ते अत्यंत पवित्र आणि प्रभावी असते. हे प्रेम दुष्टाच्या हृदयातील दुष्टतेचे संशोधन व निवारण करून तिथे स्वतःची संस्थापना केल्याशिवाय राहत नाही. ते दुष्टाच्याही अंतःकरणात स्वतःचा भाव जागृत केल्यावाचून स्वस्थ बसत नाही. दुष्टाच्याही हृदयात या प्रेमाचा पुनर्जन्म होत असतो. प्रेम प्रेमास जन्म देते ते असे ! गांधींच्या साधनेत यालाच 'हृदयपरिवर्तन' म्हणतात.

हृदयपरिवर्तन म्हणजे दुष्टाच्या हृदयातील दुष्टतेचा नाश, अहिंसेच्या द्वारे सत्याची पूजा ! सर्व प्रकारच्या संघर्षांचे मूळ मानवी हृदयातच आहे. जगात चाललेले व जगाला विनाशाकडे खेचीत असलेले सर्व प्रकारचे संघर्ष हे खरोखरी राजकारणातले किंवा अर्थकारणातले नसून ते मानवाच्या मनातील सत् आणि असत् या प्रवृत्तींतीलच संघर्ष आहेत. सर्व संघर्षांचे उगमस्थान व त्यांची अंतिम सीमाही मानवी हृदय हीच आहे. जग आज अंतिम सीमेपर्यंत पोचले आहे. गांधी जगाला आंतरिक सीमेच्या प्रारंभाकडे नेऊ इच्छित होते. संघर्षानेच शांती मिळेल असे जगाला वाटते, संघर्षशून्य होण्यातच खरे सुख आहे अशी गांधींची भावना होती. अंताकडून उगमाकडे जाण्याचा उलट प्रवास जग करीत आहे; गांधी उगमाकडून अंताकड

जाण्याचा नैसर्गिक प्रवाह अनुसरीत होते. मनुष्याच्या हृदयातील सताने असतावर मिळविलेल्या विजयानेच जगातली सर्व दुःखे, विषमता, अशांती विलयाला जाईल व जगात शाश्वत सुख नांदेल. याकरिता सर्व जीव-मात्राला एकत्र जोडणाऱ्या अंतर्गत शक्तीला–प्रेमाला–गांधींचे आवाहन होते. "अहिंसाप्रतिष्ठायां तत् सन्निधौ वैरत्यागः"–'अहिंसा प्रतिष्ठित झाली की तिच्या सान्निध्यात वैरभाव टिकत नाही'–या पतंजलीच्या सूत्रातील न्यायानुसार, खऱ्या प्रेमाची स्थापना झाली की जगातून वैरभाव नाहीसा होईल व जगाला चिरंतन सुख मिळाल्याशिवाय राहणार नाही, असा गांधींचा विश्वास होता. या प्रेमाला 'वैषम्याची वार्ता'-ही नसते. ज्ञानदेवांच्या शब्दात सांगायचे तर—

जो सर्वं भूतांचा ठांइं । द्वेषातें नेणे काहिं
आप परु नाहिं । चैतन्या जैसा ।।
उत्तमातें धरिजे । अधमाते अव्हेरिजे
हें काहि चि नेणिजे । वसुधा जेवि ।।
रायाचें देह चालूं । रंकातें परउतें गालूं
हें नेणेचि कृपालू । प्राणु पैं गा ।।
गाइची तृषा हरूं । व्याघ्रा विष होउनि मारूं
हें नेणे चि करूं । तोय जैसें ।।
घरिचिया उजियेड करावा । पारखेयां आंधारु होआवा
हें न म्हणे चि पांडवा । दीपु जैसा ।।[३२]

अशी त्याची अवस्था असते.

गांधींच्या अहिंसेवर भ्याडपणाचा आरोप केला जात असे. पण, गांधींची अहिंसा ही भित्र्याची अहिंसा नव्हे ! स्वतःला वाचविण्यासाठी किंवा स्वतःच्या भित्रेपणावर पांघरूण घालण्यासाठी पत्करलेला तो मुखवटा नव्हे. हा तपश्चर्येचा मार्ग आहे. हिंसेचा आणि असत्याचा मार्ग सोपा असल्यामुळे व कमी किंमत मोजून तो पदरात पडणारा असल्यामुळे बुद्धी पुष्कळदा अनिच्छेनेदेखील तोच मार्ग स्वीकारते व त्याला तत्त्वज्ञानाचा मुलामाही देते. अहिंसा ही हिंसेलाही पोटात घेणारी, तिलाही पवित्र करणारी असते. अहिंसा आणि भित्रेपणा यांचे साहचर्य नाही. हिंसा भित्रेपणातून निर्माण होते, अहिंसा निर्भयतेला जन्म देते. खरी अहिंसा ही वीरांची तपश्चर्या आहे; ते भित्रेपणाचे, दुबळेपणाचे, निष्क्रियतेचे लक्षण नव्हे !

३२. ज्ञानेश्वरी (रा.) १२, १४३–१४७.

हिंसा जन्माला का येते ?–आपलेच खरे आहे असा ज्याला अहंकार असतो पण त्यावरोबरच विवेकाशी झगडताना आपण विजयी होऊ अशी ज्याला खात्री नसते तो विवेकाला दावून टाकतो, अविवेकाच्या कह्यात जातो, अविवेकातून संताप आणि भीती यांचा उद्भव होतो आणि भीतीमुळे तो हिंसेचा आश्रय घेतो. विवेकाशी झगडण्याचे धैर्य ज्याच्यात नसते तो भित्राच हिंसेचे हत्यार उपसतो. प्रतिपक्षाला आपले म्हणणे मान्य करायलाच लावले पाहिजे या अहंकाराने व प्रतिपक्षी कदाचित आपल्यावर मात करील या धास्तीने तो बेभान होतो. या धास्तीमुळे डावपेच व दुष्ट वासना त्याच्या हृदयात थैमान घालतात व परिणामी तो हिंसेला प्रवृत्त होतो. भित्रेपणाच्या वृत्तीतून हिंसेची कृती जन्माला येते.

हिंसेला हिंसेने उत्तर दिले तर हिंसा कधीच संपत नाही, पाशवी शक्तीचा प्रयोग चालूच राहतो आणि त्यामुळे उन्नतीचा मार्ग मुळातच बंद होतो. कारण, हिंसकाची हिंसा केली तर त्या दुष्टाची सुधारणा होण्याची शक्यता मूळातच खुंटते; बरे, त्याची हिंसा न करता त्याला शासन करून जिवंत ठेवले तरी त्या दुष्टाच्या मनात भय आणि भीतीतून उद्भवणारी हिंसावृत्ती ही कायमच राहते. म्हणजे व्यक्तीच्या काय किंवा समाजाच्या काय, सुधारणेचा मार्ग हिंसेने मुळातच खुंटतो. अहिंसेचे असे नाही. ती हिंसकाच्या हृदयातील प्रेमाचा स्पर्श करते, तेथील 'अविवेकाची काजळी' झाडून टाकते, त्याचेही हृदयपरिवर्तन करते..

गांधींना हिंसेचा तर तिटकारा होताच, पण भित्रेपणाचा त्याहून तिटकारा होता. "जेथे भ्याडपणा व हिंसा या दोहोंतच निवड करावयाची असेल तेथे मी हिंसेचा सल्ला देईन",[३३] "हिंसा किंवा भ्याडपणे पळ काढणे या दोहोत मी हिंसाच पसंत करीन"[३३] असे गांधींनी वारंवार सांगितले आहे. गांधींनी हिंसेपेक्षाही हिंसेला प्रवृत्त करणाऱ्या भीतीचा जास्त निषेध केलेला आहे. हिंसेच्या कृतीपेक्षा ती घडविणाऱ्या चित्ताच्या भ्रष्टतेवर गांधींचा जास्त कटाक्ष आहे. कारण, भित्रा मनुष्य पळून गेला तरी मानसिक हिंसा करतोच ! तो पळून जातो याचे कारण मारता मारता मरण्याचे धैर्य त्याच्यापाशी नसते, हेच होय. अहिंसेची निर्मिती भीतीच्या विरुद्ध भावनेतून–निर्भयतेतून–होते. अहिंसेचा

३३. गांधीजींचे मानस, पृ. ५४.

मार्ग हा विवेकाचा, आत्मक्लेषाचा, तपश्चर्येचा मार्ग आहे. तो आत्मशक्तीचा प्रभाव आहे. गांधींनी म्हटले आहे—" ज्या ऋषींनी भोवताली हिंसा चालू असताना अहिंसेचा धर्म शोधून काढला ते न्यूटनहूनही अलौकिक बुद्धीचे पुरुष होते, वेलिंग्टनपेक्षाही फार मोठे योद्धे होते. त्यांना स्वतःला शस्त्राशस्त्रविद्या अवगत असूनही तिचे वैयर्थ त्यांच्या लक्षात आले आणि संत्रस्त जगाला त्यांनी अशी शिकवण दिली, की जगाची मुक्ती हिंसेच्या मार्गाने होणार नाही, तर अहिंसेच्याच द्वारा होईल."[३४]

हे अहिंसा-तत्त्व गांधींनी नवीन सांगितले आहे असे नाही. वेदाइतके ते प्राचीन आहे. यज्ञसंस्था ही प्राचीन काळापासून अस्तित्वात असली व यज्ञात पशु-हिंसाही होत असली तरी यज्ञात होणाऱ्या हिंसेचा अनेक ऋषींनी वारंवार निषेध केलेला आहे; आणि त्यावरोबरच अहिंसा व तत्संबद्ध असलेले चिरंतन सत्य यांचाही आवेशाने पुरस्कार केला आहे. 'अहिंसा सत्य-मक्रोधो...धर्म एष सनातनः',[३५] 'न तत्परस्य सन्दध्यात्प्रतिकूलं यदात्मनः एष संक्षेपतो धर्मः',[३६] 'न पापे प्रतिपापः स्यात्——साधुरेव सदा भवेत्',[३७] 'निर्वैरः सर्वभूतेषु',[३८] 'कृध्यन्तं न प्रतिकृध्येत्',[३९] 'अहिंसा परमोधर्मः' इत्यादि प्राचीन धर्मग्रंथांतील वचनांत अहिंसा हाच परमधर्म आहे असा अहिंसेचा महिमा गायिलेला आढळतो. महाभारताच्या शांतिपर्वात तर अहिंसेचे सर्वांगीण विवेचनही करण्यात आलेले आहे. इतकेच नव्हे तर महाभारतातील गोव्याघ्रसंवादात अहिंसावृत्तीने वाघाचेही हृदयपरिवर्तन झाल्याची कथा आहे. वेद, स्मृती, महाभारत यांच्याप्रमाणेच जैन आणि बौद्ध धर्मग्रंथ व संतवाङ्मय यांच्यातही अहिंसेचे श्रेष्ठत्व जागोजाग वर्णन केलेले दिसते. मग गांधींनी या बाबतीत नवीन काय केले?— गांधींनी केले ते असे की, पूर्वी केवळ व्यक्तिगत जीवनातच जी अहिंसा प्रतिष्ठित होती, ती साऱ्या समाजाला लावून दाखविली. अहिंसेचे तत्त्व व्यक्तिजीवनातून समाजजीवनात व राजकीय जीवनात प्रसृत करणारे गांधी हे मानवी इतिहासात पहिलेच आहेत. अहिंसा हा व्यक्तिधर्मच नसून समाजधर्म आहे हे गांधींनीच पहिल्यांदा सिद्ध करून दाखविले. इतरांनी वैयक्तिक उद्धाराचा म्हणून जो मार्ग सांगितला तोच जगाच्या उद्धारासाठी सामाजिक व राजकीय कार्यक्रम म्हणून गांधींनी पुरस्कृत केला व मानवतेच्या सेवेचा, मानवजातीच्या कल्याणाचा एक नवाच जीवन-धर्म प्रवर्तित केला.

सत्य आणि अहिंसा ही गांधींनी नवीन शोधून काढलेली नाहीत. ती सनातनकाळापासून मानवी हृदयात आहेतच. गांधींनी ती ओळखायला व त्यांच्या प्रेरणेनुसार वागायला शिकविले,— व्यक्तिगत जीवनातच नव्हे, समाजजीवनातसुद्धा ! सत्याग्रह हे गांधींनी राजकीय स्वातंत्र्याकरिता अस्तित्वात आणलेले 'तंत्र' नव्हे, मानवाच्या हृदयात असलेल्या ईश्वराला ओळखण्याचा व मानवमात्राच्या उद्धाराकरिता आचरणात आणावयाचा तो 'मंत्र' आहे.

सत्य-अहिंसेचे तत्त्व साऱ्या समाजजीवनात प्रसृत करून मानवतेच्या सेवेचा, शाश्वत सुखाचा मार्ग गांधींनी जगाला दाखविला, ही त्यांची केवढी अपूर्वता आणि अनन्यता !

---

३४. "The *rishis* who discovered the law of non-violence in the midst of violence, were greater geniuses than Newton. They were themselves greater worriors than Wellington. Having themselves known the use of arms, they realized their uselessness and taught the weary world that its salvation lay not through violence, but through non-violence." —'Young India', 11-8-20.

३५. अनुशासनपर्व, १६२-२३.

३६. अनुशासनपर्व, ११४-८.

३७. वनपर्व, २०६-४४.

३८. भगवद्गीता, ११-५५.

३९. मनुस्मृति, ६-४८.

निष्कर्ष

आतापर्यंत केलेल्या विवेचनाचे प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे सांगता येतील—

(१) गांधीवाद नावाचा एखादा 'वाद'-ism-किंवा एखादी 'शास्त्रीय' विचारपद्धती अस्तित्वात नाही. ती एक 'जीवनसाधना' आहे;——जीवनासारखीच अखंड गतिमान्, अविरत सृजनशील असलेली व म्हणून कुठल्याही 'वादा'च्या किंवा तार्किक 'दर्शना'च्या चौकटीत बसू न शकणारी जीवनसाधना !

(२) सत्य व अहिंसा हीं पर्वतांइतकी प्राचीन आहेत आणि तीं आपल्या व्यक्तिगत जीवनात आचरणारे ऋषिमुनीही पुरातन कालापासून भारतात अस्तित्वात आहेत; पण गांधींची अपूर्वता व गांधी-साधनेची अपरूपता अशी की त्यात व्यक्तिधर्म आणि समाजधर्म यांचे अद्वैत होते.

(३) वीतरागी आत्मवाद्यांचा कल समाजापासून दूर राहण्याचा असल्यामुळे त्यांच्या व्रताचरण-शुद्ध आत्मदृष्टीचा लाभ समाजाला होऊ शकला नाही, त्यांच्या आध्यात्मिक उन्नतीला सामाजिक उद्धार करता आला नाही. म. गांधींनी मात्र 'सत्याग्रहा'च्या रूपाने भारताच्या पुरातन अध्यात्म-संस्कृतीला सामाजिक व राजकीय क्रांती करण्याचा एक नवाच मार्ग, एक नवाच युगधर्म दाखविला व त्या युगधर्माची दीक्षाही राष्ट्राला अनुष्ठानपूर्वक दिली.

(४) साध्य व साधन यांच्यात संपूर्ण तादात्म्य असावे यावर गांधींचा विशेष कटाक्ष होता.

(५) वस्तुतः आत्मज्ञानी पुरुषांच्या बाबतीत साध्य आणि साधन असा प्रश्नच उद्भवू नये !

(६) पूर्णावस्थेतून व्यवहारात उतरले म्हणजे अत्युच्च धर्माधर्मात थोडाबहुत फरक करावा लागतो असे लोकमान्य टिळकांचे मत होते. अर्थात, पूर्ण पुरुषालाही अपूर्ण जगात जो अशुद्ध साधनांचा स्वीकार करावा लागतो तो विश्वाच्या पूर्णतेसाठीच होय; आणि साधनांची शुद्धता ठरविताना बाह्य क्रियेपेक्षा आंतर-हेतूलाच--निष्काम, सम व निःसंगबुद्धीलाच--खरे महत्त्व असते, असे टिळकांनी प्रतिपादन केले आहे.

(७) टिळक आणि गांधी या दोघांचेही तत्त्वज्ञान सारखेच होते.

(८) फरक होता तो दोघांच्या वर्तन-तत्त्वात ! साम्यबुद्धी पुरुषाच्याही दृष्टीने समाजाच्या अपूर्णा-वस्थेत, समाजाच्या पूर्णावस्थेकरिताच, परमावधीच्या नीतिधर्मांना अपवाद करावे लागतात असे टिळकांचे मत होते; तर गांधी मात्र आत्मज्ञानी पुरुषाच्या दृष्टीने, समाजाच्या अपूर्णावस्थेतसुद्धा, नित्य नीतिधर्मांना अपवाद मानावयाला तयार नव्हते. हाच या दोन महापुरुषांमधला महत्त्वाचा फरक आहे.

(९) हा फरक पडण्याचे प्रमुख कारण असे की, टिळक हे आदर्शवादी (Idealistic) असले तरी आधी वस्तुनिष्ठ (Realist) व नंतर आदर्शनिष्ठ, तर गांधी हे व्यवहारकुशल असले तरी सुरुवाती-पासून अखेरपर्यंत आदर्शनिष्ठ (Idealist) होते.

(१०) सत्य हाच गांधींचा ईश्वर आणि अहिंसा हा त्या ईश्वराकडे जाण्याचा मार्ग होता. 'ईश्वर म्हणजे प्रेम' असे म्हणण्यापेक्षा 'ईश्वर म्हणजे सत्य'; व 'ईश्वर म्हणजे सत्य' असे म्हणण्यापेक्षा "सत्य हाच ईश्वर" असेच म्हणणे अधिक यथार्थ आहे.

(११) पूर्णपणे निरासक्त झालेल्या मनुष्याच्या आत्म्याला जे प्रमाण वाटते ते सत्य; व त्याचे निर्भयपणाने आचरण करणे हाच सत्याच्या शोधनाचा, पूर्ण सत्याकडे जाण्याचा मार्ग !

(१२) सत्याग्रह हे गांधींनी राजकीय स्वातंत्र्याकरिता अस्तित्वात आणलेले 'तंत्र' नव्हे, मान-वाच्या हृदयात असलेल्या ईश्वराला ओळखण्याचा व मानवमात्राच्या उद्धाराकरिता आचरणात आणावयाचा तो 'मंत्र' आहे.

(१३) अहिंसा म्हणजे केवळ हिंसेचा अभाव (Non-voilence) नव्हे, तर अहिंसा म्हणजे सार्वभौम प्रेमाचे सनातन जीवनतत्त्व ! अकारण, अकृत्रिम, निरपेक्ष प्रेम म्हणजे अहिंसा ! अहिंसा ही अभावात्मक वृत्ती नाही; अत्यंत कार्यप्रवण, पराकाष्ठेची क्रियाशील अशी ती शक्ती आहे.

(१४) अहिंसेचे तत्त्व फार प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात आहे. पण, ते व्यक्ति-जीवनातून समाजजीवनात व राजकीय जीवनात प्रसृत करणारे गांधी हे मानवी इतिहासात पहिलेच होत. हीच गांधींची अपूर्वता आणि अनन्यता !

---

१५ सप्टेंबर १९६९

युगवाणी

अनुक्रमणिका

गांधीजी–एक थोर शिक्षणशास्त्रज्ञ

—प्रा. म. बा. कुंडले

[महात्मा गांधींच्या थोरवीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी जीवनाच्या एकाच किंवा काही विशिष्ट अंगांचाच विचार न करता संपूर्ण व समग्र जीवनाचा विचार केला आहे. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, धर्म इत्यादी क्षेत्रांमध्ये तर त्यांच्या प्रतिभेने अवगाहन करून अत्यंत मूलगामी असे सिद्धांत मांडले आहेतच. परंतु कला, साहित्य, स्त्रिया, आरोग्य अशा विषयांवरही विचारमंथन करून मौलिक मार्गदर्शन केले आहे. शिक्षण हाही विषय त्यांनी दृष्टिआड केला नाही. उलट शिक्षणावर सखोल चिंतन करून अतिशय शास्त्रशुद्ध असे शैक्षणिक सिद्धांत प्रतिपादन केले व एका अभिनव व सर्वस्वी भारतीय अशा शिक्षणपद्धतीला जन्म दिला. त्यांच्या शैक्षणिक सिद्धांतांचा व शिक्षणपद्धतीचा परिचय करून देणे हे या लेखाचे उद्दिष्ट आहे.]

पार्श्वभूमी—

गांधीजींच्या शैक्षणिक विचारांचा परिचय करून घेण्यापूर्वी तत्कालीन प्रचलित शिक्षणाचे स्वरूप काय होते हे पाहणे आवश्यक ठरेल. कारण ही पार्श्वभूमी समजून घेतल्याशिवाय गांधीजींच्या शिक्षणविषयक कल्पनांचे महत्त्व व क्रांतिकारकत्व यथार्थ रीतीने उमगणार नाही. इंग्रजांनी या देशात रूढ केलेल्या शिक्षणपद्धतीचे स्वरूप केवळ पुस्तकी होते. कारकून तयार करण्यापलीकडे त्याची काही उपयोगिता नव्हती. या शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनाशी–जीवनविषयक गरजांशी काही संबंध नव्हता. चरितार्थसंपादनाचे प्राथमिक उद्दिष्टही त्यातून साध्य होऊ शकत नव्हते. अभ्यासक्रमात विशिष्ट विषयातील माहिती व ज्ञान देण्यावरच भर असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या भावनात्मक व नैतिक विकासाकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत होते. तसेच शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असून ते मूठभर सुशिक्षित वर्गापुरतेच मर्यादित होते. त्यामुळे समाजात सुशिक्षित व अशिक्षित, बुद्धिजीवी व श्रमजीवी असे दोन वर्ग निर्माण झाले होते. तात्पर्य, शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये केवळ बाबूगिरी व गुलामगिरीची मनोवृत्ती वाढत होती. स्वावलंबन, चारित्र्यसंवर्धन, राष्ट्रीय वृत्ती, भारतीय संस्कृती याबद्दल आदर व अभिमान इत्यादी प्रवृत्तींच्या विकासाला त्या शिक्षणात मुळीच वाव नव्हता.

देशाचा विकास घडवून आणायचा असेल, लोकांच्या अंतःकरणात आत्मविश्वास व स्वतंत्र मनोवृत्ती निर्माण करायची असेल तर शिक्षणपद्धतीमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे अत्यावश्यक आहे हे गांधीजींनी ओळखले, व त्यांनी आपले लक्ष शिक्षणावर केंद्रित केले.

मूलोद्योग शिक्षणपद्धती

१९३७ साली सेवाग्रामला त्यांनी आपले शिक्षणविषयक विचार एक परिषद घेऊन तज्ज्ञांसमोर मांडले. आचार्य विनोबा भावे, काका कालेलकर, बाळासाहेब खेर, डॉ. झकीर हुसेन आदी मंडळी या वेळी हजर होती व त्यांच्याबरोबर चर्चा करून गांधीजींनी आपली शिक्षणयोजना सादर केली. हीच मूलोद्योगी शिक्षणपद्धती या नावाने ओळखली जाते. या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे—

(१) ७–१४ वयोमर्यादेतील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण. सक्तीचे करून ते विनामूल्य देण्यात यावे.

(२) शिक्षणाचे ध्येय हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे असावे.

(३) शिक्षणात केवळ पुस्तकी शिक्षणावर भर न देता, हस्तव्यवसायाला प्राधान्य द्यावे. एवढेच नव्हे तर त्या हस्तव्यवसायाच्या माध्यमातून निरनिराळे विषय समवाय पद्धतीने शिकविले जावेत.

(४) शिक्षणाचे माध्यम मातृभाषा हे असावे.

(५) शिक्षण हे स्वाश्रयी (self-supporting) असावे, म्हणजे हस्तव्यवसायातून विद्यार्थी ज्या वस्तू तयार करतील त्या विकण्यात याव्या, व त्या उत्पन्नातून शाळेचा काही खर्च-निदान शिक्षकांचा पगार तरी भागला जावा.

हा झाला मूलोद्योग पद्धतीचा स्थूल आराखडा. परंतु त्या योजनेत जी महत्त्वाची शैक्षणिक तत्त्वे अनुस्यूत झाली आहेत ती समजून घेतल्याशिवाय या शिक्षणपद्धतीचे खरे स्वरूप व गांधीजींच्या विचारांची मौलिकता स्पष्ट होऊ शकणार नाही. म्हणून या तत्त्वांचा अधिक सविस्तरपणे विचार करू.

शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकास

शिक्षण म्हणजे साक्षरता हा संकुचित अर्थ गांधीजींना मान्य नव्हता. ते म्हणतात, " Literacy is not the end of education, not even the beginning of it. By education I mean, an all-round drawing out of the best in man-body mind and spirit " व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अशा सर्व प्रकारच्या सुप्त शक्तींचा परमोच्च व परिपूर्ण आविष्कार म्हणजे शिक्षण. शिक्षण म्हणजे केवळ बौद्धिक वा ज्ञानविकासही नव्हे. तत्कालीन शिक्षणाचे दोष दाखविताना त्यांनी एका ठिकाणी म्हटले आहे, 'It ignores the culture of the heart and the hand, and confines itself simply to the head.' केवळ 'writing' 'reading' व 'arithmetic' या '3 rs' चाच नव्हे तर 'head' 'hand' व 'heart' या '3 hs' चा विकास म्हणजे सर्वांगीण विकास. व हेच खरे शिक्षण ! वरील व्याख्येत वा या '3 h' मध्ये बुद्धीसोबतच शरीरसंवर्धन, क्रियाशीलता, स्वावलंबन, आवडीनिवडी, विविध मानसिक प्रवृत्ती, अभिरुची, नीतिमत्ता चारित्र्य संवर्धन, सामाजिकता, राष्ट्रीयत्व, धार्मिक वृत्ती इत्यादी सर्व अंगोपांगांचा अंतर्भाव होऊन जातो. सर्वच आधुनिक शिक्षणशास्त्रज्ञांनी 'संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास' (development of the total personality) हे शिक्षणाचे खरे ध्येय म्हणून पुरस्कारिले आहे.

वरील व्याख्येतील 'drawing out' हाही शब्द फार महत्त्वाचा आहे. कारण या संज्ञेत शिक्षणप्रक्रियेचे मर्म प्रगट झाले आहे. शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या डोक्यात बाहेरून काही भरणे, कोंबणे (filling in) ही कल्पना चुकीची आहे. 'education' या शब्दातील मूळ शब्द 'educere' हा असून त्याचा अर्थ 'to lead out' असा आहे. पेस्टॅलॉजी व फ्रोबेल या शिक्षणशास्त्रज्ञांनी शिक्षणप्रक्रियेचे स्पष्टीकरण करताना बीजातून निर्माण होणाऱ्या वृक्षाच्या रूपकाचा आधार घेतला आहे. प्राचीन भारतीय शिक्षणविचारातही विकासासंबंधी हाच दृष्टिकोण दिसून येतो. यावरून गांधीजींची शिक्षणाची व्याख्या कशी परिपूर्ण व शास्त्रशुद्ध आहे हे समजू शकते.

ज्ञान व कर्म यांचे अद्वैत

गांधीजींच्या शिक्षणपद्धतीत अंतर्भूत झालेले दुसरे महत्त्वाचे शैक्षणिक मूल्य म्हणजे त्यांनी शिक्षणात कृतीला दिलेले अनन्यसाधारण महत्त्व ! मानस शास्त्रज्ञांच्या मते क्रियाशीलता (activity) ही मुलांमध्ये असलेली महत्त्वाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. परंतु दुर्दैवाने शाळांमध्ये तिला चालना तर मिळत नाहीच उलट ती दडपली जाते. क्रियाशीलतेच्या माध्यमातूनच मुलांना आत्माविष्काराची संधी मिळत असते, त्यांच्यातील सर्जनशीलता व कार्यक्षमता यांचा विकास होत असतो. म्हणूनच रुसोपासून ते मॉंटेसरीपर्यंत सर्वच शिक्षणशास्त्रज्ञांनी कृतिपरतेचा पुरस्कार केला आहे. 'कृतीतून शिक्षण' (Learning by doing)

हे आधुनिक शिक्षणाचे घोषवाक्य वनले आहे. कृतीचे महत्त्व विशद करताना गांधीजी म्हणतात, "I hold that true education of the intellect can come through a proper exercise and training of bodily organs i.e. hands, feet, eyes, ears, nose etc. In other words, an intelligent use of the bodily organs in a child provides the best and the quickest way of developing his intellect...... We have uptill now concentrated on stuffing children's minds with all kinds of information, without ever thinking of stimulating and developing them. Let us now cry a halt and concentrate on educating the child properly through manual work, not as a side activity, but as the prime means of intellectual training." वुद्धीचा विकास किंवा ज्ञानप्राप्ती ही केवळ पुस्तकी अभ्यासातूनच होते, ज्ञान व कृती यांचा काही संबंध नाही ही त्यावेळी प्रचलित असलेली कल्पना गांधीजींना मान्य नव्हती. यावावतीत त्यांची तुलना आधुनिक युगातील श्रेष्ठ तत्त्वज्ञ व शिक्षणशास्त्रज्ञ जॉन ड्यूई यांच्याशीच होऊ शकते. ड्यूईनेही ज्ञानार्जन प्रक्रियेत कृतीला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. ज्ञान आधी व कृती नंतर हा क्रम वदलवून कृती हीच ज्ञानाची जननी असा सिद्धांत त्याने मांडला. कृती करीत असताना येणारे अनुभव म्हणजेच त्याच्या मते ज्ञान. 'Knowledge is incidental to action, it is the bye-product of action' असे तो म्हणतो. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातही केवळ पुस्तकी चिंतनापेक्षा कृती व प्रयोग यांना महत्त्व दिल्यामुळे त्याचे तत्त्वज्ञान हे कार्यवाद (Pragmatism) या नावाने ओळखले जाते. तसेच 'ज्ञानासाठी ज्ञान' या कल्पनेचाही ड्यूईने धिक्कार केला आहे. जे ज्ञान कृतीसाठी उपयुक्त ठरते, अगर ज्याची कृतीमध्ये परिणती होऊ शकते तेच खरे ज्ञान. कृतीचे साधन हेच ज्ञानाचे अंतिम मूल्य, असे तो म्हणतो. म्हणून त्याच्या विचारसरणीला 'साधनवाद' (Instrumentalism) हेही नामाभिधान प्राप्त झाले आहे. ड्यूईचे तत्त्वज्ञान व गांधीजींचे तत्त्वज्ञान हे सारखेच आहे असा गैरसमज कोणी करून घेऊ नये. परंतु शिक्षणाच्या वावतीत मात्र दोघांचेही विचार वरेच मिळते जुळते आहेत एवढेच येथे दर्शवायचे आहे. ड्युईप्रमाणेच गांधीजींनीही ज्ञान व कृती यांतलं द्वैत नष्ट केले, कर्मयोगातून ज्ञानयोग व ज्ञानयोगाची परिणती कर्मयोगात असा सिद्धांत प्रस्थापित करून आपल्या देशातील शैक्षणिक विचारांमध्ये क्रांती घडवून आणली. कृतीला–श्रमाला शिक्षणात प्रतिष्ठा मिळवून दिली व तद्वारा समाजातूनही वुद्धिजीवी व श्रमजीवी या दोन वर्गांमधील अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला. कोठारी आयोगाने शिक्षणात 'कार्यानुभवावर' (Work-experience) जो भर दिला आहे त्यामागे गांधीजींच्या विचारांची प्रेरणा आहे असे म्हटल्यास चूक ठरणार नाही.

समवाय–तत्त्व

मूलोद्योगी पद्धतीत अंतर्भूत असलेले दुसरे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे समवाय किंवा अनुवंध (correlation). आपल्या शाळांमध्ये अभ्यासक्रमातील निरनिराळे विषय वेगवेगळे व स्वतंत्रपणे शिकविले जातात. शिक्षकही वेगवेगळे असतात. त्यामुळे प्रत्येक विषयाचे वेगवेगळे कप्पे तयार होतात. विषयांचा किंवा विषयांतील विविध ज्ञानघटकांचा परस्परसंबंध काय आहे हे विद्यार्थ्यांना कळत नाही. शिक्षकांनाही समजलेला नसतो. एवढेच नव्हे तर प्राप्त होणाऱ्या एकूण ज्ञानाचा आपल्या वैयक्तिक व सामाजिक जीवनाशी, आपल्या गरजांशी त्याचा काय संवंध आहे याचीही जाणीव विद्यार्थ्यांना होऊ शकत नाही. ते ज्ञान केवळ पुस्तके व परीक्षा यांच्यापुरतेच मर्यादित राहते. विनोवांनी आपल्या शिक्षण पद्धतीचे वर्णन करताना म्हटले आहे, "जोवर विद्यार्थी शिकत असतात, तोवर ते जीवन जगत नाहीत–म्हणजे त्यांचा प्रत्यक्ष जीवनाशी संवंध येत नाही. व जेव्हा ते खऱ्या अर्थाने जीवन जगू लागतात तेव्हा त्यांचे शिक्षण संपून गेले असते. एकूण शिक्षण व जीवन याची गाठभेट कधीच होत नाही." ज्ञानाच्या विविध शाखा असल्या तरी ज्ञान हे एकरूप आहे. त्याचा विद्यार्थ्यांच्या जीवनाशी साक्षात संबंध जोडला गेला तरच त्याला काही

अर्थपूर्णता येईल. म्हणून ज्ञान हे पृथगात्म स्वरूपात न देता त्याची एकात्मता जाणवेल अशा रीतीने ते दिले पाहिजे. गांधीजींनी कृतिपरतेला वाव मिळावा म्हणून शिक्षणात हस्तव्यवसायाला महत्त्वाचे स्थान दिल हे खरे. परंतु ते केवळ एक स्वतंत्र विषय म्हणून नव्हे तर सर्व विषयांच्या अध्ययन–अध्यापनाचे माध्यम म्हणून ! त्या त्या प्रदेशातील जीवनाला अनुकूल अशा व्यवसायांची निवड करून तद्द्वारा निरनिराळया विषयांचा तेथील भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाशी संबंध जोडला जावा ही त्यांची अपेक्षा होती. सूतकताई हाच काही एकमेव व्यवसाय नव्हे. व्यवसाय हा तेथील जीवनाचे प्रातिनिधित्व करणारा असावा. व त्याच्या माध्यमातून त्या त्या प्रदेशातील भूगोल, इतिहास, गणित, भाषा, संस्कृती इत्यादी विषयांचे ज्ञान विद्यार्थ्यांना देण्यात यावे. तेथील जीवनाशी त्यांचा संबंध जोडला जावा, व शक्यतोवर जीवनातून त्यांना शिकविण्यात यावे. हीच समवाय पद्धती. जीवनाची तयारी करण्याच्या हेतूने हे शिक्षण दिले जात असल्यामुळे मूलोद्योगी शिक्षण-पद्धतीला 'जीवन–शिक्षण पद्धती' हे नाव मिळाले आहे व तेच अधिक यथार्थ आहे. यापूर्वी ड्यूई व गांधीजी यांच्या शिक्षण विषयक विचारांमधील साम्य दाखविलेच आहे. आज अमेरिकेत ड्यूईच्या तत्त्वज्ञानावर आधारलेल्या प्रोजेक्ट व प्रॉब्लेम पद्धतींचा शिक्षणात उपयोग केला जात आहे. या पद्धतीतही अभ्यासक्रम हा विषयवार नाही. विषय वेगवेगळे शिकविले जात नाहीत. व्यवसाय, कार्यक्रम किंवा समस्या घेऊन त्यांच्या अनुषंगानेच विद्यार्थ्यांना विविध विषयांचे ज्ञान दिले जाते. व हे जीवनसदृश कार्यक्रमांच्या (Real life activities) आधारे दिले जाते. जेणे करून शिकत असताना विद्यार्थ्यांना आपण जीवनही जगत आहोत असे वाटावे. अर्थातच या पद्धतीने सगळया विषयांचे सुसंगत, तर्कशुद्ध व सर्वांगीण स्वरूपाचे ज्ञान मिळेलच असे नाही. त्यामुळे असे आवश्यक वाटलेले ज्ञान स्वतंत्रपणेही देण्यास हरकत नाही.

शिक्षण व जीवन यांचा संबंध

परंतु यावावत आणखीही एक दृष्टिकोण आपण विचारात घेतला पाहिजे. जे जे ज्ञान आज विद्यार्थ्यांना निरनिराळया विषयांमधून दिले जाते ते सारे आवश्यकच असते काय ? नागपूरला राहणाऱ्या व शिकणाऱ्या विद्यार्थ्याने नागपूरचा परिसर देखील पाहिला नसतो, तो इंग्लंडचा इतिहास शिकतो, परंतु नागपूरच्या भोसले घराण्याची त्याला काहीच माहिती नसते· मॅंचेस्टरला कापडाच्या गिरण्या आहे हे तो पाठ करतो, परंतु नागपूराच्या आसपास होणारे उत्पादन व येथे चालणारे कारखाने, गिरण्या यांची माहिती त्याला कितपत असते ? आमचा विद्यार्थी निरनिराळया प्रकारच्या धान्याच्या उत्पादनाला लागणारे घटक घडघड पाठ म्हणून दाखवितो. परंतु शेजारच्या बाजारातील धान्याचे प्रकार त्याला ओळखता येत नाहीत. तो वाङमयाचा अभ्यास करतो, पण पत्र लिहिणे अर्ज लिहिणे इत्यादी साध्या व्यावहारिक गोष्टींचे त्याला ज्ञान नसते. हे योग्य आहे काय ? मूलोद्योगी शिक्षण-पद्धती ही प्राथमिक व माध्यमिक शिक्षणापुरतीच मर्यादित आहे हे खरे. परंतु उच्च शिक्षणातही बहुसंख्य विद्यार्थ्यांना प्राप्त ज्ञानाचा किती प्रमाणात जीवनात उपयोग होतो, किती प्रमाणात त्याचा त्यांच्या जीवनावर संस्कार होतो व किती ज्ञान वाया जाते ? जे काही आपण शिकवितो ते खरोखर ज्ञान असते की, केवळ पुस्तकी माहिती असते ? 'Our educational iustitutions are information shops and our teachers are information–manaers' असे उद्गार एका शिक्षणशास्त्रज्ञाने काढले ते अयथार्थ आहेत काय ? यावावत विनोबांचाही जो अभिप्राय आहे तो मोठा मार्मिक व उद्‌वोधक आहे. ते म्हणतात, "Knowledge which cannot be related with life, need not be given to to the studeuts, Lust of knowledge, like lust of wealth ' is singul. " यावरून मूलोद्योगी पद्धतीतही अनावश्यक ज्ञानप्राप्तीवर भर नसण्याचे कारण समजू शकेल. ज्ञानपिपासा ही त्याज्य नव्हे. परंतु सर्वांसाठी व सर्व थरांवर तिचा सक्तीने अवलंव करणे आवश्यक व इष्ट नाही एवढेच येथे सुचवायचे आहे.

स्वाश्रयी शिक्षण

गांधीजींनी पुरस्कारिलेले स्वाश्रयीपणाचे तत्त्व हे शिक्षणक्षेत्रात बरेच विवाद्य ठरले आहे. मुलांनी

केलेल्या उत्पादनाच्या आधारे शाळेचा खर्च भागवायचा म्हटले म्हणजे शिक्षण देण्याऐवजी त्यांना अधिक वस्तूनिर्मितीसाठीच राबवावे लागेल व ही एकप्रकारे बालकांची पिळवणूकच ठरेल, असा आक्षेप अनेक टीकाकारांकडून घेण्यात आला. काहींनी तर ही शिक्षणयोजना आहे की, उत्पादनयंत्रणा असाही प्रश्न उपस्थित केला. याबाबत गांधीजींनी आपली भूमिका निःसंदिग्ध स्वरूपात प्रगट केली आहे.

"Self-sufficiency is not merely a priorie condition, but to me, it is an acid test This does not mean that basic education will be self-supporting from the very start. But taking the entire period of seven years, income and expenditure should balance each other, otherwise it would mean that students even after taking the basic education will not be fitted for life. This is the negation of basic education. Nai Talim without the self-support basis would be a lifeless body." उत्पादनक्षमता हा शैक्षणिक विकासातील एक महत्त्वाचा घटक आहे. एकूण ७ वर्षांच्या कालावधीत विद्यार्थ्यांमध्ये जीवन व्यवसायाला आवश्यक अशी उत्पादनक्षमता निर्माण झाली पाहिजे ही गांधीजींची अपेक्षा शैक्षणिक दृष्टचादेखील गैरवाजवी नव्हे.

आर्थिक अडचणीवर तोडगा

खर्च भागू शकेल की नाही या मुद्यावर मतभेद होऊ शकतात. परंतु ही अट टाकताना गांधीजींपुढे तत्कालीन परिस्थिती होती. देशाचे दारिद्रय, सरकारची शिक्षणाबद्दलची अनास्था, शाळांना न मिळू शकणारी आर्थिक मदत व अशा प्रतिकूल परिस्थितीत ८०% निरक्षर जनतेला शिक्षित करण्याचे विराट कार्य, समोर उभे ठाकलेले, ही समस्या सोडविण्यासाठी त्यांनी हा मार्ग सुचविला. मूलोद्योगी शिक्षण हे स्वाश्रयी बनले पाहिजे याबाबत त्यांचा आग्रह असला तरी अट्टाहास नव्हता. स्वाश्रयीपणा हे लक्ष्य असावे परंतु प्रत्यक्षात जरी ते गाठता आले नाही तरी विषाद मानण्याचे कारण नाही. प्रयोगातूनच याचा अंदाज येऊ शकेल.' If the schemes fails after experimentation, no mahatma shall be able to save it' अशीच त्यांची प्रयोगनिष्ठ भूमिका होती. विद्यार्थ्यांकडून उत्पादन करवून घेणे हे मात्र कोणत्याही प्रकारे गैर नाही. आजही शाळांमधून शाब्दिक व पुस्तकी शिक्षणावर किती आवश्यक भर दिला जातो व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या विधायक शक्तीचा कसा अपव्यय होत आहे हे पाहिले म्हणजे फार दुःख होते. अन्य निरुपयोगी व विध्वंसक कार्यात वाया जाणारा वेळ व शक्ती नवनिर्मितीसाठी, सृजनासाठी राबविल्या गेली तर ते अनिष्ट होईल काय ? तसेच विद्यार्थ्यांच्या या निर्मितीतून जर शाळेच्या खर्चाला थोडा हातभार लागला तर ते श्रेयस्करच ठरणार नाही काय ? स्वातंत्र्य मिळून २० पेक्षा अधिक वर्षे होऊन गेलीत. परंतु अजूनही देशाच्या परिस्थितीत काय फरक पडला आहे ? दारिद्रय अजूनही संपलेले नाही, सार्वत्रिक शिक्षणाचे उद्दिष्ट अजूनही आपल्याला गाठता आले नाही, शिक्षणावर खर्च करताना शासनाचा हात अजूनही आखडताच आहे. शाळांची एकंदर परिस्थिती कशी भिकार आहे हे सर्वविदीत आहे. हे सगळे पाहिले म्हणजे गांधीजींनी स्वाश्रयीपणाचा पुरस्कार करण्यात फार मोठी दूरदृष्टी दाखविली असेच म्हणावे लागते.

मातृभाषेचे माध्यम

शिक्षण हे मातृभाषेतूनच देण्यात यावे यावर गांधीजींचा फार कटाक्ष होता. आज हा दृष्टिकोण सर्वत्र मान्य झाला असल्यामुळे त्यावर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता नाही.

मूलोद्योग पद्धती व गांधीजींचा जीवनविषयक दृष्टिकोण

प्रत्येक शिक्षणशास्त्रज्ञ हा तत्त्वज्ञ देखील असतो. व प्रत्येक शिक्षणपद्धतींचा जन्म विशिष्ट प्रकारच्या तत्त्वज्ञानातून झाला असतो. त्या शिक्षणशास्त्रज्ञाची ज्या तात्त्विक सिद्धांतावर निष्ठा असेल त्यांचे अधिष्ठान त्या शिक्षणपद्धतीला लाभले असते. तत्त्वज्ञान हे साध्य निश्चित करते तर तत्त्वज्ञानाच्या आधारे शिरोधार्य मानलेले आदर्श व मूल्ये जीवनात उतरविण्याचे कार्य साधन म्हणून शिक्षणाला करावे लागते. म्हणून गांधीजींच्या शैक्षणिक सिद्धांतांचे व त्यांच्या

मूलोद्योगी शिक्षणपद्धतीचे मर्म समजून घेताना व त्यांचे मूल्यमापन करताना त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोनही विचारात घेणे आवश्यक आहे. मूलोद्योगी शिक्षणपद्धतीचे उद्दिष्ट स्पष्ट करताना ते म्हणतात, " My plan to impart education through the medium of village handicrafts is thus conceived as the spearhead of silent social revolution frought with the most far reaching consequences. It will provide a healthy and moral basis of relationship between the classes. It will check the progressive decay of our villages and lay the foundation of a juster social order in which there is no unnatural division between the the 'haves' and 'have nots' and everybody is assured of a living wage and the right to freedom. And all this would be accomplished without the horror of a bloody class-war or a colossal capital expenditure, such as would be involved in the mechanization of a vast continent like India. Nor would it entail a helpless dependence on foreign imported machinery or technical skill. Lastly, by obviating the necessity for highly specialized talent, it would place the destiny of the masses as it were, in their own hands." गांधीजींना नवी समाजरचना निर्माण करायची होती. शोषणरहित, शक्य झाल्यास शासनरहितही ! यंत्रांना गांधीजींचा विरोध नव्हता. परंतु जीवनाचे प्रचंड प्रमाणात औद्योगीकरण व यांत्रिकीकरण त्यांना नको होते. प्रत्येक खेडे हे स्वतंत्र व स्वयंपूर्ण घटक बनून ग्रामराज्ये प्रस्थापित व्हावी असे त्यांना वाटत होते. विनोवांच्या परिभाषेत यालाच सर्वोदयी समाजरचना म्हटले जाते. शिवाय ही नवी समाजरचना भारतीय सांस्कृतिक मूल्यांवर अधिष्ठित असावी असे त्यांचे ध्येयस्वप्न होते. ज्यात लोकजीवन हे पाश्चात्य देशांतील भौतिक संस्कृतींप्रमाणे उपभोगप्रधान बनणार नाही तर आवश्यक त्या गरजा व आवश्यक तेवढे उत्पादन असाच लोकांचा जीनवक्रम राहील. 'अनासक्ती' हे गांधीजींच्या मते जीवनातील सर्वश्रेष्ठ मूल्य होते, माणसाच्या आध्यात्मिक उन्नतीचा अनासक्त वृत्ती हाच पाया होय. गीतेवरील आपल्या भाष्याला त्यांनी 'अनासक्ती योग' हे नाव दिले आहे. गांधीजींची प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानावरील श्रद्धा ही सर्व परिचित आहे. 'सा विद्या या विमुक्तये' हा शिक्षणाचा अर्थ गांधीजींना मान्य होता. जो आपल्या गरजा कमी करीत जातो, भौतिक इच्छावासनांपासून मुक्त होत जातो तोच आध्यात्मिक प्रगती करू शकतो, मुक्ती प्राप्त करू शकतो. यंत्र संस्कृतीत उत्पादनावर भर फार, व उत्पादन अधिक झाले की त्यामागे उपभोग आलाच म्हणून, उत्पादनाला मर्यादा घालून उपभोग प्रवृत्तीला आळा घालणे ही खरी संस्कृती. अशा संस्कृतीला आवश्यक अशा प्रवृत्तींचा नवा माणूस व अशा प्रवृत्तींच्या विकासाला पोषक अशी समाजरचना निर्माण करण्याचे मूलोद्योग शिक्षणपद्धती हे एक साधन होते. गांधीजींच्या एकूण जीवनविषयक दृटिकोनाच्या संदर्भात त्यांच्या शिक्षणविषयक तत्त्वांचा व पद्धतीचा अर्थ समजून घेतल्यास त्यावरील अनेक आक्षेपांना आपोआपच उत्तर मिळून जाते.

मूलोद्योग पद्धतीचे भवितव्य

मूलोद्योग पद्धतीचे भवितव्य काय हा प्रश्न विचारल्यास देशात गांधीवादाचे जे भवितव्य तेच मूलोद्योग पद्धतीचे असे उत्तर द्यावे लागेल. मूलोद्योग पद्धतीने काही काळ काही शाळा चालविल्या गेल्या. परंतु त्या अपयशी ठरल्या हे दु:खद असले तरी कटुसत्य आहे. ही पद्धती अपयशी ठरण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ती केवळ यांत्रिकपणे राबविण्यात आली. तिच्यातील मूलतत्त्वे व त्यामागे असलेला तात्त्विक व सामाजिक विचार यांचे आकलन कोणालाच झाले नाही. त्यावर कोणाची प्रामाणिक श्रद्धाही नव्हती. शासनाचीही नव्हती, शिक्षकांचीही नव्हती. गांधीजींच्या सगळ्याच शिकवणुकीबाबत आज देशात हेच घडत आहे. त्यांचे नाव तर सोडवत नाही, पण विचार मात्र घरवत नाही अशी आमची स्थिती आहे. प्रत्यक्षात गांधीप्रणीत आदर्शांपासून आपण फार दूर जात आहो. गांधीजींना अभिप्रेत असलेल्या मूल्यांवर आधारित अशी

समाजव्यवस्था अर्थव्यवस्था व शासनव्यवस्था हे आमचे उद्दिष्ट आहे काय? याचे प्रामाणिक उत्तर आपणच आपल्याला विचारावे. एकीकडे देशाच्या औद्योगीकरणाचे संकल्प करून पाश्चात्य देशांशीच स्पर्धा करण्याचे आम्ही मनोरे रचीत आहो तर इकडे कृषी हा आमचा प्रमुख व परंपरागत व्यवसाय असूनही अन्नधान्याच्या बाबतीत देखील आम्ही स्वयंपूर्ण व स्वावलंबी होऊ शकलो नाही, परदेशावर विसंबून राहत आहो, असे आमच्या घेडगुजरी प्रगतीचे दयनीय चित्र आहे. अशा परिस्थितीत मूलोद्योगी पद्धतीच्या भवितव्याबद्दल निश्चितपणे काहीही विधान करणे कठिण आहे.

गांधीजींचे ऋण

गांधीजींच्या अन्य विचारांप्रमाणेच त्यांच्या शिक्षणविषयक सिद्धांतांची देशात चाललेली परवड लक्षात घेऊनही त्यांचे ऋण कधीच अमान्य करता येणार नाही. प्रचलित साचेबंद शैक्षणिक कल्पनांना त्यांनी जबरदस्त धक्का दिला, शिक्षणासंबंधी नवा दृष्टिकोण प्रसृत करून देशात शैक्षणिक पुनर्रचनेचा पाया घातला. त्यांच्या शिक्षणविषयक कल्पनांमध्ये काही अत्यंत मौलिक असे शास्त्रीय सिद्धांत आहेत तर काही परिस्थितीला धरून उपयुक्त अशा सूचना आहेत. शास्त्र व व्यवहार शाश्वत व तात्कालिक, नित्य व नैमित्तिक अशा अनेक शैक्षणिक तत्त्वांचा मिलाफ त्यांच्या विचारसरणीमध्ये झालेला आहे. मूलोद्योगी शिक्षणपद्धतींचा जरी आज आपण अवलंब केला नसला तरी शिक्षणामध्ये होत असलेल्या अनेक सुधारणांवर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडलेला स्पष्टपणे दिसून येतो. तसेच आज जरी त्यांचे शिक्षणसिद्धांत आपल्याला स्वीकार्ह वाटत नसले तरी कालांतराने का होईना जीवनात निर्माण होणाऱ्या अनेक समस्या सोडविण्यासाठी गांधीजींचे एकंदर तत्त्वज्ञान जसे आपल्याला मार्गदर्शक ठरेल तसेच शिक्षणक्षेत्रातही त्यांनी प्रतिपादिलेल्या तत्त्वांचा मागोवा घेऊनच शैक्षणिक विकासाच्या मार्गावर वाटचाल करावी लागेल.

पं. नेहरूंच्या शब्दात गांधीजी

गांधीजी हे केवढे तरी अद्‌भुत पुरुष होते! जनतेवर त्यांचे सूक्ष्म प्रभुत्व होते. प्रतिकार करण्यास जवळ जवळ अशक्य अशी आश्चर्यकारक मोहिनी त्यांच्यात होती. त्यांच्या लेखाभाषणांच्या पाठीशी त्यांचे जे व्यक्तिमत्व उभे असे त्याची फारच थोडी कल्पना त्यांच्या लेखाभाषणावरून येते. त्यावरून एखाद्याला वाटे, त्यापेक्षा त्यांचे व्यक्तिमत्त्व किती तरी उच्च होते. आणि त्यांनी भारताची जी सेवा केली ती तरी किती विशाल! भारतीय जनतेत केवढे धैर्य व केवढा पुरुषार्थ त्यांनी ओतला- केवढी शिस्त, केवढी सहिष्णुता, उद्दिष्टासाठी आनंदाने त्याग करण्याची केवढी शक्ती त्यांनी निर्माण केली! स्वतः अत्यंत विनम्र असताही त्यांनी केवढा स्वाभिमान जागृत केला! चारित्र्याचे दृढ अधिष्ठान धैर्य होय, असे ते म्हणत.

'फ्रीडम फ्रॉम फिअर'—पं. जवाहरलाल नेहरू

गांधीवाद आणि मराठी काव्य

—प्रा. म. शं. बाबगावकर

गांधीवादाच्या मराठी काव्यावर झालेल्या परिणामाचे परिशीलन करण्यापूर्वी समग्र मराठी साहित्यावर उमटलेला गांधीवादाचा संस्कार आणि मराठी वाङमयाच्या अंगोपांगातून साकल्याने व्यक्त होणारी गांधी व गांधीवाद याविषयीची अनुकूल प्रतिकूल प्रतिक्रिया तिच्या कारणमीमांसेसह संक्षेपाने पाहणे उचित ठरेल. महाराष्ट्र हा गांधींना अनुकूल नसल्याचा समज जुनाच आहे. वस्तुतः गांधीप्रणीत राष्ट्रीय आंदोलनांमध्ये महाराष्ट्राचे योगदान इतर प्रांतांपेक्षा अणुमात्रही कमी नाही; उलट महाराष्ट्रातील बहुसंख्य जनता ही गांधी व राष्ट्रसभा यांच्याच मागे होती. परंतु भारतातील अन्य काही प्रांतातील राजकीय व सामाजिक जागृतीचा काळ गांधीयुगापासून सुरू झाला. त्या उलट महाराष्ट्रात राजकीय व सामाजिक क्षेत्रातील जागृतीचे विभिन्न विचारप्रवाह व आंदोलने इ. स. १८५० पासूनच सुरू झालेली असल्याने महाराष्ट्राची स्वतःची एक परंपरा व प्रकृती सिद्ध झालेली होती. गांधीप्रणीत १९२० च्या चळवळीमधून निर्माण झालेल्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांच्या नव्या पिढीला या जुन्या राजकीय पीठांच्या वारसांशी व वतनदारांशी झगडून आपले वर्चस्व स्थापावे लागले. महाराष्ट्रातील बहुसंख्य सुशिक्षित मध्यमवर्ग पूर्वपरंपरेलाच चिकटून राहिला. त्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङमयीन सत्ताकेंद्रेही या जुन्या पुढाऱ्यांच्याच वर्चस्वाखाली राहिली. जुन्या राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन व्यासपीठांचा वारसा या नव्या चळवळीतून निर्माण झालेल्या कार्यकर्त्यांना लाभला नाही. म्हणूनच एकीकडे गांधीवादाची तात्त्विक विचिकित्सा करून त्याला एका सर्वस्पर्शी, एकसंध तत्त्वज्ञानाचे सुसंगत स्वरूप प्राप्त करून देणारे विनोबा, शं. द. जावडेकर, स. ज. भागवत, काका कालेलकर, दादा धर्माधिकारी इत्यादी गांधीवादाचे थोर अधिकारी भाष्यकार महाराष्ट्रसारस्वतात निर्माण झाले. पण मराठी ललित वाङ्मयातून मात्र गांधीवादी जीवनदृष्टीच्या दीक्षा स्वीकाराचा उत्कट प्रत्यय फारसा उतरला नाही.

आधुनिक मराठी काव्याचा आरंभ आणि आधुनिक भारताच्या राजकीय जागृतीचे पहिले प्रकट प्रसादचिन्ह अशी भारतीय राष्ट्रसभेची स्थापना या उभय घटना इ. स. १८८५ साली घडलेल्या म्हणजे समसामयिकच नव्हेत तर समसांवत्सरिक आहेत. अर्वाचीन मराठी काव्याचे जनक केशवसुत काव्याला सामाजिक क्रांतीचे प्रभावी माध्यम मानीत असले तरी राजकीय पारतंत्र्याची तीव्र जाणीवही प्रसंगववशात त्यांच्या काव्यातून प्रस्फुटित झाली आहे. केशवसुतांच्या मृत्युकालापर्यंत गांधींचे कार्य भारतीय भूमीवर अद्याप सुरू व्हावयाचे होते. प्रेमप्रतीतिधर्मी सौन्दर्यजीवि भावकवि ही तांब्यांची कविप्रकृती असली तरी गांधीप्रणीत असहकार योगाच्या विराट आंदोलनाच्या आवाहनापासून त्यांचे संवदेनक्षम कविहृदय अलिप्त राहू शकले नाही. " रुद्रास आवाहन " ही त्यांची प्रसिद्ध कविता ३ डिसेंबर १९२० रोजी लिहिलेली आहे. या लेखनकालाच्या सुमारे एक वर्ष आधी पंजाबात जालियनवालाबागेत घडलेल्या ब्रिटिश दमननीतीच्या आसुरी थैमानामुळे सारा भारतवर्ष प्रक्षुब्ध झाला होता. त्यातच पुनः १९१८ त संपलेल्या पहिल्या युरोपीय महायुद्धातील विजयोत्सवाची भर पडली होती. प्रजा दुःखात असताना ब्रिटिश राज्यकर्ते विजयोत्सवात मग्न होते. याच सुमारास रशियन राज्यक्रांतीचे वैचारिक वादळ या भूमीच्या किनाऱ्यावर येऊन आदळत होते. या एकूण परिस्थितीचा उद्दाम उद्रेक तांब्यांच्या

वाणीत होऊन क्रांतिकारी रुद्रास आवाहन करताना ते उद्‌गारतात :

पाड सिंहासने दुष्ट ही पालथी
ओढ हत्तीवरुनि मत्त नृप खालती
मुकुट रंकास दे करटि भूपाप्रती,
झाड खट्‌खट् तुझे खड्‌ग क्षुद्रां !

सशस्त्र क्रांतिकारक भगतसिंहावर लिहिलेली 'देशद्रोह की राजद्रोह ?' ही कविता वगळली तर काव्य-लेखनाच्या अंतिम कालखंडातील तांब्यांच्या काही उर्वरित कवितांवर गांधी व गांधीवाद यांचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. गांधीवादावरील त्यांच्या कविता-गुच्छात संपूर्ण अशा पाच कविता असून त्यापैकी एक हिंदीत आहे. शिवाय दोन कविता अपूर्ण असल्याने त्यांच्या काव्यसंग्रहात त्या संकलित झालेल्या नाहीत. गांधींचे 'यंग इंडिया' तांब्यांचे अत्यंत आवडते होते. गांधींची विशुद्ध विचारसरणी, त्यांचा तर्कशुद्ध कोटि-क्रम, त्यांचे सरळ सुबोध विवेचन, त्यांची ओघवती 'विक्लिकल्' इंग्रजी भाषा, त्यांची प्रभावी शैली व या सर्वांमागील त्यांचे आदरणीय विभूतिमत्त्व यावर तांबे लुब्ध होते. १९२१।२२ साली गांधींच्या असह-योगयुगाच्या आरंभकाळी सशस्त्र पाशवी आंग्लसत्ते-विरुद्ध भारतीय जनतेने आत्मबलावर आधारित असा निःशस्त्र प्रतिकार पुकारला त्यावेळी देशातील अणुरेणु असहकारितेच्या आदर्शाने भारलेला होता. "गाडी बदलली" या आपल्या आध्यात्मिक रूपकात्मक कवि-तेतही नकळत तांब्यांनी त्या आदर्शाचा निर्देश केला आहे. त्या भारलेल्या वातावरणात तांब्यांच्या कवितेने आपला सूर सत्याग्रही वीरांच्या सुरात मिसळून अत्याचारी आंग्लसत्तेला आव्हान दिले :

उखळात दिले शिर, काय अता ?
दणकवा मुसळ ढोंग न करिता
दुबळ्यांचे बळ केवळ दुस्तर
करील सहसा 'दिव्य' भयंकर
बलोद्धतांची मोडिल कंबर,
जग चकित होउं द्या हे बघता !

आंग्लसत्तेला अनुलक्षून तांब्यांनी येथे योजिलेला हा 'बलोद्धत' शब्द पुढल्या अनेक कवींनी वापरला. ह्या कवितेत व 'अब तुम जयजयकार करो' ह्या हिंदी कवितेत तांब्यांनी गांधींचा 'मोहन' असा स्पष्ट नामनिर्देश केला असून आत्मोत्सर्ग करणारा चिलया, सत्याग्रही प्रल्हाद आणि अहिंसारत निग्रही हरिश्चन्द्र यांचा आत्मा आज अनेक युगांनंतर या 'मोहना'त एकवटला आहे व तो भारताला खचित दास्यमुक्त करील असा आशावाद व्यक्त केला आहे. तांबे सश्रद्ध व भाविक असल्याने त्यांच्या अनेक कवितांमधून निर-निराळ्या पौराणिक कथांचे व अवतारांचे संदर्भ आले आहेत. त्यात 'नरसिंहा'चा संदर्भ अनेकदा आवृत्त झाला आहे. बहुधा हिरण्यकश्यपूच्या राक्षसी वृत्तींशी इंग्रजी राजनीतीचे असणारे साम्य याला कारण असावे. आणि या अवतारचरित्रातील 'प्रल्हाद' हा आद्य सत्याग्रही असल्याचे गांधीजींचे विधान येथे लक्षात असू द्यावे. 'प्रतिज्ञा' ही मालकंस रागातील तांब्यांची कविता - त्या रागातील सुरांप्रमाणेच धीर-गंभीर आहे. त्या कवितेत यापुढे असत्यापुढे आम्ही नमणार नाही आणि विलायती वस्त्र वापरणार नाही ही प्रतिज्ञा उच्चारतांना तांबे म्हणतात :

धुळीलाहि जाऊं मिळोनी सुखे ।
घरालाहि होऊं सुखें पारखे
उपाशी मरूं दूर देशांतरीं ।
वनीं रानि हिंडूं पिशाचापरी
असत्या तुझ्या हा न माथा झुके ।
जरी कापशी, काप, येई सुखें !
फिरूं नागवे होऊनी वानरें ।
विषारी तुझे ते दुशाले पुरे !

'कोण रोधील ?' या कवितेत तांब्यांनी गांधी व त्यांचे अनुयायी यांना 'नवराष्ट्राचे निर्माते' म्हटले असून प्रेम, न्याय व सत्य हे जिचे गण जिच्या रक्षणार्थ सज्ज आहेत अशा भविष्याच्या मंदिरातील रत्नमय सिंहासनावर बसलेल्या भरत भूजननीचे भव्य चित्र रेखाटले आहे. ब्रिटिश सम्राटाला सबूरीचा इशारा देताना ते म्हणतात :

ज्यावरी भार तव, ज्यावरी गर्व तव
विफल तोफा तुझ्या, पलटणी सर्व तव
विफल बलदर्प तव, यात का शर्व तव ?
उघड लोचन, पहा दूर राजा, जरा.
तेथ त्या रत्नमय दिव्य सिंहासनीं
लखलखे भरतभूजननि बघ ! विजयिनि
प्रणय, नय, सत्य हे सज्ज गण रक्षणीं
बघ, भविष्याचिया मंदिरा.

पाच सहा वर्षांनी गांधीजींच्या चळवळीचा जोम ओसरला, तेव्हा तांब्यांनी 'वाटले नाथ हो!' हे आर्त गीत आळविले :

वाटलें नाथ हो, तुम्ही उतरतां खाली
दे असहकारिता हाक तुम्हां ज्या कालीं
हंबरडा फोडी आर्त महात्मा जेव्हा
आघात झेलिले घोर उरावर तेव्हा
त्या यज्ञे द्रवुनी गमे धावलां देवा,
ऐकिली आर्त किंकाळी.
परि हाय ! कोणते पाप आडवे आलें ?
हा ! कपाळ फुटलें, संचित तें ओढवलें !
परतली माउली, स्वार्थाने अडवीले,
आशेची माती झाली.

'राजा ! समज न हा गुजराथी' ही महात्माजींना उद्देशून लिहिलेली तांब्यांची उत्कृष्ट कविता लिपिनिविष्ट झाली नाही. तिचा प्रारंभ असा होता :

राजा ! समज न हा गुजराथी
राजदंड नच याच्या हातीं, मुकुट न याच्या माथीं
परी प्रबलतम त्यांतून याची शांत अहिंसक नीती.

'कृष्णयोगीश' ही गांधींविषयींची आपली कविता तांब्यांनी कालांतराने लिपिबद्ध करण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे ती अपूर्व राहिली. तिचा आरंभ असा होता :

कृष्णयोगीश
योगीश्वर जेथें
भूति, जय, नीति, श्री तेथें.

असहयोग आंदोलनाच्या काळी गांधींच्या मतांशी सहमत नसलेले काही नेते होते. त्यात स्वामी सत्यदेव परिव्राजक हे एक होते. त्यांना कौन्सिल बहिष्कार अमान्य होता. त्यांचे एकदा अजमेरला ईदगाहमध्ये असहकारिताविरोधी व्याख्यान झाले. त्याप्रसंगी तांबे मुद्दाम तेथे उपस्थित झाले होते. स्वामीजींची विचारसरणी तर्कशुद्ध, वक्तृत्व अमोघ व आवाज बुलंद होता. त्यांच्या वक्तव्यात इंग्रजी कायदेकानूविषयी विलक्षण बेफिकिरी व बेपर्वाई होती. ती त्यांची फकिरी वृत्ती व तो उदंड आविर्भाव पाहताच तांब्यांच्या मुखावाटे ओळी बाहेर आल्या :

अशांचे कोण करिल तरि काय ?
वस्त्र हवें ज्या लाज झाकण्या, अन्न ढकलिण्या काय !
खुशाल घाला अशां तुरुंगीं, काय अशांचे जाय ?
भीती का चतुरंगबल नृपा ? दिला मृत्युशिरिं पाय !
'जनीं जनार्दन' ही हरिसेवा, अन्य न ज्यां व्यवसाय !

तांब्यांचे एक सहकारी प्रा. धारकर ह्यांनी या कवितेचे "का ऐसनको कोऊ करै ?" हे हिंदी रूपांतर केले होते. तांबे म्हणत, "महात्माजी हे अंधारातले शुक्र आहेत." त्यावर तांब्यांना चिडवण्यासाठी धारकर उत्तर देत, "हो ! शुक्र तेजस्वी आहे. पण भोवतालचा अंधार तसाच आहे !" "मरणात खरोखर जग जगते !" ही तांब्यांची कविता प्रथम 'विविधज्ञान-विस्तारा'च्या पन्नाशीच्या आनंदोत्सवाचे स्मारक म्हणून निघालेल्या 'विविध काव्यमाला' ग्रंथात 'मातेस्तव व्हा सिद्ध मराया' या शीर्षकाने प्रसिद्ध झाली. तिच्यातील—

यज्ञ करा स्वातंत्र्य मिळाया,
सर्वस्वाचे दान करा, या,
मातेस्तव व्हा सिद्ध मराया

ह्या ओळी वाचल्या म्हणजे "यज्ञाला साकार व्हावेसे वाटले आणि तो गांधींच्या रूपाने पृथ्वीवर अवतरला" हे रवीन्द्रनाथ टागोरांचे उद्‌गार आठवतात. गांधींचे समग्र जीवन हाच एक अखंड धगधगणारा यज्ञ होता. यज्ञ हे भारतीय संस्कृतीचे सर्वश्रेष्ठ प्रतीक आहे. यज्ञ, दान आणि तप ही मानवाला पावन करणारी कर्मे आहेत असे गीता सांगते. गांधींनी आपल्या दीर्घ जीवनात याच त्रयीचे सतत आचरण केले. ८ सप्टेंबर १९२९ रोजी लिहिलेल्या 'साम्राज्यवादी' या कवितेत तांब्यांनी विश्वशांती, विश्वबंधुता, न्याय, नीती, समता, स्वतंत्रता इत्यादिकांची जपमाळ एकीकडे ओढावयाची व दुसरीकडे अन्याय, आक्रमण, हिंसा, परस्वापहरण निर्गलपणे आचरीत राहावयाचे हा साम्राज्यशाहीच्या स्वरूपातील अंतर्विरोध व दंभ यावर नेमके बोट ठेवले आहे.

गिळी अपुलें, गिळि परकें; खाचती तरी भरे न,
शांतीच्या वर बाता, बोंबले अधाशि हा
शास्त्रतटीं तोफ घोर फडशा करि बंधूंचा !
विश्वबंधुता खरि ही रक्षी दुबळ्यांशि हा !
मातित राबोनि गरिब धान्याचे रचिति ढीग
भक्षुनि रक्षक निरिच्छ बोका संन्यासि हा !

गांधींची भारताच्या भूमीवरील पहिली सत्याग्रह चळवळ चंपारण्यातील. ह. स. गोखले यांची या प्रसंगावर १० जून १९१८ रोजी लिहिलेली ' महात्मा गांधी ' ही आर्याबद्ध कविता स्मरणीय आहे.

जगिं बोलतात सगळे अरण्यरोदन कुणी न आयकितो
चंपारण्यामधले रोदन परिसे असा जगीं तूं तो !
त्यागी सत्यव्रत हितदक्ष सुधी धीर या महात्म्याला
नेता करा यश धरा होऊं दे चकित सर्व जगताला ! *

स्पष्टपणाने गांधींच्या आंदोलनांचे, व्यक्तिमत्त्वाचे चित्रण करणारी कालदृष्टया ही मराठीतली पहिली कविता दिसते.

तांव्यांनंतर त्यांच्या कर्तृत्वाने प्रभावित झालेले जे रविकिरणमंडळ त्याच्या कक्षेवाहेरच्या पण गांधीयुगातील लोकजागृतीच्या नवचैतन्याचे पडसाद उमटविणाऱ्या कवींमध्ये "असहकारितेचा दसरा" लिहिणारे फडणीस, कुंजविहारी, अज्ञातवासी इ. कवी येतात. कुंजविहारींच्या गीतगुंजारवात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मुळशीपेटचाच्या सत्याग्रहावरील "मुळशीचा पाळणा" इत्यादी प्रभावी कवितांमधून तत्कालीन गांधीपर्वातील उत्कट समरप्रसंगांनी उत्स्फूर्त झालेले कविमनाचे उद्गार शब्दरूप पावले आहेत. "भेटेन नऊ महिन्यांनी" या कवितेत चौरीचौरा प्रकरणातील एका आरोपी सत्याग्रहीचे वीरमरण व त्या समयीचे त्याचे अंतिम उद्गार ग्रथित झाले आहेत. तो म्हणतो, "आई ! स्वातंत्र्यासाठी मी आज वलिदान करतो आहे. पण नऊ महिन्यांनी तुझ्या उदरात तू मला पुन: जागा देशील ना ?" या उद्गारातील धैर्य, कारुण्य आणि काव्य काळजाला भिडणारे आणि भव्योत्कट नाही काय ?

मायभूमिसेवाधर्मी प्राण दिले ज्यांनी
माय मुळशि आता त्यांची जातसे मरोनि.

ही मुळशीसत्याग्रहावरील अज्ञातवासींची कविताही अशीच उत्कट आहे. मुळशीसत्याग्रहाप्रमाणे गांधीजींचे विभूतिमत्त्व हाही कुंजविहारींच्या काव्याप्रमाणेच अज्ञातवासींच्या काव्याचाही लक्षणीय विषय झाला आहे. 'महात्मा', 'गांधीजी' इत्यादी कवितांत अज्ञातवासी म्हणतात—

जग विलासात रंगले, तो तुरुंगात तळमळे
यज्ञाची ही मूर्ति केवळ, जग पापातून उजळले.

आणि म्हणूनच की काय—

जग वंदी त्यासच पुन्हा पुन्हा
हे घडत कसे, न कळे कवणा.

आणि त्यावेळी महाराष्ट्रातल्या काही विशिष्ट वर्गाची खरोखरच अशी स्थिती झाली होती !

१९२३ साली गांधींच्या आंदोलनकालात स्थापन झालेल्या रविकिरण मंडळातील रवि माधव जूलियन ह्यांच्या 'महात्म', 'गांधी आणि टागोर', 'महात्मा काय करिल एकला?', 'पश्चिमेच्या मारुताचे उच्छ्वास' इत्यादि मोजक्याच पण उत्कट कवितांतून तत्कालीन तरुण महाराष्ट्राचे मनोगत नेमके व्यक्त झाले आहे. विशेषत: जुन्या टिळकांच्या राजकीय परंपरेचे वारसदार असलेले तत्कालीन महाराष्ट्रातील जे गांधीविरोधक शब्दपटु पुढारी त्यांच्यावर माधवरावांनी 'महात्मा काय करिल एकला ?' ह्या कवितेत ओढलेले कोरडे व त्यांचा केलेला दंभस्फोट निरतिशय रोचक वाटतात.

'तत्त्व मान्य तपशील न माने' म्हणती हे धोरणी
नको 'तप' – 'शील' राज्यकारणीं !

'विविधवृत्ता'त आलेल्या व पुढे 'गज्जलांजली'त समाविष्ट झालेल्या दुसऱ्या एका कवितेत हीच भावना व्यक्तविताना माधवराव म्हणतात—

दिखाऊ शब्दशूरांचे थवे हे शुभ्र पोषाखी
हुतात्मा ध्येयवादी तो जगाचा अस्करा कोठे ?
भरे ना पोट कष्टोनी न विद्या धूर्तता दोन्ही
न ज्यांचा कायदा वाली अशांचा आसरा कोठे ?

गांधीजींची पक्षातीत वृत्ती, त्यांची सत्यनिष्ठा, भेदभाव नष्ट करून समत्व स्थापण्यासंबंधीची त्यांची कळकळ, अखिल मानवजातीवद्दल त्यांना वाटणारे प्रेम, तत्त्वासाठी सर्वस्वाचा होम करण्याची त्यांची तयारी, नि:स्पृह राहूनही कोणाचाही अनादर होऊ न देण्यावद्दलची त्यांची दक्षता या साऱ्या गुणांमुळे माधव जुलियनांना गांधींवद्दल थोर आदर वाटू लागला होता असे माधवरावांचे निकटवर्ति स्नेही व चरित्रकार श्री. गं. दे. खानोलकर सांगतात. १९२०–२१ सालात गांधींच्या 'यंग इंडिया'चे वाचन तुकोवांच्या अभंगांइतकेच ते भक्तिभावाने करीत. गांधींच्या चरित्राचे

* काहीतरी, प्रकाशन १९२५, पा. ३५.

मनन करण्याने त्यांना एकप्रकारचे समाधान मिळे. घरच्या मंडळींकडून त्यांना पुष्कळदा त्रास होई आणि ते चिंतामग्न होऊन जात. अशावेळी ते गांधींच्या चरित्राकडे वळत. त्यांतील त्यांची आवडती प्रकरणे ते वाचीत आणि मनाला शांत करीत. अशाच एका प्रसंगी त्यांचे परमस्नेही श्री. रा. वि. मराठे यांना ते लिहितात, ". . . .महात्मा गांधींच्या मननीय चरित्राचे मी मनन करीत असतो. त्यांच्याशी काही बाबतीत माझा मतभेद आहे. परंतु माझ्या दृष्टीने अनुकरणीय लोकोत्तर साधुत्व (तोचि भगवंताची मूर्ती) जर कोठे असेल तर त्यांच्यात आहे. धन्य हिंददेवी की जिची कूस अखिल जगाला आदर्श-भूत अशा पुत्राला प्रसवली." त्यानंतरच्या आणखी एका पत्रात ते लिहितात, "माझा काळ असह्य एकांतात जातो. नाही म्हणायला महात्मा गांधींचे 'यंग इंडिया'मधील लेख वाचतांना मात्र मन उच्च भावनांनी प्रदीप्त होऊन डोळयातून अश्रु वाहू लागतात." गांधींबद्दल त्यांना वाटणाऱ्या या आदरामुळेच ते १९२१च्या जूनमध्ये कॉंग्रेसकीडवर सही करून सभासद झाले. म्हणूनच या काळातला गांधींविषयींचा त्यांचा पराकोटीचा आदर १९२१ व १९२२ साली अनुक्रमे लिहिलेल्या 'महात्मा काय करिल एकला?' व 'दोन विभूति' या कवितांतून व्यक्त व्हावा हे स्वाभाविकच आहे. या संदर्भात गांधीवादावर आपल्या कादंबऱ्यांतून भाष्य करणारे प्रसिद्ध कादंबरीकार श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची साक्ष उद्धरणीय आहे. माडखोलकर लिहितात, "१९२१ च्या जुलैमध्ये त्यांची (म्हणजे माधवराव पटवर्धनांची) आणि माझी प्रथम ओळख झाली, तेव्हा ते लो. टिळक यांची अनन्वित निंदा करीत असत; व म. गांधी यांच्या विषयींचा त्यांचा आदर अगदी उताला चाललेला होता. (टिळकांना मानपत्र देण्याच्या प्रसंगी पुण्यात भरसभेत माधवराव पटवर्धनांनी विरोधाचा त्या सभेतला एकमेव असा स्वतःचा हात उभारला होता हे प्रसिद्धच आहे.) 'महात्मा कोण तो गांधी', 'महात्मा काय करिल एकला' इत्यादी त्या काळातल्या त्यांच्या कवितांची पहिली अपरिष्कृत आवृत्ती जर वाचली तर त्या अत्यादराच्या पराकोटीचे प्रदर्शन त्यात पहावयाला सापडते. पण महात्माजींचा मुस्लिम समाजाविषयींचा पक्षपात आणि मध्यप्रांतांतील सुप्रसिद्ध डॉ. खरे प्रकरणातील गांधींचे अन्याय्य वर्तन या मुख्यतः दोन कारणांमुळे, या आदराला पुढे ओहोटी लागली. ती इतकी की, डॉ. खरे यांच्या पदच्युतीवर लिहिलेल्या आपल्या सुनीतात, —

"झाली क्रांति पहा विलक्षण कशी
हिंसा न होता मुळी।
अत्याचार कुणा दिसेल तरि का
सत्यप्रयोगात या? ॥"

असे जळजळीत उपरोधोद्गार त्याच महात्माजींविषयी त्यांनी नंतर काढले!" (मी आणि माझे साहित्य — ग. त्र्यं. माडखोलकर, पा. १०).

रविकिरण मंडळातील दुसरे लोकप्रिय कवी श्री. यशवंत ह्यांच्या विपुल काव्यसंभारात 'सत्य न मरते दळभारें', 'अनुग्रह', 'शृंखलेस', 'अढळ सिंहासन', 'अन्य नको वरदान', 'महात्मन्', 'द्या आम्हांला सुळी', 'रक्ताचा अर्घ्य', 'देवालयाच्या आवारात' इत्यादी कवितांतून —

"वाढु दे कारागृहाच्या भिंतिची उंची किती
मन्मना नाही क्षिती..."

इत्यादि पंक्तींतून गांधी युगातील अहिंसक प्रतिकारोद्यत जागृत जनशक्तीचा कानोसा प्रतिध्वनित झाला आहे. विठ्ठलराव घाटयांची "तो पहा महात्मा आला" ही या कालातली उल्लेखनीय कविता. परंतु रविकिरण-मंडळाचे काव्य प्रायः तत्कालीन मध्यमवर्गाच्या भाव-जीवनाचे प्रतिनिधित्व करीत असल्याने आणि तत्कालीन महाराष्ट्रीय मध्यमवर्ग हा गांधीवादाला पुरता अनुकूल नसल्याने रविकिरणमंडळ काव्यातील गांधीवादाचा संस्कार हा त्या काव्याची मध्यवर्ती प्रकृती ठरला नाही. ते प्रासंगिक पडसाद वाटतात. म्हणूनच 'जीवनप्रभा' या द. दा. पेंडशांच्या १९३९ साली निघालेल्या काव्य-संग्रहाला लिहिलेल्या आपल्या प्रस्तावनेत वि. स. खांडेकरांनी म्हटल्याप्रमाणे, "रविकिरणमंडळ स्थापन होऊन चारपाच वर्षे होईपर्यंतही महाराष्ट्रीय समाजाचे जीवन बव्हंशी स्वप्नाळू होते. राजकारणात, समाज-कारणात, वाङ्मयात सर्वत्र या कल्पनारम्य व स्वप्नाळू मनोवृत्तीचे अधिराज्य आपल्याला आढळून येईल. गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर दहा वर्षेपर्यंत त्यांच्या नाटकांचा लोकांच्या मनावर विलक्षण पगडा होता. पण हा पगडा कायम राहायला गडकऱ्यांच्या वाङ्मय-

अनुक्रमणिका

गुणांइतकेच त्यांच्या वाङ्मयकृतीतील स्वप्नाळु सामाजिक तत्त्वज्ञानही कारणीभूत झाले हे कितीसे लोक लक्षात घेतात ? या काळात महात्मा गांधींचे असहकारितेचे तत्त्वज्ञान राजकारणाच्या क्षेत्रात प्रविष्ट झाले होते. पण १९३० च्या कायदेभंगापूर्वी या तत्त्वज्ञानाचे हरघडी दिसणारे अगदी सामान्य जनतेपर्यंत पोचणारे स्वरूप एकच होते—खादी ! आणि म. गांधी व स्वदेशीव्रत यांच्याविषयी आदर बाळगूनही शास्त्रीय दृष्टी असेच म्हणेल की खादीचे तत्त्वज्ञान स्वप्नाळु आहे ! १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीने आमच्या स्वप्नाळू जीवनाला अत्यंत जोराचा धक्का दिला . . या धरणीकंपाने पिढ्यान् पिढ्या डौलाने मिरवत आलेली समाजाच्या सर्व क्षेत्रातील स्वप्नमंदिरे भग्न केली !"

या १२ मार्च १९३० रोजी निघालेल्या गांधींच्या दांडी यात्रेवर 'अद्‌भुत रणसंग्राम'ही आनंदराव टेकाडे यांची पोवाड्याच्या चालीवरची वीररसपूर्ण ओजस्वी कविता 'चित्रमयजगत् एप्रिल १९३०' च्या अंकात प्रथम प्रसिद्ध झाली.

...जणु सुदाम यष्टि ज्याची, परि मूर्ति भानुतेजाची,
तशि पूर्ण चंद्र शांतीची...२
स्वातंत्र्य समर जे झाले, आजवरी की घडलेले,
इतिहास पुराणीं लिहिले,
खड्गांचा खणखणाट,
वाहती पाट,
तप्त रुधिराचे, पण रण हे बहुनवलाचे ! . . . .

नेमकी दांडी मार्चच्याच दिवशी १२ मार्च १९३० रोजी लिहिलेली कवि बलवंत ऊर्फ श्री. पळशीकर यांची 'यति की सेनानी' ही उत्कृष्ट कविता त्यांच्या 'कादंबिनी' ह्या १९३६ साली प्रकाशित झालेल्या संग्रहात आली आहे.

वर्णे श्यामल कोण हा कृशतनू आला यती भारती
सत्याची वलयें पहा तळपती त्याच्या मुखाभोवती
धैर्याचा झळके किरीट निटिलीं शांती वसे मानसीं
अर्पाया निज अस्थिचर्म उरला जैसा दधीची ऋषी...
...प्रेमाचे फिरते सुदर्शन पहा ते नित्य त्याच्या करीं
सेनानी असला धुरंधर कुणी दावा दुजा भूवरी.

गांधींना ही दधीचीची उपमा पुढे बा. भ. बोरकरांनी व इतर अनेक कवींनी दिली आहे. दांडी मार्चवर वि. मि. कोलते यांची एक आर्यावद्ध प्रदीर्घ कविता 'युगवाणी'त प्रसिद्ध झालेली आहे. याशिवाय "वाजे-शिंग, सुरू होय कायदेभंग" अशांसारखी मेळ्यांची पदे या काळात सर्वतोमुखी असत. नागपूरचे प्रसिद्ध कवि जयकृष्ण केशव उपाध्ये ह्यांच्या अशा लोकगीत सदृश, लोकभावना प्रोत्साहित करणाऱ्या काही वीरश्री-युक्त, काही थट्टेखोर अशा रचनांपैकी "अरे ही गांधींची टकळी, इंग्लंडच्या बोकांडी बसली, वकिलांनी वकिली टाकली"...इ. ही रचना अशी त्या काळची अनेक उत्स्फूर्त गीते आज ग्रंथनिविष्ट स्वरूपात संपूर्णपणे उपलब्ध नाहीत. याच सुमारास गढवाल दिनानिमित्त मोठी सभा होऊन त्याप्रसंगी श्री. ल. पांढरीपांडे, रा. सा. साळवे इत्यादी नेते मंडळी पकडली गेली. त्यावेळची श्री. ज. के. उपाध्ये यांची प्रसिद्ध कविता —

"बसवे न घरीं, रणिं जाऊं दे ।
यज्ञकुंड भडकलें चहुंकडे, त्यात उडी मज घेऊं दे !"

ही त्यावेळी नागपुरातून निघणाऱ्या 'वागीश्वरी' मासिकात अगदी पहिल्या पानावर छापलेली आहे. टेकाड्यांच्या—

"तूं जाइ अता दिनकरा सख्या मंदिरा
गगनिच्या मुली चिमुकल्या हसूं लागल्या तुच्छतेने"

ह्या 'सूर्यास्त' कवितेत ज्याच्यावर सूर्य कधीही मावळत नव्हता त्या ब्रिटिश साम्राज्यरूपी सूर्याला अस्तास जावयास सांगितले आहे. गांधींच्या आंदोलनात सर्वार्थाने समरसून सहभागी न होता गांधींच्या तथाकथित दोषांचेच चर्वण करण्याची प्रवृत्ती तत्कालीन महाराष्ट्रीय नेत्यांच्या एका थरात व त्यांच्या अनुयायात होती. तिच्यावर मार्मिक टीका 'महाराष्ट्रा ! तुझी सत्य कथा' ह्या आपल्या कवितेत (चित्रमयजगत्, मार्च १९३७) आनंदराव टेकाड्यांनी केली आहे.

श्रीशिवबाचा, श्रीतिलकाचा ऐस कुणाचाही
स्वातंत्र्यास्तव प्राण वेचिले सत्यकथा बघ ही
स्वातंत्र्याची ज्योति पेटवो परी तिलक बाळ.
जात पाहिना गोत पाहिना तू मी विसरोनी
स्वातंत्र्याच्या रणसंग्रामी सकल बंधु मानी
"भारतींच्या कवण्याही जातिला लाभो स्वातंत्र्य
वास तयाचा होउनि राहिन" हाच एक मंत्र.
(टिळकांचा होता.)

धर्मसंस्कृति जातिथोरता कुठे गुलामास
जगतातलि गाळीव हीनता तया कपाळास...
श्रीतिलकाचे श्रीशिवबाचे पूज्य महाराष्ट्रा
सहस्रनयने आजि पहा तू तुझ्या महाराष्ट्रा.
गादीवरुनी स्वतंत्रतेच्या करी वल्गनेला
एकनिष्ठ जो पाइक त्याचे ओढी चरणाला.
'लढनेकू तो मेरा भाई, खानेकू हम तो;
ऐन समयि ही वृत्ति आपुली प्रगट मात्र करितो.
एक बलाचा, एक मतीचा भंग भेद करुनी,
पिशाच्चापरी उडचा मारितो शौर्या बडबडुनी
स्वतां होइना, दुजे साहिना ऐसा हीनमति
आज तुझा महाराष्ट्र भासतो हिंदभूमिवरती.
स्वातंत्र्यास्तव मर्दपणाने झुंजावे ज्याशी
विसरुनि ते करि प्रेमभराने करमीलन त्याशी
स्वातंत्र्यास्तव अरिशी लढता प्राण वेचि अपुला
माळावरि बैसुनी हासुनी, उपहासे त्याला.
स्वकर्मि रतजो दोषहि घडतो तयाच्याच करवी
गुण अवगणुनी दोष पिंजणे सुज्ञ रीति नच ही
स्वतांहुनी त्या मुळी दिसेना हिंदभक्त कोणी
निष्क्रिय राही परी सर्वथा स्वतां सुखस्थानी.
बुद्धिकुशलता, बलप्रबलता वेचुनि एक मने
सदैव स्वजनांशीच भांडणे हेचि एक जाणे
पूर्वकाळ लोपला लोपली पूर्वसाधनेही
नव्या घडीची नवी साधने तेजे लखलखती
एकाकी महाराष्ट्र कधी ना स्वतंत्र व्हायाचें
भारत भाग्योदयीं गुंफिलें भाग्यसूत्र त्याचें
गतकीर्तीचे केवळ गाणे गाउनिया कोठे
निजस्थिती आजची पालटे न कळे त्या वाटे.

मार्च १९३७ हा या कवितेचा लेखनकाल लक्षात घेता 'महाराष्ट्रा ! तुझी सत्यकथा' हे ह्या कवितेचे शीर्षक कसे यथार्थ आहे ते कळून येते. म. गांधी व महाराष्ट्र यांच्या परस्परसंबंधांचे १९२० ते १९४० ह्या उण्यापुऱ्या दीड तपातील कालावधीचे हे वास्तवचित्र आहे यात शंका नाही. खुद्द टेकाड्यांच्या कित्येक कवितांतून गांधीवादी आंदोलनांचा भावनात्मक सहजोद्गार आहे तसा त्यांच्याच काही कवितांतून तत्कालीन टिळकपक्षाच्या पद्धतीने केलेला गांधीवादाचा निषेध, अधिक्षेप व उपहासही आहे. द. भि. रणदिवे, ना. के. बेहेरे, कवि सुधांशु, प्रा. भ. श्री. पंडित इत्यादि अनेक कवींच्या काव्यातून गांधी व गांधीवाद यांच्याविषयींची त्यांची अनुकूलतेची भावना व्यक्त झाली आहे. 'रणदिवे यांची कविता' (भाग २ रा स्फुट कवितासंग्रह) या संग्रहाला लिहिलेल्या प्रास्ताविक 'रसग्रहणां'त गिरीशांनी अशी ग्वाही दिली आहे की "जीवनविषयक तत्त्वज्ञानात जिनवराचे व गांधीतत्त्वज्ञानाचे ते कट्टे पुरस्कर्ते आहेत." कोणत्या अवस्थेला प्रभावना (म्हणजे धार्मिक उत्कर्ष) म्हणावे हे सांगताना कवि म्हणतो—

तळमळत्या हृदयावर फिरती
कर करुणेचे जिथे
मानितो प्रभावना मी तिथे...

'म. गांधींचा कारागृहवास' या नावाची एक कादंबरी देखील याच रणदिव्यांनी लिहिली आहे. प्रा. भ. श्री. पंडित यांच्या 'सुवास आणि रस' संग्रहातील 'अमर-महात्मा' कवितेतील

तूं सत्य अहिंसा रत प्रति गौतमबुद्ध
तूं तनुवाङ्मनसा उदारचरित विशुद्ध
तूं देवदानवातला दुवा तुटलेला
तूं भूतदयेचा झरा जिता फुटलेला !

या ओळीतील उत्स्फूर्तता सहजसंवेद्य आहे. श्री. ह. न. जोशी ऊर्फ कवी सुधांशु यांच्या 'विजयिनी' संग्रहातील 'युगपुरुष', 'हे कोण ऋषी चालले ?' इत्यादी कवितांतील गांधींचे व्यक्तिचित्रण जिवंत वाटते. उदाहरणार्थ—

हे कोण ऋषी चालले ?
कृश देहावर उग्र तपाचें दिव्य तेज फाकलें.
निर्मल कर्पुर शरीरकांति

(येथे "ती मूर्ति साजिरी ज्योति कर्पुर गौर"... ही बोरकरांची ओळ आठवते.)

मुखीं कोटि सूर्यांची दीप्ति
काय युगांचे मानवतेचे स्वप्नच साकारले.
वर्तमान तर लोळे चरणीं लवुनी तेजोबलें !

श्री. द. रा. वेंद्रे यांची 'गंगायमुनेचे पाणी', राजा मंगळवेढेकरांची 'माउली' विशेषांकात आलेली 'तपकीर', श्रीनिवास खारकरांची 'रघुपति राघव राजाराम', गोपीनाथ तळवलकरांची 'आनंद' मासिकात आलेली 'प्रेषित', इंदू टिकेकरांची 'अखंड मानव', श्रीपाद जोशींची येरवडा तुरुंगात लिहिलेली 'नमेल त्यापुढती ही मान', सोपानदेव चौधरींची 'अनुपमा' संग्रहातील 'असीम महात्मा', ग. ह.

पाटलांची त्यांच्या 'लिंबोळघा' मधील 'उत्तम मानव', साने गुरुजींची 'महात्माजींस', श्रीराम आठवल्यांची 'मानव्याचा मंत्रदाता' संजीवनी मराठे यांच्या 'मंगलदीप' व 'लाख ज्योत लागली', गिरीशांच्या 'कांचनमेघ' मधली 'कळस', प्रभाकर माचव्यांची 'गांधी गौरव ग्रंथा'तली 'मार्क्स व गांधी' इत्यादी कवितांमधून त्या त्या कवींची भावस्पंदने शब्दरूप पावली आहेत. त्यातही सानेगुरुजींची गांधीजींच्या जीवनमूल्यांचा स्वीकार करून त्यांच्या सक्रिय आविष्कारासाठी आपले जीवन वाहिले असल्याने त्यांची कविता आत्मप्रतीतीच्या प्रभेने उजळून निघावी यात नवल नाही. ते म्हणतात--

" गीता माझि तुम्ही, श्रुतिस्मृति तुम्ही तुम्हीच सत्संस्कृति
त्यांचा अर्थ मला विशंक शिकवी ती आपुली सत्कृति,
पुण्याई तुम्हि मूर्त आज दिसता या भारताची शुभ,
धावे दिव्य म्हणून आज भुवनीं या भूमिचा सौरभ..."

सान्यांचा 'पत्री' काव्यसंग्रह काही काळ जप्तही झाला होता. 'स्वप्नभंग' व 'अनुक्षण' या काव्यसंग्रहांचे कर्ते हिंदीतील व मराठीतील प्रगमनशील कवि प्रभाकर माचवे यांची 'मार्क्स व गांधी' ही कविता आपल्या वैचारिक पृथगात्मतेने वेगळी उठून दिसते. कवि म्हणतो--

दाढीचे जंगल, भयंकर तोंडाचा, यहुदी तो मासला
खादीच्या पंच्यात गुंडाळलेला हा हाडांचा सापळा!
दोघेहि सारखेच जगता विटलेले
दोघेहि सारखेच जगता चिकटलेले
मला तर दोघेहि सारखेच पटलेले.
...... दोघेहि अद्वितीय, दोघेहि एकटेच
दोघेहि अर्धसत्य, दोघांना लागे ठेच.

मार्क्स व गांधी हे दोघेही कवीला सारखेच पटलेले आहेत. आणि म्हणूनच की, काय ते दोघेही अर्धसत्य आहेत हा आपला साक्षात्कार कवि निर्भीडपणाने सांगू शकतो. ही वैचारिक धिटाई कौतुकास्पद आहे.

रविकिरणमंडळोत्तरकालीन दोन कविश्रेष्ठ कुसुमाग्रज आणि बोरकर, "स्थंडिल संप्रदायी" कुसुमाग्रजांच्या आरंभीच्या 'विशाखे'त रक्तरंजित क्रांतीची उग्रस्वप्ने अधिक असली तरी नंतरच्या 'किनाऱ्या'त ते रक्तरंजित क्रांतीचे तांडवलास्य शमले असून त्यातील आंतरिक आशय गांधीवादातील भूतदयेच्या व मानव्यनिष्ठेच्या प्रेरणेला जवळ येणारा आहे. तरीही 'मराठीमाती' मधील 'करा दूर जरा हात' या गांधींना उद्देशून लिहिलेल्या कवितेत कुसुमाग्रज म्हणतातच की तुमचा दयामय प्रीतिमय हात व स्नेहमय शांतिमय दृष्टी जरा दूर करा; आणि युगेयुगे साठलेले अमंगल जाळण्यासाठी रणशील भावनांचा हा दावानल पेट द्या. वैरद्वेष यांना हा अंत्यघास आता घेऊ द्या. कारण--

तुझ्या स्पर्शाने तमास, आली तेजाची पालवी
ऋचा ऋषिवर्या तुझी, जडपाषाण चालवी
परी असमर्थ झाले, प्रेमवेद तारायास
धनमत्तांची प्रासते, आज जगाला मिरास

भांडवलशाहीच्या विषारी विळख्यातून समाजाची मुक्तता गांधीवाद करू शकत नाही, शकला नाही. किंबहुना अहिंसक, आत्मबलाधिष्ठित, लोकसत्ता स्थापण्याचे ध्येय पुढे मांडणारे गांधी प्रत्यक्षात भांडवलशाही हितसंबंधांचेच पोषण करीत होते. भांडवलशाही समाजरचनेला अधिक बळकटी आणीत होते हा गांधींच्या साम्यवादी टीकाकारांचा सूर येथे आठवतो, पुढे कवि म्हणतो--

कल्पवृक्षास ज्ञानाच्या, अणुगोलाचे ये फल
विनाशाच्या सावलीने, काजळले धरातल.

हा आशय मर्ढेकरांच्या कवितेतही जागोजाग व्यक्त झाला आहे.

बोरकर हे "कविवर्य तांब्यांच्या घराण्याची गायकी निष्ठेने पुढे चालविणारे" रसलोलुप, नादलुब्ध, गंधधुंद, रूपमत्त, स्पर्शहर्षित असे सौंदर्यजीवि भावकवी. परंतु त्यांची जीवननिष्ठा गांधीवादाच्या ध्येयदीक्षेत खरीखुरी न्हायलेली दिसते. गांधीजींच्या विचारांमुळे प्रादेशिक अस्मितेची राजकीय जाणीव गोव्यासारख्या प्रदेशांना होऊ लागली होती. अभावितपणे ती त्यावेळी साहित्यक्षेत्रातही मूळ धरू लागली असणं शक्य आहे. या वातावरणाचा देखील माझ्यावर परिणाम झाला असेल, पण तो अजाणता."--असे स्वतः बोरकरच म्हणतात. तरी १९२७ साली बोरी येथे लिहिलेल्या 'एक मागणे' कवितेत कवी म्हणतो--

करीं तलवार तेजस्वी मुखीं रसवंति ओजस्वी
तये स्वातंत्र्य जिंकाया मला सामर्थ्य दे प्रभुजी.

म्हणजे पुढे अहिंसाप्रभावित झालेले बोरकर आरंभकाळी तरी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सशस्त्रमार्गावर विश्वास असलेले, प्रभूला तलवार मागणारे दिसतात. पुढच्याच वर्षी १९२८ साली धारवाडला लिहिलेल्या 'खादी गीता'त

तुझी गुणाची गगनदेवता नवशशिचा चरका
फिरवुनि स्वर्गी सूत कातिते द्याया सुरलोकां...
हा तर झाला देवाघरचा खादीचा खेळ
दुनियेवरती हृदय बसविते तयालाच मेळ.

(ह्या ओळींवर गडकऱ्यांची छाप ओळखू येण्याइतकी स्पष्ट आहे !)

भारतभूला मंगलमंत्रे नवजीवन द्याया
परमेशाने धरिली आता गांधींची काया...
अंध मानवा परवशतेचे तोड घोर बंध
खादि पेहरुन हो संन्यासी जगताला वंद्य.

गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय जनशक्ती जेव्हा जागृत, संघटित व प्रतिकारोद्यत झाली तेव्हा २१ जून १९४६ रोजी लिहिलेल्या कवितेत कवि म्हणतो—

शांता झाली दुर्गा रे
जागृति आली दीनदुर्बळां सगळ्या पीडित वर्गा रे
सत्य अहिंसा शिस्त शांतता
मोक्षास्त्रे फेकीत ऋतरता
भूगर्भांतुन हृद्गर्भांतुन आणी अक्षय स्वर्गा रे.

'धृतराष्ट्रास' ह्या ३ मार्च १९४७ रोजी मुंबईस लिहिलेल्या कवितेत गांधींना हरि कल्पून बोरकर म्हणतात —

सर्व संग वर्जून हरी तो वज्र दंडधारी
प्रेममंत्र घोषीत चालला कलीचिये द्वारी
...रक्त ठिबकले हरि पद्मांतुनी स्रवली सुरगंगा
सत्य अहिंसा उजळुन आल्या स्वर्णरूप रंगा
भगीरथांनो या, यामूही पुन्हा गार झाली
घ्या काढुनि आसेतु हिमाचल पाट याच काली.

२०–९–५१ रोजी पुण्याला लिहिलेल्या 'मज लोभस हा इहलोक हवा' या कवितेत जीवन साफल्यासाठी मार्क्सची अर्थमूलक जीवनमीमांसा व फ्राईडची काममूलक जीवनमीमांसा ह्या दोन्ही हव्या. परंतु त्यांनी गांधीवादी जीवनदर्शनाच्या मर्यादेत नांदले पाहिजे हे सांगताना बोरकर म्हणतात—

मार्क्सचा मज अर्थ हवा अन् फ्रॉईडाचा मज काम हवा
या असुरां परि राबविण्या घरिं गांधींचा मज राम हवा

'हिमाद्रीहुनी भव्य नक्षत्रमौली' ह्या १–८–१९५६ रोजी लिहिलेल्या कवितेत गांधींच्या अद्वितीय कर्तृत्वाचे सार नेमके शब्दबद्ध केले आहे.

महामुक्तिचा शंख फुंकूनि जीवें शर्वी
प्रेरिल्या वीर अक्षौहिणी
नवे मोल आणावया जीवनाला स्वयें
सिद्ध केल्यास आत्मार्पणीं
अगा कर्म योगेश्वरा ! मोक्ष द्रष्टचा !
अगा निर्भया ! जन्ममृत्युंजया !
भयातून काढून राष्ट्राप्रती या जयारूढ
आत्मस्थ केले तया...

१९४६ साली दिल्लीस गांधीजी भंग्यांच्या वस्तीत उतरले त्यावेळची बोरकरांची 'आनंद भैरवी'तली 'भंग्याच्या घरी' ही कविता गांधींच्या सेवाव्रती जीवनातून निष्पन्न झालेल्या पवित्र आनंद निर्भरतेचा एक वेगळाच पैलू प्रकट करते.

हरि आला हो, हरि आला हो
भंग्याघरि हरि आला हो
हरिजन झालो सर्वार्थांनी सगळा पंक गळाला हो
छळ गिळिला तो येइ फळाला
बळ चढलें गळल्या गात्रांला
चोखोबांचा घेऊनि नाचे भागवतांचा मेळा हो.

गांधींच्या जीवनावर 'महात्मायन' नावाचे १८ हजार कडव्यांचे प्रदीर्घ महाकाव्य लिहिण्याचा बोरकरांचा संकल्प अजून प्रत्यक्षात संपूर्ण फलद्रूप झालेला दिसत नाही. तरी त्यातली आरंभीची जी सुमारे पंधराशे कडवी लिहून झाली आहेत (त्यातला काही अंश 'सत्यकथे'त आला होता) ती पाहता प्रस्तुत महाकाव्य पूर्ण झाले तर विशुद्ध गांधीवादी प्रेरणेतून जन्मलेले ते मराठीतले पहिलेच महाकाव्य ठरेल. कवि या. मु. पाठक हे वर्ध्याला प्राध्यापक असताना नियमाने गांधींच्या दर्शनाला जात असत. तेथे त्यांनीही गांधींवर अनुष्टुभ् वृत्तात एक महाकाव्य रचावयास घेतले होते. त्यातील बराचसा भाग प्रत्यक्ष गांधींना त्यांनी वाचून दाखविला होता. बोरकरांच्या महात्मायनापेक्षाही त्याची काव्यपदवी अधिक वरच्या श्रेणीची आहे. दुर्दैवाने हेही महाकाव्य पूर्ण होऊन अद्याप

प्रकाशित झालेले नाही. तसे ते झाले तर मराठी शारदेचे ते एक चिरंतन लेणे ठरेल. तथापि, वोरकरांच्या स्फुट काव्यातूनही जागोजाग गांधींचे व्यक्तिमत्व व जीवितकार्य ह्याविषयींची बोरकरांची अपार आत्मीय श्रद्धा, व गांधीप्रणीत नव्या मूल्यविचारांशी झालेले त्यांचे सहज व उत्कट तादात्म्य ह्यांचा तीव्र तरीही काव्यात्म, भावकोमल प्रत्यय विचक्षण रसिकाला सतत जाणवत राहतो. महात्माजींच्या सायंप्रार्थनेचे बोरकरांच्या कुंचल्यातून उतरलेले हे भावचित्र किती विलक्षण जिवंत आहे—

आताच संपली सांध्यवंदना त्याची
जो नवयुगजनिता करुणामूर्ति दधीचि
जनलाटा हटल्या, नटल्या तत्तेजाने
जणु कांचन रविच्या स्पर्शे सागरवीचि
ती मूर्ति साजिरी ज्योतिकर्पुर गौर
ऋत शांति अहिंसा दलितस्फूर्ति गभीर
गंगेपरि गेली पुढुनी संथ गतीने
निःशब्द प्रीतिने जिववुनि दोन्ही तीर.

कुसुमाग्रजांच्या 'क्रांतीच्या जयजयकारा'च्या तुलनेने बोरकरांचा 'शांतीचा जयजयकार'ही असाच लक्षणीय आहे. गांधीवादी जीवननिष्ठेशी अनुभवलेल्या आत्यंतिक तादात्म्यातून उत्कट, रसरशीत व जिवंत गांधीवादी जाणिवातून काव्य स्फुरलेले बोरकर हे एकमात्र कवि दिसतात. आणि तरीही त्यांच्या कवितेला प्रचाराची अवकळा येत नाही. अथवा तिचा काव्यात्मतेचा तोलही सहसा कोठे ढळत नाही.

६ मे १९४४ रोजी प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे आगाखान पॅलेसमधून गांधींची सुटका झाली. त्या प्रसंगाला अनुलक्षून त्याच दिवशी लिहिली गेलेली श्रीकृष्ण पोवळ्यांची "महात्माजींस"ही कविता श्रीकृष्ण पोवळे व मधुकर सबनीस यांनी संपादित केलेल्या 'विजय' मासिकाच्या एप्रिल–मे १९४४ च्या अंकात (वर्ष २, अंक १) आली आहे. गांधींच्या भावनांशी जीवनाशी सहकंप अनुभवण्याबाबत अनुयायांची जी असमर्थता तिला अनुलक्षून कवी म्हणतो—

दुःख तूं साहिले घोर कारागृहीं
आणि आम्ही इथे हासलों नाचलों
बंध तोडावया दंड तूं साहिला
शृंखालांची न जाणीव आम्हां परी.

८ ऑगस्ट १९४२ ची प्रसिद्ध 'भारत छोडो' चळवळ व त्या चळवळीत महाराष्ट्रात विशेषतः साताऱ्याच्या परिसरात घडलेले जागृत जनशक्तीचे प्रसंगी हिंसक असे ऊग्रमंगल विराट दर्शन अनेक कवींच्या प्रतिभेला स्फुरण आणण्यास कारणीभूत झाले. कवी काव्यविहारींच्या 'स्फूर्तिनिनाद' संग्रहातली 'पराक्रमी महाराष्ट्र' ही कविता "१९४२ च्या आंदोलनात महाराष्ट्राने विशेषतः सातारा जिल्ह्याने गाजविलेल्या मर्दुमकीवर" असल्याचे स्वतः कवीच सांगतो. किंबहुना 'स्फूर्तिनिनाद' हा त्यांचा संग्रहच 'भारतीय स्वातंत्र्याचे प्रणेते स्वर्गस्थ महात्मा गांधीजी यांच्या पुण्यसमाधीवर' अर्पण केलेला आहे. (व या संग्रहातली १ लीच कविता ३०–१–१९४९ रोजी गांधीजींच्या पहिल्या पुण्यतिथीस लिहिलेली 'महात्माजींच्या पुण्यसमाधीवर' ही आहे) 'चलेजाव' आंदोलनातील एक समाजदृश्य' चित्रित करणारे काव्यविहारींचे 'वीरमाता' हे कथा काव्य बेचाळीसच्या प्रत्यक्ष क्रांतिकाळात लिहिलेले नाही. ते २०–९–१९४६ रोजी मागाहून लिहिलेले आहे. बेचाळीस पराक्रम गाथेवर त्याकाळी अनेक कथा, काही कादंबऱ्याही निर्माण झाल्या. अशा स्वरूपाची एखादी कथा वाचून लिहिली गेलेली ही 'वीरमाता' कविता वाटते. त्या तुलनेने 'प्रेरणा' या संग्रहातली ब. ल. वष्ट (जानेवारी १९४७) यांची 'सातारा जिल्हा' ही कविता पाहण्याजोगी आहे. "१९४२ साली सातारा जिल्ह्याने घडविलेला इतिहास अविस्मरणीय आहे", अशी टीप देऊन कवी वर्णन करतो—

स्यापूंच स्वराज्या एकच उठली घाई
दुमदुमली पुनरपि चाफळची वनराई
झोपडी झोपडी पुनश्च झाली जागी
प्रतिराज्याची अन् फिरली विजयी द्वाही
क्षण शांत वाहती दिलली कृष्णामाई
जरि गडागडांचे ढासळले तट कांही
जरि काल घेतला नांगरफाळ करात
शिवशिवत हात कमरेस अजूनहि जाई!

परंतु कवितेचा शेवट मात्र "बुडवून मराठी रक्ताच्या रंगात जरिपटका फडके स्वतंत्र राज्यावरती" आणि "येणार हांक पण कधि शिवबाची कानी?" असा स्पष्टपणे हिंदुत्ववादी केला आहे. बेचाळीसच्या आंदोलनाचे चित्रण करणाऱ्या एकूण कवितांमध्ये ग. दि. माडगूळकरांच्या 'जोगिया'मधले त्यांचे 'आसरा' हे

कथाकाव्य सर्वोत्कृष्ट आहे. "अराजकातिल भूमिगतांसम, दिसता दिसता लपल्या तारा. नभ ढगाळून तमात वारा घुसला. सातान्यावर पडतां गोळे, झाल्या त्यांच्या गारा गोठून...त्या मान्यात संतानांचे सावज होऊन, पळे क्रांतिचा एक मोहरा. तीस जवान त्याचा पाठलाग करणारे. त्यांनी विजेत्यांचे झोत टाकले. निसर्ग मानव झाले कौरव, चक्रव्यूहि तो वीर सापडे. त्याला मरणाची भीती नव्हती पण 'जिवंत जाणे अरिच्या हातीं' हे लांच्छन वाटले. मनात विचार आला की 'सांपडतां मी यांच्या हातीं, ग्रामराज्य का नष्ट व्हायचे ?' तोच समोरच्या अंधारावर क्षीण प्रकाशरेखा पाहिली, झोपडीतून किलकिले दार ओढणारी बालिका दिसली. थांब थांबरे पळत्या षंढा, नातरि आली भिडली गोळी' अशी देशघातकी सैल जिभांची आरोळी होत असतानाच तो दाराला भिडला. 'चकित होउनि तोहि नवोढा, उघडी दारा थोडी दचकुन.' 'तुफान.. सैनिक...शत्रू मागे !'- शब्द एवढे तिने ऐकले. कोपऱ्यातली समई विझली, पळात आणिक दार लागले...सिंह निसटला मारुनि दिग्गज...शोध घेतला घरभेद्यांनी. अधिकाऱ्याचा दारावर लत्ताप्रहार. झोपडीतून वृद्धा आली. दरडावून अधिकारी विचारतो, 'झोपडीत कुणी फरारी लपविलास का ?' 'देवाशप्पत नाही दादा', दोन कापरे ओठ हालले !.. झोत विजेचे आतच घुसले. 'कोण दोन ते त्या खाटेवर ?' पुसे शत्रुचा एक शिपाई; लाजुन दवकुन सांगे वृद्धा, "दादा, माझी लेक जांवई !"...चावट भाष्ये करुनी त्यावर, कुणी विजेने पुनश्च पाही. आले आणिक निघून गेले, पडत्या गारा घेत शिपाई. अनोळखी त्या वहिणीपाशी, सुखरूप होता कुशीत भाई, दहशतवादी साम्राज्याची, दूर पोचली दुवळी बडबड. अंधारातच खाटेवरुनी, क्रांतिवीर तो बाजुस होई. नवोढेस त्या म्हणे, "पुन्हा मी—तुझ्याच पोटीं येइन आई !" (येथे 'भेटेन नऊ महिन्यांनो' ह्या कुंजविहारींच्या कवितेतल्या सत्याग्रहीचे उद्गार स्मरतात.) नवोढेसही गहिंवर दाटे, शब्द फुटेना नयनीं गंगा.

"कूस फाडुनि तुझ्यासारख्या,
रणमर्दाला द्यावी जागा !"
सखोल डोळे गळूं लागले,
कुरवाळुनिया त्या दोघांना.
अश्रूखाली पुनश्च भिजवी, वीराला ती वृद्ध अंगना !

बेचाळिसच्या बलवंतांना. असा लाभला दिव्य आसरा
लोकशक्तिच्या सामर्थ्यावर, चिरंजीव हो मग सातारा !
कवितेतील नाट्याची उदात्तता व उत्कटता सहजसंवेद्य आहे.

फाळणीच्या वेळी देश स्वातंत्र्यप्राप्तीच्या विजयोत्सवात दंग होता; आणि जातीय दंग्यांचे थैमान सर्वत्र उसळले होते. अशावेळी नोआखलीत जातीय हिंसेचा तो आगडोंब विझविण्यासाठी गांधींनी पदयात्रा आरंभिली. तिचे चित्रण वसंत बापटांच्या 'विजली' संग्रहातील 'महायान' कवितेत आहे.

सश्य श्यामला वंगभूमिवर
विभक्त देशासाठी झाली विभक्त देहापासुनि मार्यो...
या द्वेषावृत कलहकलंकित भूमीवरती येत कलंकी
सांधुनि कंकण, पुसून अश्रू, अनाथ अर्भक घेईल अंकीं
...एकलाच हा इकडे जमविल समाजसंगीताचा मेळ
कौटिल्यांनो खुशाल तिकडे, राजनीतिचे खेळा खेळ.

(ह्या कवितेच्या अंत्यभागातील 'खेळ' व 'मेळ' हे यमक गडकऱ्यांच्या कवितेत पुनरुक्तीने आलेले व बोरकरांच्याही कवितेत आलेले येथे पुनः आले आहे !) स्वतः बापटांनी आपल्या 'सेतु' संग्रहाच्या 'भूमिके'त म्हटले आहे, "...छोटीमोठी आंदोलने प्रत्यही घडत होती आणि मी तर ह्या सर्व घटनांच्या निकट संन्निध्यात होतो. नव्याने उदयाला येणाऱ्या आपल्या राष्ट्राच्या आकांक्षा, पीडितांचे दुःख. .सगळे काही जवळून पाहात होतो. संघर्षाच्या धकाधकीत प्रत्यक्ष पडलो होतो. ह्या सर्व घडामोडींचा परिणाम माझ्या व्यक्तीमत्त्वावर म्हणजेच कवीवर होणे अपरिहार्यच होते... माझ्या कवितेला समाजनिष्ठेचे व समाजजागृतीचे बाह्य प्रयोजन निर्माण झाले. ज्या निर्मितीत समाजनिष्ठा कवीच्या व्यक्तीमत्त्वाशी एकरूप झालेली असते तीत उणेपणा येत नाही. त्या त्या क्षणी त्या बाह्य प्रयोजनाची काव्याच्या मूळ प्रयोजनाशी एकतानता साधलेली असते. या एकतानतेच्या अभावी ती कविता प्रचारी होईल." बापटांची कविता अशी प्रचारी झालेली नाही. मंगेश पाडगावकरांच्या 'धारानृत्य' संग्रहातली 'आमार जीवन ई आमार बानी'—'आमुचे जीवन मंगल गान, आमुचे जीवन अमुची वाणी चिरमांगल्यनिधान' हीही कविता गांधीजींच्या नोआखली पदयात्रेचा सारभूत आशय समर्थपणे प्रकट करते.

धर्म आमुचा विश्वबंधुता
कर्म आमुचे शुचिता समता
परम विरागी असून आम्ही अनुरागाचे प्राण.

(येथे वसंत बापटांच्या 'विनोबा' या कवितेतील 'संसाराचे सार झोकुनी अनासक्त अवधूत तुम्ही' या ओळी सहजच आठवतात.)

'सुधांशु' यांची 'एकला चालला', ग. दि. माडगूळकरांची 'महात्मा', तु. ना. काटकरांचे 'नौखाली' इत्यादि काव्ये या संदर्भात स्मरणीय आहेत. संजीवनी मराठ्यांच्या 'परिमला' संग्रहातली 'एकलेपणेचि तुला पुढति जायचे रे, अंतरिचे गीत तुझे तुजसि गायचे रे... तुज स्वयेचि दीप बनुनि चिर जळायचे रे" हीही कविता नोआखलीच्या एकाकी पदयात्रेच्या संदर्भात सहजच आठवते. राजा बढे यांच्या 'क्रांतिमाला' (प्रकाशन १९५३) संग्रहातली 'नोखालीतील जीवन-महोत्सव' ही कविता हिंदुत्ववादी मनाची प्रतिक्रिया तीव्र शब्दात व्यक्त करणारी म्हणून आपल्या वेगळेपणाने लक्ष्य वेधून घेते. कवि म्हणतो—

आली स्वातंत्र्यदेवता खरे आम्ही भाग्यवंत
भारताच्या वैराणात चला फुलवू वसंत
आला मृत्यूला बहर पहा जोहाराच्या चिता
अहिंसेने मेलेल्यांनो! काय मरणाला भिता?

आणि या स्वातंत्र्यदेवतेला अर्पण करण्यासाठी

पंचप्राणाचे स्तबक, हुंदक्यांची हारावली
गेली पार कोमेजुनी हातसुतात ओवली···
अहोरुप अहोध्वनि स्वातंत्र्याचे सुस्वागत
मिळे स्वगत स्वातंत्र्य आज आम्हां स्मशानात

गांधींचा मृत्यु हा त्यांच्या जीवनग्रंथाचा कलशाध्याय. त्या करुणभीषण प्रसंगाने कविजनांची हृदये न हेलावती तरच नवल. वि. म. कुळकर्णी यांची 'एक महात्मा निघून गेला' (पहाटवारा), माडगूळकरांची १२–२–४८ रोजी लिहिलेली 'अमर गांधीजीस श्रद्धांजलि' (जोगिया), राम पिंगळीकरांची 'हा तर या दशकाचा मान' (साद), विंदा करंदीकरांची 'काय केलेस हे?' (स्वेदगंगा), ना. ग. जोशांची 'निर्याण' (विश्वमानव), सूर्यकांत खांडेकरांची 'आज युगाचा अंत जाहला', मनमोहन नातूंची 'प्राणज्योति' व 'पांडुरंगा वीट तुझी' (रोहिणी मासिक), राजकवि काळेल्यांची 'गीतनिर्वाण' (हिमअंगार), कृ. ब. निकुंबांची '३० जानेवारी १९४८' (उर्मिला), य. खं. कुलकर्णी यांची 'महात्मा' व 'युगकर्ता' (भावपुष्पे), राजा महाजनांची 'तू म्हटले जेव्हा राम', सोपानदेव चौधरींची 'ती संध्याकाळ', कुसुमाग्रजांची 'ती संध्याकाळ' (किनारा), गिरीशांची 'महात्माजीच्या समाधीवर' ही ८–२–४८ ला लिहिलेली, काव्यविहारींची 'महात्माजींच्या पुण्यसमाधीवर', वसंत बापटांच्या 'पूर्णाहुतीचा तो दिवस', 'अमर विहंगम' व 'चालू दे जयनाद' (बिजली) इत्यादि कवितांतून त्या त्या कवींनी व शिवाय कांत, वोरकर, यशवंत, पोवळे, खारकर, श्रीनिवास कार्लेकर, मंगेश पदकी, प्रफुल्लदत्त व मर्ढेकर अशा कितीतरी कवींनी आपली हृदय-संवेदनारूप श्रद्धांजलि याप्रसंगी अर्पिली आहे. यातील काही कविता प्रासंगिकतेची कक्षा उल्लंघून काव्य-दृष्ट्या चिरस्मरणीय ठरण्यात अशा योग्यतेच्या आहेत. उदाहरणार्थ, 'गीतनिर्वाण' कवितेत काळेले म्हणतात—

या हिंसेमधुनी तरून वरती आली अहिंसा खरी
या द्वेषातुन प्रेम हो अमर हे आले उठोनी तरी
ताही बोलत ओठ–मात्र उमटे हा एक शब्द 'क्षमा'
या विच्छिन्न उरीं–क्षमा, ठिबकत्या रक्तामधेही–क्षमा!
नाही रक्त, दयाच हो द्रवुनिया ही गद्गदा वाहते
नाही रक्त, अखण्ड शांतिच खरी भूमीस ही शिम्पिते!

विंदा करंदीकरांच्या कवितेत गांधींच्या जीवनाचा व मृत्यूचा महान् अर्थ कवीने केवळ एका चरणात अचूक ओविला आहे.– "जीवनी बुद्ध, जो ख्रिस्त मृत्यूमधे." पुढे कवी म्हणतो, "त्या महात्म्याचि ही थोर आत्माहुती, होउ दे अंतिची." वसंत बापटांच्या कवितेत गांधींसाठी शोक करणाऱ्या आम्हा त्यांच्या वारसांचे अंतर्मन उकलून दाखविले आहे की—..."आम्ही पित्याच्या मरणानंतर धाय मोकलून रडलो; आमच्या वेदनेचा उगम आमच्या लोभात होता. ज्या दिवशी दीप विझला त्या दिवशी माती मातीला मिळाली. ज्योत ज्योतीला मिळाली, आम्ही मात्र तसेच कोरडे राहिलो." पुढे कवी विचारतो, "आता अंधारातच किती गोड वाटते, नाही?" यातील उपरोध जाणत्यांना सहज समजावा. हाच अंतर्मुख आत्मपरीक्षणाचा व आत्मनिर्भर्त्सनेचा भाव कृ. ब. निकुंबांच्या '३० जानेवारी १९४८' या शीर्षकाच्या व त्याच दिवशी ३० जानेवारी १९४८ ला लिहिलेल्या कवितेतही व्यक्त झाला आहे; तो असा—

अनुक्रमणिका

निज हृदय रसांनी ज्या नित अभिषेकावें
ज्यावरती अवघे मृदु हृद्‌भाव वहावे
त्याच्यावर घजला निर्दय वार कराया—
तो मानव–आणिक माणसेच आम्हीहि
ज्या माणुसकीची लाज न उरली कांही !
अन्याय जगातिल युगानुयुग साहून,
कारुण्य जगातिल युगानुयुग पाहून
निज अशरमतेने ऊर जिचा गहिंवरला—
त्या मानवतेच्या नयनांतिल तू आसूं !
रे, भुतेंच केवळ आम्ही रक्तपिपासू !

गांधींच्या मृत्यूने झालेली एका भावोत्कट पण विचारशील मनाची प्रतिक्रिया दि. के. बेडेकरांच्या 'नवभारत' मासिकात प्रसिद्ध झालेल्या 'निर्वाण' कवितेत दिसते. गांधींच्या मृत्यूने जगातील साधुत्वाचे धन घेऊन केशरी ज्वालांची शिडे फडफडत ती चंदनी नाव वर स्वर्गाकडे चालू लागली तेव्हा पृथ्वीचे हे विशाल मंदिर आता रिकामे पडले आहे असे कुसुमाग्रजांना वाटते. "—शांतिमहात्म्या ! आज युगाचा झाला जरि अंत, मानवतेची हाक तुझी पण घुमते विश्वात !" अशी ग्वही सूर्यकान्त खांडेकर देतात. हाच आशय "गीत संपले तरी अजूनी हृदयंगम तो स्वर रेंगाळे, त्या गीताच्या स्वरमेळाने जीवन अमुचे पुलकित झाले." असा अधिक हृदयंगम करून वा. ज्यो. देशपांडे यांनी आपल्या 'महात्मा' कवितेत (संग्रह नजराणा) मांडला आहे. शरच्चंद्र मुक्तिबोध हे साम्यवादी जीवननिष्ठेला जवळचे कवि परंतु त्यांच्या 'यात्रिक'मधली "द्याल ना आशिसदान" ही गांधींवरची कविता आपल्या पृथगात्मतेने लक्ष्य वेधून घेते.

चाळीस कोटींचा सागर कधीचा गोठला होता
तुमच्या प्रेमळ स्पर्शाने जागल्या डोंगरलाटा
युगानुयुगांची संस्कृति तुमच्यात साकार झाली
तुमच्या चरणस्पर्शाने धरणी आकाश झाली
······दऱ्यात खोऱ्यात घुमले तुमच्या प्रेमाचे गीत
येणाऱ्या पिढ्या नि पिढ्यांस स्मरेल तुमची प्रीत,
आणि या प्रीतीचे पोलादी चिलखत अंगात घालून,
विराट उभा जो मानव बलाढ्य विद्रोही बनून,
अन्यायी सत्तेस ठेचून हरील तियेचे प्राण
तेव्हाहि अवश्य द्याल ना तेथून आशीष् दान ?

बा. सी. मर्ढेकरांच्या कवितेत प्रत्यक्षरीत्या गांधीवाद कुठे नसला तरी यंत्रसंस्कृतीमुळे मानवाच्या वाट्याला आलेल्या जंतुजीवनाविषयींची मर्ढेकरांची घृणा, भोवतालच्या जीवनातील दांभिकता, भीरुता, श्रद्धाशून्यता व भोगवाद इत्यादिविषयींची त्यांच्या काव्यातील चीड व अंतिम मांगल्यावरची त्यांची अपार श्रद्धा ही पाहता दूरान्वयाने गांधीवादातील यंत्रसंस्कृतीनिषेध आणि मांगल्यपूजा, आध्यात्मिकता इत्यादि मूल्यांचा तो अप्रत्यक्ष पडसाद तर नव्हे असे वाटल्यावाचून राहत नाही. हा विज्ञानमहंत भावनेने संतच होता. कदाचित् म्हणूनच त्याची कविता गांधीवादी जीवनदृष्टीशी जवळीक दाखविणारी झाली असावी. गांधींच्या मृत्यूनंतर लगेच निघालेल्या 'मौजे'च्या (मार्च १९४८) म. गांधी विशेषांकात 'या गंगेमधि गगन वितळले, शुभाशुभाचा फिटे किनारा' ही मर्ढेकरांची कविता गांधींविषयींची मानून सोबत म. गांधींचा फोटो देऊन त्यासह छापली गेली. खरे म्हणजे ह्या कवितेचा गांधींशी काहीही संबंध नाही. (म्हणजे मौज, सत्यकथेच्या संपादकांचीही मर्ढेकरी नवकाव्याने दिशाभूल होऊ शकते म्हणावयाची !) ह्या उलट गांधींच्या मृत्यूशी जिचा संबंध आहे ती मर्ढेकरांची "फुटेल होती वेडी आशा, आभाळाचा कर्मठ सांधा, पडेल किंवा तडा भयंकर, वसुंधरेच्या अर्घ्या अंगा..." ही प्रसिद्ध कविता 'अभिरुचि'त मार्च १९४८ च्या अंकात आली होती. "गांधींच्या मृत्यूसारखी ही विलक्षण भयानक घटना घडली. तेव्हा हिच्यामुळे आभाळाचा कर्मठ सांधा फुटेल किंवा वसुंधरेच्या अर्घ्या अंगाला तडा पडेल अशी वेडी आशा होती. पण असे काही घडले नाही. फक्त अनंत सुतकी शब्द उठले. आणि दोन मिनिटांची सडी शांतता लब्धप्रतिष्ठितांवर शहारली आणि मिटली."— जाता जाता हे पौष माघाला म्हणाला. (३० जानेवारी या गांधींच्या मृत्युदिनी हिंदु कालगणनेप्रमाणे 'माघ' महिनाच असतो ! हे कवितेतले आणखी एक औचित्य.) आणि इसवीसनाच्या कवायतीचा कदम आणखी पुढे सरकला. पुढे कवी म्हणतो अशी वर्षांमागून वर्षे जावीत आणि पुढचा नवा महात्मा यावा व त्यावेळी आम्ही डोळ्यांवरचा चष्मा काढून स्वतःला पुनः पहावे ! अशा महात्म्यांच्या बलिदानाने देखील मानवजात काही शिकली नाही, बदलली नाही, माणसातली पशुता होती तशीच कायम आहे

अनुक्रमणिका

हे कवीने शब्दांची आदळआपट अथवा भावनांचा थयथयाट न करता पण किती भेदकतेने दाखविले आहे! गांधीवधानंतर महाराष्ट्रात गांधीवधाचे निमित्त करून जुन्या ब्रह्मद्वेषाला उधाण आणून ब्राह्मणांची जी जाळपोळ व लुटालूट योजनाबद्ध रीतीने करण्यात आली त्या घटनेची दखल घेण्याचे धैर्य फक्त विंदा करंदीकरांच्या कवितेने दाखविले आहे. आपल्या 'धोंड्या न्हावी' या उत्कृष्ट व्यक्तिचित्रात्मक कवितेत (मृद्गंध, पान २०) कवी म्हणतो—

धोंड्या न्हावी—
म्हणजे विचित्र प्राणी
गांधिवधाच्या नंतर
लगेच दुसऱ्या दिवशी
दाढी करता करता
हलक्या आवाजात मला तो
गंभीरपणे म्हणतो—
"गांधी म्येलो म्हणतात्,
लय् लय् मनात व्होतां
या बाजुक् येतो तर
फुकट करूची त्येची
एक हजामत्."
ब्राह्मण होते भवतीं
परंतु त्यांना नव्हती
हसण्या–रडण्याची उरलेली हिंमत
हसणें-रडणें मुळांत एकच;
अश्रूंतिल ही गंमत.

देवळात स्थापून ठेवावयाची एक शोभेची वस्तु; बाकी दनंदिन जीवनात तिला संपूर्णपणे विसरून जावयाचे, तिच्याकडे पाठ फिरवावयाची असे गांधींच्या उपदेशाबावत तरी व्हायला नको असेल तर गांधींचे मंदिर बांधू नका, त्यांना नुसती शोभामूर्ती करून ठेवू नका असा मर्मभेदक आशय वसंत बापटांच्या 'बिजली' संग्रहातील 'बांधु नका गांधींचे मंदिर' ह्या कवितेत जो आहे तो आजच्या आमच्या गांधीविषयक वृत्तीवर किती विदारक प्रकाश टाकतो. तोंडाने गांधींचा जप क्षणोक्षणी करावयाचा, आपल्या प्रत्यक्ष जीवनात, आचरणात, वर्तनात आणि वृत्तीत मात्र त्यांच्या विचारांचा संपर्क कटाक्षाने टाळावयाचा. म्हणून कवी म्हणतो—

सत्य अहिंसा यांची हिंसा, पशुतेची जगतात प्रशंसा
मात्र गिरीवर
लेणी सुंदर
मूर्ति मनोहर
सौंदर्य फुले जणु खडकांवर
—आणि आज गांधींचे मंदिर.
..मानवतेची करण्या पूजा, स्फूर्ती संतत लाभो मनुजा
पोपटपंची
पुराण वाची
अशी तयाची
स्थिती व्हावया असे नको जर,
बांधु नका गांधींचे मंदिर!

यंदा गांधींची जन्मशताब्दी साजरी करताना हा विवेक आम्ही अवश्य चित्तात बाळगला पाहिजे.

गांधींचे व्यक्तिमत्व, त्यांचा ध्येयवाद व त्यांनी प्रवर्तित केलेली आंदोलने यांचा उपहास करणारी, त्यावर टीका करणारी अशीही कविता मराठीत झालेली आहे. ह्या कवींत प्रामुख्याने काही टिळकमतानुयायी व काही कट्टर हिंदुत्ववादी सावरकरनिष्ठ अशा वैचारिक बाणाच्या कवींचा अंतर्भाव होतो. यातील काही प्रच्छन्न उपहासकाव्ये आहेत. कवि बावुलनाथ ह्यांच्या 'जलधारा' (प्रकाशन १९४१) संग्रहात 'आजचे रणकंदन' कवितेत "हा कारागृह–वृंदावनिचा मोहन असहकारिता–गीता काटतो." आणि–"कंसवधासम परवशतेचे कालीयामर्दन, करील तो आज उद्या ना पण!" अशी गांधींविषयींची जशी प्रांजल आदरभावना आहे; तशीच 'पुण्याचे भामटे आम्ही!' ह्या त्यांच्या कवितेत–"जरी राष्ट्रामधे आले घडूनी ऐक्य सर्वत्र, कराया त्यांवरी टीका निराळे राहतो आम्ही!" असे म्हणून—

"पुढारी अन्य पक्षाचा कुठे गावामधे आला
जिवाला त्याचिया धोका प्रसंगीं आणितो आम्ही!"

असा तथाकथित पुणेरीवृत्तीवर प्रकाश टाकला आहे! १९३४ साली पुण्यात गांधींवर बाँब पडला होता हे येथे ओघाने आठवते. आणि पुण्यातला हा प्रसंग मनमोहन नातूंच्या काव्यात काव्यबद्ध झाला आहेही! कवि बावुलनाथांच्याच 'मुंग्यांचे वारुळ' संग्रहात "हाय! हाय! तो भाला!!" ही जी "एक दणदणीत, झणझणीत, ठणठणीत विलापिका" आहे तिचे स्वारस्य

लक्षात येण्यासाठी ती तेथे मुळातून उद्धृत केली पाहिजे.

असहकारिता झूट आणखी झूट अहिंसा ती
स्पष्टपणे लिहिणार कोण ते पत्रातुन अगदी ?
गांधीजींना जरी 'महात्मा' जग दे ठरवून
'मोहात्मा' तो खास, कोण हे वदेल गर्जून ?
परदेशी तो खजूर खाती गांधी बेताल
त्यांच्या नादी लागु नये हे कोण निवेदील ?
टिळकांनंतर नसे पुढारी भारत देशाला
छातिठोक हे गर्जुन गेला काय बरे भाला ?
टिळकांनंतर त्यांचे चेले नेते हे कसले ?
"तात्या" देती फिरवुन पगडी भाल्याने कथिले ?
कौंसिलमध्ये "घुसा आणखी घांसा" हा मंत्र
कोठुनि सांगा दिसावयाचा आता इतरत्र ?

महाराष्ट्रातील टिळकपक्षाच्या गांधीविरोधी राजकारणाच्या सगळ्या बदलत्या लटा या एका उपहासिकेत मार्मिकपणे येऊन गेल्या आहेत. प्रतिसहकारवादी केळकर पक्षाचे असेच दुसरे एक विडंबन चित्र दि. वि. देवांनी संपादित केलेल्या 'उपहासिनी' नांवाच्या प्रातिनिधिक विडंबन काव्यसंग्रहात आहे. 'बाई, प्रतिसहकारिते' ही ती कविता. 'चाबूकस्वार'च्या एका दिवाळी अंकात प्रथम प्रसिद्ध झालेली.

गासीऽ व्यर्थचि तूं बाष्कळे
पडुनि अवर्षण भूमि करपली।
ग्रीष्म उग्रता वसंति आली
दिवाणगिरिची पेटे होळी।
छायेमाजी जीव तळमळे.
स्वभावधर्मे जरि तूं गासी।
तरि कौतुक तव काय जगासी ?
..गर्व वाहसी फुकट खुळे !
स्वाभिमान हो श्रेष्ठ गुण खरा।
रुचि न त्याविना परोपकारा
परपिंडाने पुष्ट नच बरा।
देह, हे न तुज अजुनि आकळे.

'काव्यमय टिळक' हा काव्यतीर्थ का. र. वैशंपायन यांनी संपादित केलेला लो. टिळकविषयक ३७ संस्कृत न १५० मराठी काव्यांचा संग्रह १९४७ साली प्रसिद्ध झाला आहे. त्यात धुळ्याच्या दिगंवर नारायण अनगळांची 'श्रीटिळक निधन संशयमाला'ही मोरोपंती संशयमालेच्या वळणाची कविता आहे. महाराष्ट्रातील टिळकांच्या निधनानंतरच्या टिळकपक्षाचे गांधींविषयींचे मनोगत ती सूचकपणे व्यक्त करते, ते असे—

की वाग्युद्ध कराया मेथा गोपाल कृष्ण नेमस्तीं
पाचारिलें पुन्हा तुज सुरतीं पुरती
न का जिरली मस्ती.
...की असहकार पथ नव दाविति
गांधी तुला न जो मान्य
तव कर्मयोग ग्रंथचि आधार
अम्हां असे असामान्य.

ही कविता मुळात 'सह्याद्रि' मासिकाच्या ऑगस्ट १९४५ च्या अंकात आली होती हेही येथे लक्षात घेतले पाहिजे. ह्याच 'काव्यमय टिळक' ग्रंथात 'लोकमान्यांच्या पुण्यस्मृतीस' ही शांतासुत, मुंबई ह्यांची कविता आहे. तिच्यात ते म्हणतात—

खुळ्या कल्पना राष्ट्र विच्छेदनाच्या
महात्मे नि राजे जरी बांधिती
मुठेच्या जळीं मूठमाती तयांना
अम्ही देववूं आज ही निश्चिती.
उभा सिंधु आसिंधुपर्यंत सारा
अखंडीत रक्षूं अम्ही भारत
त्वरें मेळवूं राष्ट्र स्वातंत्र्यही ते
तुझ्या स्फूर्तिने जाहलो जागृत.

मुठेच्या जळात मूठमाती द्यावयाची ती त्या महात्म्यांना की राष्ट्रविच्छेदनाच्या त्यांच्या खुळ्या कल्पनांना हे येथे संदिग्ध आहे. मात्र ही कविता श्री. नाथूराम गोडसे ज्याचे संपादन करीत त्या 'अग्रणी'च्या २-८-१९४४ च्या अंकात आलेली आहे. टिळक आणि गांधी यांचा मार्ग एकच आहे अशी आपली भावना श्री. 'यज्ञोपवीत' या टोपणनावाने लिहिणाऱ्या कवीने आपल्या 'बंदिशाळेतील तिलकस्मृतिदिन' या कवितेत व्यक्तविली आहे. ती अशी—

स्वातंत्र्याचा प्रथम दिधला मंत्र तू आर्यभूला
दास्याचा तो पथ तुडवुनी दाविली बंदिशाला
गांधीजींनी पुनरपि दिला पाठ तो भारताला
आता जागा तिळ न उरली दाटल्या बंदिशाला.

पुढे कवि म्हणतो 'हे तिलका ! प्रथम तुझ्यासाठी डोंगरीचे दार उघडून येरवड्याचे दगड फुटले. आणि आता—

गांधीजींनी लवण लुटुनी दांडिचे बंड केले
निर्वाणीची लढत लढण्या राष्ट्रही सिद्ध झाले.

त्यामुळे–

वक्ते कर्ते अमित जनता शृंखलाबद्ध होई
कारागारी तिलकस्मृतिला सार्थता आज येई

अकोल्याचे कवि वा. भा. दामले यांची गांधींच्या मिठाच्या सत्याग्रहावर 'मिठाचा कायदेभंग' नावाची कविता त्यांच्या 'भावसरिता' संग्रहात आहे; ती अशी–

मोडला ग मोडला–कायदा मिठाचा ग मोडला।
बाइग–मोडला–कायदा मिठाचा ग मोडला ॥ धृ. ॥
विहीर खारी बाइ म्या पाहुन
खादी पातळ घेतलं वेढुन
कळशिभर पाणी आणलं शेंदुन
हंडा उकळीला–कायदा मिठाचा ग मोडला ॥
कितितरि मेलं लागतंय् सरपण
दमल्यें ग बाई या शेकानं
अंग घामानं निघतंय् निथळुन
पेटल्यें हट्टाला–कायदा मिठाचा ग मोडला ॥
मिरवी सरकार कांदे सोलुन
चांगलं मेल्याचं नाकच ठेंचुन
मीठ त्यामधे मरलं कोंबुन
टिच्चुन मोडला–कायदा मिठाचा ग मोडला ॥

गांधींचा मिठाचा सत्याग्रह ही पौरुषहीन,बायकी चळवळ आहे असा त्या चळवळीचा उपहास या कवितेत स्पष्टच आहे. याहूनही राजा वढे ह्यांच्या 'क्रांतिमाला' ह्या हिंदुत्वनिष्ठ काव्यसंग्रहातील भाव अधिक जळजळीत आहे. 'खदखदा हासे विभूती अता' ह्या कवितेत कवि म्हणतो––

होती मान्य जगात जे उडविती नेत्रीं धुळीचे कण
चातुर्यें रचिल्या हिमालय चुका द्यायास तीलांजलि
व्हाया भारत मुक्त गुप्तकुहरीं हो राष्ट्र गंगाजळी ॥

बहुधा पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये देण्याबाबत गांधींनी जो हट्ट धरला व ज्यामुळे ते दिले गेले त्या घटनेचा निर्देश वर उद्धृत केलेल्या काव्यपंक्तींच्या अंतिम ओळीत कवीला अभिप्रेत असावा. "आम्ही लावले दिवे" या कवितेत पुढे कवी म्हणतो—

आली आली आज दिवाळी–मंगलता माळवे
ओवाळाया स्वत:भोंवती अम्ही लावले दिवे...
अशा दिवाळित दिवामितांना मिळे मोकळें रान
परमुंडीपर करि पांडेपण खादीचा संतान
चरख्यावरती सूत वळोनी अलक्ष्य केल्या वाती
अंधभक्त स्नेहात मिजवुनी दिल्या नरोटया हातीं.

'फाळणी' या कवितेत कवी म्हणतो––

भंगला वंग पांचाल भंगली दुर्गा,
परधर्मरंजना अम्ही बांधला दर्गा
विसरलों स्वत्वसंस्कृति आपुल्या मोल्या
आणखी काय विसरावे आता बोला
विसरुनी पुन्हा आम्हीच जरी अपराधी
तरि क्षमा मागतो अहो महात्मा आधी.

महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी विचारधारेच्या गांधीविषयक प्रतिक्रियांचे हे काव्य प्रातिनिधिक चित्र आहे असे म्हटले असता त्यात अतिशयोक्ती होणार नाही.

गांधीवादाचेच प्रयोगसफल व परिणत स्वरूप असलेल्या सर्वोदयाचे प्रणेते आचार्य विनोबा भावे आणि त्यांचे अहिंसक सर्वोदयी क्रांतिकार्य यांचे चित्रण वसंत बापट, मंगेश पाडगांवकर, ना. मा. सरपटवार इत्यादी कवींच्या काही कवितांतून उमटले आहे. त्यातही वसंत बापटांची 'सेतु'मधली विनोबा ही कविता आंतरिक उमाळयाने उस्फूर्त झालेली व विलक्षण उत्कट आहे.

स्थिरमेरूचे पूत विनोबा
नवपवनाचे दूत तुम्ही
संसाराचे सार झोकुनी
अनासक्त अवधूत तुम्ही
...अर्थ मागुनी धावत यावा
अशी मुखांतुन ये वाणी.

(येथे 'ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति' हे भवभूतीचे उत्तररामचरित् स्मरते आणि विनोबा हे ऋषिच आहेत हे कवीने किती मार्मिकपणे सुचविले आहे हे ध्यानात घेऊन कवितेचा आस्वाद दुणावतो. आणि वसंत बापट हे मराठीसह संस्कृताचेही अभ्यासक–अध्यापक आहेत हेही आठवते.) पुढे कवी म्हणतो—

क्षितिजान्ताचे यात्रिक असुनी
क्षितीस गणता सेव्य तुम्ही

नित्य नव्या यज्ञाचे दीक्षित
विस्मरलां अपसव्य तुम्ही...

गांधीयुगातील महाराष्ट्रातले भिन्न भिन्न सहकारी व अनुचर नेते हेही स्वतंत्रपणे काव्यविषय झालेले आहेत. श्री. जमनालाल बजाज यांच्यावर ना. के. बेहेऱ्यांची कविता, वीर वामनराव जोशांवर आनंदराव टेकाड्यांची कविता अथवा सानेगुरुजींवरचे शांता शेळक्यांचे सुनीत ही येथे सहजच स्मरतात.

एकंदरीत, मराठी काव्याची आंतरिक प्रकृती किंवा अभिव्यक्तिसरणी यात गांधीयुगामुळे वा गांधीनिष्ठेच्या प्रभावाने काही चिरस्थायी लक्षणीय परिवर्तन घडून आलेले नाही. गांधीवादाचा पृथगात्म असा काही स्थायी संस्कार मराठी काव्याच्या मध्यवर्ती प्रवाहावर उमटला असेही नाही. 'सत्याग्रही' ह्या साने गुरुजींच्या खंडकाव्यासारखे एखादे खंडकाव्य गांधीवादी निर्मिति प्रेरणेतून संभवलेले दिसते. मनमोहनांचे 'युगायुगांचे सहप्रवासी' अथवा ना. ग. जोशांचे 'विश्वमानव' ह्या खंडकाव्यांचा गांधीवादी निर्मिति प्रेरणेशी दूरान्वयानेच संबंध संभवेल. वा. भ. बोरकर अथवा या. मु. पाठक ह्यांची संकल्पित महाकाव्ये अद्याप तरी संपूर्ण साकार झालेली नाहीत ! बोरकरांसारखा एखादा अपवाद वगळला तर बहुसंख्य श्रेष्ठ सत्कवींच्या काव्यात आपाततः उमटलेले प्रासंगिक प्रतिबिंब असेच गांधीवादाच्या मराठी काव्यावरील परिणामाचे साकल्याने वर्णन करावे लागते. म्हणूनच गांधीविचारांनी स्फुरलेली चैतन्ययुक्त कविता मराठीत अल्प आढळते हा प्रा. वा. ल. कुळकर्णी यांचा अभिप्राय योग्यच (सत्यकथा – जून १९६१) आहे. फार काय 'हिंदी और गुजराती में भी गांधीविचारोंसे प्रभावित साहित्य अधिक मात्रा में नहीं दिखाई देता।' असे डॉ. नगेंद्रांना देखील म्हणावेसे वाटले (आधुनिक हिंदी काव्य की प्रवृत्तियाँ, पृ. २७). हे असे का झाले असावे ह्याची कारणमीमांसा लेखाच्या आरंभभागात केली आहेच. महाराष्ट्रातील बहुसंख्य साहित्यिक गांधीविचाराशी बौद्धिक दृष्टया वा भावनिकरीत्या समरस झाले नाहीत हेच खरे. मात्र गांधींचा उपहास अथवा गांधीविचारांवर टीका करणारे जे, जसे व जितके काव्य मराठीत झाले तसे ते, तितके अन्य कोणा भारतीय भाषेत असेल असे दिसत नाही. या वस्तुस्थितीवर १३ जुलै १९२१ च्या 'यंग इंडिया'तील "My method is not Tilak's method and that is why I have still difficulty with some of the Maharashtra leaders" हे किंवा ४ जानेवारी १९४८ च्या 'हरिजन'मध्ये श्री. न. चिं. केळकरांवर स्वतः गांधींनी लिहिलेल्या मृत्युलेखांतील, "I am much misunderstood among a school of Maharashtrians" हे खुद्द गांधींचे उद्गार पुरेसा प्रकाश टाकतात. त्यावर अधिक भाष्य ते काय करावयाचे ?

दोन ऑक्टोबरची प्रतिज्ञा

"माहातमा गांधींच्या पुण्यस्मृतीला कृतज्ञतेने अभिवादन करून आम्ही भारताचे नागरिक, आज अशी प्रतिज्ञा करतो की, जातीयवाद, जमातवाद आणि विविध प्रकारचा अन्याय, जुलूम व उपोषण यांच्या निर्मूलनासाठी जो लढा गांधीजींच्या प्रेरणेने सुरू झाला तो आम्ही पुढे चालवू आणि देशाचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व व एकता यांच्या मूलभूत तत्वांसाठी ते जगले व त्यांनी हौतात्म्य स्वीकारलेल्या तत्वांच्या रक्षणाची जबावदारी पार पाडू."

महात्मा गांधींच्या जन्म-शताब्दीच्या निमित्ताने—

--प्रा. सौ. तारा शास्त्री

महात्मा गांधींच्या जन्म–शताब्दीच्या निमित्ताने, स्वातंत्र्याच्या गेल्या बावीस वर्षांच्या काळांत भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रांतील लोकजीवनावर महात्मा गांधींच्या मानवतावादाचा आणि सत्य–अहिंसेसारख्या उच्च अध्यात्मिक मूल्यांचा काय प्रभाव पडला आहे ते आजमावून पाहण्याचा प्रयत्न सध्या सुरू आहे. राजकीय क्षेत्रात सत्याग्रही नागरिकाचा आदर्श महात्मा गांधींनी स्वतःच्या उदाहरणाने लोकांसमोर प्रस्तुत केला. सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात रचनात्मक कार्यक्रमाच्या द्वारा अहिंसात्मक उत्क्रांतीचे महत्व सांगून या उत्क्रांतीकरिता खेडे हे घटक मानण्यात योजकता आहे ही आपली भूमिका त्यांनी विषद केली. इतकेच नव्हे तर राष्ट्रीय आंदोलनाच्या कार्यक्रमात एकीकडे कॉंग्रेसमधून बाहेर पडून फक्त सुपर ॲडव्हायजरची भूमिका बजावीत असताना दुसरीकडे अस्पृष्योद्धार, ग्रामसुधारणा इत्यादी कामाकरिता त्यांनी स्वतःला वाहून घेतले. दुर्दैवाने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अवघ्या सहा महिन्यांच्या आत महात्मा गांधींना मृत्यू आला, आणि उत्क्रांतीच्या कार्यातले त्यांचे धुरंधर नेतृत्व काळाने अचानकपणे नाहीसे केले.

मग उरले काय ? स्वातत्र्यानंतर हाती आलेल्या सार्वभौम सत्तेचा प्रयोग रामराज्य, किसान–मजदूरांचे राज्य निर्माण करण्याकरिता बद्धपरिकर असलेले सरकारी पातळीवरचे कॉंग्रेसचे नेते एकीकडे आणि जनतेच्या सेवाव्रताला वाहिलेले आश्रम–वासी कॉंग्रेसजन दुसरीकडे, अशी परिस्थिती निर्माण झाली. १९२०, १९३०, १९३७ आणि १९४२ च्या काळात महात्मा गांधींच्या हाकेसरशी सत्याग्रह आंदोलनात उडी घेऊन त्यागाला आणि बलिदानाला सज्ज झालेले सामान्य लोक, यांचा एक फार मोठा वर्ग स्वराज्याच्या उभारणीच्या कार्यातून मात्र अजीबात नाहीसा झालेला लक्षात येतो. बलिदानाच्या मोबदल्यात अनेकांच्या वाटचाला आलेले दारिद्र्य आणि विफलतेची भावना, ह्यात ही सगळी पिढी एकदम अज्ञात–वासात गेल्यासारखी, गारद झाल्यासारखी दिसली. कॉंग्रेसच्या सरकारी पातळीवरच्या नेत्यांनी महात्मा गांधींनी घालून दिलेल्या वैयक्तिक, आणि विशेषतः सार्वजनिक पातळीवरील मानवतावादी राष्ट्रवादाच्या अहिंसात्मक वीरवृत्तीचा उच्च आदर्श, व्यावहारिक पातळीवरून असंमत ठरविला. आश्रम–वासीयांत विनोबांनी महात्मा गांधींच्या वारसाची भूमिका फार उत्तमपणे वठविली. नव्या सामाजिक क्रांतीची भूमिका विनतोडपणे विषद करण्याबाबत त्यांचे श्रेय फार मोठे मानावे लागेल. परंतु, सत्याग्रह–आंदोलनाच्या निमित्ताने या जनशक्तीला क्रियान्वित करण्याची जी संधी महात्मा गांधींना मिळाली, आणि जनशक्तीला तिच्या विराट–स्वरूपाचा साक्षात्कार घडविण्याचे जे श्रेय या निमित्ताने महात्मा गांधींना घेता आले, त्याकरिता स्वराज्यात वाव नव्हता. एक तर, भू–दान आंदोलनाच्या निमित्ताने श्रीमंत जमीनदारांचे हृदय–परिवर्तन घडवून आणण्याच्या कार्यक्रमाने या चळवळीचा एक मोठा भाग व्यापलेला होता. दुसरे, ग्रामदान, संपत्तीदान किंवा शांतिसेनेचा जो कार्यक्रम विनोबांच्या नेतृत्वाखाली आश्रमवासीयांनी हाती घेतला होता त्यातील प्रगतीची गती मंद असणे अपरिहार्य होते. उलटपक्षी मजुरांच्या, विद्यार्थ्यांच्या, किंवा सामान्य जनतेच्या ज्या चळवळी वेळोवेळी उभ्या झाल्या त्या या उत्क्रांति–वादी नेतृत्वाच्या प्रभाव–कक्षेत येऊ शकत नव्हत्या. राजकीय पक्षांनी हे नेतृत्व आपल्याकडे घेतले होते. त्यांना शह देण्याकरिता शांति–सेनेला कार्य करता आले नाही. आश्रमवासीयांची ग्राम–आंदोलनाची अहिंसात्मक चळवळ शहरी पक्षीय चळवळीच्या सांवटाने कुठल्याकुठे पार झांकळून टाकली.

असे कां झाले ? या प्रश्नाचे विश्लेषण करणे अगत्याचे ठरेल. गांधींचे नेतृत्व हे विभूतीचे नेतृत्व होते. विभूतीच्या संकेताने माणसे आणि घटना यांच्या हालचाली व्हायच्या, हे विभूतिमत्त्वाचे वैशिष्ठच इथेही कार्यान्वित होत होते. निष्ठा या एकाच गुणाला येथे आवाहन केले जात होते. सत्यासत्याचा ठाव घेण्याची अनुयायांना गरज नव्हती. त्यांचे ते कामही नव्हते. कारण विभूतीच्या प्रेरणेतून त्यांची दिशा आधीच ठरली होती. विभूतीच्या संकेतानुसार हाकेला उत्तर दिले आणि कर्तव्य संपताच पुन्हा आपले जीवन जगायला आपण मोकळे झालो, ह्या भूमिकेतून जन-शक्तीचे आवेग–उद्रेक प्रगट झाले. पण जनतेचा तो स्थायीभाव होऊ शकला नाही. गांधींनासुद्धा जनतेच्या चळवळीच्या नीतिमत्तेच्या मर्यादा, शेवटी माहित झाल्या होत्या. म्हणून १९४१ साली अस्सल सत्याग्रहींच्या एकांडचा सत्याग्रहाची योजना त्यांनी हाती घेतली. विनोबांना त्यांनी पहिला सत्याग्रही नेमले, आणि पुढे १९४२ मध्ये तर जन-आंदोलनांतून स्वतःच्या मार्गदर्शनाची भूमिकाच त्यांनी काढून घेतली.

स्वराज्यानंतर ज्या लोकशाही भूमिकेवरून राष्ट्राच्या पुनरुत्थानाचे कार्य हाती घेण्याचा संकल्प नेत्यांनी केला होता, त्या भूमिकेशी वरील भूमिका कितपत सुसंगत होती हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. शासक-शासितांतले अंतर कमी करणे, किंबहुना त्यांच्यात अधिकाधिक जवळीक निर्माण करणे, हे लोक-शाहीच्या सिद्धान्ताचे मर्म आहे. महात्मा गांधींचे विभूतिमत्त्व आणि त्यांच्या पुढे विनम्र झालेली जनता या दोघांच्या उंचीतला भेदच अधिक स्पष्ट होता. ते अंतर चढून जाण्याचा विचारही जनतेला करता आला नाही.

दुसराही एक महत्त्वाचा प्रश्न असा. महात्मा गांधींनी सामाजिक आणि आर्थिक उत्क्रांतीच्या कार्यक्रमा-करिता स्वयंपूर्ण ग्रामाची जी कल्पना मांडली, आणि पं. नेहरूंनी स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर देशाच्या औद्योगी कर-णाच्या दृढ संकल्पाने प्रेरित होऊन ज्या योजना धडाडीने हाती घेतल्या, त्या दोन्ही कार्यक्रमांची सांगड घालण्याचा प्रयत्न राज्यकर्त्यांनी कधी केला का ? या दोन्ही कल्पनांमधल्या अंतर्विरोधांचा प्रश्न वैचारिक पातळी-वरून, वराचसा अनुत्तरित राहिला आहे हे खरे आहे. परंतु व्यवहारात हे दोन्ही प्रयोग स्वतंत्रपणे चालू राहावेत, आणि परिणामी ते एकामेकांना पूरक ठरावेत इतके विशाल क्षेत्र सुदैवाने या देशाला उपलब्ध झालेले आहे. स्वराज्याच्या आंदोलनाच्या काळांतील ज्यांची सेवेची आणि त्यागाची प्रेरणा आजही टिकून आहे असे आश्रम-वासी नेतृत्व या ग्रामीण क्रांतीच्या निमित्ताने सतत कार्यरत आहे. राजकर्त्यांनी आपल्या कार्याशी त्यांच्या कार्याचा योग साधण्याचे कौशल्य दाखविले का, हा विचाराचा मुद्दा आहे. खादी-ग्रामोद्योग मंडळ आणि राज्यांच्या पातळीवरील राज्य-खादी आणि कुटीर-उद्योग मंडळे, असे आणि इतरही प्रयोग चालू असलेले दिसत आहेत. परंतु, ग्रामीण क्रांतीचा ठाव घेणाऱ्या अंतर्वेधी दृष्टीची या प्रयत्नात उणीव दिसून येते. सर्व प्रयत्नांचा मेळ देशोन्नतीच्या उद्दिष्टांकरता कामी लावण्याची धडाडी इथे प्रत्ययाला येत नाही.* खरे म्हणजे, शहर आणि खेडे, राष्ट्रीयीकरण आणि उद्योग-धंद्यांतील वैयक्तिक साहस, यांच्या परस्पर-संबंधातल्या कोडयाची उकल अजून आपल्याला झालेली दिसून येत नाही. लोकतांत्रिक समाजवादाचे ध्येय अंगीकारून योजना आणि लोकशाही यांचा समन्वय साधण्याचा निर्धार आपण केला असला तरी प्रत्यक्षात हा समन्वय अजून आपल्याला साधता आलेला नाही हे जसे सत्य आहे, तसेच कांग्रेसी सरकार आणि आश्रम-वासी यांच्यातल्या औद्योगीकरणाचा आणि अहिंसावादी ग्रामीण उत्क्रांतीचा मेळ अजून आपल्याला बसविता आला नाही, हेही उघड आहे.

आपल्या राष्ट्रीय जीवनात निर्माण झालेल्या वदतोव्याघाताचं (paradox)चे स्वरूप माझ्या दृष्टीने स्पष्ट करायचे तर असे सांगता येईल की, आपण पार्लमेंटरीचे जे मूल्य स्वीकारले आहे, त्या मूल्यांच्या अधिष्ठानाचे स्वरूप, ब्रिटिश इतिहासाला साक्षी ठेवून सांगायचे तर सांस्कृतिक आहे. स्वयंपूर्ण ग्रामाच्या कल्पनेवर आधारलेली स्वराज्याच्या शास-नाची जी कल्पना वेळोवेळी विनोबांच्या तोंडून आप-ल्याला ऐकायला मिळालेली आहे, तिचे अधिष्ठान आध्यात्मिक आहे. ही दोन्ही मूल्ये आपल्या देशात अभावानेच तळपत आहेत, हा वाजवी टीकेचा भाग

---

* बिहार सरकारने विनोबांच्या ७४ व्या वाढ-दिवसानिमित्त एकशे चौदा ग्रामदानी खेडयांची ग्राम सभांच्या स्थापनेसाठी घोषणा केली आहे हे खरे.

सोडून दिला तरी एक गोष्ट नक्कीच. ती ही की, मूल्यमापन करताना आपण कसोटचा अचूकपणे लागू करीत नाही. आणि त्यामुळे, अस्तित्वात असलेल्या विरोधांच्या पलीकडेही, वरील कारणामुळे confusion worst confounded अशी परिस्थिती दिसून येत आहे.

आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांबाबत माझी भूमिका स्पष्ट करणे जरूर आहे. संसदीय प्रणालीचा सारा गाभा अहिंसेवर आधारलेला आहे असे विधान मी करणार आहे. पण ही अहिंसा आणि गांधींची अहिंसा ह्यात मी फरक करते. संसदीय प्रणालीला आधारभूत असणारी अहिंसा ही सांस्कृतिक आहे. गांधींच्या अहिंसेला आध्यात्मिक, मानवतावादी अधिष्ठान आहे. मतभेद मुद्यांनी मिटवायचे, गुद्यांनी नाही, ही संसदीय प्रणालीची भूमिका, म्हणून ह्या प्रणालीचा तर्कावर, बुद्धिवादावर जोर आहे. म्हणजे, गुद्यापेक्षाही मुद्याची भाषा बोलायला आणि ऐकायला, समजून घ्यायला आणि समजावून द्यायला आणि मतैक्य व तडजोड हे मुख्य उद्दिष्ट मानून मतभेदाची परिसीमा निर्धारित करणारा उच्च स्तर ठरवायला प्रौढ समजूतदारपणा संसदीय प्रणालीला आवश्यक आहे. ह्या प्रणालीतील मतस्वातंत्र्याचा भर वादातून निर्माण होणाऱ्या शहाणपणावर आहे. " हो, हो,—नाही, नाही "च्या अडमुठेपणाला ह्या पद्धतीत स्थान नाही. समता आणि स्वातंत्र्याच्या प्रामाणिक जपणुकीतून निर्माण झालेले सौहार्द्र या पद्धतीला अभिप्रेत आहे. आणि हे सौहार्द्र, हा प्रामाणिकपणा, शहाणपणा आणि समजूतदारपणा, सुसंस्कृतपणाची बैठक असल्याशिवाय निर्माण होऊ शकत नाही. सुसंस्कृत माणसाचे हे गुण आहेत असे म्हणता येईल. ग्रेटब्रिटनमधे सामाजिक आणि आर्थिक जीवनाच्या क्षेत्रातून जसजशी या गुणांची अभिवृद्धी खालच्या थरापर्यंत पोहोचत गेली, तसतशी संसदीय पद्धती विकसित होत गेली, आणि अहिंसात्मक सुसंस्कृत जीवनाचा पाया मजबूत होत गेला. माणसाची वैयक्तिक पातळी आणि प्रतिष्ठा विकासाला आणि वाढीला लागली, एका दृष्टीने ब्रिटनच्या धर्म–कारणाने तिथल्या समाजात एका Puritanismचा आविष्कार केला. त्या Puritanismने पार्लमेंटला प्रतिष्ठा दिली, आणि अर्थकारणाने या पार्लमेंटचा पाया मजबूत केला.

महात्मा गांधींनी मनुष्याच्या अंतःकरणातल्या दिव्यत्वाला स्पर्श करायचे ठरविले;—असे दिव्यत्व की जे दारिद्र्य, अज्ञान यांना पार करून वर येईल. स्वराज्याच्या मंत्राने हे दिव्यत्व भारले गेले; आणि आपल्या विराट दर्शनाने त्याने पाश्चात्यांनाही चकित केले. पण सामाजिक आणि आर्थिक स्थैर्याच्या अभावी हिंदुस्थानच्या माणसाचा, दिव्यत्वच काय पण सुसंस्कृतपणा हाही स्थायीभाव होऊ शकला नाही. रिकाम्या पोटाच्या चिंतेने दिव्यत्वाचा तोल सांभाळण्याची त्याची शक्ती क्षीण केली.

परिणाम असा झाला की, धर्म–निरपेक्ष राष्ट्रवादाची कास आपण धरली, आणि सामाजिक पातळीवरून एक धर्मातीत असा व्यापक दृष्टिकोण पुढे मांडला. वैयक्तिक पातळीवरून मात्र धार्मिक माणसाच्या हृदयांत उद्भवणाऱ्या नीति आणि कर्तव्यकठोर आत्मपरीक्षणाला माणूस पारखा झाला. ह्याचा दृश्य परिणाम असा झाला की, प्रचलित संस्थांना, प्रचलित कल्पनांना आव्हान देणाऱ्या ज्या चळवळी निर्माण झाल्या त्या आत्मवंचनेतून, न्यूनगंडातून निर्माण झाल्या आहेत.

हा न्यूनगंड समाजाच्या संपूर्ण क्षेत्रातून निर्माण झालेला न्यूनगंड आहे. सामाजिक क्षेत्रात, आर्थिक क्षेत्रात, राजकारणात किंवा धर्मकारणात, न्यूनगंडाने पछाडलेल्या व्यक्तींच्या हाती चळवळीची सूत्रे जात आहेत. ज्यांच्या हाती जमीन येत आहे, ते हिरव्या क्रांतीत (Green Revolution) सहभागी होऊ शकत नाहीत. ज्यांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध होत आहेत, त्यांना ज्ञानार्जनाची लालसा नाही. समाज–वादाने ज्या मजूराला उचलून धरले त्याला उत्पादनाच्या गुणवत्तेची आणि गतीची तमा वाटत नाही. जमीन हिसकावून घेण्याची भाषा ते ऐकतात आणि बोलतात. विद्यापीठाचे निर्णय त्यांच्या इच्छेने व्हावे असा त्यांचा दावा आहे. कारखान्यांच्या स्वामीत्वाची मागणी करून त्यांना दहशतीचे राजकारण रंगवायचे आहे. आणि खेड्यांच्या पातळीवर स्थानीय स्वशासनाच्या प्रयोगाद्वारा जिथे स्वावलंबनाला आणि Community Feeling ला प्रेरणा द्यायचा प्रयत्न होतो आहे, तिथे सत्तेच्या राजकारणाचे डावपेच सारं ग्रामीण जीवन दूषित करून टाकीत आहे.

म्हणजे, सत्ता हाती घेतलेला शासक–वर्ग, समाजवादी कल्याणवाद, प्रायव्हेट सेक्टर, पब्लिक

सेक्टर, राष्ट्रीयीकरण, सामाजीकरण, अशा अनेक वादांच्या भोवऱ्यात साध्याला हरवून "संशयहिना विनश्यति" अशा परिस्थितीत किंकर्तव्यमूढ होऊन "फक्त सत्ता तेवढी खरी" असे म्हणून तिला कवटाळून बसलेला आहे. आणि हतप्रभ झालेले विरोधी पक्ष वरील न्यूनगंडांचा आपल्याला काय फायदा होईल याचा शोध घेत आहेत. न्यूनगंडांतून निर्माण होणाऱ्या हिंसेने सामाजिक जीवनात अधिकाधिक अस्थिरता निर्माण होते आहे, आणि प्रगतीला होणाऱ्या प्रतिरोधामुळे मधला वर्ग हताश होत्साता असताना आत्मकेंद्रित बनत चालला आहे. सारे जीवन राजकारणाच्या गदारोळात डचमळत पडले आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या पिढीवर महात्मा गांधींच्या विचारांचे संस्कार नाहीत ही गोष्ट कटु असली तरी सत्य म्हणून आपल्याला पचवावी लागेल. पं. नेहरूंच्या मृत्यूनंतर अवघ्या पाच वर्षांतच त्यांचाही तरुण पिढीला विसर पडत चालला आहे. विभूतिमत्वाच्या अनेक पिढ्यांच्याच नव्हे तर अनेक शतकांच्या संस्कारांचे बंधन हा नवा समाज झुगारून देणार असेल तर त्याची खंत बाळगण्याचे तसे कारण नाही. उलट, ही गोष्ट स्वागतार्ह मानावी अशीच आहे. पण गांधींची म्हणून नाही तरी अखिल मानव्याची भूमिका उचलून धरणाऱ्या आध्यात्मिक अहिंसेचा विचार या देशाला आज ना उद्या करावा लागणार आहे. सारा विधायक विचार याच दिशेने पुढे जात आहे, जाणार आहे. आणि त्याकरता एका सुसंस्कृत समाजाची "जगा, आणि जगू द्या" (Live and let live) ही भूमिकाही आज ना उद्या आपल्याला धारण करावी लागणार आहे. न्यूनगंडातून निर्माण होणाऱ्या चळवळीत तादृष परिणाम निघत असले तरी एकसंघ राष्ट्रीय समाजांच्या गरजा त्यातून जोपर्यंत पूर्ण होत नाहीत तोपर्यंत ते परिणाम अस्थिर, अस्थायी असेच राहणार. अनुभवाचे मोल दिल्याशिवाय ही गोष्ट कदाचित् ह्या समाजाला पटायची नसेल. पण जाणीवेतून येणारी समज अधिक चिरस्थायी असते. तेव्हा हे अनुभवाचे मोलही चुकवायलाच हवे. संसदीय संस्था त्याकरिता या देशात टिकायला हव्यात, असा आग्रह धरण्याचेही कारण नाही. त्यामागील भूमिका जास्त महत्त्वाची आहे. अहिंसेच्या — सुसंस्कृत सौहार्द्राच्या पातळीवरून निर्णय घेण्याची !

विनोबांनी एकदा ब्रिटिश राष्ट्राच्या सुसंस्कृतपणाची प्रशंसा केली होती. कारण, — (१) परिस्थितीची पावले ओळखून खुल्या मनाने त्यांनी सत्तेचे हस्तांतरण केले; (२) युद्धकाळात आणि युद्धसमाप्तीनंतरही महागाईची पातळी परिसीमा ओलांडण्याच्या आधीच रोखून धरली; आणि (३) चर्चिल सरकारचे महायुद्धकाळीन कार्य संपताच, त्या सत्तेच्या हातून अधिकार काढून घेतले.

आपल्या राष्ट्रामधील समस्यांना ही अशीच काहीशी उत्तरे अभिप्रेत नाहीत का? गांधींच्या मार्गाने पुढे जाण्याकरिता आधी या म्हणजे सुसंस्कृतपणाच्या मार्गाने आपल्याला जायला हवे. विचारवंतांची या देशात उणीव नाही. उणीव आहे ती जाणीवेची.

असा मुत्सद्दी ! असा वैष्णव

प्रा. ना. सी. फडके

१९१६ सालच्या फेब्रुवारी महिन्याच्या ४ तारखेस बनारस येथे पंडित मदन मोहन मालवीय यांनी स्थापन केलेल्या हिंदु विद्यापीठाच्या इमारतीचा कोनशीला समारंभ झाला. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या न्याय्य हक्कांचा लढा लढविण्यात आयुष्यातील भर उमेदीची एकवीस वर्षे खर्च करून, गांधी १९१५ साली हिंदुस्थानात परत आले होते. भारताचं स्वातंत्र्य मिळविण्यासाठी उरलेलं आयुष्य वेचण्याचं त्यांनी ठरवलं होतं. आणि देशातील परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी ते देशभर हिंडत होते. हिंदु विद्यापीठाच्या समारंभाचं आमंत्रण मालवीयजींनी गांधींना दिलं होतं आणि भाषण करण्याची विनंतीही त्यांना केली होती. . समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ॲनी बेझंट बसल्या होत्या. बडे बडे गोरे काळे सरकारी अंमलदार हजर होते. मोठमोठ्या संस्थानांचे राजे महाराजे उंची वस्त्रालंकारांनी सभेत सजून बसले होते.

समारंभ साजरा करणारी ठरीव ठशाची भाषणे झाली. परस्पर प्रशंसेचे पूर वाहू लागले . . .गांधींची भाषण करण्याची पाळी आली तेव्हा ते उभे राहिले . . . सर्वांची कल्पना सहाजिकच अशी की, प्रशंसेच्या वाहत्या गंगेत गांधी हात धुवून घेतील.

परंतु गांधींनी भाषणाच्या रूपानं समारंभावर बॉंबच टाकला.

भाषणाच्या प्रारंभीच त्यांनी ठणकावून सांगितलं की अशा समारंभातली भाषणं इंग्रजीतून व्हावीत ही मोठी शरमेची गोष्ट आहे. देशी विद्यापीठातलं सर्व शिक्षण हिंदीच्या माध्यमातून का होऊ नये असा सवाल त्यांनी केला. आपले विचार व्यक्त करण्यास आपली राष्ट्रभाषा असमर्थ आहे, असं वाटत असेल तर राष्ट्र या नात्यानं सरळ मरण पत्करलेलं काय वाईट ? अशी निर्भर्त्सना केली आणि आपल्या स्पष्टोक्तीचा खुलासा करण्यासाठी ते म्हणाले, " गोड गोड बोलण्यासाठी मी या ठिकाणी आलो नाही. माझ्या मनात जे काही उकळतं आहे ते मला सांगायचं आहे."

सभास्थानातील बडी बडी धेंडं अस्वस्थ झाली. राजनिष्ठांना वाटलं, आता हा गृहस्थ सरकारविरुद्ध काय काय बोलतो कुणास ठाऊक ? अध्यक्षस्थानी बसलेल्या बेझंटबाई गांधींना इशारा देऊ लागल्या की, 'प्रसंग ओळखून बोला' – गांधींनी प्रत्येक वेळेस बाईंना बजावलं की, 'प्रसंग ओळखला आहे आणि म्हणूनच बोलतो आहे' – सरकारला, राजेरजवाड्यांना आणि लोकांनाही चौफेर कानपिचक्या देणारं आपलं विलक्षण स्पष्टोक्तीपूर्ण भाषण गांधी रेटीतच राहिले.

ते म्हणाले, काल संध्याकाळी मी काशी विश्वेश्वराच्या दर्शनास गेलो होतो. तिथली घाण आणि अस्वच्छता बघून मला घृणा वाटली. साऱ्या जगात प्रसिद्ध असलेल्या आपल्या या हिंदु देवालयातील घाण म्हणजे आपल्याला समाजाच्या आणि राष्ट्राच्या अंतरंगातील गलिच्छपणाचं प्रतीकच म्हणावं लागेल. आपली पवित्र मंदिरं जर आपणाला आरशासारखी स्वच्छ ठेवता येत नाहीत तर स्वराज्याच्या कल्पना करण्याचा आपल्याला काय अधिकार आहे ?...देशातील दारिद्र्य बघून माझं अंतःकरण नुसतं व्यथितच होतं, परंतु ऐदी, आळशी नालायकांच्या संपत्तीचं प्रदर्शन पाहिलं की, माझ्या अंतःकरणाच्या चिंध्या चिंध्या होतात. . . . माझ्यासमोर नटून थटून बसलेल्या या राजे महाराजे यांना सांगावसं वाटतं की, "बाबांनो, तुमच्या अंगावरचं हे जडजवाहीर खाली उतरवून ठेवा. तुमची उंचीउंची वस्त्रं, कमरेला केवळ शोभेसाठी लटकाविलेल्या तलवारी, केवळ स्त्रियांनाच शोभतील असे

हिऱ्यामोत्यांचे अलंकार, कंठे, पगड्यांवर गोंडे——ही काय पराक्रमांची चिन्हं आहेत? ती गुलामीची चिन्हं आहेत. या चिन्हांची शरम वाटली पाहिजे"

महात्मा गांधींनी ब्रिटिश राज्यकर्त्यांना उद्देशून, 'चले जाव'ची घोषणा केली, ती पुढे १९४२ साली. परंतु त्याच्या आधी २६ वर्षांपूर्वी बनारस हिंदु विद्यापीठात केलेल्या या भाषणात 'चले जाव'चा हा विचार त्यांनी स्पष्ट बोलून दाखविला होता. ते म्हणाले, "इंग्रज लोक हिंदुस्थान सोडून गेल्याखेरीज या देशाचा उद्धार व्हायचा नाही. त्यांना हाकून दिलंच पाहिजे अशी माझी जर खात्री झाली तर 'तुम्ही चालते व्हा' असं त्यांना उघडपणे बजावण्यास मी मागे पुढे पाहणार नाही. आणि या माझ्या मताप्रीत्यर्थ मरण्यास देखील मी सज्ज होईन. बॉंबगोळे फेकणाऱ्या अराजकांचं म्हणणं असं आहे की"——

अध्यक्ष बेझंटबाई यांना गांधींचं ते वक्तृत्व ऐकवेना. त्यांनी गांधींना अडथळा करून म्हटलं, 'मेहरबानी करून पुरे करा आता–' पण गांधी म्हणाले, "अध्यक्षांच्या परवानगीनं मी आपणाला असं सांगतो की, सरकार आणि जनता यामध्ये उभयपक्षी जे संशयपूर्ण वातावरण आहे त्यातून देशाला मुक्त करण्याची माझी इच्छा आहे."

व्यासपीठावरील सारे शिष्ट अस्वस्थ झाले. राजे महाराजे गर्भगळीत झाले, भाडोत्री विद्वान् लटलटा कापू लागले. अध्यक्षांसकट सारी वडी वडी धेंडं चक् चक् करीत निघून गेली. सन्माननीय पाहुण्यांनी काढता पाय घेतला. सर्व सामान्य श्रोते टाळ्यांचा गजर करीत होते. परंतु अध्यक्षच नाहीसे झाल्यामुळे सभा मोडली, गांधींचं ते भाषण अपूर्णच राहिलं....

परंतु त्या प्रसंगीच्या अपूर्ण वक्तृत्वानं शेकडो पूर्ण भाषणांचं काम गांधींनी साधलं होतं. लोकांची खात्री पटली होती की गांधी म्हणजे इतरांसारखा पोषाखी वक्ता नव्हे. वरून कितीही शांत, स्थिर भासला तरी तो एक निद्रिस्त ज्वालामुखी आहे. त्याच्या गर्भात कोटी कोटी लोकांना चेतविणारा तप्त रस आहे.

आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या न्याय्य हक्कासाठी सतत एकवीस वर्षं सत्याग्रहाची झुंज देऊन, गांधीजी परत भारतात आले होते, ते अशा ठाम विचाराने की, आफ्रिकेतील हिंदी लोकांचा प्रश्न योग्य रीतीनं सोडवून घ्यायचा असल्यास भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आधी सोडविला पाहिजे आणि तो सोडविण्यासाठी सत्याग्रहाचं शस्त्रच वापरलं पाहिजे. स्वातंत्र्य हे साध्य आणि सत्याग्रह हे साधन अशी त्यांच्या मनाची भूमिका तयार झालेली होती. सत्याग्रहाची आणि असहकारितेची देशव्यापी चळवळ भारतात कशी उभी करता येईल याचा अदमास घेण्यासाठीच ते भारतात हिंडत होते. सत्याग्रहाचा प्रयोग भारतीय जनतेला शिकविण्याच्या संधीची ते वाट पहात होते.

चंपारण्यातील निळीच्या मळ्यावर राबणाऱ्या मजुरांवरील कित्येक वर्षांचा घोर अन्याय दूर करण्यासाठी मळ्यांच्या गोऱ्या मालकांशी लढा देण्याचं त्यांनी ठरविलं, ते भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात सत्याग्रहाचं शस्त्र वापरता येतं की नाही हे पाहण्याच्या हिशेबानेच. चंपारण्यातील लढा गांधींनी जिंकला. त्यानंतर थोड्याच दिवसात रौलॅंड ॲक्ट नावाचा एक नवा जुलमी कायदा सरकारनं केला. तेव्हा निःशस्त्र प्रतिकार आणि सत्याग्रह यांची दीक्षा भारतीय जनतेला देण्याची आणखी एक संधी गांधींना मिळाली. या कायद्याविरुद्धची चळवळ देशभर उठविण्यात त्यांना यश मिळालं. परंतु अहिंसेच्या तत्त्वाचं परिपालन जनतेनं केलं नाही. देशात अनेक ठिकाणी दंगे झाले. दडपशाहीचा वरवंटा लोकांवर फिरविताना दया, माया, न्याय, नीती या गोष्टी सरकारनं गुंडाळून ठेवल्या. यातूनच जालियनवालाबाग येथे हजारो लोकांची जी क्रूर कत्तल गोऱ्या अधिकाऱ्यांनी केली तिचं प्रकरण उत्पन्न झालं. देशव्यापी चळवळ करून दाद लावून घेण्याचा गांधींचा प्रयत्न फसला. परंतु त्यांच्या या अपयशातच पुढच्या चळवळीची बीजं होती. कारण रौलॅंड ॲक्ट आणि जालियनवाला बागेतील कत्तल या दोन घटनांमुळे गांधींचं हृदयपरिवर्तन झालं. ब्रिटिश सरकारवर विश्वास टाकून सहकार्य करण्याची त्यांची आशावादी वृत्ती पार जळून खाक झाली.

आता ते या परकी सरकारला तिलांजलीच द्यावयास उठले. पंजाब प्रकरणी देशाला न्याय मिळालाच नाही. पण सहकार्याच्या इच्छेच्या कोशातून बाहेर पडलेले नव्या रुद्र स्वरूपातले गांधी मिळाले —— आफ्रिकेतून परत आल्यापासून ते देशातील परिस्थितीचा

अभ्यास करीत होते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्याला काय करता येईल याचं चिंतन करत होते. आज त्यांचा अभ्यास आणि चिंतन पूर्ण झालं होतं. कोणत्या स्वरूपाची चळवळ देशात उठविली पाहिजे याबद्दलचे त्यांचे विचार निश्चित झाले होते. १९१९ सालच्या अमृतसर येथील काँग्रेसच्या अधिवेशनाला ते हजर राहिले ते या मनस्थितीतच.

गांधींनी राष्ट्रसभेच्या ज्या अधिवेशनात पुढारी म्हणून भाग घतला ते हे पहिलंच अधिवेशन होतं आणि उलट टिळक ज्या अधिवेशनाला हजर राहिले असं राष्ट्रीय सभेचं हे अखेरचं अधिवेशन होतं. म्हणजे असं म्हणता येईल की, या अधिवेशनात टिळकांचं राजकारणाचं युग संपलं आणि गांधींच्या राजकारणाचं नवं युग सुरू झालं.

पुढे तारीख १ ऑगस्ट,१९२० रोजी लोकमान्य टिळकांचं देहावसान झालं. 'माझा एक मोठा आधार गेला' असे उद्‌गार गांधींनी काढले. देशाचं धुरीणत्व आता आपण एकट्यानंच उचललं पाहिजे, असा निश्चय करून, असहकारितेच्या चळवळीची आपल्या मनातील योजना राष्ट्रीय सभेकडून मंजूर करण्याच्या कामाला ते लागले. . कलकत्ता येथील जादा अधिवेशन आणि नागपूर येथील नेहमीचं प्रतिवार्षिक अधिवेशन या दोन्ही अधिवेशनात गांधींच्या असहकारितेचा ठराव प्रचंड बहुमताने पास झाला. भारतीय राजकारणाची सूत्रं गांधींच्या हाती आली. चतुःसूत्री बहिष्काराचं शस्त्र गांधींनी उपसलं.

१९२० च्या नागपूर येथील काँग्रेसच्या अधिवेशनात गांधींच्या हाती राजकारणाची सूत्रं आली. त्याच्या आधीपासूनच 'एका वर्षात स्वराज्य' अशी घोषणा व्याख्यानातून आणि लेखनातून गांधीजी करू लागले होते. गांधीजी मुत्सद्दी होते आणि त्याचप्रमाणे सामान्य जनता आपल्या चळवळीकडे आकृष्ट होईल अशा प्रकारे जाहिरातबाजी करण्याचं अपूर्व कौशल्यही त्यांच्या अंगी होतं. 'एका वर्षात स्वराज्य' मिळविण्याची प्रतिज्ञा त्यांना पूर्ण करून दाखविता आली नाही. परंतु त्यामुळे जनतेचा त्यांच्यावरील विश्वास कमी झाला नाही. देशातील चैतन्याची लाट ओसरू न देता ती आणखी जोराने उठविण्यासाठी अफाट आणि अशक्य असं काहीतरी करून दाखविण्याचा संकल्प सोडला पाहिजे हे गांधींनी ओळखलं. त्यांनी तीन गोष्टींची घोषणा केली. तीन महिन्यात काँग्रेसचे एक कोटी सभासद करीन, टिळक स्मारक फंडासाठी एक कोटी रुपये जमवीन आणि देशात वीस लाख चरखे चालू करीन, अशी त्रिविध प्रतिज्ञा त्यांनी केली.. . एक कोटी सभासद, एक कोट रुपये, वीस लक्ष चरखे ! . अशा नव्या मंत्रानं त्यांनी सारा देश भारून टाकला.

भारतात ब्रिटिश राज्यकर्त्यांवर असहकारितेचं एक नवंच अस्त्र फेकण्यासाठी सिद्ध झालेले गांधी १९२० साली भारताचे एकमेव नेते झाले. तेव्हापासून पुढे १९४७ साली भारताचं स्वातंत्र्य सिद्ध झालं तोपर्यंतच्या २६ वर्षांच्या काळात भारताची राजकीय चळवळ अनेक अवस्थातून गेली. कधी ती पुढे सरकली, कधी ती मागे हटली. कधी गांधींचे डावपेच यशस्वी झाले, कधी ते फसले. १९२४ साली आणि पुन्हा १९३५ साली अशा दोन वेळा तर 'तुम्हाला काय हवं ते करा' असं नेहरू—पटेल वगैरे पुढाऱ्यांना सांगून गांधीजी बाजूला झाले होते. फक्त चार आणे देऊन मिळणारं काँग्रेसचं सभासदत्वही त्यांनी सोडून दिलं होतं. परंतु राजकीय संन्यासाच्या काळातही काँग्रेसवर आणि देशावर गांधीजींचीच सत्ता होती. गांधींच्या सल्ल्यावाचून भारतीय राजकारणाचं पान हालत नव्हतं. १९२१ ते १९४७ या सव्वीस वर्षाच्या दीर्घकाळात 'गांधी बोले देश हाले' अशी परिस्थिती होती.

लोकमान्य टिळकांनी, कॉलेजच्या विद्यार्थी दशेतच ठरविलं होतं की, देशसेवेचं व्रत घ्यायचं. माझी खरी इच्छा संशोधक होण्याची होती असं टिळक म्हणत असत खरे. परंतु आपली ही आंतरिक इच्छा बाजूला ठेवून राजकारणाच्या क्षेत्रात आपल्याला उतरले पाहिजे असा विचार करून ते स्वेच्छेनं राजकारणी बनले होते. या उलट गांधीजी राजकारणी बनले ते स्वेच्छेने नव्हे तर योगायोगानं. आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या लढ्याचं नेतृत्व त्यांच्याकडे चालून आलं, त्यांना ते पत्करावं लागलं, म्हणून राजकारणाच्या क्षेत्रात त्यांचं पहिलं पाऊल पडलं होतं. मात्र एकदा पाऊल टाकल्यावर त्यांनी कधी मागं वळून बघितलं नाही. ते सतत पुढे पुढेच गेले. आफ्रिकेतील लढा चालविताना (सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा अंगिकार त्यांनी केला होता) एक प्रकारचं साधुत्व पत्करलं होतं. एकदा साधुत्वाच्या मार्गानं जायचं ठरविल्यावर

ऱ्या मार्गानेही ते सतत पुढेच गले. गांधीजींच्या ठिकाणी मुत्सद्दी गांधी आणि साधू गांधी अशा दोन व्यक्ती होत्या. गांधींनी भारतीय राजकारणाची सूत्रं हाती घेतल्यापासून देश स्वतंत्र होईपर्यंत राजकीय क्षेत्रात ज्या बऱ्याच वाईट घटना घडल्या त्यांची सुसंगती लावण्यासाठी असंच म्हणलं पाहिजे की गांधीजी नुसतेच मुत्सद्दी अगर नुसतेच साधु नव्हते, तर मुत्सद्दीही होते आणि साधुही होते. कधी त्यांच्या ठिकाणचा मुत्सद्दी प्रभावी ठरला. तर कधी कधी त्यांच्या ठिणाणचा साधू अधिक प्रभावी ठरला. कधी गांधीजींची जीत झाली तर कधी हार झाली. ती त्यांच्या ठिकाणचा मुत्सद्दीपणा आणि साधुत्व या दोन विरोधी गुणांच्या मिश्रणामुळेच. 'काळ हा मोठा कठीण शिक्षक आहे' असं गांधीजींना वारंवार म्हणावं लागलं ते यामुळेच. प्रारंभीच्या काळात गांधीजींना वाटलं होतं की हिंदू आणि मुसलमान यांचं ऐक्य झाल्याखेरीज भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न सुटणार नाही. म्हणून ते म्हणू लागले, "आधी ऐक्य मग स्वातंत्र्य" ते ऐक्य घडवून आणण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. ते सारे प्रयत्न फसल्यावर गांधीजी म्हणू लागले, 'आधी स्वातंत्र्य, मग ऐक्य!'

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे', असं म्हणण्याचं धैर्य लोकमान्य टिळकांनी लोकांना शिकविलं. 'गांधीजींनी यापुढे एक पाऊल टाकलं आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांना स्वराज्य न दिल्यास काय करायचं ते भारतीय जनतेला सांगितलं. लो. टिळकांनी हयातभर जागृतीचं कार्य केलं खरं, परंतु देशातल्या सामान्य माणसालाही जो करता येईल असा कार्यक्रम त्यांनी दिला नव्हता. गांधींचा मोठेपणा हा की त्यांनी सामान्य नागरिकांपुढे एक विशिष्ट कार्यक्रम ठेवला. टिळकांच्या कारकिर्दीत देशाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न लढला जात होता. विधीमंडळात तो रस्त्यावर लढला जावा अशी योजना केली गांधींनी. ज्या योगे सामान्य माणसालाही सरकारशी भिडता येईल आणि झुंज देता येईल. असा मार्ग गांधींनी जनतेला दाखविला. ही गांधींची विशिष्ट कामगिरी म्हणावी लागेल. गांधीजींनी ज्या चळवळीचे धडे भारतीय जनतेला दिले. त्या चळवळीत 'कायदे भंग' आणि 'अहिंसा' या दोन तत्वतःच परस्पर विरुद्ध असणाऱ्या प्रवृत्तींचा अंतर्भाव होता. या गोष्टीतच गांधींच्या राजकारणाचं सामर्थ्य होतं. परंतु यातच चळवळीच्या विफलतेची बीजंही होती. भारतीय राजकारणाचा धुरंधर या नात्यानं गांधींनी अनेक वेळा पटावरची मोहरी पुढे सरकवली, अनेक वेळा मोहरी मागे घेतली, कितीक वेळा पटच उधळला जातो की काय असंही वाटलं–या साऱ्या घटनांचं मूळ या गोष्टीत होतं की, गांधीजी मुत्सद्दी होते आणि साधुही होते. त्यांनी भारतीय स्वातंत्र्याचं ध्येय तर डोळ्यापुढे ठेवलं होतंच, परंतु शिवाय बंधुत्व आणि शांती देशात प्रस्थापित करण्याचंही ध्येय ठेवलं होतं, किंवहुना बंधुत्व आणि शांती यावाचून स्वातंत्र्याला त्यांच्या दृष्टीने काही किंमत नव्हती.

म्हणूनच ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला नव्यानं मिळालेल्या सार्वभौम स्वातंत्र्याचा सोहळा दिल्लीत झाला. त्याला हे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सतत सत्तावीस वर्षं जे गांधीजी अव्याहत झगडले ते हजर नव्हते. ते होते कलकत्त्याला. जातीय दंग्याच्या आगीचा डोंब पेटला होता ते विझविण्यासाठी ते झटत होते. सोहळ्याच्या वेळेस देशभर झालेली दिव्यांची रोषणाई त्यांच्या नजरेला दिसत नव्हती. उलट, 'माझ्या भोवती जिकडे तिकडे अंधार दिसत आहे' असे ते बोलून दाखवित होते. देशाची फाळणी झाली आणि त्या फाळणीच्या पाठोपाठ हजारो लोकांची कत्तल झाली, लुटालूट झाली, जाळपोळ झाली हे पाहून त्यांच्या अंतःकरणाचे तुकडे तुकडे झाले.... सोळा वर्षांपूर्वी लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघ असावा असा हट्ट श्री. आंबेडकरांनी धरला होता आणि त्यावेळचे इंग्लंडचे पंतप्रधान मॅग्डोनल्ड यांच्याकडे यावावतचा अखेरचा निर्णय सोपविण्यात आला होता. तेव्हां गांधींनी त्याला बजावलं होतं की, "अस्पृश्यांना जर कोणी विभक्त मतदार संघ देऊ लागेल तर त्या राज्यघटनेला मी मरेपर्यंत विरोध करीन" हिंदु समाज अखंड राहिला पाहिजे अशी गांधींची अढळ भूमिका होती:...आणि त्याचप्रमाणे देश अखंड राहिला पाहिजे अशीही त्यांची भूमिका होती ..पाकिस्तानच्या निर्मितीत गांधींचा हात होता, असं जे लोक म्हणतात ते केवळ अज्ञानानं तसं म्हणतात. लॉर्ड माऊंट बॅटन यांनी आपली योजना पुढे मांडली तेव्हा काँग्रेसपुढे दोन मार्ग होते. एक असा की, फाळणीला मान्यता देऊन,

स्वातंत्र्य पदरात पाडून घ्यावे, किंवा दुसरा, फाळणी नाकारून, स्वातंत्र्य कितीही लांबलं तरी हरकत नाही असं म्हणावं. फाळणीसह स्वातंत्र्य हवं की पारतंत्र्यासह देशाचं अखंडत्व हवं असा सवाल होता. गांधीजी सतत सांगत राहिले की देशाच्या फाळणीला मी कधीही संमती देणार नाही.

त्यांच्या ठिकाणचा राजकारणी पुरुष आणि शांतीदूतत्व करणारा साधु पुरुष या दोघांत पूर्वी कधी नव्हे असा झगडा यावेळी उत्पन्न झाला आणि या झगडयात साधुपुरुषाचा विजय झाला....फाळणीला मान्यता न दिल्यास स्वातंत्र्य लांबेल. मग पुढे काय करायचं, या प्रश्नाचं उत्तर देण्याची वेळ गांधींवर आलीच नाही. कारण त्यांच्याखेरीज बाकीचे सर्व पुढारी फाळणीसकट स्वातंत्र्य स्वीकारण्यास उतावीळ झालेले त्यांना दिसले आणि ते पाहिल्यावर गांधी त्यांच्या वाटेतून दूरच झाले.... गांधींनी पाकिस्तानच्या प्रत्यक्ष फाळणीला मान्यता दिली नाही. केवळ आपल्या हट्टासाठी भारतीय स्वातंत्र्याचा दिवस लांबू नये एवढयाकरिता राजकारणी पुरुष या नात्यानं त्यांनी एक प्रकारे स्वतःची आत्महत्याच केली ... ज्या दिवशी हिन्दुस्थान आणि पाकिस्तान अशी दोन राष्ट्रे निर्माण झाली त्यादिवशी भारताचा एकमेव राजकीय नेता या नात्यानं गांधींचं चरित्र संपलं. त्यांनी आपण होऊन ते संपविलं. ता. १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळक स्वर्गवासी झाले आणि गांधी हिन्दी राजकारणाचे सूत्रधार बनले. ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचा पहिला स्वातंत्र्य दिन साजरा झाला आणि त्याच दिवशी गांधींच्या राजकीय कारकीर्दीचा अंत झाला.

यानंतर अवघ्या पाचच महिन्यांनी त्यांची जीवित यात्राच संपणार होती, असं भविष्य कुणी वर्तविलं असतं तर त्यावर कुणाचा विश्वास बसला नसता. पण विधिलिखित तसं होतं.

१९४७च्या ऑक्टोबरच्या २ तारखेला गांधीजींचा ७८वा वाढदिवस झाला तेव्हा जिकडून तिकडून त्यांच्यावर अभिनंदनांचा आणि शुभेच्छांचा वर्षाव झाला. परंतु या प्रसंगी गांधींनी असे उद्‌गार काढले की, 'माझ्या अंतःकरणात दुःख तुडुंब भरलेलं आहे. भोवताली जिकडे तिकडे द्वेष आणि हत्येची इच्छा यांनी वातावरण दूषित झालेलं असताना मी जगू तरी कसा?' नव्यानं स्वतंत्र झालेल्या देशाचा राज्यकारभार नेहरू-पटेल इत्यादी पुढाऱ्यांवर त्यांनी सोपविला. जनतेचा आत्मा छिन्नविछिन्न होऊ लागला होता. तो सांधण्याची अवघड कामगिरी त्यांनी पत्करली. सारं आकाशच फाटल्यासारखं झालं होतं, त्याला गांधीजी ठिगळं लावणार होते तरी किती? परंतु अशक्य वाटण्यासारखं ते काम ईश्वरावर श्रद्धा ठेवून गांधीजी करू लागले.

भारतीय स्वातंत्र्याचं मंदिर एकीकडे उभं राहिलं होतं, पण दुसरीकडे त्या मंदिराच्या पायाचे दगड निखळू लागले होते. ते निखळणारे दगड सावरण्यासाठी गांधी पुढे सरसावले. ते सावरताना स्वतः नामशेष होण्याची पाळी आली तरी हरकत नाही असा मनाचा हिय्या करून ते पुढे सरसावले. ज्या ज्या ठिकाणी लूटमार, जाळपोळ आणि हत्या यांचा भयंकर वणवा पेटला होता, त्या त्या ठिकाणी ते जाऊन उभे रहात होते, 'एक व्हा, बंधुभाव सोडू नका, देशात शांतता नांदू द्या' असा आक्रोश करीत होते. उपोषण करीत होते. देशात बंधुभाव आणि शांती टिकविण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करण्याचे वचन हिन्दी आणि मुसलमान पुढाऱ्यांकडून घेत होते. त्यांची प्रार्थनेची सभा तर रोज चालली होती. बाँब पडोत, गोळयांचा वर्षाव होवो. परमेश्वराला हाक मारण्यासाठी आपली प्रार्थना अखंड चालू राहिलीच पाहिजे, असे ते म्हणत होते. स्वतंत्र झालेल्या देशाचे दैनंदिन प्रश्न त्यांनी मनावेगळे केले होते. राजकीय नेत्याची वस्त्रं त्यांनी टाकून दिली होती. शांती आणि बंधुत्व यांचा अखंड जप करणारा वैष्णव ते बनले होते.

अशा या अभूतपूर्व वैष्णवाचा अंत ता. ३० जानेवारी १९४८ साली प्रार्थनेच्या जागी झाला ही एक अर्थपूर्ण घटना म्हणावी लागेल.

या महात्म्याच्या अंत्ययात्रेच्या मिरवणुकीत भारताच्या सार्वभौम सत्तेचं सारं वैभव प्रगट झालं. देश स्वतंत्र झाला तरी सत्तेच्या सिंहासनावर गांधीजी जिवंतपणे चढले नव्हते. परंतु राष्ट्रानं त्यांना अखेरचा मुजरा केला. तो अशा भावनेनं आणि दरबारी थाटानं की स्वतंत्र हिंदुस्थानचे अनभिषिक्त सम्राट गांधीच होते. त्या लष्करी गाडयावर फुलांनी आच्छादिलेला

गांधींचा देह ठेवला होता. त्याच्या मागोमाग नेहरूं-सकट सारे मंत्री पायी चालत होते. यात्रेबरोबर आकाशातून विमाने चालली होती आणि वरचेवर गांधींवर पुष्पवृष्टी करीत होती. ही वैभवशाली प्रचंड प्रेतयात्रा सकाळी सात वाजता बिर्ला भवनातून निघाली ती तिसऱ्या प्रहरी चार वाजता यमुना नदीच्या राजघाटावर पोचली. चंदनाच्या चितेवर गांधींचा देह ठेवण्यात आला. रामदास गांधींनी चितेला अग्नी दिला. चितेतून पहिली ज्वाला निघताच दहा लाख लोकांच्या तोंडून गांधींच्या नावाचा जयजयकार बाहेर पडला.

महात्मा गांधी अमर असोत.

संपादकीय

प्रो. ब. ग. गर्गे यांचा मृत्यु

नागपूरच्या धरमपेठ महाविद्यालयातील इंग्रजीचे ज्येष्ठ अध्यापक प्रो. बळिराम गोपाळ उर्फ राजाभाऊ गर्गे यांना दि. १३ सप्टेंबर १९६९ रोजी कॅन्सरच्या विकाराने देवाज्ञा झाली, याबद्दल आम्हास अत्यंत दुःख वाटते. मरणसमयी त्यांचे वय ५७ वर्षांचे होते.

श्री. राजाभाऊंचा जन्म ता. ८ एप्रिल १९१२ रोजी झाला. १९२९ साली ते येथील हिस्लॉप कॉलेजातून बी. ए. झाले; व त्यानंतर फ्रेंच भाषा हा विषय घेऊन १९३० साली त्यांनी पुन्हा बी. ए. ची परीक्षा दिली. त्यांचे वडिल श्री. गोपाळराव हे नागपुरातले अग्रगण्य फलज्योतिषी होते. श्री. राजाभाऊंनी ही विद्याही आपल्या वडिलांकडून संपादन केली होती. घरच्या अनुकूल सांपत्तिक परिस्थितीमुळे, पस्तीस वर्षांपूर्वीच्या त्या जुन्या स्वस्ताईच्या आणि सुबत्तेच्या काळात, राजाभाऊंना आपल्या सगळ्या बौद्धिक हौशी स्वच्छंदाने पुरवून घेता आल्या. इंग्रजी आणि फ्रेंच या दोन भाषांतील प्रावीण्याबरोबरच त्यांनी बंगाली आणि हिन्दी या दोन भारतीय भाषाही अवगत करून घेतल्या, त्यांची बुद्धी विलक्षण तल्लख आणि तरळ होती; व विलासविकृति-प्रचुर फ्रेंच साहित्याच्या व्यासंगामुळे ती अधिकच लहरी आणि लोलंग होऊन गेली. पण, या आपल्या चंचल आणि छांदिष्ट स्वभावामुळे, इतकी बुद्धिमत्ता आणि व्यासंग गाठी असून देखील, ते कोणत्याही व्यवसायात स्थिर होऊ शकले नाहीत; व हौसेने सुरू केलेले अनेक उद्योग अंगलट आल्यामुळे त्यांचे उत्तरायुष्य निरनिराळ्या आर्थिक आपत्तींशी झगडण्यात गेले.

मराठी वाङ्मयात श्री. राजाभाऊंचे नाव जे स्मरणीय होऊन बसेल, ते 'विश्ववाणी' या मासिकाचे संपादक आणि 'वीणा प्रकाशना'चे संस्थापक म्हणून होय. १९३१ साली त्यांनी, श्री. द्वा. वा. घाटे, श्री. बाबुराव चिमोटे, श्री. य. बा. शास्त्री, श्री. धनंजय भिसे प्रभृती आपल्या तरुण मित्रांच्या सहकार्याने, 'विश्ववाणी' हे मासिक काढले. त्यांच्या बहुभाषित्वाला शोभेल असे या मासिकाचे रोचक स्वरूप होते. पण, हा उपक्रम यशस्वी न झाल्यामुळे, १९३२ साली ते मासिक बंद करून त्यांनी 'पैसा वाचनालय' काढले. श्री. राजाभाऊंच्या तरल कल्पनाशक्तीचाच हाही एक खेळ होता. एका व्यक्तीने एक पैसा देऊन एक पुस्तक घ्यावयाचे आणि ते एका दिवसात वाचून परत करावयाचे, अशी ही गंमतीदार योजना होती. ही त्यांची टूम लोकप्रिय झाली. पण टिकाऊ मात्र झाली नाही.

१९३८ साली त्यांनी, श्री. द्वा. वा. घाटे, श्री. बाबूराव चिमोटे आणि श्री. धनंजय भिसे यांच्या सहकारितेने, 'वीणा प्रकाशन' या संस्थेची स्थापना केली. हेही पुन्हा श्री. राजाभाऊ यांच्या धाडसी कल्पकतेचेच अपत्य होय. या संस्थने सुरवातीच्या दोन वर्षातच प्रकाशनाच्या क्षेत्रात इतके यश संपादन केले की, ते पाहून पुण्या-मुंबईच्या प्रकाशकांना देखील हेवा वाटल्याविना राहिला नाही. श्री. माडखोलकर हे या संस्थेचे सल्लागार होते. त्यांच्या सहाय्याने, त्या वेळी लोकप्रियतेच्या शिखरावर असलेले कादंबरीकार प्रो. ना. सी. फडके यांची 'समरभूमी' ही कादंबरी मिळवून, १९३८ च्या जुलैमध्ये 'वीणा प्रकाशना'ने ती अत्यंत आकर्षक स्वरूपात

प्रसिद्ध केली; व नागपुरांतील प्रकाशनाच्या इतिहासात एक प्रकारे विक्रमच करून दाखविला. त्यानंतर, श्री. खांडेकर यांची 'दोन मने', श्री. माडखोलकर यांची 'कांता', पुढे प्रा. फडके यांच्या गृहिणी झालेल्या कु. कमल दीक्षित यांची 'निष्कलंक' इत्यादी कादंबऱ्या झपाट्याने प्रकाशित करून 'वीणा प्रकाशन' अखिल महाराष्ट्रात गाजले. या संस्थेने सुमारे १२५ पुस्तके प्रकाशित केली. पण, अशी ही भरभराटीला आलेली संस्था, श्री. राजाभाऊंचा चंचल स्वभाव, छंदफंद आणि बेहिशेबी कारभार यामुळे, घसरणीला लागून १९५७ साली बंद करण्याचा प्रसंग अखेर त्यांच्यावर आला.

शेवटी श्री. राजाभाऊंनी नागपूर येथील ऑल इंडिया लॉ रिपोर्टर आणि धरमपेठ महाविद्यालय या संस्थात काम केले. अशा रीतीने १९३० पासून १९६० पर्यंत ज्या निरनिराळ्या व्यवसायात त्यांनी, हौसेने म्हणा किंवा गरजेने म्हणा, प्रवेश केला, त्यात वाखाणण्याजोगे यश संपादन केले. मग तो व्यवसाय प्रकाशनाचा असो, टीपाग्रंथांचा असो, कायद्याच्या पुस्तकांचे सूचिग्रंथ तयार करण्याचा असो किंवा इंग्रजी साहित्याचे अध्यापन करण्याचा असो.

असा हा बुद्धिमान, कल्पक आणि कष्टाळू कार्यकर्ता अकाली मृत्युमुखी पडावा व त्याचा व्यासंग, बहुभाषाप्रवीण्य आणि कर्तबगारी यांचा लाभ विदर्भाला योग्य प्रमाणात होऊ नये, हे दुर्दैव होय. त्यांच्या पत्नी श्रीमती वीणाबाई आणि दोन कन्या यांच्यावर ओढवलेल्या या दुःखशोकाच्या प्रसंगात आम्ही सहभागी आहोत.

* * *

'Lyric' या इंग्रजी काव्यप्रकाराच्या अनुषंगाने स्फुरलेले मराठीतील भावकाव्य !

'आलोचने'चा नवा अंक हाताशी आला आहे. 'आलोचने'च्या साहित्यिक परंपरेशी साजेसाच हा अंक आहे. इंग्रजी भाषेच्या अभ्यसनामुळे पाश्चात्य साहित्यप्रकार मराठीत जसे येऊ लागले, तशी त्यांची साहित्यिक प्रकृती आणि निदान शोधण्याच्या उद्योगासही काही साहित्यिकांची लेखणी सरसावणे हे क्रमप्राप्त होते. लघुकथा, एकांकिका, लघुनिबंध, नाट्यछटा इत्यादी नवनवीन साहित्याची व्यवच्छेदक लक्षणे कोणती ह्यावर ऊहापोह होऊ लागला. इंग्रजीच्या विविध काव्य-प्रकारांनी प्रभावित होऊन जी 'अल्पाक्षर स्व-भावकविता' आपल्याकडे निर्माण होऊ लागली, तिचा परामर्श नि तिची भलावण 'काव्य आणि काव्योदय'कार प्रि. वा. व. पटवर्धन यांच्यापासून अनेकांनी केली होती. रविकिरण-मंडळाच्या सदस्यांनी तिच्यावर बरेच हितगुज केले. ह्या शतकाच्या पूर्वार्धात जे विवेचन पूर्वसूरींनी केले, त्या पुढील प्रगतीच्या पाऊलखुणा या अंकात उमटल्या आहेत. हे विवेचन विविध अंगांनी झाले असल्यामुळे, या शतकाच्या उत्तरार्धातील अभ्यासाची नांदी ठरावी, एवढे व्यापक विवेचन ह्या अंकात खास प्रविष्ट झाले आहे संकलनापेक्षा विवेचकतेवर भर ठेवण्याचा यत्नही साधला आहे, असे म्हणणे उचित ठरेल. 'भावगीत' शब्द फार बदनाम झाला आहे, असे प्रा. दावतर म्हणतात. म्हणून त्यांनी अंकभर साऱ्या लेखांतून 'गीतकाव्य' हा शब्द खेळवला आहे. (अर्थात् सर्व लेखकांची अनुमती घेऊनच !) परंतु, गै आणि कु ह्या गायन करणे ह्या धात्वर्थापासून 'गीतकाव्य' असा सामासिक शब्द, गीत आणि काव्य ह्यांचे आजचे वेगळाले अर्थ लक्षात घेतले असताना, का वापरला असावा ? त्याच शब्दाची चलती व्हावी ह्याबद्दल तमाम लेखकांचे एकमत झाले असावे, असे वाटते. 'भावगीत' हा शब्द अर्थवाही आणि सुटसुटीत आहे. असो.

अंक संग्राह्य आणि विचाराला चालना देणारा आहे, याबद्दल श्री. दावतर आणि त्यांचे सहकारी ह्यांचे अभिनंदन. प्रतिशब्दचर्चेवरील लेखांतील आदिकवीच्या प्रथम सहजोद्गाराला मुद्राराक्षसाचा जबरदस्त तडाखा बसला आहे. इंग्रजी अवतरणे आवर्जून देत असताना संस्कृतकडेही अवधान द्यावे. अर्थात् मुद्राराक्षसासमोर सारेच नतमस्तक असतात, हा भाग वेगळा !

'Lyric' संबंधी 'आलोचन'करांनी रसिक वाचक व टीकाकारांसमोर जो दृष्टिकोन या अंकाच्या रूपाने ठेवला, त्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.

*   *   *

मराठी वाङमय–कोश

मुंबईच्या मराठी संशोधन मंडळाने 'मराठी वाङमय–कोश' तयार करण्याची योजना हाती घेतली असून, त्यासाठी मंडळाचे संचालक प्रा. रा. भि. जोशी यांनी (१) प्रा. वा. ल. कुळकर्णी, (२) श्री. गं. दे. खानोलकर, (३) डॉ. स. गं. मालशे आणि (४) स्वतः प्रा. जोशी यांचे संपादक मंडळ नेमले आहे. मराठीत अशा प्रकारचा कोश अद्याप झालेला नाही. म्हणून या उपक्रमाबद्दल आम्ही मंडळाचे अभिनंदन करतो.

या कोशाचे पाचशे पृष्ठांचा एक असे पाच–सहा खंड होतील, असा संचालकांचा अंदाज आहे. त्याच्या स्वरूपाची माहिती देणारे जे पत्रक मंडळातर्फे प्रसिद्ध करण्यात आलेले आहे, त्यावरून हा कोश कोणत्या प्रकारचा होईल, याची कल्पना येते. मात्र हे पत्रक पाहून एक इशारा आताच देणे अवश्य वाटते. तो असा की, मराठीमध्ये जी अनेक शब्दांची अक्षरवटिका (Spelling) अशुद्ध लिहिण्याची प्रथा अलिकडे जोरात आहे, ती निदान या कोशात तरी घुसणार नाही, अशी दक्षता संपादक मंडळाने घेतली पाहिजे. कारण, या पत्रकाच्या ७ व्या कलमात 'इस्राएली' हा शुद्ध शब्द 'इस्त्राएली' असा, या अलिकडील प्रथेनुसार, अशुद्ध छापला आहे ! हा "प्रथमग्रासे मक्षिकापातः"च होय. त्याचप्रमाणे वाङमय आणि कोश या दोन शब्दात 'डॅश' देण्याचीही गरज दिसत नाही.

याच्या जोडीला आणखीही एक सूचना करणे अत्यवश्य वाटते. ती अशी की, या कोशात माहिती, घटना आणि व्यक्तिपरिचय देताना ती सर्व कालक्रमवार देण्यात यावीत; शक्य तोवर निश्चित तारखा देण्याचा प्रयत्न व्हावा; व व्यक्तींची नावेही संपूर्ण देण्यात यावीत. सामान्यतः मराठीतील चरित्रग्रंथात आणि चरित्र-कोशात सुद्धा कालक्रम व्यवस्थित पाळलेला नसतो; निश्चित तारखा बहुधा दिलेल्या नसतात; व्यक्तिनामेही पूर्ण दिलेली नसतात; व महत्त्वाची विधाने देखील अनेकदा मोघम केलेली असतात. केळकरकृत 'टिळक-चरित्रा'त हे दोष किती प्रमाणात आहेत, हे सांगावयाला नको. कै. वरेरकर यांच्यापासून तो प्रा. फडके यांच्यापर्यंत ज्या अनेक विख्यात मराठी लेखकांनी आपली आत्मचरित्रे लिहिलेली आहेत, त्यातही हे दोष फार मोठ्या प्रमाणात आढळतील. स्वतःचे चरित्र लिहितानासुद्धा जबाबदार व्यक्तींनी निश्चित तारखा देऊ नयेत, हे आश्चर्य नव्हे काय ? पण मराठीत काल–नाम–निश्चितीची चाडच मुळी नाही. "कालक्रम हे इतिहासाचे डोळे आहेत," (Chronology is an eye of history). हे सूत्र मुळी आमच्या जणु डोळ्यांसमोरच नाही. मराठी नावाची आद्याक्षरे ही विशेषनामांचा निश्चित बोध करणारी नसतात, हेही लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून, या सगळ्या बाबतीत हा कोश निर्दोष आणि प्रमाण होईल, याबद्दल जास्तीत जास्त दक्षता घ्यावयाला हवी.

या कोशाच्या रचनेच्या बाबतीतही आधुनिक कोशरचना शास्त्रात सर्वमान्य झालेले काही संकेत अगत्याने पाळले जातील, अशी अपेक्षा आहे. त्यांपैकी पहिला संकेत हा की, कोश हा माहितीचे अद्ययावत् संकलन करणारा असावा; मतप्रदर्शन करणारा असू नये. सर पॉल हार्वे यांनी संपादन केलेल्या "दि ऑक्सफोर्ड कंपॅनियन टू इंग्लिश लिटरेचर" या कोशाच्या प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, "ज्यांना ऐतिहासिक आणि वर्तमान महत्त्व आहे, अशा इंग्रजी ग्रंथकारांची नामावली, वाङ्मयकृती आणि साहित्यसंस्था यांची माहिती अकारविल्हेने दिलेली आहे ... मौलिक रसग्रहणाचा प्रयत्न केलेला नाही. समकालीन अभिप्राय हे चंचल आणि

विकारप्रेरित असतात, हे कुप्रसिद्ध आहे." दुसरी गोष्ट ही की, साहित्यात सामान्यतः आढळणारे जे संदर्भ इंग्रजी ग्रंथकार आणि त्यांच्या कृती यात विशद केलेले नसतात, त्यांचेही स्पष्टीकरण या कोशात दिलेले आहे." (........ two main elements are included, in alphabetical arrangement. The one is a list of English authors, literary works and literary societies which have historical or present importance.......... Original literary appreciation is not attempted, ... Contemporary judgment is notoriously fickle and tends to be impassioned. The other element is the explanation of allusions commonly met with, or likely to be met with, in English literature, in so far as they are not covered by the articles on English authors and works). ही दोन्हीही सूत्रे या कोशाच्या संपादकांनी ध्यानात घेणे इष्ट होईल., त्यावरोबरच "एन्सायक्लोपीडिया ऑफ लिटरेचर" या कोशाच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत, त्याचे संपादक डॉ. स्टीनबर्ग यांनी जे एक सूत्र मूलभूत म्हणून सांगितलेले आहे, तेही लक्षात घ्यावयाला हवे. ते सूत्र असे आहे की, "ज्या लिखाणांना, निदान अंशतः तरी, घाट आणि आशय या दोन्ही बाबतीत, साहित्यिक मूल्य असेल किंवा हे मूल्य नसले तरी देखील ज्यांचा प्रभाव प्रत्यक्षाप्रत्यक्ष वाङ्मयावर पडलेला असेल, ते वाङ्मय असे या कोशापुरते गृहीत धरण्यात आलेले आहे." (Literature, for the purpose of this book, has been taken as comprising those writings which, at least partly, in form or content, have an aesthetic value; or which, though themselves lacking in this respect, have had an influence, direct or indirect, upon literary climate and production). मराठीत कोशरचना करताना किंवा वाङ्मयाचे इतिहास लिहिताना ही मूलभूत प्रमेये पाळल्याचे बहुधा आढळणार नाही.

म्हणून, हा कोश सर्व दृष्टींनी परिपूर्ण व्हावा आणि त्याला उपयुक्तता आणि प्रामाण्य प्राप्त व्हावे, या उद्देशाने त्याच्या विद्वान् संपादक–मंडळाला या सूचना केलेल्या आहेत. विदर्भातील ग्रंथ, ग्रंथकार आणि वाङ्मय यांची माहिती मिळवण्याच्या बाबतीत विदर्भ साहित्य संघ संपादक मंडळाला तत्परतेने सहकार्य देईल. विदर्भ, मराठवाडा आणि कोकण हे महाराष्ट्राचे असे तीन विभाग आहेत की, कोणत्याही उपक्रमात त्यांच्याकडे जरूर तितके लक्ष देण्यात येत नाही. तसा प्रकार या कोशाच्या बाबतीत तरी होणार नाही, अशी आम्हाला उमेद वाटते.

—संपादक

संघवार्ता

मा. नो. गलगलीकर
सरचिटणीस

सांस्कृतिक समिती श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त व्याख्यान

वि. सा. संघाच्या सांस्कृतिक समितीतर्फे मंगळवार दि. २ सप्टेंबर १९६९ रोजी सायंकाळी ६–३० वाजता श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त प्रा. श्रीमती सिंधुताई नावलेकर यांचे "श्रीकृष्ण चरित्रावरील आधुनिक भाष्ये" या विषयावर गडकरी सभागृहात भाषण झाले.

संगीत केंद्राचा वर्धापन दिन

वि. सा. संघाच्या सांस्कृतिक समिती अंतर्गत असलेल्या संगीत केंद्राच्या (स्वर मंडळाचा) वर्धापन दिनानिमित्त गुरुवार दि. ४ सप्टेंबर १९६९ रोजी रात्री ८–३० वाजता गडकरी सभागृहात संगीत सभेचे आयोजन केले होते. यावेळी श्री. वसंत अंधारे यांचे गायन आणि श्री. यशवंत देव यांचे सतार वादनाचा कार्यक्रम झाला. यावेळी असंख्य संगीत प्रेमी उपस्थित होते.

श्री. वसंतराव शब्दे यांना निरोप

नागपूर येथील केंद्रीय ग्रंथालयाचे उपसंचालक श्री. वसंतराव शब्दे यांची बदली मुंबईस झाल्यामुळे वि. सा. संघातर्फे त्यांना बुधवार दि. ३ सप्टेंबर १९६९ रोजी सायंकाळी ६–३० वाजता कौटुंबिक स्वरूपाचा निरोप दिला.

यावेळी संस्थेचे सभासद व कार्यकर्ते उपस्थित होते.

श्रीमंत रावराजा रावसाहेब राजवाडे आणि श्रीमंत सौ. इंदुमती राजे राजवाडे यांची भेट

विदर्भ साहित्य संघाला बुधवार दि. १० सप्टेंबर १९६९ रोजी सायंकाळी ६–०० वाजता श्रीमंत रावराजा रावसाहेब राजवाडे आणि श्रीमंत सौ. इंदुमती राजे राजवाडे यांनी भेट दिली.

संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी पाहुण्यांचे पुष्पहार घालून स्वागत केले. सरचिटणीस श्री. मा. नो. गलगलीकर यांनी उपस्थित सभासद व कार्यकर्त्यांशी पाहुण्यांचा परिचय करून दिला. संस्थेची वास्तू श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय, कलाकेंद्र बालचित्रकला विभाग पाहून पाहुण्यांनी आनंद व्यक्त केला.

कै. पु. बा. काळे आणि कै. सौ. अनसूयाबाई काळे यांच्या छायाचित्राचे अनावरण

विदर्भ साहित्य संघाच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे प्रमुख दाते, नागपूरचे सुप्रसिद्ध उद्योगपती कै. श्रीमंत पुरुषोत्तम बाळकृष्ण काळे आणि त्यांच्या पत्नी नागपूरातील सामाजिक कार्यकर्त्या कै. सौ. अनसूयाबाई काळे यांची छायाचित्रे श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयात लावण्यासाठी त्यांचे चिरंजीव श्री. आनंद पुरुषोत्तम काळे आणि श्री. बाळकृष्ण पुरुषोत्तम काळे यांच्याकडून विदर्भ साहित्य संघाला मिळाली.

या छायाचित्रांच्या अनावरणाचा समारंभ महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री बॅ. शेषरावजी वानखेडे यांच्या शुभ हस्ते रविवार दि. ७ सप्टेंबर १९६९ रोजी सायंकाळी ६–३० वाजता धनवटे रंगमंदिरात झाला.

सुरुवातीला संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. नंतर अर्थमंत्री बॅ. शेषरावजी वानखेडे यांनी छायाचित्रांचे अनावरण केले. पाहुण्यांच्या भाषणानंतर सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी सर्वांचे आभार मानले.

कै. न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा

विदर्भ साहित्य संघ आणि वक्तृत्वोत्तेजक सभा, पुणे यांच्या वतीने यावर्षी शनिवार दि. २० व रविवार दि. २१ सप्टेंबर १९६९ रोजी सायंकाळी ६ वाजता धनवटे रंगमंदिरात कै. न्या. मू. म. गो. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

'महाराष्ट्रातील सहकारी चळवळ मुळीच फसलेली नाही' असा वादस्पर्धेचा विषय यावेळी ठेवण्यात आला होता. या स्पर्धेत एकूण १७ महाविद्यालयांनी भाग घेतला. यात बाहेरगावच्या ६ महाविद्यालयांचा समावेश आहे. या स्पर्धेत विश्वेश्वरैय्या रिजनल कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, नागपूर या महाविद्यालयाला **फिरती रौप्य ढाल** मिळाली.

वैयक्तिक प्रथम क्रमांकाचे पारितोषिक श्री. गिरीश वेलणकर, एस्. एफ्. एस्. कॉलेज, नागपूर यांना व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक विश्वेश्वरैय्या रिजनल कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, नागपूर या महाविद्यालयातील श्री. रविंद परेतकर यांना मिळाले.

६० टक्के व त्याहून जास्त गुण मिळाल्याबद्दल श्री. गिरीश वेलणकर, श्री. रवींद्र परेतकर, श्री. मधुकर अ. जोशी, श्री. उमेश लाभे, श्री. राजशेखर द्रवीड, श्री. आय. के. चोपडे, श्री. प्रेम-कुमार जामखेडकर व श्री. विजय कृ. देशपांडे या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

पारितोषिक व प्रमाणपत्र वितरणसमारंभ प्रमुख पाहुणे न्या. मू. श्री. एम्. एन्. चांदूरकर यांच्या हस्ते करण्यात आला. वादस्पर्धेच्या वेळी अध्यक्षस्थानी सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर हे होते.

या स्पर्धेचे वेळी दोनही दिवस परीक्षक म्हणून सर्वश्री श्री. त्र्यं. खं. गंधे, वासुदेवराव चोरघडे व प्रभाकरराव चाफेकर यांनी सहकार्य दिले, याबद्दल त्यांचे व समारंभाचे अध्यक्ष न्या. मू. श्री. एम् एन्. चांदूरकर यांचे वि. सा. संघ अत्यंत आभारी आहे.

कला केंद्र समिती

'कला केंद्र' समिती, वि. सा. संघ आणि भारत सोवियत सांस्कृतिक संघ, नागपूर यांच्यावतीने दि. ७-९-६९ रोजी बालचित्र स्पर्धा आयोजित केली होती. त्यात ८६ बालकला-कारांनी भाग घेऊन 'माझे महान स्वप्न' या विषयावर कलाकृती सादर केल्या. याप्रसंगी डॉ. सुनील सुभेदार, प्राचार्य वसंतराव देहाडराय, चित्रकला महाविद्यालय, नागपूर, श्री. जी. टी. उपाख्य बापूसाहेब परांडे, 'हितवाद' आणि श्री. एम्. टी. उपाख्य अप्पासाहेब पाडळकर, 'नागपूर टॉईम्स' यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम केले. निवडक २५ कलाकृती अंतिम स्पर्धेसाठी दिल्ली येथे पाठविण्यात आल्या.

कला केंद्र प्रदर्शन कक्ष उभारण्यात प्रसिद्ध छायाचित्रकार आणि कलारसिक श्री. जयंतराव कोलते यांनी अत्यंत श्रम घेतले. कलाकार श्री. प्रकाश कावळे आणि श्री. प्रकाश कानिटकर यांनी त्यांना सहाय्य केले. त्याबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे. दि. २५-९-६९ रोजी सायंकाळी श्री. मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ यांनी कला-प्रदर्शन केंद्रात सरस्वती पूजन करून त्याचे उद्‌घाटन केले.